म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ७८५०

उमिव्ह - ४४६

श्री निवृत्तिराम

सत्कार्योत्तेजक सभा–धुळें

[ श्रीरामदास आणि रामदासी मासिक पुस्तकांतून प्रसिद्ध झालेला ]

श्री

# रामदास आणि रामदासी

## भाग चवदावा

सर दुसरा ] [ मणि तिसरा

# श्री निवृत्तिराम

सद्गुरुचरणीं निवृत्ति वेणी । निवृत्तिरामग्रंथश्रवणीं ।
श्रवणमननें मानवी प्राणी । पावन होती सत्संगें ॥

हा ग्रन्थ शंकर श्रीकृष्ण देव यांनीं धुळें येथें आपल्या
श्रीआत्माराम छापखान्यांत छापून
धुळें येथें प्रसिद्ध केला.

सर्व हक्क राखून ठेविले आहेत.

१८३८ कार्तिक शुद्ध ११

१९१६

किंमत एक रुपया

श्री ग्रंथ संग्रहालय
नं. ...
ता. ...
ठाणे.

# श्री निवृत्तिराम

## अनुक्रमणिका

**प्रस्तावना**:—ग्रंथकर्तृत्व—ग्रंथस्वरूपकथन—निवृत्तिरामरहस्य—ग्रंथसंपादन.

**चित्रणिलाचा खुलासा व श्रीसद्गुरुस्तवन**

**समास १ ला**—सद्गुरुसमर्थआख्यान पृष्ठें १–९

ओंव्या १–४ श्रीगणेशवंदन, ५–८ सरस्वतिवंदन, ९–१४ गुरुस्तवन, १५–१८ कुलदैवत–राम–वंदन, १९–२३ संतसाधुवंदन, २४–३९ कथानुसंधान-ग्रंथनाम–गुरुपरंपरा–रामदासअवतार–वर्णन, ४०–५६ श्रीरामदासचरित्र, ५७–७४ समर्थ–हनुमान–भेट, ७५ चांफळवर्णन, ७६–७७ परळीवर्णन, ७८–८९ समर्थकार्यवर्णन, ९०–९२ श्रोत्यांची विनंति, ९३–१०३ उत्तर–ग्रंथाचें प्रासादिकत्व–तो करण्याची गुरूची आज्ञा–रचनेचें भविष्य, १०४–११० समासाचा उपसंहार.

**समास २ रा**—सद्गुरुकृपास्तवन पृष्ठें ९–१३

ओंव्या १–१२ जगदंबास्तवन, १३–१९ जगदंबा आणि रामरूप परमात्मा एकच, २०–२७ अंबाकृपेचें माहात्म्य, २८–३२ अंबेची स्तुति करणें अशक्य-ग्रंथाविषयीं प्रार्थना, ३३–३४ अंबेचें अभिवचन, ३५–४२ सद्गुरुवर्णन आणि समासाचा उपसंहार.

**समास ३ रा**—ब्रह्मानुभवनिरूपण पृष्ठें १३–१६

ओंव्या १–५ सद्गुरुस्तवन, ६ गुरुभक्तीनें गायत्रीद्वारा ब्राह्मण्यप्राप्ति, ७–१४ गायत्रीवर्णन, १५–१६ गायत्रीमहिमा, १७ वेदांत (कर्मकांडांत) अप्रत्यक्ष स्वर्गादिकांचें ज्ञान, पण वेदान्तांत प्रत्यक्ष ब्रह्मज्ञान, १८–२० ब्रह्मस्वरूप वेदाच्या शब्दाच्या पलीकडे, २१–२४ ब्रह्मज्ञानानें निवृत्ति झाल्यावर संप्रदाय चालावा कसा? २५–२६ या प्रश्नाला उत्तर, २७–३२ उपदेशाचा अधिकार कोणाला, ३३–३४ उत्तरानें समाधान, ३५–३९ आत्मनिष्ठाच्या समाधानाचा प्रकार, ४०–४४ सद्गुरुभजनाचें फळ आणि समासाचा उपसंहार.

**समास ४ था**—ग्रंथानुभवकथन पृष्ठें १६–२१

ओंव्या १–५ ग्रंथरचनेविषयीं गुरुप्रार्थना, ६–९ निवृत्तिस्थितिवर्णन, १०–३२ निवृत्ति कशी झाली, ३३ निवृत्तिराम करण्याची गुरूची आज्ञा, ३४–३७ निवृत्ति झाली म्हटल्यानें ती होत नाहीं, ३८–४२ गुरुकृपेचें हें ज्ञान

परंपरागत आहे, ४३–४८ श्रुतिस्मृतिगीतादिकांत हें च आहे, ४९–५३ गुरु-संत महिमा, ५४–६१ निवृत्तिरामाची अनुक्रमणिका, ६२–६३ निवृत्ति-शब्दार्थ, ६४–६५ समासाचा उपसंहार.

**समास ५ वा**—मनमायानिवृत्ति पृष्ठें २१–२७

ओंव्या १–८ गुरुप्रार्थना, ९–२२ मनमायानिवृत्तीचा प्रकार, २३–४० मनचंद्र आख्यान, ४१–५९ मायारमा आख्यान, ६०–६१ निवृत्तिस्थितिवर्णन, ६२–६७ नेति वाक्यानें आत्मस्वरूपवर्णन, ६८–७३ समासाचा उपसंहार.

**समास ६ वा**—अहंमायानिवृत्ति. पृष्ठें २७–३२

ओंव्या १–५ प्रार्थना, ६–१२ ब्रह्मस्वरूप-मायेचा विस्तार, १३–१५ अवताराचें कारण, १६–२७ राहुकथेचें स्पष्टीकरण, २८–४३ अहंमायानिवृत्तीचा प्रकार, ४४–६९ स्कंधआख्यान, ७०—७२ समासाचा उपसंहार.

**समास ७ वा**—अहंममतानिवृत्ति पृष्ठें ३२–३९

ओंव्या १–१२ कार्तिकस्वामिमहात्म्य, १३–१४ सद्गुरु कार्तिकस्वामीहून श्रेष्ठ, १५–१९ संतवर्णन, २० श्रोत्यांची विनंति, २१–५५ पक्षिरूप वसिष्ठ–विश्वामित्रांचें युद्ध, हाहाकार, ब्रह्मा विष्णु महेश तेथें जातात, ब्रह्मदेवाचा त्यांना बोध, त्यांचा संवाद, ते ताळ्यावर येतात, ५६–५९ कथेचें तात्पर्य, ६०–९१ विश्वामित्र आणि रावण यांच्या कथानुसंधानानें अहंममतानिवृत्तीचा प्रकार, ९२–९४ समासाचा उपसंहार.

**समास ८ वा**—नवविधाभक्तियोगनिवृत्ति पृष्ठें ३९–४८

ओंव्या १–११ गुरुस्तुति—ब्रह्मप्राप्तीला साधन भक्ति, १२–६४ राम कौसल्येच्या हरिमंदिरांत येतात, मंदिरवर्णन, रामस्वरूपवर्णन, रामकौसल्यासंवाद, कौसल्येला विश्वरूपदर्शन, ६५—६९ कथेची परंपरा, ७०–७१ गुरुप्रार्थना, ७२–१०४ नवविधाभक्तियोगानें निवृत्तीचा प्रकार, १०५–१११ भक्तिमाहात्म्य, ११२–११३ समासाचा उपसंहार.

**समास ९ वा**—ज्ञानयोगनिवृत्ति पृष्ठें ४८—५६

ओंव्या १–५ गुरुप्रार्थना, ६–१६ शिवाचा स्कंध-गजाननाला बोध, १७–३८ याज्ञवल्क्याचा जनकाला बोध, ३९–४४ जनकाच्या ज्ञानाचा प्रकार, ४५–५२ ज्ञान झालें तरी राज्यत्याग करावयास नको, ५३–५७ सीतास्वयंवराचें स्पष्टीकरण, ५८–६० सगुणानें निर्गुणप्राप्ति, ६१–६६ इतर दर्शनें वेदान्ताचीं उपकरणें, ६७–७४ ब्रह्मस्वरूपाविषयीं व्याकरणाचा दृष्टान्त, ७५–८३ सीतास्वयंवरावरील आणखी रूपक, ८४–९१ जनकावरील भोंदूपणाच्या आक्षेपाचें खंडन, ९२–९९ सद्गुरुभक्तियुक्तज्ञानाचें माहात्म्य, १००–१०१ समासाचा उपसंहार.

**समास १० वा**—वैराग्ययोगनिवृत्ति पृष्ठें ५६–६१

ओंव्या १–४ गुरुस्तुति, ५–१७ वैराग्यानें निवृत्ति कशी होते, १८–६० व्यासपुत्र शुकाचें आख्यान, जन्मतःच वैराग्य, व्यास त्याला ज्ञानप्राप्त्यर्थ जनकाकडे पाठवितो, संग टाक असें जनक त्याला सांगतो, अहंकारलोप म्हणजेच खरें वैराग्य, शुक–जनक–भेट, शुकाला खरें ज्ञान होतें, ६१–६४ सत्संगाचें माहात्म्य आणि समासाचा उपसंहार.

**समास ११ वा**—भवोपसर्गनिवृत्ति पृष्ठें ६१–६६

ओंव्या १–३ गुरुस्तुति, ४–२३ पुष्करिणीयात्रावर्णन–,वराहस्वामीचें वैभव, महाप्रसाद न घेतल्याचा दोष, २४–७१ भवोपसर्गनिवृत्तीचा प्रकार आणि समासाचा उपसंहार.

**समास १२ वा**—सर्वसंकल्पनिवृत्ति पृष्ठें ६६–७०

ओंव्या १–२४ श्रीशैल्यस्वामीस्तवन, श्रीशैल्यवर्णन, शिवमहिमा, २५–२९ संकल्पाचें स्वरूप, ३०–३५ संकल्पनिवृत्तीचा प्रकार, ३६–४० याविषयीं कथानक, ४१–४८ भगवद्भजन माहात्म्य, गुरुप्रताप, ४९–५० समासाचा उपसंहार.

**समास १३ वा**—द्वासुपर्णानिवृत्ति पृष्ठें ७०–७५

ओंव्या १–२ सद्गुरुस्तवन, ३–४ द्वासुपर्णानिवृत्तिकथनाविषयीं आज्ञा, ५–१० संसारवृक्ष आणि त्यावरील पक्षी यांचें स्वरूप, ११–१४ शिवपक्ष्याचा जीवपक्ष्याला उपदेश, १५–३८ जीवपक्ष्याचें उत्तर, ३९–६१ शिवपक्ष्याचें प्रत्युत्तर, ६२–६३ जीवपक्ष्याचें शिवपक्ष्याशीं ऐक्य, ६४–६५ समासाचा उपसंहार.

**समास १४ वा**—अभ्यासयोगनिवृत्ति पृष्ठें ७५–८३

ओंव्या १–५ कपिलरूप सद्गुरूचें स्तवन, ६–११ प्रास्ताविक, १२–१४ अभ्यासयोगमहत्त्वरूप पूर्वपक्ष, १५–२४ त्याचा उत्तरपक्ष, २५–३१ अभ्यासयोगाचें वर्णन, ३२–३६ अभ्यासयोगाचे दोष, ३७–६४ राजयोगवर्णन, ६५–७६ अभ्यासयोगाहून भक्तियोग श्रेष्ठ, ७७–८७ एका हटयोग्याची कथा, ८८–९० सहजसमाधिवर्णन, ९०–९३ समासाचा उपसंहार.

**समास १५ वा**—स्वर्गकामनिवृत्ति पृष्ठें ८३–८७

ओंव्या १–७ सद्गुरुस्तवन आणि प्रार्थना, ८–५१ स्वर्गकामनिवृत्तीचा प्रकार, दक्षकथा, यज्ञांतील पशुहत्या, द्रौपदीची कथा, नहुषकथा, पृथुकथा, बळीची कथा, निष्कामकर्म, ५२–५७ रामवसिष्ठसंवाद, ५८–६४ रामकथामाहात्म्य, ६५–६६ उपनिषदांतील ज्ञान, ६७–६८ समासाचा उपसंहार.

**समास १६ वा**—ब्रह्मगोळनिवृत्ति पृष्ठें ८८–९४

ओंव्या १–६ सद्गुरुस्तवन आणि विज्ञप्ति, ७–८ श्रोत्यांची विनंति, ९–६५ ब्रह्मगोळाचें वर्णन, ६६–८३ ब्रह्मगोळ निवृत्तीचा प्रकार, ८४–८५ समासाचा उपसंहार.

**समास १७ वा—सृष्टिक्रमनिवृत्ति पृष्ठें ९४–१०१**

ओव्या १ सद्गुरुप्रार्थना, २–४ श्रोत्यांचा प्रश्न, ५ त्याला उत्तर, ६ श्रोत्यांची पृच्छा, ७–१२ तिला उत्तर, निष्कामकर्मयोग, १३–१७ श्रोत्यांचा प्रश्न, १८–२२ सृष्टिक्रमें निवृत्तीचा प्रकार, २३–२४ श्रोत्यांचा प्रश्न, २५–७९ सृष्टिक्रमाचें वर्णन, भागवताच्या ( स्कंध ४,५ ) आधारें कर्दमापासून झालेल्या सृष्टीचें वर्णन, ८०–८१ गुणावर वर्णविभाग, ८२–८४ सकामनिष्कामकर्म—विवरण, ८५–९९ संतसंगमहिमा, सद्गुरुमाहात्म्य, १००–१०१ समासाचा उपसंहार.

**समास १८ वा—भेदाभेदनिवृत्ति पृष्ठें १०१–१०७**

ओव्या १—४ सद्गुरुप्रार्थना, ५—२३ भेदाभेदनिवृत्तीचा प्रकार, २४—२६ श्रोत्यांच्या शंका, २७—५१ त्यांची फेड, ५२—५६ निवृत्तिबोधाचीं उदाहरणें, ५७—७३ निवृत्तीचा उपदेश, ७४–७५ समासाचा उपसंहार.

**समास १९ वा—स्वात्मबोधनिवृत्ति पृष्ठें १०७–१२०**

ओव्या १–७ सद्गुरुस्तवन, प्रार्थना आणि श्रोत्यांना विनंति, ८–२०१ दासबोधांत आलेल्या विविध विषयांवर प्रश्नोत्तरें, २०२–२०३ समासाचा उपसंहार.

**समास २० वा—मूळमायायोगनिवृत्ति पृष्ठें १२१–१३०**

ओव्या १–२ सद्गुरुप्रार्थना, ३–७ श्रोत्यांचा प्रश्न, ८–१३५ मूळमायानिवृत्तिकथन, ( वसिष्ठाचा भरतास उपदेश १४–२९, राम-भरतांची चित्रकूटीं भेट ३०–३४, रामाचा लक्ष्मणाला उपदेश ३५–७८, हनुमंताला सीतेकडून उपदेश, रामगीता ७९–१३१, सर्व कथांचा उपसंहार १३१–१३५), १३६–१३९ समासाचा उपसंहार.

**समास २१ वा—पंचीकरणयोगनिवृत्ति पृष्ठें १३०–१३८**

ओव्या १–७ सद्गुरुस्तवन आणि पंचीकरणयोगनिवृत्तिकथनाविषयीं प्रार्थना, ८–१६ रामायणकथेवरील रूपक, १७–२२ अकरा संख्येचा उलगडा, २३–५८ बिभीषणाचा रामाला प्रश्न व रामाचा त्याला उपदेश, ५९–६० बिभीषणाची पुनः पृच्छा, ६१—७४ षोडशमहावाक्यें व त्यांचा अर्थ, ७५—९३ भागवतधर्मकथन, ९४—९५ मारुतीस वरदान, ९६—९८ बिभीषणावर अनुग्रह, ९९-१०५ बिभीषणाची प्रार्थना, १०६—१०८ समासाचा उपसंहार.

**समास २२ वा—सर्वसिद्धान्तनिवृत्ति पृष्ठें १३८–१५०**

ओव्या १–९ सद्गुरुस्तवन आणि सर्वसिद्धांतनिवृत्तिकथनाविषयीं प्रार्थना, १०–१२३ सिद्धांतनिरूपण, १२४ श्रोत्यांचा सद्गुरुस्वरूपाविषयीं प्रश्न, १२५–१३५ वक्त्याचें उत्तर, १३६—१३७ सद्गुरुवरची जबाबदारी, १३८–१६० निवृत्तिविवेचन, वृत्तीशिवाय निवृत्ति नाहीं, १६१–१७२ सिंहावलोकन, १७३–१८७ दासबोधमाहात्म्य, १८८ ग्रंथसमाप्ति, १८९–१९० उपसंहार.

ग्र. क्र. ४८००

दा. क्र. 9328

॥ श्रीराम ॥

# श्री निवृत्तिराम

## प्रस्तावना

### ( १ ) ग्रंथकर्तृत्व

गिरिधरांच्या कृतींपैकीं हा दुसरा महत्त्वाचा ग्रंथ वाचकांस सादर केला आहे. गिरिधरांची योग्यता केवढी, त्यांचें ग्रंथकर्तृत्व किती विस्तृत, त्यांच्या चरित्राचें इतिकर्तव्य आणि सार काय इत्यादि गोष्टी श्रीसमर्थप्रतापाच्या प्रस्तावनेंत येऊन गेल्या असल्यामुळें त्यांची पुनरावृत्ति करण्याचें येथें कारण नाहीं. तथापि प्रस्तुत **निवृत्तिराम** ग्रंथासंबंधाचें विवेचन करतांना त्याचा उपयोग असल्यामुळें त्याचें तात्पर्य थोडक्यांत सांगणें इष्ट दिसतें.

गिरिधरांचा जन्म केव्हां झाला तें निश्चित समजत नाहीं. परंतु समर्थांच्या भेटीची, तशी च समर्थांच्या आज्ञेवरून त्यांच्यापुढें कीर्तन केल्याची हकीकत श्रीस्वामीदर्शन नांवाच्या ग्रंथांत ( श्रीसमर्थप्रताप प्रस्तावना पान १४ ) त्यांनीं स्वतः च दिली आहे; तीवरून पाहतां समर्थांच्या प्रयाणकालीं ( शके १६०३ दुर्मतिनाम संवत्सर ) त्यांचें वय पंचविशीच्या सुमारास असावें असें दिसतें. त्यांचे विविध विषयांवर सुमारें ४० ग्रंथ आहेत. एकनिष्ठपणें सांप्रदायिक व्रत चालवून शके १६५१ वैशाख शुद्ध अष्टमी शुक्रवार या दिवशीं श्रीगिरिधरांनीं समाधि घेतली. त्यांची समाधि बीडास असून गुरुपरंपरा समर्थ श्रीरामदास---वेणाबाई---बाइयाबाई---गिरिधर अशी आहे.

निवृत्तिराम ग्रंथ साग्र वाचून पाहिला तरी त्यांत त्याच्या कर्त्याचें नांव स्पष्टपणें कोठें च आढळत नाहीं. प्रत्येक समासाच्या उपसंहारांत जो मजकूर आहे त्यांत सर्वत्र ' निवृत्तिवेणी ' अशा मोघम नांवाचा च उल्लेख आहे. यास्तव हा ग्रंथ गिरिधरांचा च कशावरून याचें थोडें स्पष्टीकरण केलें पाहिजे.

पहिल्या समासांत ' निवृत्तिरामग्रंथकथन । सर्वज्ञें केलें पाहिजे '॥ १।३।५ या श्रोत्यांच्या प्रश्नाला जें उत्तर दिलें आहे त्यांत,

ऐका कृष्णातीरीं सद्गुरुदेवें । अपार अप्रमेय देवाधिदेवें ।
परिपूर्ण कृपेकरूनि प्रभावें । काय आज्ञा केलीसे ॥ ९४ ॥
वेणीस्वामी ह्मणती वेणी । भक्ति ज्ञान वैराग्य त्रिवेणी ।
विशेष निवृत्ति जाली श्रीचरणीं । तरि निवृत्तिग्रंथ तां करावा ॥९५॥
समर्थ सद्गुरु ह्मणती वेणीसंप्रदाई ।
बाईयानामें निवृत्तिवेणी आहे देवगृहीं ।
येथूनि दया प्रगटेल विमळ हृदई । निवृत्तिग्रंथ होईल ॥ ९८ ॥
विद्वान्न विरागी भक्त ज्ञानी । पुत्र प्रसवेल विद्याजननी ।
स्वानुभव पुत्र श्रीगुरुचरणीं । आत्मारामीं निवेदील ॥ १०० ॥
आनंद संवत्सरीं जन्म गिरि । संप्रदाई कृष्णातीरीं ।
षोडशवर्षे ग्रंथांतरीं । दासबोधी अद्वैत विवरेल ॥ १०१ ॥

अशी हकीकत आली आहे. या ओंव्यांचा अर्थ आमच्या मतें असा दिसतो—' कृष्णाकांठीं मिरज येथें श्रीसमर्थांनीं वेणाबाईची निवृत्ति पाहून तिला निवृत्तिग्रंथ करावयास सांगितलें. त्यावर वेणाबाईनें उत्तर दिलें कीं आपली आज्ञा शिरसा मान्य आहे, परंतु निवृत्ति झाली अशी भावना देखील आपण माझी नाहींशी केली आहे, तर मी ग्रंथ कसा करूं ? तथापि आपल्या प्रसादानें संप्रदायांत ग्रंथ होईल. हें ऐकून समर्थांनीं ठीक आहे ह्मणून म्हटलें आणि सांगितलें कीं देवगृहीं ( ? ) वेणाबाईची शिष्या बाईयाबाई आहे तिच्या कृपेनें तिचा शिष्य निवृत्तिराम नामक निवृत्तिग्रंथ करील. हा गिरिधर शिष्य शके १५९६ आनंदनाम संवत्सरीं जन्मास येऊन संप्रदायांत आल्यावर १६ वर्षेपर्यंत अनेक ग्रंथ आणि विशेषत: दासबोध वगैरेंचें परिशीलन करून नंदननाम संवत्सरीं ( शके १६३४ ) निवृत्तिराम ग्रंथ करील.' या समर्थांच्या भविष्याप्रमाणें नंदन संवत्सरीं ग्रंथाला आरंभ झाला असावा आणि पुढें २२ व्या समासांत सांगितल्याप्रमाणें

समर्थसंदेश कृष्णातीरीं । ग्रंथ संपला गोदातिरीं ।
विजयनाम संवत्सरीं । संतसज्जनीं अवलोकिला ॥ ३८ ॥

ह्मणजे हा ग्रंथ बीड मठांत शके १६३५ या वर्षी संपला. वरील ओंव्यांत ' आनंद संवत्सरीं जन्म गिरि ' असे जे शब्द आले आहेत त्यांचा अर्थ त्या वर्षी गिरिधरांचा जन्म झाला असा दिसतो. हा अर्थ खरा धरिल्यास समर्थांच्या प्रयाणसमयीं ( शके १६०३ ) गिरिधरांचें वय अवघें ७ वर्षांचें येतें. पण हें वय समर्थांपुढें कीर्तन करण्याचें दिसत नाहीं, ही त्यांत अडचण

येते. आतां जन्म ह्मणजे संप्रदायांत येणें असा अर्थ जर शक्य असेल तर मात्र ही अडचण येणार नाहीं. कारण मग खरा जन्म १५९६ शकापूर्वी केव्हां हि असूं शकेल. वरील वाक्यांत गिरि ह्मणजे गिरिधर असें धरून आह्मी चाललों आहों. पण तसें नसेल तर मात्र सबंध ग्रंथांत गिरिधर असें नांव कोठें हि आढळत नाहीं आणि त्यामुळें एवढा एक च ग्रंथ वाचल्यास तो कोणाचा आहे हें कळण्यास मार्ग नाहीं. मग हा ग्रंथ गिरिधरांचा कशावरून ? या प्रश्नाला गिरिधरांनीं आपल्या श्रीसमर्थप्रताप ग्रंथांत उत्तर दिलेलें आहे. त्याच्या अकराव्या समासाच्या शेवटीं वेणाबाईची हकीगत देऊन 'मरीचि क्षेत्रीं वेणाबाई। संस्थान बाईयाबाई' असा वेणाबाईची शिष्या बाईयाबाई हिचा उल्लेख केला आहे. या बाईयाबाईची हकीगत देऊन शेवटीं,

> **तेथें गिरिधर त्रिवर्गबंधूंसीं शरण आला।**
> **श्रीगुरुदेवें श्रीचरणसेवेसी लाविला।**
> **निवृत्तिराम निवृत्तिधाम ग्रंथ वदविला।**
> **आत्मानुभवें वाक्यार्थें ॥ ११/९३**

असें स्पष्ट च सांगितलें आहे. ही गोष्ट लक्षांत घेतां आह्मीं पहिल्या समासांतील एतद्विषयक ओंव्यांचा जो अर्थ वर केला आहे तो बरोबर असावा असें दिसतें; ह्मणजे समर्थांनीं प्रथम वेणाबाईंना च ग्रंथ करण्याची आज्ञा केली, परंतु त्यांनीं स्वतः तो न करितां गिरिधरांकडून करविला. ह्मणून च गिरिधर या ग्रंथांत आपल्याला निवृत्तिवेणी आणि इतर ठिकाणीं हि ( समर्थप्रताप ) वेणीगिरिधर असें ह्मणवून घेत आहेत.

## ( २ ) ग्रन्थस्वरूपकथन

या ग्रंथाचे एकंदर समास २२ असून ओंवीसंख्या २०२६ आहे. यांपैकीं पहिले चार समास प्रस्तावनारूप आहेत. समर्थकृपेनें हा ग्रंथ झाला ह्मणून पहिल्या च समासांत समर्थांचें अल्प पण सारभूत चरित्र देऊन ग्रंथाची पूर्वपीठिका सांगितली आहे. पुढच्या दोन समासांत जगदंबास्तवन आणि गुरुस्तवन करून ग्रंथाचा प्रसंग सांगितला. गुरूच्या उपदेशानें आणि ग्रंथराज दासबोधादिकांच्या मननानें स्वतःला निवृत्ति कशी झाली हें गुरूपुढें कथन केल्यावर गुरूंनीं तो सर्व प्रकार ग्रंथरूपानें करावयाची आज्ञा केली.

> **ऐसा शिष्यें स्वानुभव कथिला। मग गुरुदेवें शिष्य आज्ञापिला।**
> **निवृत्तिराम ग्रंथ करीं रे वहिला। नाना आख्यानीं स्वानंदें ॥ ४/३३**
> **समर्थकृपेनें निवृत्ति झाली। समर्थदेवें आज्ञा केली।**
> **कैसी कैसी निवृत्ति बाणली। समर्थ मुखें बोलविती ॥ ४/३७**

जाईल वेगें । तत्वें तत्व विभागूनि मागें । ब्रह्म अंगें होइजे ॥ ८-१०९. हें ज्ञान ह्मणजे तरी काय ? ज्ञान ह्मणिजे अद्वैतज्ञान ॥ ९-१९. त्या स्थितींत ज्ञेय ज्ञाता ज्ञान नाहीं । ध्येय ध्याता ध्यान नाहीं । दृश्य द्रष्टा दर्शन नाहीं । नाना त्रिपुटीअतीत ॥ ९-३४. याज्ञवल्क्यानें जनकाला अशा ज्ञानाचा उपदेश करून परब्रह्म तूं अखंडित ॥ ९-३६ अशी त्याची खात्री करून दिली. तेव्हां विदेह कोंदला ब्रह्मानंदें । दोंद सुटलें सच्चिदानन्दें । निंदक ह्मणती चढलें मांदें । अहंब्रह्मास्मि अभिमानें ॥ ९-४५. परंतु ज्ञान्याला स्तुति किंवा निंदा सारखी च असल्यामुळें, आत्माराम अंतरीं स्वानंद । स्तुतिवादें झणीं न चढे मद । निंदक लोक वंदी त्रिविध । शांतिमूर्ति भद्रासनीं ॥ ९-५१. या ज्ञानाची मौज अशी आहे कीं, तेथें एकदां पोंचल्यावर पुनः माघारें येणें नाहीं, मग जगाची उलाढाल करा कीं स्वस्थ अरण्यवास पतकरा. प्रपंचें परमार्थ ढळेना । पवनें गगन चळेना । वृत्तिनें निवृत्ति मळेना । सुख समाधि स्वरूपीं ॥ ९-५२. ही स्थिति प्राप्त होण्यापूर्वी जनकानें सर्वस्व केलें गुरुदेवार्पण । विदेहें सेविलें निरंजन । याज्ञवल्क्यें सेविलें तपोवन । गुरु शिष्य दोघे उदासमूर्ति ॥ ९-२९. पण असें झाल्यानें जगाची स्थिति काय होणार असा विचार करून क्रोध आला याज्ञवल्क्यास आणि गुरुद्रोही तूं निर्धारें कारण, माझें राज्य जाणोनि केलेंसी तूं वोस असें तो जनकाला ह्मणाला; तेव्हां मग जनकाची खरी समजूत होऊन, गुरु याज्ञवल्क्यें बोलिजे । तैसें चि विदेहें आचरिजे । भद्रासनीं भद्रपीठीं बैसिजे । गुरुपदीं भोगिजे समाधिसुख ॥ ९-१८. ज्ञान झालें ह्मणजे भक्तीची गरज नाहीं, कांहीं करण्याची गरज नाहीं हें ह्मणणें समर्थसंप्रदायाला मान्य नाहीं, हें यावरून सिद्ध होतें. याविषयीं अधिक विवेचन पुढें सविस्तर करावयाचें असल्यामुळें, याविषयीं गिरिधरांचा थोडक्यांत अभिप्राय देऊन, येथें आटोपतें घेतों. सगुण आंगीं लागेल । ह्मणोनि भजनमार्ग जो उडवील । तो सत्य जाणा हो वाहावेल । मायापुरीं संशयें ॥ ९-९५. म्हणून माया भयानक तरूनि जावें । तरी ईश्वरीं निःकाम भजन करावें । सद्गुरुकृपें तरावें । संसारसागरीं ॥ ९-९६. निर्गुणीं निर्गुण आपण आहे । सद्गुरुभजनीं तत्पर राहे । मग समाधिसुख कोठें जाय । सद्गुरुचरणावेगळें ॥ ९-९२.

कोरड्या ज्ञानानें येणारें वैराग्य खरें नव्हे. त्यानें खरें ज्ञान आणि शाश्वत सुखाची प्राप्ति झाली असें होत नाहीं; ही गोष्ट दहाव्या समासांत शुकाच्या इतिहासानें स्पष्ट केली आहे. मी ज्ञानी मला वैराग्य झालें, ही भावना आहे तोंपर्यंत कांहीं च झालें नाहीं असें म्हटलें पाहिजे. **महद्भूत अंतःकर्ण जाणीव लक्षणें । जाणीव ह्मणजे नेणिवेसी कारणें । जाणीव नेणीव सारूनि आपणें । आपण मीपणें वारिलीं ॥** १०–१४. व्यासपुत्र मातेच्या उदरांत १२ वर्षें राहून आणि तेथें च ज्ञान संपादन करून मग बाहेर आला, आणि संसाराच्या भितीनें पित्याचें दर्शन हि न घेतां तसा च रानांत निघाला. इतकें कडकडीत वैराग्य. वाटेंत अप्सरा नग्न स्नान करीत होत्या त्यांना पाहून हि त्याचें चित्तस्थैर्य राहिलें, अप्सरांना हि अर्थात् लज्जेचें कांहीं कारण दिसलें नाहीं. मात्र व्यास मागोमाग येतां च त्यांनीं वस्त्रें परिधान केलीं; हें पाहून तर शुकाला आपल्या वैराग्याबद्दल फार च अभिमान होऊन व्यासाची हि तो कुचेष्टा करूं लागला. पण खरा प्रकार व्यासाला कळला. **मौन अरण्यीं शुक काक पिक । तैसा चि हा हि शुक येक बाळक । व्यासासि चिन्ह कळलें देख । ज्ञानाभिमानें बाधिलें ॥** १०–२८. तेव्हां त्याला कळवळा येऊन तो शुकाला ह्मणाला कीं, जनकाला जाऊन भेट आणि त्यापासून ज्ञान प्राप्त करून घे; कारण, **जनक आहे संसारी । नाना स्त्रियांसीं घरबारी । नाना विलासीं राज्यधारी । परि निर्विकारी निरंजन ॥** १०–३१. हें बापाचें सांगणें ह्मणजे आपल्या वैराग्याचा केवळ अपमान होय असें शुकाला वाटलें. परंतु पित्याच्या भिडेखातर तो जनकाकडे गेला आणि **मी शुक आलों भेटीसी ।** असा त्याला त्यानें निरोप पाठविला. तेव्हां **मग संगं त्यक्त्वा सुखी भव । सांगों धाडी मिथिळराव ॥** जनकाचें हें उत्तर ऐकून शुक मनांत म्हणाला, एवढें वैराग्य झालें तरी आणखी संग तो कसला टाकावयाचा ? असा विचार करीत तो दंडकमंडलु, जानवें इत्यादि वस्तूंचा संग शब्दांत समावेश होत असेल असें समजून त्या तो टाकूं लागला. तरी पुनः 'संग टाक' हें जनकाचें पालुपद कांहीं सुटेना. तेव्हां पुनः विचार करतां '**मीपणा**' हाच खरा संग, तो सोडल्याशिवाय निःसंगता म्हणजे वैराग्य कसचें ? हें त्याला कळून आलें आणि शेवटीं **दर्शन जालें गेलें न म्हणे । अबोलणें हि अबोलणें । तंव जनकरायें केलें धांवणें । समाधि भुवन**

सांडोनियां ॥ १०-४९. इतकें झालें तेव्हां मात्र समदर्शनी तो शुक जाला। मग व्यासमुनि दर्शना आला। भागवत पुत्रासी उपदेश केला। मातृदर्शना निघाला योगींद्र ॥ १०-५८. तात्पर्य म्हणोनि मुक्तांसी हि पाहिजे सत्संग। सत्संगें भक्तीचा प्रसंग। भक्तिप्रसंगें अंत-रंग। आत्मारामरंग दाटला ॥ १०-६१. भक्तिज्ञानवैराग्याची नित्य सांगड च पाहिजे. एकेक सुटें घेतलें तर कांहीं उपयोग नाहीं. त्यानें प्रसंगीं अधोगति हि होण्याचा संभव आहे. येका वेगळा येक योग। तो योग चि वियोग। भक्ति-ज्ञान-वैराग्य-योग। निवृत्तिवेणी श्रीचरणीं॥ १०-६३. पण सद्गुरुभक्तीची मात्र अशी गोष्ट नाहीं. तिच्या चरकांत जो एकदां सांपडला तो ज्ञानवैराग्याच्या द्वारानें आत्मारामाला जाऊन मिळणार च. गुरुदेवभक्ति घडलियां नवविधा। मागें लागती मुक्ति चतुर्विधा ॥ ११-६३.

येथपर्यंतच्या समासांत आलेले विषय महत्वाचे च आहेत. कारण, या विषयांवर जरी शेंकडों साधुसंतांनीं किंवा आचार्यांनीं ग्रंथ लिहिले आहेत, तरी त्यांचें नवीनत्व अजून हि कमी झालेलें नाहीं, आणखी पुढें हि व्हावयाचें नाहीं, अशी च त्या विषयांची योग्यता आहे. खऱ्या रमणीय वस्तूचें लक्षण च असें केलें आहे कीं, क्षणे क्षणे यन्नवतां विधत्ते। सदेव रूपं रमणीयतायाः॥ A thing of beauty is a joy for ever. भक्तिज्ञानादिक विषयांनीं युक्त अशा संतकथा सदा सर्वदां मुळच्या च गोड. त्यांत समर्थांसारख्या किंवा त्यांच्या शिष्यांसारख्या प्रेमळ आणि अनुभवी गुरूंच्या वाणीचें कोंदण त्यांना मिळाल्यावर दुधांत साखर पडल्यासारखें व्हावें यांत आश्चर्य नाहीं. हा एक भाग; पण दुसऱ्या हि गोष्टींचा विचार यांत केला असतो. रोज तो च तो च पदार्थ आपण भक्षण करतों कीं नाहीं? यःकश्चित् शरीररक्षणा-करितां जर त्या च त्या च वस्तूला आपण कंटाळत नाहीं तर सर्वांत श्रेष्ठ अशी जी आत्मप्राप्ति तिच्यासाठीं भक्तिज्ञानयुक्त कथांचें रोज रोज सेवन करण्याचा कंटाळा करणें हा केवढा वेडेपणा आहे? ह्मणून ह्मणतों कीं, असले ग्रंथ असतील तेवढे हवे च. यांत चर्वितचर्वणाची गोष्ट च नाहीं. ज्यांस यांत चर्वित-चर्वण वाटेल ते खरोखर अभागी नव्हेत तर कसे? समर्थांनीं च सांगितलें आहे कीं, आरे हें पाहिलें चि पाहावें। विवरलें चि मागुतें विवरावें। वाचिलें चि वाचावें। पुन्हपुन्हा ॥ १२-८-९. असो.

गुरूवर अप्रतिम प्रेम असलें ह्मणजे हातचें काम राहून गुरुप्रतापवर्णनाकडे च मन धांवतें. असा प्रकार गिरिधरांचा झाला आहे. ह्मणून च कित्येक समासांच्या आरंभीं विषयाला सुरुवात करण्यापूर्वी सद्गुरूंची एखादी गोष्ट किंवा त्यांनीं केलेला एकादा प्रसाद यांचें सहज वर्णन येऊन पुढें विषयाला सुरुवात झाली असते. ११ व्या समासाच्या आरंभीं गुरुकृपेनें घडलेल्या वराहस्वामीच्या दर्शनाची अथवा १२ व्याच्या आरंभीं श्रीशैल्यवासी मल्लिकार्जुनाची जी हकीकत आलेली आहे, ती याच कारणास्तव होय. असो. आतां पुढें भवोपसर्गनिवृत्तीचा विषय आला आहे, त्याकडे वळूं. भवोपसर्गनिवृत्ति म्हणजे काय ? भव म्हणजे संसार। उपसर्ग म्हणजे उपद्रव फार ॥ या उपद्रवाची निवृत्ति करणें ती कशी करावी ? व्यवहारांत जसें पडून घर घ्यावें लागतें, त्याप्रमाणें च संसारशत्रूशीं वागावें लागतें. संसारशत्रु मित्रपणें । विश्वासें चि संहारणें ॥, संसारशत्रूचें घर । भेदें घेती योगेश्वर ॥ म्हणजे काय ? तर संसाराशीं बाह्यतः वैर न करितां मिथ्यापणें विश्वास धरणें । आपण रहाणें अलिप्त ॥ आतां कोणी म्हणेल, 'हें कसें घडावें ? संसारांत राहून अलिप्त असणें बहुतेक अशक्य, ह्मणून तर मोठमोठे योगी संसार सोडून गेलेले दिसतात!' पण असें म्हणणें हा भ्रम आहे. योगी संसार सांडोनि गेले । पुन्हा लौकिकांत वर्तले । उदंड लोकसंग्रह केले । परोपकारें उद्धारे ॥ ११–२९. असें ज्यांनीं केलें ते च खरे योगी. पण भीतीनें येक संसार सांडोनि गेले । ते संसार संसार ह्मणतांचि मेले । ते गेलेचि न गेले । वेषधारी संसारी ॥ ११–३०. भक्तियोगनिवृत्तीच्या प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें इंद्रियांना जी विषयांची चटक स्वभावतः च लागली आहे, तिचा उपयोग करून च आपलें काम आपल्याला करून घेणें सोपें जाईल. याकरितां त्यांच्या विरुद्ध उघड बंड न करितां पडून च घर घेतलें पाहिजे. ह्मणजे ब्रह्मचारी अथवा गृहस्थ । सन्यासी अथवा वानप्रस्थ । कांहींयेक योग अव्यावस्त । कामा नये सर्वथा ॥ ११–४९. इंद्रियें सूक्ष्म असल्यामुळें त्यांना वरकरणी देहांत कोंडलें तरी पुनः दृष्टि चुकवून तीं बाहेर पडणार च. शिवाय विषयांचा खराखुरा सर्वथा त्याग करून तरी काय पुरुषार्थ साधणार ? पंचविषय सर्वांसी लागले । निवृत्तियोग कैसे जाले । विषयत्यागें देह चाले । हें तों न घडे सर्वथा ॥ ११–५१.

ह्मणून विषयांचें शुद्ध आणि शबल असें वर्गीकरण करून शबल विषय टाकावे आणि शुद्ध घ्यावे; ह्मणजे परमात्म्याला च विषय करावें. तो च शुद्ध विषय. देहात्मबुद्धीनें विषय सेविल्यास अधोगति, पण ते च विषय परमात्मबुद्धीनें सेवन केल्यास मोक्षप्रद होतील. **एवं पांच विषय निजात्मलाभें। सुखें सेविजे परमार्थलोभें। दुराशा विषय देहात्मयोगें। भगवत्प्राप्ति घडेना** ॥ ११–५८. श्रीसमर्थसंप्रदायांत विशेष आहे तो हा च; **शुद्ध विषय कार्याकारण। स्थापिले पूर्ण समर्थें** ॥. अशा रीतीनें शुद्ध विषयांचा परमार्थलोभानें उपभोग घेतला ह्मणजे भवाचा उपसर्ग होत नाहीं. देहात्मबुद्धि टाकून दिल्यावर **कैंचें भवप्रपंचभान। वंध्यापुत्राचें जन्ममरण। निवृत्तिवेणी ह्मणे शरण। सद्गुरुचरणीं रिघावें** ॥ ११–७०.

संकल्पाच्या मुळें सर्व पिंडब्रह्मांड उभें होतें. त्याच्या अभावीं कांहीं नाहीं. हा संकल्प उत्पन्न झाला कोठें, याचा थांग लावण्यासाठीं संतांच्या साहाय्यानें खालून वर तपाशीत गेलें म्हणजे मी जीव हा संकल्प--ज्याच्या योगानें जन्ममरणांत सांपडावें लागतें--मूळ हरिसंकल्प च आहे असें ठाम कळतें. **अधोर्ध्व संकल्प जो पाहिला। तो मुळींचाचि शेवटासि आला। शेवटींहुनी मुळास गेला। संतसंगें विचार** ॥ १२--३०. आतां जीवसंकल्प स्वतंत्र नव्हे, हें कळल्यावर ‘ वाउगा जल्प ’ करतो कोण ? **जीवित्वसंकल्प निश्चयें गेला। हरिसंकल्प सहजचि आला। त्याचा तोचि आपणाला। ठाव नाहीं जीवपणें** ॥ १२–३२. मग हरिसंकल्प आल्यावर सर्व संपलें, कांहीं च कर्तव्य राहिलें नाहीं असें होतें काय ? नाहीं. कारण जीवसंकल्प सुटला तरी जीवपण म्हणून आपोआप कांहीं राहतें. त्याच्या साठीं कर्तव्य आहे च. पण तें जीवसंकल्पानें नसून हरिसंकल्पानें असतें. **तथापि जीवपण कांहीं लागलें। तन्हि हरिसंकल्पें चि वर्तलें। कर्म उपासना ज्ञान विवरिलें। त्रिकांड वेद प्रमाण** ॥ १२–३३. उद्धव, प्रल्हाद, ध्रुव वगैरेकडे पहा. त्यांनीं ‘ आपुला संकल्प हरिसंकल्प ’ केल्यामुळें, ‘ मग आपुला कैंचा जीवसंकल्प ’ अशी स्थिति झाली. **ह्मणोनि आधीं भागवत व्हावें। भगवत्स्वरूप विवरावें। भगवद्भजनें तरावें। संसारसागरीं** ॥१५–४२. हा जीवसंकल्प निवृत्त होण्यासाठीं ‘ **शरण जावें देवासी** । कारण, ‘ **शरणागताची संकल्पनिवृत्ति। करिताति स्वामी कृपामूर्ति। सद्गुरुभजनें ब्रह्मप्राप्ति। संकल्पातीत निरंजन** ॥ १२–४८.

मा ४४.०



जीवसंकल्प सुटून हरिसंकल्प येईपर्यंत मोठा झगडा करावा लागतो. त्याचें वर्णन द्वासुपर्णानिवृत्तिकथनरूपानें गिरिधरांनीं १३ व्या समासांत मोठ्या सुरसपणें केलें आहे.

संसाराला ' ऊर्ध्वमूल आणि अधःशाख ' अशा वृक्षाची उपमा उपनिषदांपासून सर्व वेदांत ग्रन्थांत दिलेली आहे. या वृक्षाच्या मुळाशीं शिवपक्षी ( ईश्वर ) आणि खालीं फांदीवर जीवपक्षी बसलेले आहेत. पहिला निष्काम आणि दुसरा सकाम. शिवपक्ष्याचें जीवपक्ष्याला सांगणें असें कीं, **अविद्यावृक्षींचीं माईक फळें । दुःखकारकें भक्षूं नको ॥** त्याबद्दल मी तुला **निर्विकल्पतरूचीं ब्रह्मरसाळें फळें** देईन १३–१४. पण निर्विकल्पाची कल्पना च होत नसल्यामुळें, जीवाला हें ह्मणणें खरें न वाटून तो माईक फळें खाण्याचा ( सकाम कर्माचा ) आपला अट्टाहास सोडीत नाहीं. पण तो सोडीत नाहीं ह्मणून, शिवपक्षी कांहीं स्वस्थ बसत नाहीं. वास्तविक तो ' परिपूर्ण ' असतां जीवासाठीं ( लोकसंग्रहार्थ ) परमात्मस्वरूप क्षणभर विसरलेंसें करून, त्याची दृष्टि मुळाकडे वर खेंचण्याचा प्रयत्न करीत असतो. शेवटीं जन्ममरणप्रळयाग्नीचा तडाखा बसून कालान्तरानें **शरण आला जीव सुपर्ण । जीव शिव ऐक्य जालें पूर्ण । परमात्मरूपीं मिळाले ॥** १३–६२

पण शिवसुपर्णाचें ह्मणणें जीवाला पटे तोंपर्यंत तो नाना ढंग करीत असतो. सुख प्राप्त करून घेण्याचे त्याचे स्वतःचे मार्ग निराळे च असतात. तो ह्मणतो, **माझे नाना मार्ग भवस्वर्गभोगें । मंत्रयंत्रादि अघोरयोगें । नाना निग्रहें हठयोगें । इच्छिलीं फळें पावतसे ॥** १३–२१. पण या मार्गांचें मिथ्यात्व अनुभवाशिवाय जीवाला पटत नाहीं व खोट्या सुखाला च लाचावून तो इंद्रपदादि फळें मिळविण्यासाठीं नाना प्रकारची धडपड करितो. **नाना परकायाप्रवेश करी । नानापरीचीं मी सुखें वरी ॥** १३–३३. त्यांतील हठयोगादि साधनें कशीं मिथ्या आहेत हें दाखविण्यासाठीं पुढें १४ व्या समासांत **अभ्यासयोगनिवृत्ति** सांगितली आहे.

हठयोगानें साध्य काय ? तर **येकदेशी समाधिसुख.** हठयोगी बढाई मारोत कीं, **जीवपण आमुचें गेलें । ब्रह्मरंध्रीं ऐक्य जालें ॥** पण वस्तुतः पाहतां देखणें देखूनि योगी जीवपणें उरे । बरें पहाणें विवेकें ॥ योगी समाधि लावतात खरी, पण त्यांत केवळ **मन पवन येकवट जाले ।**

षट्चक्रें भेदूनि गेले । त्यामुळें, देहीं देहभाव सहजचि राहिले । काळ वंचिले योगीन्द्रें ॥ १४–३१. कारण पवन ह्मणजे वायु हा चंचळ आहे; त्याशीं ऐक्य केलें तरी, ' समाधिलक्षण हें नव्हे '. असल्या समाधीनें काळ मात्र व्यर्थ दवडिल्यासारखें होतें. शिवाय या प्रकारच्या समाधीनें एखादे वेळीं सर्व च कारभार आटपण्याचा संभव असतो. कारण, वायो नीट गेला तरी गेला । नाहीं तरी फुटोनि निघाला । योगाभ्यासाचा गलबला । येणें रितीं दुर्गम ॥ १४–३६. शरीर आहे तर हा योग; पिंड करावा जतन । तेव्हां योगियांचें ध्यान । परंतु, पिंडासी होय ना कां पतन । ब्रह्मज्ञान ढळेना ॥ १४–१६; ह्मणून सहजींसहज स्वरूपसमाधि । हे खूण कांहीं शोधीं आधीं । जेथें योगाभ्यासांगउपाधि । निरसोनि जाय निर्धारें ॥ १४--२४. सहजसमाधीची योग्यता दुसऱ्या कशास हि येणार नाहीं. संतसंगेंविण समाधियोग । तो योग नव्हे वियोग । उगा चि शरीराचा भोग । काळवंचन समाधि ॥ १४–२३.

मग काय हठयोग अगदीं च निरुपयोगी ? नाहीं. योग्य मर्यादेंत त्याचा उपयोग आहे. नाना मनोजयाकारणें । अभ्यासयोग लागे करणें ॥ तरी तेवढें झाल्यावर राजविद्या राजयोग अगत्य वरणें । भगवद्गीतेसी सांगीतलें ॥ १४–६६. कारण, भक्तियोगाची बरोबरी । योगाभ्यास न पवे सरी । गीता भागवत श्रवण चतुरीं । केलें असेल निर्धारें ॥ १४–६७. आतां हें न ऐकतां कोणी या फंदांत पडणार च असेल तर गिरिधर सांगतात त्यानें खुशाल पडावें, आमचें काय जातें; करणें चि असेल योगाभ्यास । तरी अवश्य करणें अभ्यास । ज्याचें कर्म त्याचें त्यास । आमुचें काय वेंचलें ॥ १४–७६. ही गोष्ट सिद्ध करण्यासाठीं जी एका योग्याची गोष्ट पुढें दिली आहे, ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

जीवपक्ष्यानें ज्या अनेक घमेंडीच्या गोष्टी सांगितल्या, त्यांतील एकीचें खंडन झालें. दुसऱ्या हि गोष्टींचें असें च खंडन पुढील समासांत केलें आहे. यज्ञादिकांच्या योगानें मी इंद्रादि पदें प्राप्त करून घेतों, अशी जी त्याची बढाई आहे, तिला १५ व्या समासांत उत्तर दिलें आहे. एक तर, यज्ञांतून हिंसा होत असल्यामुळें ते त्याज्य होत. शिवाय त्यांच्या योगानें प्राप्त होणारीं फळें मुद्दां क्षणिक आहेत. ज्यांना अमर म्हणजे देव म्हणतात, ते खरे अमर आहेत काय ? किंवा त्यांचीं स्थानें शाश्वत आहेत काय ? तशीं असतीं

तर इंद्राला पृथु, सगर इत्यादिकांना विघ्नें करण्याचें प्रयोजन नव्हतें. असलीं काम्य कर्में करून दक्ष, नहुष वगैरेंची काय अवस्था झाली हें सर्वश्रुत च आहे. हें पाहून देव देखील पुनः निष्कामकर्मरूप सत्कर्म करण्यासाठीं भरतखंडरूप कर्मभूमींत जन्म मागतात. देवपणांत शाश्वत सुख नाहीं. स्वर्गसुखाची ज्यांनीं निवृत्ति केली व केवळ परमेश्वरप्रीत्यर्थ कर्में केलीं, त्या पृथु, बळि इत्यादिकांना शाश्वत सुख मिळालें. आतां असा प्रश्न येईल कीं, बळीला इन्द्रपद, वसिष्ठाला ब्रह्मपद अशीं मिळावयाचीं म्हणून जर ठरलें आहे, तर त्यांना निवृत्ति बाणली असें कसें ह्मणावें ? याला उत्तर एवढें च कीं, **भोगीं त्यागीं उदासीन हे ।** त्यांना त्याबद्दल हर्षविषाद नाहीं, कर्तव्य ह्मणून च ते तीं कामें करणार. कारण कर्में ब्रह्मार्पण केलीं तरी, त्यांचीं फळें मिळणार च. मग घेणाऱ्यानें घ्यावीं वा टाकावीं. जनकानें निष्काम बुद्धीनें राज्य केलें, शुकानें संसार सोडला, तरी दोघांची योग्यता एक च. तात्पर्य, **सकाम कर्में पाविजे पतन ।** ह्मणून, **निःकाम भजन करावें । अथवा निष्काम बुद्धीनें सत्कर्में । केलीं पाहिजे अवश्य ॥**

अष्टधा प्रकृति, अनेक कोटी ब्रह्मांडें इत्यादि दृश्याहून वेगळा जो ईश्वर त्याच्या हि पलीकडे निर्गुण ब्रह्म आहे. वस्तुतः हें सर्व दृश्य ह्मणजे **मिथ्या माया प्रपंच खेळ** आहे. तेव्हां त्याच्या पलीकडे काय आणि अलीकडे काय सारखें च. परंतु आमच्यासारख्या अज्ञांची अंशतः तरी समजूत करण्यासाठीं ब्रह्मगोळादिकांचें वर्णन करून त्याच्या पलीकडे ब्रह्म आहे असें सांगतात; **शाखाचंद्रमसीतिन्यायें । दृशमस्त्वं असि उपायें । नाना सृष्टिक्रम व्यतिरेक अन्वयें । निवृत्तिब्रह्म अनुभविजे ॥** १६–९. खरा प्रकार समजल्यावर याची कांहीं जरूरी नाहीं. **प्रकृति असतां विवेक केले । विवेकप्रळय होऊनि गेले । ब्रह्मगोळ असतां चि नाहीं जाले । सद्गुरुनाथप्रतापें ॥** १६–८०.

याच विषयाचा विशेष विस्तार करून, पुढच्या सतराव्या समासांत **सृष्टिक्रमनिवृत्ति** सांगितली आहे. सृष्टिक्रम कां नाहींसा होणार आहे ? तो आहे च. पण तो असेना बापडा. **सन्निध देव देखिल्यावरी । सृष्टिक्रमासी न उरे उरी । अथवा सृष्टिक्रम उपसंहारीं । परब्रह्म पावावें ॥** १७–५. काम्य कर्मांच्या मागें लागून देव सन्निध होणार नाहीं. **काम्य कर्में जे जे करिती । ते ते स्वर्गावरुते चढती । क्षीणे पुण्यें पतन**

पावती । सावकाश भूमीतें ॥ १५-७ ॥ ह्मणोनि सद्गुरुनाथीं शरण जावें । निष्कर्म ( निष्काम ) कर्म आचरावें । आत्माराम होऊनि रहावें । मग पतन न घडे कल्पान्तीं ॥ ८ ॥

निष्कामकर्मांची किल्ली सांपडली कीं, भेदाचें कुलूप उघडून अभेद दृष्टीस पडतो. ह्मणून अठराव्या समासांत भेदाभेदनिवृत्ति सांगितली आहे. जें पिंडांत तें च ब्रह्मांडांत. मग पिंडब्रह्मांडाचा भेद दिसला तरी वस्तुतः अभेद च नाहीं कां ? ईश्वरें नाना भेद केले । ईश्वरभेदें सृष्टि चाले । सृष्टिक्रम धरूनि जे वैसले । ते ते पडले कर्माधीन ॥ १८-३४. पण निष्कामकर्मांच्या योगें सृष्टिक्रमांतून बाहेर पडतां येतें; अर्थात् च कर्मांचा बंध हि तुटतो. ईश्वरआज्ञेनें वर्तावें । ईश्वरबुद्धीं कर्म करावें । ईश्वरीं सर्वस्व अर्पावें । पावन व्हावें परब्रह्मीं ॥ १८-३५. ही च गोष्ट खरी. ब्रह्मांड नाहींसें होईल तेव्हां कां मोक्ष मिळणार ? ब्रह्मांड असतांना च ब्रह्म दाटलें पाहिजे. ह्मणोनि अंतर लागे भगवंतीं । तो चि मुक्त संसारीं ॥ १८-५७ ॥ कारण खरें पाहिलें असतां ब्रह्मांड म्हणून च जर कांहीं नाहीं तर त्याचा नाश तरी कसा होणार ? परब्रह्म तें अखंड । ब्रह्मीं कैंचें ब्रह्मांड । आसतां च नाहीं हें प्रचंड । ज्ञाते उदंड बोलती ॥ १८-६४ निर्विकार निरंजन । तेथें माया मिथ्या दृश्यभान ॥ आली गेली वंध्या माया । ब्रह्मीं न घडे तिचा थाया । खऱ्यापासूनि खोटें वाया । आलें गेलें न ह्मणावें ॥ १८-७१.

आतां इतकें सांगितल्यावर पुढें कांहीं रहात नाहीं. तथापि बारीक सारीक शंकांची निवृत्ति होऊन निश्चय दृढ व्हावा ह्मणून, दासबोधाचें सार च असा स्वात्मबोधनिवृत्ति नांवाचा एकोणिसावा समास गिरिधरांनीं सांगितला. समर्थें लोकसंग्रहाकारणें । नाना निश्चय अनुवादणें । नाना निवृत्तियोग करणें । विमळ वाळबोधार्थीं ॥ १९-५. या स्वात्मबोधांत जीं प्रश्नोत्तरें आहेत तीं फार सरस असून अनेक विषयांचा त्यांत चटकदार रीतीनें व अगदीं थोडक्यांत उलगडा केला आहे. सर्व गोष्टींचा खुलासा होऊन बद्ध, मुमुक्षु, साधक इत्यादि पायऱ्यांवरून सिद्धकोटींत गेल्यावर पुढें काय ? नित्यमुक्त अशा साधूजनीं कैसें रहावें ? तर त्यांनीं त्या स्थितींत हि लोकसंग्रहार्थ साधन सुखें करीत जावें । कारण, साधन न करितां सिद्ध बद्ध ॥ १९-७१. मग साधक आणि सिद्ध ओळखावे

कसे ? हें काय विचारावें ? अमृत प्राशन केल्यावर जशी अंतर्बाह्य काया लखलखीत होणार त्याप्रमाणें, अंतर्बाह्य लक्षणें संत । वोळखावे संत महंत ॥ संसाराचा महंतानें स्वरूपत्याग केलेला नसतो; तर विवेक वैराग्यें सगळें त्यागिलें। स्वतः मायातीत होऊन इतर दुर्बळांना मायातीत करण्याचा यत्न महंत करतो. असा प्रयत्न करावयाला मायातीत महंत च पाहिजे. सांग महंती उत्तम पुरुष । उत्तम गुणें तो विशेष । जगदाधार परम पुरुष । जगदोद्धार करीतसे ॥ मायेंत गुरफटलेल्याकडून इतरांना मुक्त करण्याचें काम होणार नाहीं. इंद्रियांना बाह्यात्कारी दामटून केवळ शरीरानें स्वस्थ बसणारा सिद्ध नव्हे च. आत्माराम अनुभविला । जाणता तो समजोन राहिला । टोणपे सिद्ध उगा चि बैसला । आत्माराम नेणे चि ॥ १९–१७०.

पुढच्या २० व्या समासांत अध्यात्मरामायणाच्या आधारानें वसिष्ठ-भरत, राम–भरत, राम–लक्ष्मण, राम–हनुमान इत्यादिकांच्या संवादरूपानें मूळमायानिवृत्ति सांगितली आहे. हा विषय लक्ष्मणानें लोकानुग्रहें रामाला विचारिला आणि रामानें हि लोकानुग्रहें त्यास उपदेशिला. त्याचें तात्पर्य एवढें च कीं, परब्रह्म निर्मळ निश्चळ । तेथें नाहीं मायामळ ॥ निरनिराळीं शास्त्रें जगत्कर्तृत्व निरनिराळ्या ठिकाणीं लावितात, पण निर्गुण ब्रह्माच्या माथीं कोणी हि तें लावीत नाहीं. अर्थात् निर्गुण ब्रह्मीं कर्तृत्व लाविती । महामूर्खशिरोमणी ॥ याप्रमाणें अध्यात्मज्ञान लोकानुग्रहें प्रकट केल्यावर राम ह्मणतात, हें अध्यात्मज्ञान झाल्यावर अहिंसा समता सहनशक्ति । शम दम साधन सद्गुरुभक्ति । स्वधर्मनिरत उदासवृत्ति । वैराग्यशीळ सर्वदा ॥ २०–६८. अशा वृत्तीनें असावें ह्मणजे अध्यात्मज्ञान जतन होईल. ही च गोष्ट पुनः रामानें हनुमंतासाठीं सीतेकडून वदविली असून त्या संवादांतील सीतेची साक्ष मायाकर्तृत्वासंबंधानें लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

एकविसाव्या समासांत मागील विषयाची पुनः उजळणी करून पंचीकरणद्वारा निवृत्ति करण्याचा मार्ग सांगितला. त्यांत श्रीरामचंद्राच्या कथानकांत रामायणाचें सर्व सार सांगून शेवटीं त्यानें ११ हजार वर्षें साम्राज्य केल्याचें वर्णन केलें, त्यांत या अकरा शब्दावर श्लेष करून निवृत्तिरहस्य मोठ्या चतुराईनें सांगितलें आहे. सर्व एक च आहे. देव भक्त, पिंड ब्रह्मांड,

वक्ते श्रोते, पुरुष प्रकृति, हरि हर, जीवात्मा शिवात्मा, इत्यादि सर्व एकीं एक होत. अर्थात् अकरा झाल्यावर पूर्ण निवृत्ति च झाली. द्वंद्व नाश होऊन सर्वत्र एकीएक झालें कीं, अ-करा शिवाय ( अकर्तृत्वाशिवाय ) उरणार काय ? निवृत्तिमार्गानें अकराचा असा उलगडा होतो; असो. द्वंद्वनिवृत्ति होण्यासाठीं प्रथम द्वंद्व तरी कसें झालें हें सांगणें अवश्य आहे. त्यासाठीं पंचीकरणाचा प्रकार या समासांत निवेदन करून पुढें जीवब्रह्माचें ऐक्य प्रतिपादणाऱ्या तत्वमासि इत्यादि सोळा श्रुतिवचनांचें ह्मणजे महावाक्यांचें थोडक्यांत अर्थासह कथन केलें आहे. जीवब्रह्माची महावाक्यविवरणानें ऐक्यप्रतीति झाली ह्मणजे, अखंड राहणें परमार्थे । तरी कर्म उपासना सद्वासना । भागवतधर्मे धरी मनोभावना ।। आणि कांहीं झालें तरी, अशुद्ध संप्रदाय कामा नये ।। २१–७५. याविषयीं बिभीषणाला रामानें सांगितलेल्या गोष्टी सर्वांनीं हृदयावर कोरून च ठेवण्यासारख्या आहेत.

दृश्य सकळ मिथ्या जालें । तरी भजन पाहिजे जतन केलें । पदार्थी पाहिजे उदास वर्तलें । सद्गुरुभजनीं संतुष्ट ।। ७७ ।। मी मुक्त ह्मणोनि राहसी । तरी बद्धता लागेल मानसीं । मी ज्ञानी ह्मणोनि फुंजसी । तरी अज्ञानदशा लागेल ।। ७८ ।। ह्मणोनि निःकामबुद्धि उत्साह । निकुंबळें सुवेळा महोत्साव । लंकेमध्यें परमोत्साह । अन्नछत्रें घालावीं ।। ७९ ।। ब्रह्मसंतर्पणें हरिकीर्तनें । करीत जावीं आयन आयनें । जे जे प्रसंगीं विविध वचनें । ते ते प्रसंगीं करावीं ।।२१–८०।।

राम ह्मणतातः–जे असें करणार नाहींत ते च खरोखर देहाभिमानें नाडले । यास्तव तूं असें न करतां, आत्मस्थिति आत्माराम । आत्मारामीं चित्त अराम । सद्गुरुभजनीं स्वानंदधाम । सुख भोगिजे चिरकाळें ।। २१–९०. ही गोष्ट हि तुला मीं लोकानुग्रहें बोलिलों, वस्तुतः मज तुज नाहीं भिन्न भेद । कारण, आत्मस्थिति तुजपासीं असल्यामुळें तुला हें सांगण्याची खरोखर अवश्यकता च नाहीं.

आतां शेवटचा समास ह्मणजे सर्व ग्रंथाचें सार. अर्थात् त्यांत सर्वसिद्धातनिवृत्ति च असणार. सर्वसिद्धांतप्रतिपाद्य वस्तु निर्गुण ब्रह्म, तेथें बद्ध मुक्त ह्मणजे विनोद च केवळ होय; तेथें स्वस्वरूपाशिवाय दुसरें नाहीं च. पण स्वरूप नेणल्यामुळें जीवबुद्धि होऊन तिला च सकामकर्मामुळें भवस्वर्गवास लागतो. त्याचा निरास होण्यासाठीं सद्गुरुमुखानें सिद्धांतविवरण

ऐकावें. जगांत नाना मतें आहेत खरीं, पण तीं अधिकारपरत्वें लागूं करावयाचीं असून तीं ज्यानें केलीं त्या पुराणपुरुषाची शुद्धि ( शोध ) केली पाहिजे. कारण, तो त्या सगळ्या हि मतांच्या पलीकडे वेगळा च आहे. त्याचा शोध एकदां झाला ह्मणजे, **निष्काम कर्में आचरावीं । ईश्वरीं सर्वस्वें अर्पावीं । भर्जित बीजें सर्व करावीं । ज्ञानाग्निकुंडीं ब्रह्मांडीं ॥** २२–२४. असें झाल्यानें क्रियमाण कर्मांचें बंधन नाहींसें होतें. सकाम कर्मांत इंद्रादि देवांकडून जो विरोध होतो तो हि या प्रकारानें बंद होतो. स्वर्गादिकांची ज्यांना इच्छा च नाहीं त्यांना इंद्रादि देव तरी त्रास कां देतील ? उलट ते आत्मत्वें **सखे सोयरे सुहृद्** च होतात. देवपदाची इच्छा धरील त्याच्याशीं देव द्वंद्व करतील, पण गिरिधर ह्मणतात, आम्हीं भक्तांनीं **स्वर्गसुखाच्या नावें गुरुपदीं शून्य घातल्यामुळें** आह्मांला त्याची भीति नाहीं. आमच्या निःकाम भजनाचें देव उलट कौतुक च करितात. पण याप्रमाणें **स्वर्गसुखाची कुरवंडी** केली तरी, भक्त निःकाम कर्म सोडीत नाहींत. **देहधारी भक्त दिसती । देह विदेह सांडूनि राहती । भागवतधर्म आचरती । जयंत्या पर्वें अपूर्वें ॥** २२–५३. भक्तांचें हें ऐश्वर्य पाहून देव हि त्यांस ह्मणतात, **धन्य धन्य साधु तुह्मी । गुरुदेवें तुम्हांसी नेलें परब्रह्मीं ॥** तरी तुमच्या या आत्मसुखाची आम्हांला थोडी कल्पना तरी करून द्या. पण हें आत्मसुख सांगणार कसें ? कारण ब्रह्म कांहीं पाहतां किंवा सांगतां येण्यासारखें नव्हे. पण सत्संगानें ब्रह्म होतां मात्र येतें. **अहं ब्रह्मास्मि** इत्यादि महावाक्यांचा उद्देश थोडाबहुत मतलब कळावा एवढा च आहे. खरें आत्मस्वरूप ह्मणजे त्या ठिकाणीं **गुरु मौनी शिष्य मौनी । संत मौनी ग्रंथ मौनी । श्रोते वक्ते सर्व मौनी । मौनगर्भ विचारणा ॥** २२-१०७. तेव्हां आत्मस्वरूप हें अनुभवाला च आलें पाहिजे. सद्गुरु ब्रह्मस्वरूप असल्यामुळें त्यांचें हि स्वरूप असें त्या अनुभवानें च जाणलें पाहिजे. कोणी विचारील तर त्याला सांगावयाचें एवढें च कीं, **ईश्वरापरतें परब्रह्म साचें । सद्गुरुस्वरूप अखंड ।** मग हे सद्गुरु उपदेश तरी कसा करतात ? तर **सद्गुरुकृपेचें बोलणें । बोलत असतां चि अबोलणें ।** कारण, **बोलण्याचा उबग धरणें । तरी जगदोद्धार घडेना ॥**२२-३६. सद्गुरु पूर्ण ब्रह्मस्वरूप असून हि केवळ लोकसंग्रहासाठीं बोलतात; तें तरी कशासाठीं ? तर साधकाला **बोलण्याचा उबग** यावा आणि त्यानें हि स्वतःसारखा

अबोलबोलें बोल बोलावा । ह्मणून. ते बोलतात ह्मणून बोलण्यांत च गुर-फटलेले असतात असें नाहीं. सद्गुरुकृपेचें बोलणें । बोलण्यामाजीं अबोलणें ।। अशी या बोलण्याची मौज असते. वृत्तिशिवाय निवृत्ति तरी कशी बोलावी ? वृत्तिवीण निवृत्तिग्रंथ । करितां चि न ये। याप्रमाणें स्वतः निवृत्ति झाली असून लोकसंग्रहासाठीं गिरिधरांनीं गुरूच्या आज्ञेनें ग्रंथ केला. गिरिधर सांगतात, ग्रंथाचें करावें स्तवन । तरी कर्ता राम मी नव्हे आपण । तेव्हां ग्रंथाची योग्यता आम्ही सांगण्यापेक्षां वाचकांनीं स्वतः च पहावी. तरी सांगावयाचें च म्हटलें तर लौकिकदृष्ट्या हि ग्रंथ फार सरस आहे. नाना कथानक संमति । वेदशास्त्र श्रुति स्मृति । आत्म-शास्त्र गुरुप्रचिती । इत्यादिकांच्या भक्कम पायावर त्याची रचना झाली आहे. वेदांतानें सगळी घाण केली असें म्हणणारांनीं हि तो अवश्य वाचून पाहण्यासारखा आहे. जोरदार भाषा, प्रतिभा, प्रसाद हे लौकिक काव्यगुण हि त्यांत भरपूर आहेत. तात्पर्य, समर्थसंप्रदायाची कीर्ति वाढविणारा हा ग्रंथ आहे एवढें च थोडक्यांत सांगतों.

## ( ३ ) निवृत्तिरामरहस्य

निवृत्तिराम ग्रंथ केवळ अमूल्य आहे. आधीं च जगाच्या क-ल्याणा । संतांच्या विभूति ।। अवतरलेल्या; त्यांत समर्थसंप्रदाय तर विशेष च. प्रपंच साधुनि परमार्थाचा लाभ करून घेण्याची किल्ली या संप्रदायांत स्पष्ट सांगितली आहे; तितकी दुसरीकडे क्वचित् च सांपडेल. त्या संप्रदायाची कोठी ह्मणजे श्रीमद्दासबोध होय. याचें परोपरीनें वर्णन, ज्याला आह्मी अमूल्य ह्मणतों, त्या या गिरिधरकृत निवृत्तिरामानें करून आपल्या स्वतःकडे त्याचें दासानुदासत्व घेतलें आहे. [ तेव्हां आह्मीं आपली निर्जीव लेखणी त्याचें महत्व पुनः प्रतिपादावयाला उचलण्याचें धाष्टर्य न करितां त्या दासानुदासांचे च चरणरज मस्तकीं धरावे आणि त्यांची च अल्प-स्वल्प सेवा करावी. याच बुद्धीनें मागील चार ओळी खरडण्याचा प्रयत्न केला आहे. ] अर्थात् दोघांचें हि ऐकमत्य असणार हें सांगावयास नको. भक्ति-पुरस्सर गुरुदेवसेवा करून ज्ञान संपादन करावें व ज्ञानसंपादनानें चित्तस्थैर्य झालें ह्मणजे स्वतः कृतकृत्य जसें झालों तसें दुसऱ्यांना हि करण्याचा हव्यास ठेवावा हें च तें मत. निवृत्तिरामांत हि तें च अगदीं स्पष्टपणें प्रतिपादिलें आहे. मागील विवेचनात ठिकठिकाणीं त्याचा अनुवाद यथाप्रसंग केला आहे च; पण कांहीं विशेष गोष्ट येथें सांगणें अवश्य वाटतें.

ज्ञान झाल्यावर कर्म केलें पाहिजे कीं नाहीं याविषयीं आमच्या मतें समर्थसंप्रदायांत दोन मतें च नाहींत. पूर्णज्ञान्यानें हि लोकसंग्रहार्थ कर्तव्य-कर्म बिनचूक केलें पाहिजे, या मताचा अनुवाद **निवृत्तिरामांत** सर्वत्र केला आहे व तसें कां करावें याचें कारण विवेचनपूर्वक प्रतिपादन केलें आहे. **गीतारहस्य** प्रसिद्ध झाल्यापासून या विषयाला स्वतंत्र प्रतिपाद्यत्व जसें आलेलें आहे, तसें स्वतंत्र प्रतिपादन जरी निवृत्तिरामांत केलेलें नाहीं, तरी गीतेचें म्हणणें असें च आहे असें गिरिधरांनीं स्पष्ट सांगितलें आहे. पंधराव्या समासांत निष्कामकर्माचें विवेचन करीत असतां ते ह्मणतातः **उत्तरमीमांसक व्यासमुनि । पूर्वमीमांसक शिष्य जयमिनी । श्रीगुरुवचन निःकाम जनीं । शिष्यवचन सकाम ॥ ४५ ॥ व्यासें जयमिनी भारत बुड-विलें । नाना काम्यकर्म संतीं उडविलें । महाभारत देवें रक्षिलें । भगवद्गीतार्थ प्रगटावया ॥ ४६ ॥** यावरून गिरिधरांच्या मतें तरी श्रीमद्व्यास आणि तत्कृत महाभारतग्रंथ हि हे निष्कामकर्मप्रतिपादक असून गीतेचा हि इत्यर्थ अर्थात् तो च आहे. ' भगवद्गीतेचा अर्थ प्रकट करण्यासाठीं महाभारत रक्षिलें ' हे शब्द विशेष महत्वाचे आहेत. गीतेंतील तत्वांचें स्पष्टीकरण महाभारतांतील कथांत केलें आहे आणि महाभारतांत ज्या कथा आहेत त्यांत अंतर्भूत असलेलें निष्कामकर्माचें तत्व गीतेंत निरूपिलें आहे; असें त्या दोघांचें अन्योन्य पोषकत्व लो० टिळकांप्रमाणें गिरिधरांनीं हि सांगि-तलें आहे. पण याहून हि स्पष्ट शब्द योजून पुढें १७ व्या समासांत गिरि-धर सांगतात, ' **पुष्पिता वाणी देवाची । निष्फळा फळदायक कर्माची । निष्कामकर्में परब्रह्माची । वाट सांगे भगवद्गीता ॥ १७-१०.** निष्कामकर्माचा मार्ग मोक्षदायक आहे असें गीता सांगते; आह्मी तिच्या च आधारानें बोलतों असें सांगणाऱ्या गिरिधरांची ही साक्ष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. शेवटच्या कांहीं समासांमध्यें कर्मयोगप्रतिपादक अनेक ठिकाणें आहेत. त्यांचा निर्देश बहुशः टीपांत केलेला आहे च. ह्मणून येथें पुनरुक्ति करीत नाहीं. ज्ञानोबापासूनचे सर्व महाराष्ट्रीय संत भागवतधर्माचे पुरस्कर्ते व अनुयायी आहेत, ही गोष्ट आणि लो० टिळकांनीं भागवतधर्माचें जें लक्षण गीतारहस्यांत सांगितलें आहे तें, या दोघांचा उत्तम मेळ या गिरिधरांच्या वचनानें बसत आहे.

**मायातीत निरंजन साधु । दुर्बळांसी करिती ज्ञानबोधु । यत्न सिक-**

वूनि विज्ञान प्रबोधु । सांग महंती करिताती ॥ १९-१३४ ॥ संत साधु ज्ञानी उदास । जगदोद्धाराचा हव्यास । येकान्तीं राजकारणें सावकाश । राजयोगें विवरिती ॥ १८८ ॥ राजयोगें भक्तियोगें । ज्ञानयोगें वैराग्ययोगें । जगदोद्धार लागवेगें । विवेकी संत करिताती ॥१८९॥ ब्रह्मज्ञानें कर्म उडवावें । मग ब्रह्मज्ञानी कैसें ह्मणवावें । कर्माकर्म विवरावें । विचाररूप सत्कर्म ॥ २२-१२२ ॥

## ( ४ ) ग्रंथसंपादन

प्रस्तुत निवृत्तिराम ग्रंथ छापतांना चार प्रतींचा उपयोग केला आहे. १ ली श्रीगिरिधरांच्या बीड येथील मठांतील हस्तलिखित प्रत. ही सर्व प्रतींत उत्तम, ह्मणजे अस्सल आणि शुद्ध आहे. हिच्या च वरून हा ग्रंथ छापला आहे. २ री रा. विनायकराव भावे यांना मिळालेल्या प्रतीवरून नक्कल करून घेतलेली. हींत किरकोळ पाठभेद व लिपिभेद यांहून विशेष फरक नाहीं. चार पांच ओंव्या मात्र कमी आहेत. ३ री श्रीक्षेत्र रामतीर्थ येथें श्रीमंत आप्पासाहेब जमखंडीकर सरकार यांचे खासगी लायब्ररीकडील छापखान्यांत मिति वैशाख शुद्ध १ विजयनाम संवत्सरे शके १८१५ त छापिलेली. ४ थी रा. ब. काशीनाथ नारायण साने यांचेकडून आलेली. हींत दुसऱ्या समासांत ४ ते १४ ओव्यांची जागा कोरी सोडलेली आहे. बाकी सांगण्यासारखा फरक नाहीं. रावबहादुरांनीं या प्रतीसंबंधानें असें लिहिलें आहे कीं, " ही प्रत अलीकडे केलेली आहे. कोठच्या प्रतीवरून तें सांगतां येत नाहीं. प्रत करणारा हि कोठें, कधीं प्रत केली, तें लिहीत नाहीं. पण बहुधा ही कोल्हापुराहून आली असावी असें वाटतें. " जमखंडीची छापील प्रत आणि ही प्रत यांचें मूळ एक असावें असें वाटतें. या चारी प्रतींत सांगण्यासारखे पाठभेद नाहींत. किरकोळ लिपिभेद च विशेषेंकरून आहेत. जे कांहीं पाठभेद दिसले ते टीपांत नमूद केले आहेत. दुसरी सांगण्यासारखी गोष्ट अशी कीं, चारी प्रतींत कोठें हि ग्रंथकर्त्याचें नांव नाहीं. तसें च छापीव प्रत वगळून प्रती कोणी केल्या, केव्हां केल्या, याचा हि पत्ता नाहीं. ओंवीसंख्या मात्र भावे-प्रत-खेरीज इतर तीन प्रतींची जुळते. साने-प्रतींत कांहीं ठिकाणीं ओंव्यांचे चरण गळलेले मात्र आहेत.

आतां शेवटीं निवृत्तिराम आणि संपादक याविषयीं चार शब्द लिहून ही प्रस्तावना पुरी करितों. सत्कार्योत्तेजक सभेच्या चिटणिसांनीं ग्रंथ वाच-

ण्यासाठीं हातांत दिला. तेव्हां तो चाळून पहातां बरा च कठीण वाटला; सर्व ग्रंथ एकदां वाचून संपविल्यावर तो सहजासहजीं न समजल्यामुळें नीरस वाटला; परंतु पुनःपुनः जेव्हां त्याचें वाचन झालें तेव्हां दर वेळीं त्यांत कांहींतरी नवीन खुबी दिसून येऊन प्रथमदर्शनीं झालेला ग्रह पार नाहींसा झाला आणि निवृत्तिरामाविषयीं आदरबुद्धि उत्पन्न होऊन ती हळूहळू वाढत चालली. ग्रंथ कठीण हा जो ग्रह तो मात्र अद्यापि हि कायम आहे. पण कठीण वाटण्याचें कारण मात्र संपादकाचें सामान्य अज्ञान आणि संप्रदाय-विषयक विशेष अज्ञान हें च आहे. असें आहे तरी, पुनःपुनः वाचल्यानें त्यांतून च अधिकाधिक प्रकाश उत्पन्न होतो. शिवाय, ह्यापूर्वी **श्रीमद्दास-बोधाचीं** हि मननपूर्वक पारायणें झालीं पाहिजेत. तीं हि प्रस्तुत संपादकाचे हातून झालेलीं नाहींत. पण दासबोधाचे अनुरोधानें निवृत्तिराम वाचल्यास त्यांतला कठीणपणा कमी होतो, असा थोडासा अनुभव आला आहे.

निवृत्तिरामाचे संपादनासंबंधानें आणखी हि एका योगायोगाची गोष्ट सांगणें अवश्य दिसतें. आमचे मामा आणि आश्रयदाते कै. तीं. **भास्कर केशव वेलणकर** यांनीं सत्कार्योत्तेजक सभेच्या ग्रंथमालेपैकीं एकादा ग्रंथ प्रकाशित करण्यासाठीं थोडीशी देणगी दिली. त्याच्या आधीं थोडे च दिवस ग्रंथ आमचे हातीं येऊन संपादण्यासाठीं तो वाचण्याची सुरुवात झाली होती. सदर देणगी हातीं येतां, त्यांतून हा च ग्रंथ छापण्याचें चिट-णिसांनीं ठरविलें व तसें प्रसिद्ध हि केलें. अशा रीतीनें एका च प्रयत्नानें दोघां इष्टांची अल्प सेवा करण्याचा सुयोग संपादकास आला. पण त्यांत दुःखाची गोष्ट अशी झाली कीं, तीं. भास्करराव यांस यापूर्वी थोडे दिवस अर्धांगवायूचा झटका येऊन ते त्यानें बेजार झाले होते व यानंतर थोड्या च महिन्यांनीं ते हा लोक सोडून गेले! त्यामुळें माझी ही अल्प सेवा त्यांच्या दृष्टीस पडली नाहीं इतकें च नव्हे तर मी ती करीत आहें, हें हि त्यांना जीवंतपणीं कळण्याचा मार्ग राहिला नव्हता! परंतु ईश्वरेच्छेपुढें इलाज नाहीं, असें जाणून ही सेवा त्यांच्या आत्म्याला च आतां अर्पण करणें भाग आहे.

धुळें,<br>१८३८ आश्विन शु. १० } **केशव लक्ष्मण ओगले**

# चिटणीसाचा खुलासा

आमच्या विनंतीला मान देऊन आमच्या एका मित्राचे मित्र रा. रा. केशव लक्ष्मण ओगले बी. ए. यांनीं हा ग्रंथ संपादिला हे त्यांचे सभेवर मोठे उपकार आहेत. त्यांच्याकडून निवृत्तिरामग्रन्थाचें संपादन किती शास्त्रोक्त झालें आहे हें प्रत्यक्ष अनुभवानें वाचकांना दिसत च आहे. 'आरंभीची अनुक्रमणिका व शेवटची सूची व मध्यंतरींच्या टीपा आणि सारभूत प्रस्तावना हीं रा. ओगले यांच्या विद्याव्यासंगाची, श्रमाची व श्रीसमर्थकार्यावरील प्रेमाची उत्तम साक्ष पटवीत आहेत. अशा दहा पांच मित्रांचें सहाय्य मिळाल्यास श्री रामदास आणि रामदासी ग्रन्थमालेंतील १२१ भाग प्रसिद्ध करण्याचा आपला मनोरथ श्रीसमर्थकृपेनें पूर्ण होणें अशक्य नाहीं !

रा. रा. भास्कर केशव वेलणकर नांवाचे एक सज्जन गृहस्थ मुंबईस असत. त्यांचा आणि आमचा मुळीं च परिचय नव्हता, परंतु एके दिवशीं त्यांच्या कडून अशी सूचना आली कीं, एकादा श्रीसांप्रदायिक ग्रन्थ छापविण्यासाठीं आपण शंभर रुपये कायमचे देऊं इच्छितों. आह्मीं त्यांना काय कळवावयाचें तें कळविलें, परंतु एकादा ग्रन्थ छापविण्याकडे च आपल्या रकमेचा विनियोग करावयाचा, असा आपण पूर्वीं च संकल्प केला आहे असें कळवून, त्यांनीं सभेकडे शंभर रुपये पाठविले हि. रा. भास्करराव यांचे हे आह्मांवर मोठे उपकार झाले ! त्यांच्या इच्छेप्रमाणें आज हा निवृत्तिराम ग्रन्थ संपूर्ण प्रकाशित होत आहे, पण तो त्यांनीं पहावा असा श्रीसंकेत नव्हता याचें वाईट वाटतें !

धुळें, शके १८३८ कार्तिक शु. १

॥ श्रीरामदासार्पणमस्तु ॥

# श्रीसद्गुरुस्तवन

## पद

जय जय जी श्री गुरुराया ॥ ध्रु० ॥

अजरामरा अलक्ष अपारा ।
वाहिन मी निजपदीं काया ॥ १ ॥

नित्यानंदा नित्य परिपूर्णा ।
निरसीं दुर्घट माया ॥ २ ॥

सकळ चराचर मुनिवर सुरवर ।
वंदिती तुझिया पायां ॥ ३ ॥

रिद्धि सिद्धि दासी होउनि मुक्ति तिष्ठताती ।
पावावया तुझिया छाया ॥ ४ ॥

कल्याणदासा हृदयनिवासा ।
भावितसे प्रेमछाया ॥ ५ ॥



# शुद्धिपत्र, पाठभेद, दुरुस्ती इ०

| समास | ओंवी | अशुद्ध इ० | शुद्ध इ० |
|---|---|---|---|
| ३ | ४ | या ओंवीवर ' अगोचरी मुद्रा ज्यांची त्या समर्थांचें रूप हें च प्रत्यक्ष भगवंताचें सगुण स्वरूप होय ' अशी टीप वाचावी. | |
| ३ | १२ | त्रिविध । ओंकार | त्रिविध ओंकार |
| ३ | १४ | होय | होय ! |
| ३ | २८ | ' थितें ' यावर ' स्थित, असलेलें ' अशी टीप वाचावी | |
| ७ | २४ | 'च तों' बद्दल जमखिंडी–प्रतींत 'चळों' आहे. | |
| ७ | ४३ | मुनिश्चरणा | मुनि चरणा |
| पान ४० | टीप २ | चवथ्था | चवथ्या |
| ८ | ३१ | ' जनकनंदनी ' या शब्दावरील टीपेबद्दल ' आपल्या सासूच्या सेवेंत असलेली सीता ' असें वाचावें. | |
| ८ | ३५ | ' प्रकृतिदेह ' यावरील टीपेबद्दल ' स्त्रीदेह ' असें वाचावें. | |
| पान ४२ | टीप ४ | ३० | २५ |
| ८ | ६३ | तम्नय | तन्मय |
| पान ५५ | टीप ५ | याया | माया |
| पान ७७ | टीप १४ | सूब्राला | सूत्राला |
| १६ | ९ | दशमस्त्वे | दशमस्त्वं |
| १६ | ३७ | अतेळें | अतळें |
| १६ | ३८ | सहस्त्र | सहस्र |

नमन सद्गुरुमाहेरा । अपार अप्रमेय जगदीश्वरा । निज निर्विकारा नमन तुज ॥ ९ ॥ तुझेन ठेंगणें सर्व जालें । मायाभान उडोन गेलें । गगनसदृशं ध्यान केलें । ब्रह्मानंदं श्लोकार्थें[1] ॥ १० ॥ नाद बिंदु कळातीत । शुद्ध बुद्ध सर्वातीत । उपमे रहित व्योमातीत । नमन माझें श्रीचरणीं ॥ ११ ॥ अज्ञानाचें मूळहरण । जन्मकर्माचें निवारण । ज्ञान विज्ञान सिद्धि कारण । तीर्थ पावन स्वामीचें ॥ १२ ॥ पूर्व मानसें पश्चम मानसें । उत्तर मानसें दक्षण मानसें । अधोर्ध्व मानसें स्वर्गमानसें । मोक्ष मुक्ति कुरवंडिल्या ॥ १३ ॥ नाना मानसें येकवटलीं । सद्गुरुचरणीं विनट जालीं । वेद शास्त्रें पुराणें बोलिलीं । सद्गुरुमहिमा[2] अधिक ॥ १४ ॥ आतां माझ्या जगजीवना । कुळदैवता पुरातना । देवाधिदेवा मनमोहना । जानकीजीवना वंदन ॥ १५ ॥ मन लक्ष्मण चरणारविंदीं । भाव भरत आनंदकंदीं । शरण शत्रुघ्न निजानंदीं । स्वानंदकंदीं हनुमंतु ॥ १६ ॥ नमन माझें श्रीरामचरणा । षडशास्त्रामाझि हे विचारणा । स्थूळसूक्ष्मादि महाकारणा । तुर्या उन्मनी कुरवंडी ॥ १७ ॥ नळ नीळ जुत्पति मनोवाती । अठरा पद्म वानर वोवाळिती । ब्रह्मादि पदें स्वर्गसंपत्ति । लोण उतरती स्वानंदें ॥ १८ ॥ तेथें संत स्वानंदघन । तन्मयाकार जालें मन । त्यांसी माझें अभिवंदन । भवसागर तरावया ॥ १९ ॥ उतरावया संसारसागरु । गुरु कर्णधारु[3] कवीश्वरु । गुरुकृपेचे जे नरु । सारविचार जाणती ॥ २० ॥ जाणती प्रपंचाचें ज्ञान । परमार्थाविषई अज्ञान जन । अज्ञान ते ही होती सज्ञान । सत्समागम लाधल्या ॥ २१ ॥ अध्यात्मविद्या अध्यात्मग्रंथ । प्रकट करिती संत महंत । निवृत्तिरामकथापंथ । श्रोतेजनीं परिसावा ॥ २२ ॥ सभानायक साधुजन ।

---

१ ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिं । द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्वमस्यादिलक्ष्यम् । एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं । भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि ॥ या श्लोकाच्या अर्थानें. २ सद्गुरूचा महिमा दासबोधांत अनेक ठिकाणीं वर्णिला आहे, तो वाचकांनीं अवश्य वाचावा. ३ सुकाणूवाला.

सकळांसि केलें अभिवंदन । आतां कथानुसंधान । वक्ता ह्मणे ऐकावें ॥ २३ ॥ ग्रंथा नाम निवृत्तिराम । श्रीरामदासस्वामीविश्रामधाम । गुरुपरंपरा श्रीराम । तारकब्रह्म चराचरीं ॥ २४ ॥ श्रीरामदासस्वामी अवतारमूर्ति । विख्यात पावन पुण्यकीर्ति । समर्थवेषें रघुनाथमूर्ति । आत्माराम जगद्गुरु ॥ २५ ॥ भविष्योत्तरआश्रयें बोलिलें । श्रोतीं पाहिजे श्रवण केलें । कलिमलदहन चरित्र जालें । संतसज्जनीं ऐकावें ॥ २६ ॥ निर्गुण ब्रह्म निरंजन । तेथें हरिसंकल्प विष्णु आपण । महद्भूत अंतरात्मा पूर्ण । संभवामि युगे युगे ॥ २७ ॥ कृतायुगीं अंतरात्मा पावन । त्रेतायुगीं पवननंदन । द्वापारीं ह्मणती भीमसेन । श्रीरामदासस्वामी कलयुगीं ॥ २८ ॥ आदिपुरुषाचें अवतरण । बोलिलें युगावेतारण लक्षण । समर्थ निर्गुण निरंजन । ईश्वरतनु निर्धारें ॥२९॥ कलयुगीं कल्मश लोकांसी । भवसागर तरावयासी । श्रीरामनाम नौका जीवासी । गुरु कर्णधार आपण ॥ ३० ॥ गौतमीतीरीं उत्पन्न । कृष्णातीरीं विहारस्थान । परळी पर्वतीं येकांत वन । समाधिभवन निरुपाधि ॥ ३१ ॥ श्रीरामदासस्वामी योगींद्र । रामध्यानपरायण कृपासमुद्र । हनुमानरूपें निःकलंक चंद्र । भक्तचकोर अवलोकिती ॥३२॥ आत्मज्ञानविहीन जन । कर्माकर्म नकळे ज्ञान । भक्तिमार्गें रघुपति आपण । अत्यद्भुत प्रकाशिला ॥३३॥ निस्सीम वैराग्य रघुनाथभक्ति । विशदें ज्ञान लोकांप्रति । विषयांधासि सूर्यदीप्ति । अटण केलें पृथ्वीचें ॥३४॥ व्यापकपणें सकळां ठाईं । न कळे देहीं कीं विदेहीं । षड्गुणसंपन्न ईश्वर पाहीं । नाना मतें निरसावया ॥ ३५ ॥ नाना मतीं भेद नाना । निर्भीड कोण्हीच बोलेना । संशयनिवृत्ति होईना । माया आणि

१ ' धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे । ' या वचना प्रमाणें पूर्ण अंतरात्म्यानें मारुति आदिकरून अनुक्रमें अवतार घेतले. त्यांतील कलियुगींचा अवतार श्रीसमर्थ होत. २ मारुति. ३ सुकाणूवाला. ४ गोदावरीचे कांठीं जांबगांवीं. ५ स्पष्ट. ६ विषयांध लोकांना रामभक्तिरूप सूर्यप्रकाश समर्थांनीं दाखविला. ७ भ्रमण. समर्थांचें तीर्थाटण सुप्रसिद्ध च आहे. ८ येथें थोडक्यांत पण मार्मिक रीतीनें श्रीसमर्थचरित्राचें रहस्य आलें आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १८ | १७ | कत | कर्ता |
| १८ | ४२ | ' कळहो ' बद्दल जमखिंडी–प्रतींत ' कल्होळ ' आहे. कल्होळ=कल्लोल, लाटा. | |
| पान १०४ टीप २ | | केलें लेंकर्म | केलेलें कर्म |
| ,, | ,, | करानें | करावें |
| १९ | ९१ | साह | साहे |
| पान ११५ टीप १ | | जिव्याचा | जिन्याच्या |
| ,, | ,, | होतें | होत |
| पान ११५ टीप २ | | अंतरात्माला | अंतरात्म्याला |
| २० | ६५ | होत | होतां |
| २० | १११, ११२ | यांतले चरण गळाले आहेत. त्या ओंव्या अशा वाचाव्या. क्षर अक्षर दोनी पुरुष । सर्वभूतीं जगन्निवास । उत्तम पुरुष आदिपुरुष । विमळ ब्रह्म सनातन ॥ १११ ॥ एवं उत्तम पुरुष तो अन्य । तेथें नाहीं मायाभान । माया ब्रह्म अनुसंधान । ज्ञान विज्ञान माझोनि ॥ ११२ ॥ | |
| २१ | १३ | अढळपदीं । स्थापिला | अढळपदीं स्थापिला |
| २२ | २२ | वदे | वेद |
| २२ | ४० | सतीं | संतीं |
| पान १४४ टीप ५ | | माहा | माया |

॥ श्री ॥

# ॥ निवासिराम ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

ॐ नमो जी गजानना । आदिपुरुषा पुरातना । मंगळमूर्ति स्वानंदघना¹ । चित्तचातकें निववीसी ॥ १ ॥ सदा सर्वदा हृदयांबका-शीं² । उदयअस्तेंविणें³ रविशशी । नाना चक्रवाकचकोरासी । नित्य दर्शन स्वानंदें ॥ २ ॥ आदि विनायक अनंतकळा । आदि गणेश अवतारमाळा । आदि अनादि सिद्धि सकळा । विद्यानिधान गणपति ॥ ३ ॥ तुजें वेगळें तुझें स्तवन । करील कोण भक्तजन । अनन्य भावें अभिवंदन । सिद्धलाडु गणेंद्रा ॥ ४ ॥ जय जय अंबे वरदायिनी । विश्वकदंबे मनमोहनी । मोक्ष मुक्ति तुज वरूनि । वोवाळू-नि सांडिल्या ॥५॥ तुझे पोटीं जीवन्मुक्त । विद्या विनय संपन्न युक्त । हरिभक्त होऊनि विरक्त । निवृत्तिपंथें चालिले ॥६॥ तूं सद्भक्तांचें जीवन । तूं मनाचें मनमोहन । नाना कळा ब्रह्मज्ञान । ज्ञान विज्ञान तुझेनि ॥७॥ तूं मूळमाया सरस्वती । तुझेनि गुणें तुझी स्तुति । अनन्यभावें यथा-मति । तुज माते अभिवंदन ॥ ८ ॥ जय जय जी करुणाकरा ।

---

१ आत्मानंदाचा मेघ असा गणपति भक्तांच्या चित्तरूपी चातकाला शांत करितो. मेघ आणि चातक यांचा संबंध सर्वप्रसिद्ध च आहे. २ हृदयरूप आका-शामध्यें. ३ आपल्या सूर्याला आणि चंद्राला उदय आणि अस्त असतात; त्यामुळें चक्रवाक आणि चकोर यांना केव्हां तरी त्यांचें अदर्शन होऊन दुःख होतें. पण हृदयाकाशांतील स्वानंदरूप चंद्र सूर्य एकच असल्यामुळें त्यांना केव्हांच अस्त नाहीं. चक्रवाकांचा जोडा रात्रौ विभक्त असून सूर्योदयीं एकत्र होतो व चकोराला चंद्रप्रकाश हेंच अन्न आहे, हे कविसंकल्प सर्वश्रुत आहेत. ४ स्तवार्थ तुझिया तुझ्यासम कवी कधीं जन्मती ॥ (मोरो० केका० ) ५ हें गणपतीचें विशेषण वेणा-बाईच्या सीतास्वयंवरांत ही आलें आहे. सीतास्वयंवराच्या काजा । सिद्धलाडु गण-राजा । पूर्ण मोदक पंचखाजा । तूं वऱ्हाडी आधीं ॥ (१, ३.)

ब्रह्मींची ॥ ३६ ॥ सर्वत्रह्में शाब्दिकज्ञान जालें । भक्ति ज्ञान वैराग्य लोपलें । सकाम भजनें जन लागले । कामनेपाठीं प्रत्यक्ष ॥ ३७ ॥ परलोकप्राप्तीचा विचार । कोण पाहातो सारासार । तारकब्रह्म राम साचार । मूढ लोकां कळेना ॥ ३८ ॥ ह्मणोनि निर्भीड वीतरागी । धगधगीत ज्ञानशक्ति आंगीं । ऐसा अवतार कलयुगीं । समर्थवेषें प्रगटला ॥ ३९ ॥ समर्थस्वामीचें मूळ आख्यान । ॐपुण्याहवचनीं सावधान । सावधान ह्मणतां सावधान । अंत्रपाटीं निघाले ॥ ४० ॥ शुक[1] भेऊनि पळाले वेगें । स्कंधे[2] कपाटीं[3] मात्रुरागें । नाना संसारदुःखें वीतरागें । अरण्य सुखें सेविती ॥ ४१ ॥ अभिनव लीळा अवतारमूर्ति । श्रीरामनौमी जन्म सत्कीर्ति । द्वादश वर्षी विख्यात कीर्ति । संत देखोनि निवाले ॥ ४२ ॥ संग कोणाचा न साहे । निःसंग वनीं विचरत आहे । जगदोद्धार करीत पाहे । धर्मस्थापक सर्वोत्तम ॥४३॥ अणिमादि सिद्धि सामर्थ्यें । तुच्छ केलीं स्वामीसमर्थें । ध्वज उभारिले परमार्थें । लोकत्रईं परियसा ॥ ४४ ॥ भक्तजन जेथें जेथें भाविती । तेथें तेथें दर्शनें होती । संत सर्वज्ञ सर्वत्र ह्मणती । अवतारपुरुष निर्धारें ॥ ४५ ॥ नाना वनीं जगन्निवास । गिरिकंधरीं करी वास । जन वन सेवी सावकाश । आनंदवनीं सर्वदां ॥ ४६ ॥ नाना योगी ऋषि मुनि । दर्शन घेऊनि जाती वनीं । दत्तात्रयें देखिले नयनीं । करवीरक्षेत्रीं समर्थें ॥ ४७ ॥ प्रबर्षपाराशरीं उड्डाण केलें । शिवतर

---

१ शुकाचार्य; व्यासांचा पुत्र, जन्मतांच संसाराला भिऊन रानांत जाऊं लागला. पुढें समास १० वा पहा. २ स्कंद, कार्तिकेय. ३ रानांत. ४ समर्थांचा संसारत्याग शुकादिकांच्याहून निराळ्या प्रकारानें झाला आहे; दुःखाच्या किंवा संसाराच्या भयानें नव्हे. ५ इच्छेनुरूप सूक्ष्म किंवा स्थूळ रूप धारण करण्याचें यौगिक सामर्थ्य. ६ क्रमानें. ७ श्रीसमर्थप्रताप ३, २० पहा. ८ येथें सांगितलेलें समर्थांचे चमत्कार गिरिधरांनीं ‘ समर्थप्रतापाच्या ’ तिसऱ्या समासांत सविस्तर वर्णिले आहेत. ते वाचकांनीं अवश्य पहावे. यांत आलेल्या स्थळादिकांचे निर्देश ही तेथें टीपांत केले आहेत.

शिवतरीं स्वरूप देखिलें। नाना शिवगणें आश्चिर्य मानिलें। कोण लीला देवाची ॥ ४८ ॥ चंद्रगिरीगवीं निवास। पंचाननेसीं अखंड वास। ब्रह्मगिरिपासूनि रहिवास। पश्चम समुद्रीं गिरिकंदरीं ॥ ४९ ॥ समुद्रेश्वरीं हिमाळयकुंडीं। देहपातीं समर्थ धरिले भुजांदडीं। श्रीराम लक्ष्मण सर्वे अखंडीं। समर्थतनू रक्षावया ॥ ५० ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश। त्रिगुणमाया दृश्यभास। बाधों न लाहाती समर्थास। ईश्वरतनु ह्मणोनियां ॥ ५१ ॥ काय काय समर्थें लीळा केली। अपार अप्रमेय न वचे वदली। देखिली ऐकिली कीर्ति कथिली। संतसज्जनीं विख्यात ॥५२॥ जनस्छानीं अनुष्ठान। पंचवटिके श्रीरामदर्शन। आत्माराम स्वानंदघन। आपआपणा भेटले ॥ ५३ ॥ लीळावताराची योगलीला। कोण वर्णील हे स्वलीळा। हरिहर स्वभावें अवलीळा। धर्मस्छापने कारणें ॥ ५४ ॥ ब्राह्मण्यरक्षणीं शंकरमूर्ति। प्रगट जाले विख्यात कीर्ति। तेवि प्रगटले रघुनाथमूर्तिं। त्रिकांडवेद रक्षावया ॥ ५५ ॥ नाना समर्थांचीं चरित्रें। श्रवण करिती संत सुखपात्रें। संतसंगें श्रवणमात्रें। नाना दोष नाशती ॥५६॥ श्रोतेजन करिती प्रश्न। समर्थासि भेटले हनुमान। तें समग्र प्रकारें कथन। सर्वज्ञें केलें पाहिजे ॥५७॥ देखोन श्रोतयाचा आर्त। वक्ता ह्मणे ऐका सुचित। समर्थासि भेटले हनुमंत। कथा श्रीमंत परिसावी ॥५८॥ मुख्य सर्वेश्वर हनुमान। हनुमानरूपें समर्थ आपण। आत्माराम स्वानंदघन। संतसज्जनीं कलीयुगीं ॥ ५९ ॥ ऐका कृष्णातीरीं बाहेक्षेत्रीं। कृष्णवेण्या द्विधामात्रीं। श्रीरामलिंगीं कौतुक नेत्रीं। अप्रमेय देखिलें ॥६०॥ कृष्णेमध्यें भीमकुंड। त्यांत बलभीममूर्ति महा प्रचंड। समर्थें बुडी देऊनि अखंड। कळा वितंड काढिली ॥ ६१ ॥ रघुनाथअवतारींची सामर्थ्यमूर्ति। कृष्णेमध्यें गुप्त जोतिरूपें होती। अयोध्ये जातां रावणवधांतीं। कृष्णास्नानासि राम राहिले ॥ ६२ ॥ ध्यानस्छ असतां

१ शिवाजीच्या मंडळीनें. २ सिंहाशीं, किंवा वाघाशीं. श्रीसमर्थप्रताप ३, ६१ पहा. ३ कर्म, उपासना आणि ज्ञान हीं वेदांचीं तीन कांडें होत. ४ उत्कंठा. ५ बाहेगांवीं. ही कथा श्रीसमर्थप्रताप ३, ३८—४९ यांत आली आहे.

रघुनाथ । कृष्णा गडगर्जना अत्यंत करित । कृष्णाजळ अद्भुत प्रेमें धांवत । लोटि हनुमंत मागें दोनी गावें ॥ ६३ ॥ दोनि गांवें डोहो तुंबूनि राहे । कृष्णा निवांत विचार पाहे । ध्यान विसर्जन जाल्यां हनुमंत पाहे । यावें रघुनाथदर्शना ॥ ६४ ॥ कृष्णादर्शनासि आली लवलाहें । हनुमंतें विभागिली दोनी बाहें । नांव पडलें गांव बाहें । बाहुक्षत्र पुराणीं ॥ ६५ ॥ श्रीरामें लिंग तेथें स्थापिलें । कृष्णवेणीसी विभागिलें । वेण्या द्विधा येक केलें । पूर्वभागें संगमीं ॥ ६६ ॥ बाहो क्षत्रींचा रम्य खळाळ । प्रबोधिताहे लोक सकळ । नाना मध्यरात्री होतां निवळ । निवांत प्रांत ऐकतसे ॥ ६७ ॥ श्रीरामलिंगीं कृष्णा सव्य । कृष्णेसि आहे रामलिंग सव्य । कृष्णा वेणी वाम सव्य । श्रीरामलिंगीं विराजे ॥ ६८ ॥ एवं बाहुक्षत्रीं बलभीममूर्ति । कृष्णेमध्यें गुप्त पुरातन होती । जगदोद्धारा ये रे मारुति । समर्थदेवें हाकारिला ॥ ६९ ॥ प्रतिशब्द दिधला परमानंदें । आले भेटले निजानंदें । गगन कोंदलें गंभीरशब्दें । जयजयकार दाटला ॥ ७० ॥ देवदुंदुभी लागल्या गगनीं । लोकीं प्रत्यक्ष ऐकिल्या श्रवणीं । अवतारपुरुष ह्मणती जनीं । धर्मस्थापक समर्थ ॥ ७१ ॥ एवं कथानुसंधान । समर्थासि भेटले हनुमान । हनुमानरूपें समर्थ आपण । आत्माराम सर्वत्र ॥ ७२ ॥ ऐसें अघटित कर्म केलें समर्थें । नवल दैवी हो सामर्थ्यें । समर्थ कोण ह्मणाल जी पुरुषार्थें । श्रीरामदासस्वामी ॥ ७३ ॥ मूळ मूर्ति अंतरीं गुप्त केली । कृष्णावेणीसी मात्र कळली । समर्थपरंपरा प्रगटली सृष्टीमध्यें परियसा ॥ ७४ ॥ पंचक्रोशीं कृष्णातीरीं । चाफळ नाम विख्यात पुरी । भोंवते उदंड दाटले गिरि । तेथें अधिष्ठान प्रभूचें ॥ ७५ ॥ समाधिस्थळ समर्थाचें । सह्याद्रिशिखरीं विख्यात साचें । परळीनामें परशत्रूचें । लीन विलीन श्रीरामीं ॥ ७६ ॥ तेथें नांदती समर्थ स्वामी । आत्माराम परंधामीं । संत सज्जन स्वानंदधामीं । ऐक्यमिळणीं

१ हनुमानानें बाहूंनीं कृष्णेला विभागिल्यामुळें त्या स्थानाला बाहुक्षेत्र असें नांव मिळालें.

मिळाले ॥७७॥ शिष्यछात्रें भरतखंड व्यापिलें। कीर्तिवितानें दिग्मंडळ झांकलें । वज्रदेह[१] दैवत बोळिलें[२] । यावश्चंद्रे[३] दिवाकर ॥ ७८ ॥ वज्रदेह परंपरा । आत्माराम व्यापक खरा । द्वैतदळणीं चराचरा । जगद्वंद्य उपासना ॥ ७९ ॥ निर्द्वंद्व राम सनातन । आत्माराम पुरातन । विश्वंभर विद्यमान । संत सर्वज्ञ जाणती ॥ ८० ॥ देह विदेह सांडूनि येती । संत सज्जन दर्शन घेती । आत्मारामीं आरामें होती । द्वंद्ववृत्ति सांडोनिया ॥ ८१ ॥ समर्थस्वामीचें महिमान । जाणती संत सुलक्षण । आत्माराम निरंजन । द्वैतदळणें करितसे ॥ ८२ ॥ कर्म उपासना ज्ञान । त्रिकांड वेद केला प्रमाण । निर्गुण ब्रह्म निरंजन । संतसज्जनीं अनुभविलें ॥ ८३ ॥ नाना पंथ नाना मतें । आपभ्रंश जिवातें समस्तें आत्मारामीं भ्रांतचित्तें । गुरुगीतार्थ नेणतां ॥ ८४ ॥ गुरुगीतार्थ प्रगट केले । समर्थभानु प्रगट जाले । संतमरीच[६] प्रकाशले । ग्रंथरूपें सर्वत्र ॥ ८५ ॥ ठाईं ठाईं मूर्तिस्छापना । स्छळोस्छळीं मोहछाहें[७] नाना । भूमंडळ भरूनि कीर्ति गगना । ब्रह्मभुवना पावली ॥ ८६ ॥ नाना ग्रंथ समर्थांचे । दासबोध मुख्य स्वामीचे । जेथें संपूर्ण वेदशास्त्रांचे । भावगर्भ प्रगटले ॥ ८७ ॥ नाना संमति श्रुति स्मृति । आत्म शास्त्र गुरु प्रचिति । संशय छेदक महामति । दासबोध ग्रंथ समर्थांचा ॥ ८८ ॥ अखंड विवरण लोकोत्तरीं । नाना महंत सृष्टीवरी । नित्यानित्य सारासार विचारीं । निवृत्तिपंथें चालिले ॥ ८९ ॥ श्रोते ह्मणती जी भलें । समर्थअख्यान श्रवण केलें । निवृत्तिराम कथन बोलिलें । पाहिजे आतां गुरुकृपें ॥ ९० ॥ समर्थस्वामीचें अख्यान । श्रवणें तृप्त जालें मन । आतां निवृत्तिराम ग्रंथकथन । सर्वज्ञें केलें पाहिजे ॥ ९१ ॥ नाना ग्रंथ श्रवण केले ।

---

१ हनुमान. २ प्रसन्न झालें. ३ 'यावच्चंद्रदिवाकरौ,' चंद्रसूर्य आहेत तों पर्यंत, अखंड. ४ आत्मानंदांत मग्न होतात. ५ द्वैताचें निरसन. ६ संतरूपी सूर्य. ७ महोत्सव. ८ रहस्यें ९ श्रीमद्दासबोधांत श्रुतिस्मृतींचें रहस्य घेऊन आत्म, शास्त्र व गुरुप्रतीति यांचाही आधार घेतला आहे. दासबोध १, १, १५-२० पहा.

निवृत्तिरामग्रंथ नाहीं ऐकिले । समर्थकृपें हें प्रासादिक बोलिले । किंवा धीटपाठांतर ॥ ९२ ॥ ऐसें श्रोतेजनीं ग्रंथांतर पुसिलें । वक्ता उत्तर देतसे भलें । समर्थकृपें हें प्रासादिक बोलिलें । धीटपाठ नव्हे जी ॥ ९३ ॥ ऐका कृष्णातीरीं सद्गुरुदेवें । अपार अप्रमेय देवाधिदेवें । परिपूर्ण कृपेंकरूनि प्रभावें । काय आज्ञा केलीसे ॥ ९४ ॥ वेणीस्वामी ह्मणती वेणी । भक्ति ज्ञान वैराग्य त्रिवेणी । विशेष निवृत्ति जाली श्रीचरणीं । तरि निवृत्तिग्रंथ त्वां करावा ॥ ९५ ॥ ऐकोनि नमन केलें साष्टांग । हर्षरोमांचें दाटलें अंग । ह्मणे समर्था आज्ञा अभंग । वरदानें सिद्धि अनुकंपे ॥९६॥ निवृत्तिग्रंथ करणें आज्ञा । निवृत्तिवृत्ति वारिली सर्वज्ञा । ग्रंथ करणें समर्थसुज्ञा । समर्थपरंपरा करील ॥ ९७ ॥ समर्थ सद्गुरु ह्मणती वेणीसंप्रदाई । बाईया नामें निवृत्तिवेणी आहे देवगृहीं । येथूनि दया प्रगटेल विमळ हृदईं । निवृत्तिग्रंथ होईल ॥ ९८ ॥ निवृत्तिराम ग्रंथनाम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । समर्थें सांगोनि दिधला नेम । आनंदनाम संवत्सरीं ॥ ९९ ॥ विद्वान्न विरागी भक्त ज्ञानी । पुत्र प्रसवेल विद्याजननी । स्वानुभवपुत्र श्रीगुरुचरणीं । आत्मारामीं निवे-

---

१ सीघ्रचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडलें तें चि वर्णिलें । भक्तीवांचून जें केलें । त्या नांव धीटपाठ ॥ इ० दा. बो. १४, ३. धीटपाठाचीं सविस्तर लक्षणें त्या समासांत ८–२० ओव्यांत सांगितलीं आहेत. २ प्रासादिक ग्रंथाचीं लक्षणें दा. बो. १४, ३ यांत २२–३४ ओव्यांत दिलीं असून त्यांचें तात्पर्य–' भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त । तयासि मानिती मुक्त । साधुजन ॥ त्याचे भक्तीचें कौतुक । तया नांव प्रसादिक । सहज बोलतां विवेक । प्रगट होये ॥ ' असें दिलें आहे. ३ श्रीसमर्थ. ४ समर्थशिष्या वेणाबाई. ५ त्रिवेणी संगम. भक्ति, ज्ञान, वैराग्य जिच्यांत एकवटलीं आहेत अशी. ६ त्वां. ७ आपली आज्ञा प्रमाण आहे, आणि आपल्या कृपेनें सिद्धिही होईल. ८ निवृत्ति झाली अशी माझी भावना देखील आपण नाहींशी केली. या करितां निवृत्तिराम ग्रंथ समर्थपरंपरेंतील दुसरा कोणी तरी करील असा वेणाबाईच्या ह्मणण्याचा आशय. ९ वेणाबाईची शिष्या बाइयाबाई हिची हकीगत श्रीसमर्थप्रताप समास ११ ओव्या ४७–५३ यांत गिरिधरांनीं दिली आहे. १० शके १५९६. ११ हें निवृत्तिरामाच्या रचनेचें भविष्य.

दील ॥ १०० ॥ आनंदसंवत्सरीं जन्म गिरि । संप्रदाई कृष्णातीरीं । षोडश वर्षें ग्रंथांतरीं । दासबोधीं अद्वैत विवरेल ॥ १ ॥ नंदनवर्षी निवृत्तिराम । ग्रंथ होईल उत्तमोत्तम । आदिपुरुष आत्माराम । तोचि आपण बोलेल ॥ २ ॥ ऐसें सद्गुरु समर्थें निरोपिलें । तेंचि कृपाचिन्ह प्रगटलें । ग्रंथारंभ कथन बोलिलें । संतचरणीं यथार्थ ॥ ३ ॥ एवं समर्थस्वामीचें आख्यान । श्रवण करिती भाविकजन । त्यांचीं द्वय पापें वोसरती जाण । ब्रह्मसंपन्न ते होती ॥ ४ ॥ उत्कट भक्ति उत्कट ज्ञानें । उत्कट वैराग्य उत्कट ध्यानें । उत्कट योग अनुष्ठानें । ब्रह्मसायोज्य पावती ॥ ५ ॥ सकळ पुरती मनकामना । ब्रह्मीभूत मनोभावना । आत्माराम उपासना । सद्गुरुकृपें यथार्थ ॥ ६ ॥ ज्याचा जैसा भावार्थ । भाविकां देव यथार्थ । कोणासी सांगों गुह्यार्थ । संत सर्वज्ञ जाणती ॥ ७ ॥ भावें श्रवण करिती सकाम । त्यांचे पुरती सकळ काम । सद्गुरुकृपें स्वानंदधाम । आत्माराम पावती ॥ ८ ॥ आतां असो हें आख्यान । समर्थस्वामीचें महिमान । पुढें निवृत्तिराम ग्रंथ-कथन । निवृत्तिवेणी करील ॥ ९ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदास-स्वामी विश्रामधाम । सद्गुरुसमर्थआख्यानं नाम । समास प्रथम बोलिला ॥ ११० ॥ समास ॥ १ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु तात वरदपाणी । तुझेनि वरदें वरदवाणी । भाविक माता तूंचि ब्रह्मवरदायिनी । तुळजापुरस्थे जगदंबे ॥ १ ॥ तुझें आनंदजळकल्लोळें । येथें स्नान केलें परम निर्मळ । तेथें गेले कलि-मळमळ । पवित्र सोज्वळ स्वानंदे ॥ २ ॥ आनंद उत्साह नवचंडी । नवविधा भक्ति अखंडी । नाना स्वानुभव शतचंडी । ज्ञानाग्निकुंडीं प्रगट तूं ॥३॥ ब्राह्मणहवनें शुद्धद्रव्यें । सत्कर्मकर्में जें अपूर्वें । ब्रह्मविद्येचीं महापर्वें ।

---

१ या वर्षी गिरिधरांचा खरा जन्म झाला कीं संप्रदायदीक्षारूप जन्म झाला? २ शके १६३४. ३ वेणाबाईच्या संप्रदायापासून ज्याला निवृत्ति झाली असा गिरिधर. ४ लाटा.

तुज वेगळीं न होती ॥ ४ ॥ पूर्ण पूर्णिमा मानसपूजा । मानस अर्पिलें तुज वोजा । तेणें प्रगटसी अनंतभुजा । कुळदेवी तूं चराचरीं ॥ ५ ॥ दृष्टी देखतां अनंतरूपें । तदंतरीं तुझें चि स्वरूप । विश्वव्यापिनी विश्वरूप । विश्वमोहनी तूं अंबा ॥ ६ ॥ शक्तिनवमी रामनवमी । आत्मनिवेदनभक्तिनवमी । भक्तमुक्तऐक्यनवमी । श्रीगुरुनवमी निर्धारें ॥ ७ ॥ नाना घटी नवरात्र नवमी । आत्मनिवेदन आत्मारामीं । सहजानंद विजयादशमी । निरुपम्य उत्साह ॥ ८ ॥ तेथें वर्णन काय करावें । निवांत ध्यान दृष्टीसी पाहावें । आपआपणासी विसरावें । ठक पडावें मनोवृत्ति ॥ ९ ॥ ऐक्य जाहालें स्वभावें । मूळपीठ देखिलें प्रेमभावें । अनन्यभावें विश्वप्रभावें । सहज सुखासनिं श्रीअंबा ॥१०॥ छत्रें चामरें निशाणें । मोर्हि कीर्तिमुखें सूर्यापानें । गगन कोंदलें विमानें । उदकारें दाटला त्रिभुवनीं ॥ ११ ॥ ऐसी भवमहिषासुरमर्दिनी । मायाघांटशिळे उभी भवानी । भवानीशंकर ध्यातसे मनीं । आत्माराम जगद्गुरु ॥ १२ ॥ श्रीराम आणि वरदायिनी । दोन्ही येकचि श्रीगुरुवचनीं । सद्गुरुरूपें ब्रह्मयोगिनी । जगदोद्धारणी जगदंबा ॥ १३ ॥ निरावलंबीं अवलंबन । माते तुझेंचि कृपाचिन्ह । सद्गुरुकृपें ब्रह्मसंपन्न । करिसी पावन भक्तिमार्गें ॥ १४ ॥ नाना मार्ग विहंगममार्ग । अधोर्ध्वमार्ग आकाशमार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग । गुरुगम्यमार्ग अगम्य ॥ १५ ॥ शैव शाक्तें नाना मतें । अपभ्रंश जीवातें समस्तें ।

---

१ कौतुकानें, प्रेमानें. २ विश्वांतील अनंतरूपांमध्यें तुझें च रूप व्यापकपणानें भरून राहिलें आहे. ३ अंबा, राम, आणि सद्गुरु हे एक च असल्यामुळें ( पुढें ओंवी १३ पहा ) एका च नवमीला वाटतील तीं नांवें द्यावीं. ४ आत्मनिवेदनरूप नवमी झाल्यावर होणारा ब्रह्मानंद म्हणजे च विजयादशमी. ५ मूळस्थान. आपला आपणास विसर पडून वृत्तींचा लय झाला म्हणजे देवभक्तांचें मूळ असलेलें ऐक्य पुनः प्राप्त होतें. ६ छत्री. ७ पदकासारखा एक अलंकार. ८ अब्दागिरी. ९ जयजयकार. १० संसाररूप महिषासुराचा नाश करणारी. ११ निरावलंब अशा मायेचें आकलन करतां येतें तें तुझ्या च कृपेनें. १२ नाना मतें जीवाला भ्रष्ट करणारीं आहेत.

कार्यकारणकर्तुत्व हेतें । हेतूतीतें तूं अंबा ॥१६॥ नाना भक्त मुक्त ह्मणविती । तुझें निजरूप विरुळे जाणती । जे सकामकर्में भरीं भरती । ते भवस्वर्ग घेती पाहुणेरु ॥ १७ ॥ तुझें निजकृपेचें देखणें । तूंचि जाणसी पूर्णपणें । मंत्र यंत्र विधिविधानें । अक्षवाणें वोवाळिलीं ॥ १८ ॥ सहजसिंहासनीं अंबा । जगदाधार मूळस्तंभा । सहजासनीं निज प्रारंभा । आरंभस्तंभा सहज तूं ॥ १९ ॥ सहजकृपेचें चिन्ह । तें वेगळें चि अनुसंधान । तुझे दयेचे प्रबुद्धजन । संत सज्जन जाणती ॥ २० ॥ बाळक न करी सायास । मातेसी मुळिचाचि वोरसँ । कां जे तियेचा अंश । ब्रह्मीं ब्रह्मांश विज्ञानें ॥ २१ ॥ शुद्ध शबल तुझीं बाळकें । भिन्नभिन्नप्रकृति अनेकें । ज्याचे त्यापरी कवतुकें । वोरसें करिसी दुहावा ॥ २२ ॥ किती विस्तार हा बोलावा । अंबे न कळती तुझ्या भावा । ब्रह्मीं ब्रह्मांश सद्भावा । शरण आलों अनन्य ॥ २३ ॥ मायेतीत ब्रह्म ह्मणती । आलें पाहिजे आत्मप्रचिती । जाणिजे संत महंत श्रोतीं । आह्मी लेंकरें अज्ञानें ॥ २४ ॥ अज्ञानाची परमार्थचिंता । बहुत वाहातसे श्रीगुरुमाता । वरद हस्त ठेउनी माथां । मुकें करिशी वाचाळ ॥ २५ ॥ श्रीगुरुअर्थ अनिर्वाच्य आहे । संतमंडळी जाणताहे । सद्गुरुचरणीं संतें मन राहे । तयासी संत भेटती ॥ २६ ॥ संत समाधि तूंचि स्वभावें । तुजसीं बोबड्या बोलीं बोलावें । मातेनें हें चोज करावें । आपण व्हावें तैसेंचि ॥ २७ ॥ कोण करील तुझें स्तवन । क्षीराब्धिलेंहरीस क्षीर-

---

१ कार्य देहादि व कारण पंचभूतादि यांच्या उत्पत्तीचें कारण तूंच असल्यामुळें तूं त्यांच्या पलीकडची आहेस. २ हेतूच्या पलीकडील. ३ थोडेच. ४ काम्यकर्माच्या नादीं लागलेले लोक अल्पकाल टिकणाऱ्या स्वर्गास जाऊन पुनः भव (जन्म) घेतात- ५ तूं कृपेनें आमच्याकडे पाहिल्यास आह्मीं पूर्णपणें कृतार्थ होतों. मग इतर साधनांचीं गरज काय ? तीं तुजवरून ओंवाळून टाकावीं. ६ औरस. ७ ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥ या भगवदुक्ति प्रमाणें. ८ स्तनपान ९ संथ, स्थिर. १० तुझें स्तवन करणें ह्मणजे, दुधाच्या समुद्राच्या लाटेला दुधानें स्नान घालणें अथवा गुळाच्या गणपतीला गुळाचा नैवेद्य दाखविणें होय.

स्नपन । अमृतलहरीस अमृतभोजन । उन्मनीस शयन सुमनशय्या ॥ २८ ॥ तथापि भक्तीची भावना । चक्षुसूर्य रिघाले निरांजना[1] । मनचंद्र आले पाददर्शना । नखचंद्र दशधा[2] मिरवले ॥ २९ ॥ नवल तुझी श्रवणतांटकमहिमा[3] । अमाचि[4] करिसी पूर्ण पूर्णिमा । अज्ञानअंधारें निरसूनि तमा । चिद्व्योमसोमा[5] प्रगटिसी ॥ ३० ॥ सर्वेचि ज्ञानसूर्याचा उदयो । समस्त कवीचे[6] भाग्योदयो । सत्कर्मकर्मी अर्घ्यसमयो[7] । ब्रह्मवृंदें तत्पर ॥ ३१ ॥ नाना कर्में ब्रह्मार्पणें । करूनि तुजलाचि अर्पणें[8] । नाना सत्कर्में समर्पणें । ज्ञानप्रकाश तुझेनि ॥३२॥ आतां पूर्वी विनती केली । समस्तें पाहिजे परिसिली । श्रीगुरुसमर्थ-आज्ञा जाली । निवृत्तिग्रंथ करावा ॥ ३३ ॥ एवं ऐकोनि करुणा-स्तवन । गुरुकृपाअंबा वोळली पूर्ण । श्रीरामवरदा सुलक्षण । काय बोलती जाली ॥ ३४ ॥ ग्रंथ करावा निवृत्तिराम । आत्मारामस्वानंद-धाम । सद्गुरुभजनें पूर्णकाम । परंधाम पाविजे ॥ ३५ ॥ सद्गुरुनाथ केवळब्रह्म । अलक्ष अगोचर परब्रह्म । निरावयव निर्गुणब्रह्म । मनोवाचा नाकळे ॥ ३६ ॥ सद्गुरुब्रह्म सनातन । विमळब्रह्म पुरातन । निर्मळ निश्चळ स्वानंदघन । निर्विकार सदोदित ॥३७॥ सद्गुरुनाथ निरंजन । आद्यमध्यअवसानविहीन । त्रिगुणमाया विलक्षण । कर्ता कारण ऐलिकडे ॥ ३८ ॥ सद्गुरुपदीं आपण नाहीं । पाहतां पाहणें हारपे पाहीं । आपुला अंत करूनि राहीं । मौनगर्भविचारणा ॥ ३९ ॥ सद्गुरुकृपा अंबा माउली । सद्गुरुमूर्ग सांगती जाली । सद्गुरुपदीं धांव घतली[9] । निर्गुण-ब्रह्मीं पावावया ॥ ४० ॥ सद्गुरुचरणीं निवृत्तिवेणी[10] । स्वरूपसागरीं

---

१ नीरांजना, दीप ओवाळण्यास. २ दहा बोटांचीं दहा नखें. ३ कानांतील कुंडलें. ४ अमावास्येच्या काळोखाला. ५ चिदाकाररूपी आकाशांतील ज्ञानरूप चंद्राला. ६ ज्ञात्यांचा. ७ ज्ञानसूर्याचा उदय झाला कीं ज्ञानी लोकांच्या सत्कर्मरूप अर्घ्यप्रदानाची वेळ होते. ८ तूं ब्रह्मस्वरूप असल्यामुळें सर्व ब्रह्मार्पण होणारीं कर्में तुलाच अर्पण होतात. ९ प्रसन्न झाली. १० गिरिधर; वेणाबाईच्या परंपरेंत निवृत्ति आली ज्याची असा.

अखंडमिळणी । गुरुपरंपरा त्रिवेणी[1] । श्रीरामवरदा निर्धारें ॥ ४१ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । सद्गुरुकृपास्तवनं नाम । समास द्वितीय बोलिला ॥ ४२ ॥ समास ॥ २ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु ब्रह्ममूर्ति । जगद्वंद्य श्री परंज्योति । निरावयव तूं आत्ममूर्ति । सहज सदोदित स्वानंदा ॥ १ ॥ नामरूपाचा निरास । शुद्धब्रह्म स्वयंप्रकाश । आकाश शून्य निरावकाश । गगनगर्भ निरंजन ॥ २ ॥ नवल लोकिकांचें मत । प्रत्यक्ष भेटावा भगवंत । प्रत्यक्ष सगुणभजन निश्चित । अप्रत्यक्ष निर्गुण तें ॥ ३ ॥ अगोचरी मुद्रा सिद्धासन । तारकमंत्रजप ध्यान । पिंड ब्रह्मांड आवर्ण । आवाहन विसर्जन दृश्य हें ॥ ४ ॥ ध्यानस्थाचें अखंड ध्यान । ज्ञानियाचें मुख्य ज्ञान । ज्ञानेंसहित विज्ञान । सद्गुरुभक्ति पाविजे ॥ ५ ॥ सद्गुरुभक्ति सायोज्यमुक्ति । संगत्यागें विषयविरक्ति । ब्रह्मज्ञानें ब्रह्मप्राप्ति । ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥ ६ ॥ ब्राह्मणासी ब्रह्मकर्म गायत्री । त्रिगुण त्रिवेणी अर्धमात्री । मातृदैवत श्रेष्ठ पवित्री । ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥ ७ ॥ स्त्रीलिंग पुल्लिंग नपुंसक । त्रिविध व्याकर्णविवेक । नानावाक्याभिधानें अनेक । गायत्री स्त्रीलिंग निर्धारें ॥ ८ ॥ वेदाध्यनें [illegible]ण करिती । वेदमाता सरस्वती । मात्रृकाक्षरीं स्वरवर्ण दाखवितां । परादिवाचा चतुर्विधा ॥ ९ ॥ कळा काव्या कवी त्राति । गीता सुगीता श्रुति स्मृति । ब्राह्मी रौद्री वैष्णवी मूर्ति । धीमहि बुद्धि निश्चयात्मक ॥ १० ॥ जैसें नदीचें उदक । नव्हे स्त्री पुरुष नपुंसक ।

---

१ समर्थ, वेणाबाई, बाइयाबाई. २ शुद्धब्रह्माच्या ठिकाणीं नाम रूप नाहींत. ३ निर्गुणब्रह्मरूप भगवान् नामरूपांच्या पलीकडे असल्यामुळें त्याचें प्रत्यक्ष दर्शन घडावें असें ह्मणणें चमत्कारिक आहे. पहा श्री दा. बो. १९-९/६. सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रत्यक्ष भेटवावा देव । परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे॥. ४ पिंडाचीं व ब्रह्मांडाचीं आवरणें यांची उभारणी व संहारणी वगैरे गोष्टी गुरुभक्तीनें कळून येतात. ५ सद्गुरुभक्तीनें क्रमाक्रमानें सगुणापासून निर्गुणापर्यंत मजल गांठतां येते.

स्नपन । अमृतलहरीस अमृतभोजन । उन्मनीस शयन सुमनशय्या ॥ २८ ॥ तथापि भक्तीची भावना । चक्षुसूर्य रिघाले निरांजना[1] । मनचंद्र आले पाददर्शना । नखचंद्र दशधा[2] मिरवले ॥ २९ ॥ नवल तुझी श्रवणतौटंकमहिमा[3] । अमाचि[4] करिसी पूर्ण पूर्णिमा । अज्ञानअंधारें निरसूनि तमा । चिदव्योमसोमा[5] प्रगटिसी ॥ ३० ॥ सर्वेचि ज्ञानसूर्याचा उदयो । समस्त कवींचे[6] भाग्योदयो । सत्कर्मकर्मी अर्घ्यसमयो[7] । ब्रह्मवृंदें तत्पर ॥ ३१ ॥ नाना कर्में ब्रह्मार्पणें । करूनि तुजलाचि अर्पणें[8] । नाना सत्कर्में समर्पणें । ज्ञानप्रकाश तुझेनि ॥३२॥ आतां पूर्वी विनती केली । समस्तें पाहिजे परिसिली[9] । श्रीगुरुसमर्थ-आज्ञा जाली । निवृत्तिग्रंथ करावा ॥ ३३ ॥ एवं ऐकोनि करुणा-स्तवन । गुरुकृपाअंबा बोलली पूर्ण । श्रीरामवरदा सुलक्षण । काय बोलती जाली ॥ ३४ ॥ ग्रंथ करावा निवृत्तिराम । आत्मारामस्वानंद-धाम । सद्गुरुभजनें पूर्णकाम । परंधाम पाविजे ॥ ३५ ॥ सद्गुरुनाथ केवळब्रह्म । अलक्ष अगोचर परब्रह्म । निरावयव निर्गुणब्रह्म । मनोवाचा नाकळे ॥ ३६ ॥ सद्गुरुब्रह्म सनातन । विमळब्रह्म पुरातन । निर्मळ निश्चळ स्वानंदघन । निर्विकार सदोदित ॥३७॥ सद्गुरुनाथ निरंजन । आद्यमध्यअवसानविहीन । त्रिगुणमाया विलक्षण । कर्ता कारण ऐलिकडे ॥ ३८ ॥ सद्गुरुपदीं आपण नाहीं । पाहतां पाहणें हारपे पाहीं । आपुला अंत करूनि राहीं । मौनगर्भविचारणा ॥ ३९ ॥ सद्गुरुकृपा अंबा माउली । सद्गुरुरूप सांगती जाली । सद्गुरुपदीं धांव घेतली । निर्गुण-ब्रह्मीं पावावया ॥ ४० ॥ सद्गुरुचरणीं निवृत्तिवेणी[10] । स्वरूपसागरीं

१ निरांजना, दीप ओवाळण्यास. २ दहा बोटांचीं दहा नखें. ३ कानांतील कुंडलें. ४ अमावास्येच्या काळेखाला. ५ चिदाकाररूपी आकाशांतील ज्ञानरूप चंद्राला. ६ ज्ञात्यांचा. ७ ज्ञानसूर्याचा उदय झाला कीं ज्ञानी लोकांच्या सत्कर्मरूप अर्घ्यप्रदानाची वेळ होते. ८ तूं ब्रह्मस्वरूप असल्यामुळें सर्व ब्रह्मार्पण होणारीं कर्में तुलाच अर्पण होतात. ९ प्रसन्न झाली. १० गिरिधर; वेगावाईच्या परंपरेंत निवृत्ति आली त्याची असा

अखंडमिळणी । गुरुपरंपरा त्रिवेणी । श्रीरामवरदा निर्धारें ॥ ४१ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । सद्गुरुकृपास्तवनं नाम । समास द्वितीय बोलिला ॥ ४२ ॥ समास ॥ २ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु ब्रह्ममूर्ति । जगद्वंद्य श्री परंज्योति । निरावयव तूं आत्ममूर्ति । सहज सदोदित स्वानंदा ॥ १ ॥ नामरूपाचा निरास । शुद्धब्रह्म स्वयंप्रकाश । आकाश शून्य निरावकाश । गगनगर्भ निरंजन ॥ २ ॥ नवल लोकिकांचें मत । प्रत्यक्ष भेटावा भगवंत । प्रत्यक्ष सगुणभजन निश्चित । अप्रत्यक्ष निर्गुण तें ॥ ३ ॥ अगोचरी मुद्रा सिद्धासन । तारकमंत्रजप ध्यान । पिंड ब्रह्मांड आवर्ण । आवाहन विसर्जन दृश्य हें ॥ ४ ॥ ध्यानस्थाचें अखंड ध्यान । ज्ञानियाचें मुख्य ज्ञान । ज्ञानेंसहित विज्ञान । सद्गुरुभक्ति पाविजे ॥ ५ ॥ सद्गुरुभक्ति सायोज्यमुक्ति । संगत्यागें विषयविरक्ति । ब्रह्मज्ञानें ब्रह्मप्राप्ति । ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥ ६ ॥ ब्राह्मणासी ब्रह्मकर्म गायत्री । त्रिगुण त्रिवेणी अर्धमात्री । मातृदैवत श्रेष्ठ पवित्री । ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥ ७ ॥ स्त्रीलिंग पुल्लिंग नपुंसक । त्रिविध व्याकर्णविवेक । नानावाक्याभिधानें अनेक । गायत्री स्त्रीलिंग निर्धारें ॥ ८ ॥ वेदाध्यनें ब्राह्मण करिती । वेदमाता सरस्वती । मात्रृकाक्षरीं स्वरवर्ण दाखविती । परादिवाचा चतुर्विधा ॥ ९ ॥ कळा काव्या कवी ज्ञाति । गीता सुगीता श्रुति स्मृति । ब्राह्मी रौद्री वैष्णवी मूर्ति । धीमहि बुद्धि निश्चयात्मक ॥ १० ॥ जैसें नदीचें उदक । नव्हे स्त्री पुरुष नपुंसक ।

---

१ समर्थ, वेणाबाई, बाइयाबाई. २ शुद्धब्रह्माच्या ठिकाणीं नाम रूप नाहींत. ३ निर्गुणब्रह्मरूप भगवान् नामरूपांच्या पलीकडे असल्यामुळें त्याचें प्रत्यक्ष दर्शन घडावें असें म्हणणें चमत्कारिक आहे. पहा श्री दा. बो. १९-१/६. सगट लोकांचे अंतरींचा भाव । मज प्रत्यक्ष भेटवावा देव । परंतु विवेकाचा उपाव । वेगळाचि आहे॥. ४ पिंडाचीं व ब्रह्मांडाचीं आवरणें यांची उभारणी व संहारणी वगैरे गोष्टी गुरुभक्तीनें कळून येतात. ५ सद्गुरुभक्तीनें क्रमाक्रमानें सगुणापासून निर्गुणापर्यंत मजल गांठतां येते.

तैसाचि हा हि विवेक । त्रिगुण त्रिवेणी गायत्रीचा ॥ ११ ॥ त्रिगुण त्रिवेणी गायत्रीपाद । अर्धमात्रा चौथा पाद । नाना त्रिपुटीवाक्यें[1] भेद । त्रिविध । ओंकार अभेद त्रिवेणी ॥ १२ ॥ ओंकार त्रिवेणी गायत्री निश्चयें । निवृत्ति उन्मनी व्यतिरेक अन्वयें । ब्रह्म जानाति ब्राह्मण स्वयें । तोचि अर्थ[2] जाणेल हा ॥ १३ ॥ ॐकार त्रिवेणी अर्धमात्रा लय । पुढें निर्गुण निरंजन निरामय । ब्रह्म जानाति ब्राह्मण होय सद्गुरुचरणप्रसादें ॥ १४ ॥ ब्राह्मणासी न कळे गायत्रीरूप । त्रिवेणी वैष्णवी ब्रह्मरूप । जैसें शांडिलीचें नेणतां[3] स्वरूप । पक्ष गळाले गरुडाचे ॥ १५ ॥ तैसे सपक्ष ब्राह्मण पक्षहीन । नेणती भर्गो देवस्य धीमहि लक्षण । निवृत्ति उन्मनी सुलक्षण । सद्गुरुकृपें अनुभविजे ॥ १६ ॥ मैत्रेयमैत्रेयीसंवाद । अपरोक्षज्ञान बोले वेद । परोक्षें[4] दृष्टीचे वेवादें[5] । अपरोक्षदृष्टी[6] वारले ॥ १७ ॥ ह्मणोनि निवृत्तिमार्गी निवृत्तिपक्ष । वेताति अर्थज्ञ ब्राह्मण दक्ष । अर्थद्रष्टे अंतरसाक्ष । व्यँाकर्ण[7] वेदांत जाणते ॥ १८ ॥ नाना शब्दार्थ वेदांतीं गेले । शब्द निःशब्द होऊनि ठेले । स्त्रीलिंग पुल्लिंग प्रकृतिभाव राहिले । आत्मदृष्टिनिर्धारें ॥ १९ ॥ स्त्रीलिंग पुल्लिंग प्रकृति पुरुष । नपुंसक हें अवघें दृश्य । दृश्य भासातीत निराभास । निर्गुण निरंजन परब्रह्म ॥ २० ॥ परब्रह्म परम पावन । ब्रह्म जानाति जाले ब्राह्मण । पुढें कथानुसंधान । संतसज्जनीं ऐकावें ॥ २१ ॥ ब्रह्म जानाति ब्राह्मण जाले । प्रयाग माधव स्नानासी चालिले । निवृत्तिमार्गी प्रश्न केले । ह्मणती ऐका सर्वज्ञ गोसांवी ॥ २२ ॥ परब्रह्मीं नाहीं दुजेंपण । सेव्य सेवक नुरे जाण । शिवं भूत्वा शिवं यजेत पूर्ण[8] । देवभक्तपण निवृत्ति ॥ २३ ॥

---

१ ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान; दृश्य, दृष्टा, दर्शन इत्यादि. २ वरील ओव्यांचा अर्थ ब्रह्म जाणणाऱ्या ब्राह्मणालाच कळणारा आहे, असें प्रत्यक्ष ग्रंथकार सांगत असल्यामुळें अज्ञ संपादकानें मौन धरणेंच उत्तम. ब्रह्म जाणणारा ब्राह्मण व्हावयास पुढील ओंवींत सांगितल्याप्रमाणें सद्गुरुचरणाचा प्रसादच झाला पाहिजे. ३ शांडिली विषयीं अनुचित बुद्धि धरल्यामुळें गरुडाचे पक्ष गळाले, पण पुढें त्यानें पश्चात्तापपूर्वक क्षमायाचन केल्यावर त्याला ते पुनः मिळाले, अशी कथा भारताच्या उद्योगपर्वांत आहे. ४ अप्रत्यक्ष. ५ वाद. ६ प्रत्यक्ष. ७ व्याकरण. ८ स्वतः शिव होऊन शिवाची पूजा करावी अशी स्थिति निवृत्ति झाल्यावर होते.

निवृत्तिबोधें वृत्तिभाव गेले। पुढें ब्रह्मोपदेश कोणें केले। गुरुसंप्रदाय चालिले। निवृत्तिमार्गें कोणेपरि ॥ २४ ॥ बरें पुसलें तुह्मीं ब्राह्मणें। निवृत्तिबोधें पूर्णपणें। गुरुउपदेशाचीं लक्षणें। निवृत्तिमार्गें येणें परी ॥ २५ ॥ निवृत्तिबोधें वृत्तिभाव गेले। अंतरीं सद्गुरु ब्रह्मरूप उरले। तेचि मौन व्याख्यान उपदेशिते जाले। तारकब्रह्म चराचरीं ॥ २६ ॥ उपदेश करितां नव्हे शिष्य। उपदेशीं अधिकार गुरूस। गुरुत्व लाभे शिष्यास। होय सद्शिष्य जेधवां ॥ २७ ॥ मी गुरु ह्मणतां शिष्यपण। गेलें थितें[1] हातींचें निघोन। ऐसा दुरात्मा अभिमान। आत्माराम दुऱ्हावी ॥ २८ ॥ मी गुरु हें तों होणें नाहीं। शिष्यत्व गेलें हातींचें पाहीं। जैसा त्रिशंकु[2] राजा स्वर्गींचे ठाईं। मध्येंचि अंतराळीं राहिला ॥ २९ ॥ ह्मणोनि मीपण समूळ नागवण। ईश्वर[3] सोडी ईश्वरपण। मग स्वयें गुरुत्व पावला आपण। मायाउपाधि निरसोनियां॥३०॥ मायातीत श्रीसर्वेश्वर। सद्गुरुनाथ परात्पर। सत्शिष्यासी अधिकार। गुरुत्वें करी॥३१॥ गुरुत्वें शिष्य अधिकारी। सद्गुरुस्वामी व्यापक अंतरीं। अधिकार पाहोनि लोकांवरी। अनुग्रह करितातीं स्वानंदें ॥ तुह्मी सर्वज्ञ ब्रह्मवृंदें। जाणोनि पुसतां निवृत्तिछंदें। ऐकूनि ब्राह्मण परमानंदें। आत्मदृष्टी समजले ॥ ३३ ॥ आत्मनिष्ठ ब्रह्मवृंद ब्राह्मण। निवृत्तिबोधें बोधले पूर्ण। त्याचें स्वयंभ समाधान। ऐकिलें पाहिजे गुरुकृपें[4] ॥ ३४ ॥ आत्मानात्मा विवेक केले। सारासार विचार पाहिले। आपुले आपण निवांत जाले। स्वानंदबोधें ॥ ३५ ॥ पिंड ब्रह्मांड

---

१ वायां, फुकट. २ सूर्यवंशांतील त्रिशंकु राजा वसिष्ठशापामुळें चाण्डाल झाला. तरी त्या स्थितींत क्षत्रिय असलेल्या विश्वामित्रालाच अध्वर्यु करून त्यानें यज्ञ केला आणि त्याच्या जोरावर तो स्वर्गास जाऊं लागला; परंतु इन्द्रानें त्याला खालीं ढकलिल्यामुळें तो मध्येंच लोंबत राहिला. ३ उपाधि सोडिल्याशिवाय ईश्वरालाहि ब्रह्मस्वरूप होतां येत नाहीं. सोपाधिक ब्रह्म ह्मणजेच ईश्वर. ४ गुरुकृपेनें ब्रह्मानुभव कसा प्राप्त होतो तें या ब्राह्मणसंवादानें दाखविलें आहे. आत्मा कोण आणि अनात्मा कोण हें जाणणें ह्मणजे आत्मानात्मविवेक. आत्मा सार आणि अनात्मा असार ह्मणून त्यालाच सारासारविचार ह्मणतात.

विवरिलें । पंचभूतिक दृश्य निरसिलें । मायातीत ब्रह्म अनुभविलें । देखणें दृश्य सारूनियां ॥ ३६ ॥ जीव शिव परमात्मउपाधि । अविद्या माया मूळमाया अनादि । अनादि परतें परब्रह्म आदि । शाश्वतपणें अनुभविलें ॥ ३७ ॥ देहे मी जीव मी मन मी कल्पिलें । कल्पिलें तितुकें मिथ्या जालें । अहमस्मि ब्रह्म अनुभवा आलें । श्रुतिसंमति शास्त्रार्थें ॥ ३८ ॥ सलोकता मुक्ति ब्रह्मावलोकनीं । समीपता मुक्ति स्वानुभवदेखणीं । स्वरूपाकार मुक्ति ब्रह्माकारमिळणीं । सायोज्य ब्रह्म सनातन ॥ ३९ ॥ सद्गुरुकृपें सायोज्य मुक्ति । निवृत्तिबोधें बोधिली संतीं । सद्गुरुकृपेची प्राप्ति । सद्गुरुभजनें यथार्थ ॥ ४० ॥ सद्गुरुभजनें निर्गुणप्राप्ति । निर्गुणभजनें निर्गुण स्थिति । सगुण निर्गुण भजन निश्चिती । सद्गुरुकृपें अनुभविलें ॥ ४१ ॥ सद्गुरुकृपें ब्रह्मवृंदें । ब्रह्मानंदें स्वानंदबोधें । ब्रह्म होऊनि निजानंदें । निवृत्तिग्रंथश्रवणार्थी ॥ ४२ ॥ येथें निवृत्तिवेणी निवृत्तिरामीं । स्वस्वरूपीं स्वानंदधामीं । आत्मनिवेदनीं आत्मयारामी । ब्रह्मानुभवें निर्धारें ॥ ४३ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । श्रीगुरु ब्रह्मानुभवनिरोपणं नाम । समास तृतीय बोलिला ॥ ४४ ॥ समास ॥ ३ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जया जी सद्गुरु आदिमूर्ति । आदि अनादि पुण्य पुण्यकीर्ति । श्रुति गर्जती नेति नेति । निवृत्तिधामीं वदवावें ॥ १ ॥ सच्चिदानंदा सद्गुरुरामा । आनंदकंदा आत्मयारामा । जय जय अवाप्तपूर्णकामा । परंधामा बोलावें ॥ २ ॥ कर्म उपासना ज्ञान । त्रिकांड वेद प्रमाण ।

---

१ मायेपासून झालेली पंचमहाभूतात्मक सृष्टि. २ केवळ मी आहें, एवढें राहिलें. मी अमुक अमुक आहे हें सर्व खोटें ठरलें. ३ सरूपता; ब्रह्माप्रमाणें होणें. ४ निवृत्तीचें माहेरघर असा निवृत्तिराम ग्रंथ. श्रीसमर्थप्रतापांत "तेथें गिरिधर त्रिवर्ग बंधूंसी शरण आला । श्रीगुरुदेवें श्रीचरणसेवेसी लाविला । निवृतिराम निवृत्तिधाम ग्रंथ वदविला । आत्मानुभवें वाक्यार्थें" ॥ ११/५३ ॥ असें गिरिधरांनी लिहिलें आहे. ५ ज्याचे सर्व काम (इच्छा) पूर्ण झाल्या आहेत असा.

माया ब्रह्म करूनि निरूपण । ब्रह्मसंपन्न करावें ॥ ३ ॥ दश[1] देहांसी करूनि अंत । स्वरूप दाविलें निवांत । निवांतवृत्तीचा करूनि प्रांत[2] । निवृत्तिग्रंथ करविला ॥ ४ ॥ समर्थचरणीं निवृत्तिवेणी । कृपासिंधुमाजि मिळणी । मागुती कैसी वेगळेपणीं । ग्रंथनिर्वाणी होयील ॥ ५ ॥ जळें दाटलीं प्रेमानंदें । अवस्था दाटली स्वानंदें । भावें धुतलीं पादारविंदें । वृत्तिछंदें बोलतसे ॥ ६ ॥ निवृत्ति केली ब्रह्मबोधीं स्वामीनें । आतां कैसें घडे बोलणें । बोलणें केलें अबोलणें । अनिर्वचेय सामर्थ्ये ॥ ७ ॥ समर्थसद्गुरुपरंपरा । त्रिपथ[3]-गामिनी प्रविस्तरा । तत्त्वमसि त्रिवेणी विस्तरा । निवृत्तिबोधें करूनियां ॥ ८ ॥ निवृत्ति केली स्वात्म[4]बोधीं । सर्वही जाली संकेतसिद्धि । ज्ञान वैराग्य भजन विधि । विमळब्रह्म अनुभविलें ॥ ९ ॥ देवशोधन[5] देवें केलें । मायोद्भवतत्व देवें शोधिलें । तत्वातीत ब्रह्म ठेलें । व्याप्य व्यापक परब्रह्म ॥१०॥ जीवभूत सनातन । मायाब्रह्म हें भगवद्वचन । जीव भूत सृष्टि मिथ्या भान । ब्रह्म सनातन निरोपिलें ॥ ११ ॥ निर्गुणीं निर्गुण निवेदन । सगुणीं सगुण भजन । माया माइक दृश्य[6] निरशन । सारशोधन समाधि ॥ १२ ॥ विमळब्रह्मअनुसंधान । अद्वैतीं गेलें कल्पनाभान । माया अविद्या साक्षी आपण । साक्षित्व नाहीं परब्रह्मीं ॥ १३ ॥ आपण वस्तु स्वतसिद्ध आतां । साधन आलें देहाच्या माथां । माया विपरीत कळली तत्वता । बद्धमुक्त[9]ना मन माया ॥ १४ ॥ नित्यमुक्तांसि गुरुदेवदर्शन । कार्य कारण कर्तृत्व निरशन । परब्रह्मीं कैंचें कर्तेपण । करूनि अकर्ता सर्वेश्वर ॥ १५ ॥ कर्ता ठाईंचा[10]

---

१ पिंडाचे पांच आणि ब्रह्मांडाचे पांच असे दहा कोश. २ शेवट. ३ समर्थ स्वतः, वेणाबाई, बाइयाबाई, या तीन मार्गांनीं जाणारी. ४ या समासाचें नांव 'ग्रंथानुभवकथन' असें आहे. यांत निवृत्तीचा अनुभव कसा आला हें थोडक्यांत सांगितलें आहे. ५ श्रीदासबोध ६।१. ६ श्रीदासबोध ६।३. ७ श्रीदासबोध ६।८. ८ श्रीदासबोध ६।९. ९ बद्ध किंवा मुक्त आहे असें वांटणें हा मनाच्या विकल्पाचा ह्मणजे मायेचा प्रकार आहे. १० मूळचा.

अरूप[1] । केलें तेंहि[2] मिथ्यारूप । समर्थे फेडिले अक्षेप । माया भुजंगरज्जूचा[3] ॥ १६ ॥ मायेनें घट मठ मांडिले । आकाश ब्रह्में व्यापूनि ठेलें । जीव शिव ब्रह्मीं ब्रह्मांश जाले । आत्मदर्शनीं शून्यातीत ॥ १७ ॥ सकळांपरतें परब्रह्म । त्रिगुणमई माया भास भ्रम । वायो जाणीव प्रकृति पुरुष वर्म । सद्गुरुनाथें निरोपिलें ॥ १८ ॥ गगन ब्रह्म निवांत निश्चळ । निश्चळीं माईक भासलें चंचळ । आत्मा जगजोति सर्वज्ञपणें केवळ । सद्गुरुनाथें सांगितलें ॥ १९ ॥ निरोपिलें जीवशिवाचें लक्षण । केलें पिंड ब्रह्मांड शोधन । घट मठ महद् चिद् संपूर्ण । मायाभान वारिलें ॥ २० ॥ वारिलें सर्व दृश्यजात । त्रिगुण आणि पंचभूत । अहं ब्रह्म ऐसा हेत । ईश्वरेंसीं निवारला ॥ २१ ॥ निवारिलें जन्ममरण दांडुगें । ब्रह्मचि केलें निजांगें । आतां सत्शिष्य देहपांगें[6] । पांगिला न जाय अंधतमीं ॥ २२ ॥ अडखळोनि पडेल सूर्य तमीं । महारुद्र ग्रासील काळनेमी । तन्हि शरणागतासी स्वामी । माया भयानक वाटेना ॥ २३ ॥ वाटेना भव स्वर्ग थोर । वैकुंठ कैलास सुंदर । जेथें नांदती विधि हरि हर । सामर्थ्य मूर्ति ऐश्वर्यें ॥ २४ ॥ मायाजनित तें ऐश्वर्यें । पाहों जातां अनीश्वर्यें । सद्गुरुपदीं महदैश्वर्यें । परब्रह्मीं पावती ॥ २५ ॥ देव ऐश्वर्यें भोगिती आपुलालीं । शिष्य निष्ठा सद्गुरुपाउलीं । देव ही येती कल्पांतकाळीं । सद्गुरुपदीं विश्रामा ॥ २६ ॥ विश्रामधाम आत्माराम । जो विश्रांतीचा विश्राम । विमळब्रह्म लाधलें वर्म । नाशवंत जीवपण समर्पणें ॥ २७ ॥ नाशवंत अहंपण समूळ निर्शिलें । सद्गुरुकृपें ब्रह्मपद

---

१ नामरूपांच्या पलीकडचा. २ नामरूपात्मक जगत् खोटेंच आहे. ३ खरी दोरी आहे, ती सर्पाप्रमाणें भासते, ही गोष्ट श्रीसद्गुरु समर्थांनीं प्रत्ययास आणून दिली. ४ श्रीमद्दासबोधांत अनेक ठिकाणीं या सर्व विषयांचें विवेचन आलें आहे. तें अनेकवार लक्षपूर्वक वाचणें हाच वरील मजकूर लक्षांत येण्याचा मार्ग आहे. ५ मिथ्या. ६ पांगुळपणानें. ७ अज्ञान किंवा मायारूप गाढ अंधकारांत. ८ एक दैत्य. हा रावणाचा चुलता असून हनुमानाचा वध करण्याच्या कामीं यश्चा योजना केलेली होती. ९ नश्वर अशा जीवपणाचें ब्रह्मांत समर्पण केल्यानें.

लाधलें । मूळ ज्ञप्तीनें निरविलें । परब्रह्मीं निर्धारें ॥ २८ ॥ परब्रह्म विचारनेहटें । आंगेंचि दाटलें घनदाटें । स्वरूपसागरीं लवण मोटें । सिंधु होऊनि राहिलें ॥ २९ ॥ सिंधुमध्यें पडतां बिंदु । बिंदूचि होतसे सिंधु । मुक्तपणेंविण मुक्त विंधु । सगुणमूर्ति पल्लवीं जडावया ॥ ३० ॥ सगुणभजनीं जडली वृत्ति । निःकामभजनें निवृत्ति । अहं आत्मा हे निश्चिती । अंतरस्थिति बाणली ॥ ३१ ॥ अंतर जालें निरंतर । निरंतर निरूपणविचार । निरूपणें सारासार । कळों आला गुरुकृपें ॥ ३२ ॥ ऐसा शिष्यें स्वानुभव कथिला । मग गुरुदेवें शिष्य आज्ञापिला । निवृत्तिराम ग्रंथ करीं रे वहिला । नाना आख्यांनीं स्वानंदें ॥ ३३ ॥ आतां श्रीगुरुकृपें अबोलणें बोलावें । संतचरणीं निवेदावें । समर्थआज्ञेसी अभिवंदावें । अहंपणें कामा नये ॥ ३४ ॥ अर्भक जेवविल्या दे ढेंकर । तरी माय चोज करूनि संतोषे थोर । तैसे समर्थ-स्वानुभवउद्गार । संत ऐकोनि संतोषती ॥ ३५ ॥ निवृत्ति जाली ब्रह्म-भोजनें । ऊर्ध्व श्वासें तृप्त मनें । बोलिल्या तृप्ति जाईल वचनें । हें तों न घडे सर्वथा ॥ ३६ ॥ समर्थकृपेनें निवृत्ति जाली । समर्थदेवें आज्ञा केली । कैसी कैसी निवृत्ति बाणली । समर्थ मुखें बोलविती ॥ ३७ ॥ त्रिविध तापें तप्त भूमि । भव स्वर्ग कामें अपूर्ण कामी । गुरुकृपा वोळली पूर्णकामी । वर्षाव करिती स्वानंदजळें ॥ ३८ ॥ जेथें सनकादिक निवाले । ब्रह्मादिक निवांत जाले । अहंजळीं भ्रमें बुडाले । देवें काढिले हंसरूपें ॥ ३९ ॥ विदेहादि दिगंबर । व्यास

---

१ स्थिर केलें. २ हा निवृत्तीचा क्रम होय. ३ ब्रह्मरूप. ४ नित्य. ५ यावरून निवृत्तिरामाची रचना कळून येईल. आधीं निवृत्तिपर विवेचन आणि पुढें त्याला उदाहरणादाखल कांहीं आख्यान असा क्रम यांत आहे. ६ सर्व निवृत्ति झाल्यावर बोलणें रहात नाहीं. तरी गुरुकृपेनें ती हि स्थिति वर्णिली आहे. असें केल्यानें निवृत्ति नाहींशी होईल ही भीति नको जसें आकंठ भोजन झाल्यावर तसें झालें ह्मणण्यानें कांहीं ती तृप्ति नाहींशी होत नाहीं. ७ जीवाला भ्रम झाल्यामुळें तो ' मीच काय तो आहें, ' ' अहं अहं ' असा अहंकार करीत असतो. पण त्या भ्रमांतून निघाल्यावर ' मी तो ह्मणजे पर-मात्मस्वरूपच आहे,' 'अहं सः' किंवा 'हं सः' असें ह्मणतो. ८ जनक आदिकरून.

अरूप[1]। केलें तेंहि[2]मिथ्यारूप। समर्थे फेडिले अक्षेप। माया भुजंगरज्जूचा[3] ॥ १६ ॥ मायेनें घट मठ मांडिले। आकाश ब्रह्में व्यापूनि ठेलें। जीव शिव ब्रह्मीं ब्रह्मांश जाले। आत्मदर्शनीं शून्यातीत ॥ १७ ॥ सकळांपरतें परब्रह्म। त्रिगुणमई माया भास भ्रम। वायो जाणीव प्रकृति पुरुष वर्म। सद्गुरुनाथें निरोपिलें ॥ १८ ॥ गगन ब्रह्म निवांत निश्चळ। निश्चळीं माईक भासलें चंचळ। आत्मा जगजोति सर्वज्ञपणें केवळ। सद्गुरुनाथें सांगितलें ॥ १९ ॥ निरोपिलें जीवशिवाचें लक्षण। केलें पिंड ब्रह्मांड शोधन। घट मठ महद् चिद् संपूर्ण। मायाभान वारिलें ॥ २० ॥ वारिलें सर्व दृश्यजात। त्रिगुण आणि पंचभूत। अहं ब्रह्म ऐसा हेत। ईश्वरेंसीं निवारला ॥ २१ ॥ निवारिलें जन्ममरण दाटुगें। ब्रह्मचि केलें निजांगें। आतां सच्छिष्य देहपांगें[6]। पांगिला न जाय अंधतमीं[7] ॥ २२ ॥ अडखळोनि पडेल सूर्य तमीं। महारुद्र ग्रासील काळनेमी[8]। तऱ्हि शरणागतासी स्वामी। माया भयानक वाटेना ॥ २३ ॥ वाटेना भव स्वर्ग थोर। वैकुंठ कैलास सुंदर। जेथें नांदती विधि हरि हर। सामर्थ्य मूर्ति ऐश्वर्यें ॥ २४ ॥ मायाजनित तें ऐश्वर्यें। पाहों जातां अनीश्वर्यें। सद्गुरुपदीं महदैश्वर्यें। परब्रह्मीं पावती ॥ २५ ॥ देव ऐश्वर्यें भोगिती आपुलालीं। शिष्य निष्ठा सद्गुरुपाउलीं। देव ही येती कल्पांतकाळीं। सद्गुरुपदीं विश्रामा ॥ २६ ॥ विश्रामधाम आत्माराम। जो विश्रांतीचा विश्राम। विमळब्रह्म लाधलें वर्म। नाशवंत जीवपण[9] समर्पणें ॥ २७ ॥ नाशवंत अहंपण समूळ निर्शिलें। सद्गुरुकृपें ब्रह्मपद

१ नामरूपांच्या पलीकडचा. २ नामरूपात्मक जगत् खोटेंच आहे. ३ खरी दोरी आहे, ती सर्पाप्रमाणें भासते, ही गोष्ट श्रीसद्गुरु समर्थांनीं प्रत्ययास आणून दिली. ४ श्रीमद्दासबोधांत अनेक ठिकाणीं या सर्व विषयांचें विवेचन आलें आहे. तें अनेकवार लक्षपूर्वक वाचणें हाच वरील मजकूर लक्षांत येण्याचा मार्ग आहे. ५ मिथ्या. ६ पांगुळपणानें. ७ अज्ञान किंवा मायारूप गाढ अंधकारांत. ८ एक दैत्य. हा रावणाचा चुलता असून हनुमानाचा वध करण्याच्या कामीं याची योजना केलेली होती. ९ नश्वर अशा जीवपणाचें ब्रह्मांत समर्पण केल्यानें.

लाधलें । मूळ ज्ञप्तीनें निरविलें[1] । परब्रह्मीं निर्धारें ॥ २८ ॥ परब्रह्म विचारनेहटें । आंगेंचि दाटलें वनदाटें । स्वरूपसागरीं लवण मोटें । सिंधु होऊनि राहिलें ॥ २९ ॥ सिंधुमध्यें पडतां बिंदु । बिंदूचि होतसे सिंधु । मुक्तपणेंविण मुक्त विंधु । सगुणमूर्ति पह्लवीं जडावया ॥ ३० ॥ सगुणभजनीं[2] जडली वृत्ति । निःकामभजनें निवृत्ति । अहं आत्मा हे निश्चिती । अंतरस्थिति बाणली ॥ ३१ ॥ अंतर जालें निरंतर । निरंतर निरूपणविचार । निरूपणें सारासार । कळों आला गुरुकृपें ॥ ३२ ॥ ऐसा शिष्यें स्वानुभव कथिला । मग गुरुदेवें शिष्य आज्ञापिला । निवृत्तिराम ग्रंथ करीं रे वहिला । नाना आख्यानीं स्वानंदें ॥ ३३ ॥ आतां श्रीगुरुकृपें अबोलणें[6] बोलावें । संतचरणीं निवेदावें । समर्थआज्ञेसी अभिवंदावें । अहंपणें कामा नये ॥ ३४ ॥ अर्भक जेवविल्या दे ढेंकर । तरी माय चोज करूनि संतोषे थोर । तैसे समर्थ-स्वानुभवउद्गार । संत ऐकोनि संतोषती ॥ ३५ ॥ निवृत्ति जाली ब्रह्म-भोजनें । ऊर्ध्व श्वासें तृप्त मनें । बोलिल्या तृप्ति जाईल वचनें । हें तों न घडे सर्वथा ॥ ३६ ॥ समर्थकृपेनें निवृत्ति जाली । समर्थदेवें आज्ञा केली । कैसी कैसी निवृत्ति बाणली । समर्थ मुखें बोलविती ॥ ३७ ॥ त्रिविध तापें तप्त भूमि । भव स्वर्ग कामें अपूर्ण कामी । गुरुकृपा बोळली पूर्णकामी । वर्षाव करिती स्वानंदजळें ॥ ३८ ॥ जेथें सनकादिक निवाले । ब्रह्मादिक निवांत जाले । अहंजळीं भ्रमें बुडाले । देवें काढिले हंसरूपें[7] ॥ ३९ ॥ विदेहादि[8] दिगंबर । व्यास

---

१ स्थिर केलें. २ हा निवृत्तीचा क्रम होय. ३ ब्रह्मरूप. ४ नित्य. ५ यावरून निवृत्तिरामाची रचना कळून येईल. आधीं निवृत्तिपर विवेचन आणि पुढें त्याला उदाहरणादाखल कांहीं आख्यान असा क्रम यांत आहे. ६ सर्व निवृत्ति झाल्यावर बोलणें रहात नाहीं. तरी गुरुकृपेनें ती हि स्थिति वर्णिली आहे. असें केल्यानें निवृत्ति नाहींशी होईल ही भीति नको जसें आकंठ भोजन झाल्यावर तसें झालें ह्मणण्यानें कांहीं ती तृप्ति नाहींशी होत नाहीं. ७ जीवाला भ्रम झाल्यामुळें तो ' मीच काय तो आहें, ' ' अहं अहं ' असा अहंकार करीत असतो. पण त्या भ्रमांतून निघाल्यावर ' मी तो ह्मणजे पर-मात्मस्वरूपच आहे,' 'अहं सः' किंवा 'हं सः' असें ह्मणतो. ८ जनक आदिकरून.

वाल्मीक ऋषेश्वर । शुक शौनक योगेश्वर । कवि हरि नव बंधु ॥ ४० ॥ नाना ऋषि मुनि योगी । सर्वसंगपरित्यागी । सिद्ध साधु संत जगीं । अद्वैतब्रह्म प्रतिपादिती ॥ ४१ ॥ अद्वैतबोधें प्रतिबोधले । अद्वैतबोधें तृप्त जाले । अद्वैतज्ञानें ऐक्य पावले । ऐक्य जीव ब्रह्मांश ॥ ४२ ॥ समस्त जीव ब्रह्मांश । माया-संभ्रमें बुद्धिभ्रंश । गुरुगीतेमध्यें महेश । सांगता होय पार्वती ॥ ४३ ॥ शैव शाक्त नाना मतें । अपभ्रंश जीवांतें समस्तें । शंकरें बोलिलें गुरुगीतार्थें । मिथ्या कोण ह्मणेल ॥ ४४ ॥ भगवद्गीतेसी हाचि अर्थ । हेंचि बोलतसे भागवत । उद्धवासी सांगतसे भगवंत । मिथ्या कोण ह्मणेल ॥ ४५ ॥ गर्भगीता हेंचि बोलिली । अवधूतगीता हेंचि वदली । शिवगीता रामगीता अनुवादली । मिथ्या कोण ह्मणेल ॥ ४६ ॥ नाना गीता अनुवादती । अद्वैतज्ञान प्रतिपादिती । योग-वाशिष्ठ रघुनाथजीप्रति । मिथ्या कोण ह्मणेल ॥ ४७ ॥ वेदशास्त्रें पुराणें । तेथील अर्थ अनुवादणें । प्राकृत[1] ऐसें मूर्खपणें । मिथ्या कोण ह्मणेल ॥ ४८ ॥ मिथ्या मानिती पतित जन । पतित होती पावन । ऐसें समर्थाचें महिमान । पतितपावन ब्रीद हें ॥ ४९ ॥ पतितपावनें देवाधिदेवें । बोलों आरंभिलें श्रीगुरुदेवें । संत श्रोते तुह्मी स्वभावें । अमृतपानी सुरवर ॥ ५० ॥ अमृतपानी[2] पावती मरण । संत अजरामर संपूर्ण । कां जे परब्रह्मीं परिपूर्ण । ब्रह्मसंपन्न परमार्थें ॥ ५१ ॥ आतां निवृत्तिरामग्रंथार्था । निवृत्तिराम वदवी तत्वता । कोणासी सांगों गुरुगम्य वार्ता । संत जाणती सर्वज्ञ ॥ ५२ ॥ संतांचें करावें स्तवन । स्तवन ह्मणजे वेगळेपण । वेगळेपणें भिन्नत्व जाण । अभिन्न रूप संतांचें ॥ ५३ ॥ संत ह्मणती पुरे स्तवन । सांगें कथानुसंधान । गुरु-

---

१ प्राकृत भाषा असली तरी त्यांतील ज्ञान प्राकृत नाहीं. तें श्रेष्ठच आहे. श्रुतिशास्त्रें प्रतिपादितात तेंच आहे. २ संतांना अमृतपान करणाऱ्या देवांची उपमा योग्य नाहीं; कारण त्या देवांनाही मरण आहेच, पण संतांना नाहीं, कारण ते ब्रह्मसंपन्न असतात.

शिष्यसंवाद गहन । काय काय ग्रंथीं बोलिले ॥ ५४ ॥ श्रोते सर्वही उदितें । निवृत्तिग्रंथीं धरूनि हेत । वक्ता वदे ग्रंथसंकेत । निवृत्तिरामग्रंथार्थु ॥ ५५ ॥ मुख्य मनमायानिवृत्ति कैसी । अहंमायानिवृत्ति कैसी । अहंममतानिवृत्ति कैसी । निवृत्तिग्रंथीं सांगीतली ॥ ५६ ॥ भक्तियोगें निवृत्तिलक्षण । ज्ञानयोगें निवृत्तिलक्षण । वैराग्ययोगें निवृत्तिलक्षण । निवृत्तिग्रंथीं निरोपिलें ॥ ५७ ॥ भवोपसर्ग निवृत्तिकथन । सर्व संकल्प निवृत्तिकथन । द्वासुपर्णा निवृत्तिकथन । निवृत्तिग्रंथीं सांगीतलें ॥ ५८ ॥ अभ्यास योग निवृत्ति । स्वर्गकाम निवृत्ति । ब्रह्मगोळ निवृत्ति । निवृत्तिग्रंथीं सांगीतली ॥ ५९ ॥ सृष्टिक्रम निवृत्तिकथन । भेदाभेद निवृत्तिकथन । स्वात्मबोध निवृत्तिकथन । निवृत्तिग्रंथीं निरोपिलें ॥ ६० ॥ मूळमाया निवृत्तिकथन । पंचीकर्ण निवृत्तिकथन । सर्व सिद्धांत निवृत्तिकथन । निवृत्तिग्रंथीं बोलिलें ॥ ६१ ॥ नाना[3] निर्गता वृत्ति निवृत्ति । नाना बहुधा वृत्ति निवृत्ति । निखिल ब्रह्म केवळ निवृत्ति । संत जाणोनि घेतील ॥६२॥ नाना निर्गता गुण निर्गुण । नाना बहुधा गुण निर्गुण । निखिल परब्रह्म केवळ निर्गुण । संत समजोनि घेतील ॥ ६३ ॥ निवृत्तिवेणीस्वामीसमर्थें । ग्रंथ आरंभिला परमार्थें । अनुक्रमें संत भावार्थें । सादर श्रवण करितील ॥ ६४ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । ग्रंथानुभवकथनं नाम । समास चतुर्थ बोलिला ॥ ६५ ॥ समास ॥४॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु स्वानंदधामा । आदिपुरुषा आत्मयारामा । ईश्वरमाया मनोरमा । तुमच्या पदीं हारपलीं ॥ १ ॥ प्रकृतिपुरुषें सन्मुख जालीं । नामरूप विसरोनि ठेलीं । नामरूप[4] घेऊनि आलीं । सद्गुरुस्वरूप सांगावया ॥ २ ॥ अहं ब्रह्म ईश्वरें ह्मणतां । माहाकारण

---

१ उत्सुक. २ ग्रंथांतील विषय. पुढील ओंवीपासून निवृत्तिरामाची अनुक्रमणिका दिली आहे. ३ निवृत्ति शब्दाचा अर्थ. ४ नामरूप घेतल्याशिवाय व्यवहार संभवत नाहीं ह्मणून.

माया तत्वता । मायोपाधि ईश्वर कर्ता । सिद्धांत ब्रह्म सनातन ॥ ३ ॥ ब्रह्मीं ब्रह्माऽहमस्मि सारावें । ब्रह्मीं ब्रह्मपण नुरावें । ऐसें उपदेशिलें देवाधिदेवें । निवृत्तिरामबोधार्थीं ॥ ४ ॥ अहंपण माझें निरसेना । मनमाया वोसरेना । नाना कर्मबुद्धि सरेना । आत्मबुद्धि पावावया ॥ ५ ॥ आत्मबुद्धि आत्माराम । केविं पावेन मी आराम । नाना भवस्वर्ग दुर्धर काम । अपूर्णकाम नावडे ॥ ६ ॥ अवाप्त पूर्णकाम तुह्मी । ह्मणोनि शरण समर्थस्वामी । स्वसंवेद्य बोध सुभूमी । सद्गुरुरायें करावा ॥ ७ ॥ आतां सद्गुरुस्वामी पतितपावन । जे जे निवृत्तिमार्गीं केले प्रश्न । ते ते अनुक्रमें कथन । समर्थें केलें पाहिजे ॥ ८ ॥ प्रथम मनमायानिवृत्ति कैसी । स्वामी सांगती शिष्यासी । श्रोतीं सावध कथेसी । सादर व्हावें क्षणयेक ॥ ९ ॥ मनमायानिवृत्तिलक्षण । आत्मारामीं होतां लीन । श्रीरामचंद्रनाममहिमान । अनुसंधान ऐकावें ॥ १० ॥ मन ह्मणिजे चंद्रमा । लक्ष्मी माया मुख्य रमा । आत्मयारामीं निवृत्तिधामा । कोणेपरीं पावली ॥ ११ ॥ चंद्रमा मनसो[1] जात । माया रमा जाण निभ्रांत । आत्मयारामीं निवांत । कोणेपरीं राहिली ॥ १२ ॥ पादसेवन रमेसी । भक्ति दिधली अहर्निशीं[2] । स्वरूप पाहतां आपआपणासी । विसरूनि गेली स्वानंदें ॥ १३ ॥ सगुण नखीचें सुंदरपण । देखुन रमा मुराली आपण । निर्गुण ब्रह्म तें तों पूर्ण । महद्माये पैलीकडे ॥ १४ ॥ महद्भूत महद्माया । पिंड ब्रह्मांड अष्ट काया । प्रकृति पुरुष दश देह काया । पंचीकर्ण शास्त्रार्थें ॥ १५ ॥ पुढें महावाक्याचा घेतां अर्थ । निर्गुण ब्रह्म सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत । निर्विकार निरंजन ॥ १६ ॥ निरंजन तें परब्रह्म । जेथें नाहीं मन माया विभ्रम । चिदाकाश व्यापक धर्म । संत वर्म जाणती ॥ १७ ॥ ईश्वर ह्मणे मीचि ब्रह्म । हेंचि मायोपाधीचें वर्म । महाकारण देह उत्तम । मूळप्रकृति ब्रह्मांडींचें॥१८॥

---

१ चंद्र परमात्म्याच्या मनापासून उत्पन्न झाला. २ अहर्निश, रात्रंदिवस.

मी ब्रह्म हें ईश्वरीं होतें । तेंचि येथें जीवासि स्फुरतें । अवस्था सारूनि ब्रह्म तें । ब्रह्मीं ब्रह्मचि होइजे ॥ १९ ॥ ब्रह्म होणें जाणें हें बोलावें । वाच्यांश वाच्य ह्मणावें । जैसें तैसेंचि हें जाणावें । कळलेपणें लक्षांशें ॥ २० ॥ कळलेपणें काय कळलें । काय कळलें तें न कळलें । न कळोनि[1] तें कळलें । कांहींयेक निजगुह्य ॥ २१ ॥ कांहींयेक स्वरूप जाण । मीपणावीण मीपण । आपणावीण आपण । अनिर्वाच्य निवृत्ति ॥ २२ ॥ ऐसी पादसेवनीं निवृत्ति जाली । पुढें कथा पाहिजे परिसिली । रमा अभिमानें झळंबली । कांहींयेक थोरपणें ॥२३॥ रमामायेसी जाला अभिमान । मनचंद्रमा बंधु कळाहीन । ह्मणे मी ईश्वराचें मन । देवांसी अमृतपान देतसें ॥ २४ ॥ मी मन ह्मणतां चंद्रमा । अंतरला पुरुषोत्तमा । गुरुपत्नीचे दोष तुह्मा । ठाउकेचि असती ॥ २५ ॥ तैसें मी मन ह्मणोनि मनापाठीं । लागतां रिघती दुःखकपाटीं । वसरा बैसेल इंद्रियचेष्टीं । कळाहीन होतील ॥२६॥ चंद्र ह्मणे मी विष्णुसोयरा । रमा माझी येकोदरा[2] । मज लक्ष्मीच्या सोहदरा । कोण दंडील ब्रह्मांडीं ॥ २७ ॥ देव दंडितील मातें । तरी जीवन मी देवांतें । देवगुरु ब्राह्मण काय ते । वाचस्पति मजपुढें ॥ २८ ॥ थोरपण बाधी ईश्वरासी । ह्मणोनि जाला स्मशानवासी । आत्मारामउपासना त्यासी । येकपत्निव्रतस्था ॥ २९ ॥ एवं पोटींच्या[3] अमृतें इंदु समर्थ । आंगीच्या तेजें गेला वेर्थ । मग परोपकारीं देह वेचित । पुनित होत चंद्रमा ॥ ३० ॥ मन चंद्रमा अवध्यामध्यें । सावध राहाणें विचारामध्यें । शुद्ध[4] क्रिया जनामध्यें ।

१ जोंपर्यंत कांहीं कळलें असें वाटतें तोंपर्यंत तें कळलेंच नाहीं. कळलें ही जा णीव जेव्हां नाहींशी होईल, तेव्हांच आत्मज्ञान झालें असें ह्मणावयाचें. २ लक्ष्मी व चंद्र ही दोन्हीं समुद्रापासून निघालीं ह्मणून. ३ चंद्र स्वतंत्रपणाच्या अहंकारानें नाडला, त्यामुळें गुरुपत्नीगमनाचें महापातक हि त्याला घडलें. पुढें पापनिर्मुक्त होण्यासाठीं त्याला देवांसाठीं देह झिजवावा लागला. मनरूप चंद्र प्रत्येकाजवळ आहेच. तेव्हां हें मनचंद्रआख्यान लक्षांत ठेऊन अहंकारनिवृत्ति करावी. ४ अहंकारापासून मुक्त असा शुद्धपणा.

माया तत्वता । मायोपाधि ईश्वर कर्ता । सिद्धांत ब्रह्म सनातन ॥ ३ ॥ ब्रह्मीं ब्रह्माऽहमस्मि सारावें । ब्रह्मीं ब्रह्मपण नुरावें । ऐसें उपदेशिलें देवाधिदेवें । निवृत्तिरामबोधार्थीं ॥ ४ ॥ अहंपण माझें निरसेना । मनमाया वोसरेना । नाना कर्मबुद्धि सरेना । आत्मबुद्धि पावावया ॥ ५ ॥ आत्मबुद्धि आत्माराम । केविं पावेन मी आराम । नाना भवस्वर्ग दुर्धर काम । अपूर्णकाम नावडे ॥ ६ ॥ अवाप्त पूर्णकाम तुह्मी । ह्मणोनि शरण समर्थस्वामी । स्वसंवेद्य बोध सुभूमी । सद्गुरुरायें करावा ॥ ७ ॥ आतां सद्गुरुस्वामी पतितपावन । जे जे निवृत्तिमार्गीं केले प्रश्न । ते ते अनुक्रमें कथन । समर्थें केलें पाहिजे ॥ ८ ॥ प्रथम मनमायानिवृत्ति कैसी । स्वामी सांगती शिष्यासी । श्रोतीं सावध कथेसी । सादर व्हावें क्षणयेक ॥ ९ ॥ मनमायानिवृत्तिलक्षण । आत्मारामीं होतां लीन । श्रीरामचंद्रनाममहिमान । अनुसंधान ऐकावें ॥ १० ॥ मन ह्मणिजे चंद्रमा । लक्ष्मी माया मुख्य रमा । आत्मयारामीं निवृत्तिधामा । कोणेपरीं पावली ॥ ११ ॥ चंद्रमा मन[1]सो जात । माया रमा जाण निभ्रांत । आत्मयारामीं निवांत । कोणेपरीं राहिली ॥ १२ ॥ पादसेवन रमेसी । भक्ति दिधली अहिर्निशीं[2] । स्वरूप पाहतां आपआपणासी । विसरूनि गेली स्वानंदें ॥ १३ ॥ सगुण नखीचें सुंदरपण । देखुन रमा मुराली आपण । निर्गुण ब्रह्म तें तों पूर्ण । महद्माये पैलीकडे ॥ १४ ॥ महद्भूत महन्माया । पिंड ब्रह्मांड अष्ट काया । प्रकृति पुरुष दश देह काया । पंचीकर्ण शास्त्रार्थें ॥ १५ ॥ पुढें महावाक्याचा घेतां अर्थ । निर्गुण ब्रह्म सदोदित । शुद्ध बुद्ध सर्वातीत । निर्विकार निरंजन ॥ १६ ॥ निरंजन तें परब्रह्म । जेथें नाहीं मन माया विभ्रम । चिदाकाश व्यापक धर्म । संत वर्म जाणती ॥ १७ ॥ ईश्वर ह्मणे मीचि ब्रह्म । हेंचि मायोपाधीचें वर्म । महाकारण देह उत्तम । मूळप्रकृति ब्रह्मांडींचें॥१८॥

---

१ चंद्र परमात्म्याच्या मनापासून उत्पन्न आला. २ अहर्निश, रात्रंदिवस.

मी ब्रह्म हें ईश्वरीं होतें । तेंचि येथें जीवासि स्फुरतें । अवस्था सारूनि ब्रह्म तें । ब्रह्मीं ब्रह्मचि होइजे ॥ १९ ॥ ब्रह्म होणें जाणें हें बोलावें । वाच्यांश वाच्य ह्मणावें । जैसें तैसेंचि हें जाणावें । कळलेपणें लक्षांशें ॥ २० ॥ कळलेपणें काय कळलें । काय कळलें तें न कळलें । न कळोनि[1] तें कळलें । कांहींयेक निजगुह्य ॥ २१ ॥ कांहींयेक स्वरूप जाण । मीपणावीण मीपण । आपणावीण आपण । अनिर्वाच्य निवृत्ति ॥ २२ ॥ ऐसी पादसेवनीं निवृत्ति जाली । पुढें कथा पाहिजे परिसिली । रमा अभिमानें झळंबली । कांहींयेक थोरपणें ॥२३॥ रमामायेसी जाला अभिमान । मनचंद्रमा बंधु कळाहीन । ह्मणे मी ईश्वराचें मन । देवांसी अमृतपान देतसें ॥ २४ ॥ मी मन ह्मणतां चंद्रमा । अंतरला पुरुषोत्तमा । गुरुपत्नीचे दोष तुह्मा । ठाउकेचि असती ॥ २५ ॥ तैसें मी मन ह्मणोनि मनापाठीं । लागतां रिघती दुःखकपाटीं । घसरा बैसेल इंद्रियचेष्टीं । कळाहीन होतील ॥२६॥ चंद्र ह्मणे मी विष्णुसोयरा । रमा माझी येकोदरा[2] । मज लक्ष्मीच्या सोहदरा । कोण दंडील ब्रह्मांडीं ॥ २७ ॥ देव दंडितील मातें । तरी जीवन मी देवांतें । देवगुरु ब्राह्मण काय ते । वाचस्पति मजपुढें ॥ २८ ॥ थोरपण बाधी ईश्वरासी । ह्मणोनि जाला स्मशानवासी । आत्मारामउपासना त्यासी । येकपत्निव्रतस्था ॥ २९ ॥ एवं पोटींच्या[3] अमृतें इंदु समर्थ । आंगीच्या तेजें गेला वेर्थ । मग परोपकारीं देह वेचित । पुनित होत चंद्रमा ॥ ३० ॥ मन चंद्रमा अवध्यामध्यें । सावध राहाणें विचारामध्यें । शुद्ध[4] क्रिया जनामध्यें ।

---

१ जोंपर्यंत कांहीं कळलें असें वाटतें तोंपर्यंत तें कळलेंच नाहीं. कळलें ही जाणीव जेव्हां नाहींशी होईल, तेव्हांच आत्मज्ञान झालें असें ह्मणावयाचें. २ लक्ष्मी व चंद्र हीं दोन्हीं समुद्रापासून निघालीं ह्मणून. ३ चंद्र स्वतंत्रपणाच्या अहंकारानें नाडला, त्यामुळें गुरुपत्नीगमनाचें महापातक हि त्याला घडलें. पुढें पापनिर्मुक्त होण्यासाठीं त्याला देवांसाठीं देह झिजवावा लागला. मनरूप चंद्र प्रत्येकाजवळ आहेच. तेव्हां हें मनचंद्रआख्यान लक्षांत ठेऊन अहंकारनिवृत्ति करावी. ४ अहंकारापासून मुक्त असा शुद्धपणा.

दुल्लभ आहे ॥ ३१ ॥ थोरपणें थोर थोर । भगवंतास जाले चोर । भगवत्कृपेवीण घोर । बहुत आहे ॥ ३२ ॥ नको आश्रमधर्माचा बडिवार । नको ब्रह्मचर्य भ्रष्टाकार । नको वानप्रस्थ वेषधर । संन्यास लुलु द्रव्याचा ॥ ३३ ॥ परमहंस चित्र विचित्री । पंचाश्रम दिसती नेत्रीं । शुद्ध क्रियेसी कोण वग्रीं । बोलेल मूर्ख ॥ ३४ ॥ ह्मणोनि शुद्ध संप्रदाई ईश्वरभजन । करूत कोण्ही साधुजन । ब्रह्मचर्यधर्मापासून । परमहंसेंपावेतों ॥ ३५ ॥ भगवंत उद्धवाप्रति बोलिले । भगवद्भक्त आश्रमावेगळे । तथापि आश्रमीं जऱ्ही देखिले । तऱ्ही ते नव्हती आश्रमाधीन ॥ ३६ ॥ त्यांचे चरण पडोत कां दृष्टी । ह्मणोनि इच्छिती देव कोटी । येव्हडी माया रमा मोटी । परि ते पाईं ठेविली ॥ ३७ ॥ श्रीवत्सलांछन मिरविलें । सर्वांग भक्तांसी वोढविलें । जैसें जननीनें थोरपणें साहिलें । लत्ताताडण अर्भकाचें ॥ ३८ ॥ नांतरी जीवनीं जीवन पवनीं पवन । गगनीं गगन अमनीं अमन । तैसा भक्तरूपी भगवान । आत्माराम सर्वस्वें ॥ ३९ ॥ एवं मी मन ह्मणतां मन नाडिलें । मनमूळ पाहातां मन राम जालें । मनचंद्रमाआख्यान बोलिलें । मायारमाआख्यान ऐकावें ॥ ४० ॥ श्रोते ह्मणती जी सावधान । ऐकों मनमायानिवृत्तिज्ञान । समर्थें मायारमा-

---

१ शुद्ध क्रियेला आश्रमधर्माची आडकाठी नाहीं. शुद्ध मन ज्याचें आहे त्याचा आश्रम कोणताहि असो, तो आश्रमांत असून नसल्यासारखाच आहे. २ नाना वेषधारी संन्यासी. ३ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास हे चार आणि खरोखर सर्व वासनांचा त्याग करणारा परमहंसरूप पांचवा. ४ परमहंसापर्यंतच्या कोणत्याहि स्थितींत शुद्ध मनानें ईश्वरभजन करावें. ५ श्रीमद्भागवतामध्यें. ६ भृगुऋषीनें विष्णूच्या वक्षस्थलावर केलेल्या लत्ताप्रहाराची खूण. भृगूची शुद्ध भक्ति पाहून त्याचा लत्ताप्रहार देव सहन करतो; पण, लक्ष्मीला पायाशीं च ठेवतो. ७ कारण, समुद्र आणि लाट किंवा घटाकाश आणि महदाकाश, यांप्रमाणें वस्तुतः देव आणि भक्त यांचें एकरूप च आहे. मायेचें स्वरूप मात्र देवापासून दूर आहे. ८ मनरूपी भक्त मी देवापासून भिन्न आहें असें ह्मणतो तोंपर्यंत भिन्न असतो, पण खरोखर त्यांचें ऐक्य असल्यामुळें, आपलें मूळ पाहूं लागला ह्मणजे, तो रामरूप च होतो, असें या मनचंद्रआख्यानाचें तात्पर्य होय.

आख्यान । सांगीतलें पाहिजे ॥४१॥ ऐका वैकुंठनाथदर्शनासी । सुरवर आले संभ्रमेसीं । अंतर्गृहीं रमा विलासीं । नाना शृंगार करितसे ॥४२॥ देव तटस्त दर्शनातें । देखों ह्मणती प्रीति युग्मातें । लक्ष्मीरहित पुरुषोत्तमातें । वंदन कैसें करावें ॥ ४३ ॥ मग कोटिकंदर्पाची जननी । कोटिकंदर्पलावण्यखाणी । त्रिभुवननाथगृहस्वामिनी । मनोहर आंगीं विराजे ॥ ४४ ॥ लक्ष्मी वामांगीं बैसतांचि जाण । देव जयजयकारें करिती नमन । स्वरूप देखोनि अभिमान । लक्ष्मीसी कांहीं झळंबला ॥ ४५ ॥ ह्मणे मी क्षीरसागरींचें रत्न । तव तात्काळ बंधूसीं जाली कळाहीन । देवांसी वाटलें आश्चिर्य गहन । देवाधिदेवें अवलोकिलें ॥४६॥ स्वयें अंतरसाक्ष भगवान । कळलें ह्मणे हें स्वरूपज्ञान । नेणों आगमसागरींहूनि दिव्य रामरत्न । शंकरें मथूनि काढिलें ॥४७॥ आदि अनादि विमळ ब्रह्म । तेथूनि ईश्वर माया सृष्टिक्रम कर्दम । कर्दमीं अलिप्त आत्माराम । निगमसागरीं निघालें हें रत्न ॥ ४८ ॥ तेणें हतप्रभ जालीं चतुर्दशरत्नें । त्यांमाजीं मुख्य हीं दोन्ही रत्नें । रमा चंद्रमा प्रीतियुग्मरत्नें । आतां पार्वतीकांतासीं भेटऊं ॥ ४९ ॥ ऐसें वैकुंठनाथ बोलिले । कैलासनाथदर्शनासी चालिले । समस्त सुरवर सर्वे निघाले । कैलासधाम देखावया ॥ ५० ॥ आले भेटले संभ्रमेंसीं । हरिहरविधि ऐक्यभावेंसीं । रमावृत्तांत कैलासनाथासी । निवेदिते जाले ॥५१॥ मग विष्णु महद्भूत अंतरात्मा राम । हरहृदयसुखविश्राम । ऐक्यस्वसुखें रमा परम । बंधुसहित भेटविली ॥ ५२ ॥ हिमालयाचे पोटींचें रत्न । तियेसी दिधलें होतें कंठींचें रामरत्न । तव भुवननाथ भेटवी युग्मरत्न । लक्ष्मी आणि चंद्रमा ॥ ५३ ॥ मग तीं आदिअंतीं शोभलीं । पार्वतीकंठीं विराजलीं । श्रीरामचंद्रनामें गळसरीं बैसलीं । अपार मुक्तें ज्यामध्यें ॥ ५४ ॥ ह्मणोनि मुक्तपणीं साचार । श्रीरामचंद्रनाम सार । शिवकंठभूषण मनोहर । पार्वती दैवें लाधली ॥ ५५ ॥

---

१ श्रीविष्णूच्या भेटीला. २ मदनाची. ३ वेदशास्त्ररूपी सागरांतून. ४ त्वरेनें. ५ विष्णु, शंकर, ब्रह्मदेव. ६ पार्वती. ७ मोत्यें, पक्षीं मुक्त झालेले भक्त.

दुल्लभ आहे ॥ ३१ ॥ थोरपणें थोर थोर । भगवंतास जाले चोर । भगवत्कृपेवीण घोर । बहुत आहे ॥ ३२ ॥ नको आश्र[1]मधर्माचा बडिवार । नको ब्रह्मचर्य भ्रष्टाकार । नको वानप्रस्थ वेषधर । संन्यास लुलु द्रव्याचा ॥ ३३ ॥ परम[2]हंस चित्र विचित्री । पंचा[3]श्रम दिसती नेत्रीं । शुद्ध क्रियेसी कोण वग्त्रीं । बोलेल मूर्ख ॥ ३४ ॥ ह्मणोनि शुद्ध संप्रदाई ईश्वरभजन । करूत कोण्ही साधुजन । ब्रह्मचर्यधर्मापासून । परमहंस[4]पावेतों ॥ ३५ ॥ भगवंत उद्धवाप्रति[5] बोलिले । भगवद्भक्त आश्रमावेगळे । तथापि आश्रमीं जऱ्ही देखिले । तऱ्ही ते नव्हती आश्रमाधीन ॥ ३६ ॥ त्यांचे चरण पडोत कां दृष्टी । ह्मणोनि इच्छिती देव कोटी । येव्हडी माया रमा मोटी । परि ते पाईं ठेविली ॥ ३७ ॥ श्रीवत्सलांछ[6]न मिरविलें । सर्वांग भक्तांसी वोढविलें । जैसें जननीनें थोरपणें साहिलें । लत्ताताडण अर्भकाचें ॥ ३८ ॥ नां[7]तरी जीवनीं जीवन पवनीं पवन । गगनीं गगन अमनीं अमन । तैसा भक्तरूपी भगवान । आत्माराम सर्वस्वें ॥ ३९ ॥ एवं मी म[8]न ह्मणतां मन नाडिलें । मनमूळ पाहातां मन राम जालें । मनचंद्रमाआख्यान बोलिलें । मायारमाआख्यान ऐकावें ॥ ४० ॥ श्रोते ह्मणती जी सावधान । ऐकों मनमायानिवृत्तिज्ञान । समर्थें मायारमा-

---

१ शुद्ध क्रियेला आश्रमधर्माची आडकाठी नाहीं. शुद्ध मन ज्याचें आहे त्याचा आश्रम कोणताहि असो, तो आश्रमांत असून नसल्यासारखाच आहे. २ नाना वेषधारी संन्यासी. ३ ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, आणि संन्यास हे चार आणि खरोखर सर्व वासनांचा त्याग करणारा परमहंसरूप पांचवा. ४ परमहंसापर्यंतच्या कोणत्याहि स्थितींत शुद्ध मनानें ईश्वरभजन करावें. ५ श्रीमद्भागवतामध्यें. ६ भृगुऋषीनें विष्णूच्या वक्षस्थलावर केलेल्या लत्ताप्रहाराची खूण. भृगूची शुद्ध भक्ति पाहून त्याचा लत्ताप्रहार देव सहन करतो; पण, लक्ष्मीला पायाशीं च ठेवतो. ७ कारण, समुद्र आणि लाट किंवा घटाकाश आणि महदाकाश, यांप्रमाणें वस्तुत देव आणि भक्त यांचें एकरूप च आहे. मायेचें स्वरूप मात्र देवापासून दूर आहे. ८ मनरूपी भक्त मी देवापासून भिन्न आहें असें ह्मणतो तोंपर्यंत भिन्न असतो, पण खरोखर त्यांचें ऐक्य असल्यामुळें, आपलें मूळ पाहूं लागला ह्मणजे, तो रामरूप च होतो, असें या मनचंद्रआख्यानाचें तात्पर्य होय.

आख्यान । सांगीतलें पाहिजे ॥४१॥ ऐका वैकुंठनाथदर्शनासी[1] । सुरवर आले संभ्रमेसीं । अंतर्गृहीं रमा विलासीं । नाना शृंगार करितसे ॥४२॥ देव तटस्त दर्शनातें । देखों ह्मणती प्रीति युग्मातें । लक्ष्मीरहित पुरुषोत्तमातें । वंदन कैसें करावें ॥ ४३ ॥ मग कोटिकंदर्पाची[2] जननी । कोटिकंदर्पलावण्यखाणी । त्रिभुवननाथगृहस्वामिनी । मनोहर आंगीं विराजे ॥ ४४ ॥ लक्ष्मी वामांगीं बैसतांचि जाण । देव जयजयकारें करिती नमन । स्वरूप देखोनि अभिमान । लक्ष्मीसी कांहीं झळंबला ॥ ४५ ॥ ह्मणे मी क्षीरसागरींचें रत्न । तव तात्काळ[4] बंधूसीं जाली कळाहीन । देवांसी वाटलें आश्चिर्य गहन । देवाधिदेवें अवलोकिलें ॥४६॥ स्वयें अंतरसाक्ष भगवान । कळलें ह्मणे हें स्वरूपज्ञान । नेणों आगम[3]सागरींहूनि दिव्य रामरत्न । शंकरें मथूनि काढिलें ॥४७॥ आदि अनादि विमळ ब्रह्म । तेथूनि ईश्वर माया सृष्टिक्रम कर्दम । कर्दमीं अलिप्त आत्माराम । निगमसागरीं निघालें हें रत्न ॥ ४८ ॥ तेणें हतप्रभ जालीं चतुर्दशरत्नें । त्यांमाजीं मुख्य हीं दोन्ही रत्नें । रमा चंद्रमा प्रीतियुग्मरत्नें । आतां पार्वतीकांतासीं भेटऊं ॥ ४९ ॥ ऐसें वैकुंठनाथ बोलिले । कैलासनाथदर्शनासी चालिले । समस्त सुरवर सर्वे निघाले । कैलासधाम देखावया ॥ ५० ॥ आले भेटले संभ्रमेंसीं । हरिहरविधि[5] ऐक्यभावेंसीं । रमावृत्तांत कैलासनाथासी । निवेदिते जाले ॥५१॥ मग विष्णु महद्भूत अंतरात्मा राम । हरहृदयसुखविश्राम । ऐक्यस्वसुखें रमा परम । बंधुसहित भेटविली ॥ ५२ ॥ हिमालयाचे पोटींचें रत्न[6] । तियेसी दिधलें होतें कंठींचें रामरत्न । तव भुवननाथ भेटवी युग्मरत्न । लक्ष्मी आणि चंद्रमा ॥ ५३ ॥ मग तीं आदिअंतीं शोभलीं । पार्वतीकंठीं विराजलीं । श्रीरामचंद्रनामें गळसरीं बैसलीं । अपार मुक्तें[7] ज्यामध्यें ॥ ५४ ॥ ह्मणोनि मुक्तपणीं साचार । श्रीरामचंद्रनाम सार । शिवकंठभूषण मनोहर । पार्वती दैवें लाधली ॥ ५५ ॥

---

१ श्रीविष्णूच्या भेटीला. २ मदनाची. ३ वेदशास्त्ररूपी सागरांतून. ४ त्वरेनें. ५ विष्णु, शंकर, ब्रह्मदेव. ६ पार्वती. ७ मोत्यें, पक्षीं मुक्त झालेले भक्त.

स्कंद गजानन स्तनपानीं । अर्धोन्मीलितें[1] लक्षिती लोचनीं । तदंश भक्त श्रीरामचंद्रध्यानीं । भक्तिमाता वोसंगीं[2] ॥५६॥ पुराणप्रसिद्ध हें कथन । संत जाणती सुलक्षण । कमळोद्भवाप्रति[3] जगजीवन । तारकब्रह्म सांगतसे ॥५७॥

॥ श्लोक ॥ **निर्मथ्यागमसागरं मणिमयं रामेति निष्काशितम् ।**
**तत्सर्वेशतया शिवेन सुधिया कंठे कृतं भूषणम् ॥**
**श्रीरादावपरत्र चंद्र इति तत्कोस्त्योस्तु मुक्ताफलैः ।**
**कृत्वांभोरुहजः[4] हरोहि कुरुते गौरीगलस्थं रहः ॥ १ ॥**

एवं वैकुंठनाथ पुरुषोत्तमें । तारकब्रह्म विधीस[3] दाविलें नेमें । श्रीरामचंद्रगुणरत्नधामें । लक्ष्मी शोभा पावली ॥ ५८ ॥ अहो लक्ष्मीसी[5] कैंचा अभिमान । केलें जीवबुद्धीचें निराकर्ण । नित्य करितां श्रीगुरुपादसेवन । देहाभिमान बाधीना ॥ ५९ ॥ जालें मनमायानिवृत्तिज्ञान । गुरुकृपा बाणलें चिन्ह । शिष्य होऊनि ब्रह्मसंपन्न । काय बोले स्वामीप्रति ॥६०॥

॥ श्लोक ॥ **देहबुद्ध्या त्वत्दासोहं जीवबुद्ध्या त्वदंशकः ।**
**आत्मबुद्ध्या त्वमेवाहं इति मे निश्चला मतिः ॥ १ ॥**

देहबुद्धियोगें गुरुदास्य घडलें । जीवबुद्धियोगें त्वदंश जालें । आत्मबुद्धियोगें तो मीच बाणलें । तो मी मी तूं सारूनियां ॥ ६१ ॥ सरलें मनमाया तुर्याज्ञान । निवृत्ति उन्मनी विज्ञान । लवणं[6] सिंधूंत विरालें जाण । आत्मारामस्वरूपार्णवीं ॥ ६२ ॥ तन्न तन्न श्रुति गाती । नेति नेति श्रुति गर्जती । तें नव्हे तें नव्हे ब्रह्म ह्मणती । प्रत्यक्ष आलें अनुभवा ॥ ६३ ॥ स्थूळ नव्हे सूक्ष्म नव्हे । कारण नव्हे महाकारण नव्हे । विराट हिरण्यगर्भ अव्याकृति नव्हे । मूळप्रकृति नव्हे परब्रह्म ॥ ६४ ॥ रज तम नव्हे सत्व नव्हे । शुद्धसत्व नव्हे महत्तत्व नव्हे ।

---

१ अर्धवट उघडलेल्या डोळ्यांनीं स्कंद आणि गणपति मातेच्या मांडीवरून स्तनपान करित असतां त्यांकडे बघतात. २ मांडीवर. ३ ब्रह्मदेवाला. ४ कमळोद्भव असा ब्रह्मदेव. हें संबोधन असावें. पण रूप तसें नाहीं. कांहीं तरी चूक असावीसें वाटतें. ५ हें लक्ष्मीचें आख्यान जीवबुद्धीचें निरसन करण्यासाठीं आहे. मायेमुळें जीवपणा आलेला असतो, तो गुरुभक्तीनें जाऊन जीवशिवांचें ऐक्य होतें असें त्याचें तात्पर्य. ६ मीठ पाण्यांत विरावें त्याप्रमाणें जीवपण शिवपणांत विरून गेलें.

पंचभूत नव्हे शून्यत्व नव्हे । आत्मप्रचितशास्त्रार्थे ॥ ६५ ॥ क्षर नव्हे अक्षर नव्हे । चैतन्य नव्हे साक्षी नव्हे । सगुण नव्हे निर्गुण नव्हे । नामरूपातीत परब्रह्म ॥ ६६ ॥ देह मी मन मी जीव मी नव्हे । आत्मा ब्रह्म स्वतसिद्ध आहे । हेत अहेत निरसोनि राहे । देह विदेह निवृत्ति ॥ ६७ ॥ निवृत्ति ब्रह्मदेवें अनुभविलें । श्रुतिसंमतीं अनुभवा आलें । पूर्वकथानुसंधान ऐकिलें । पाहिजे श्रोतीं ॥ ६८ ॥ माया श्री मन चंद्रमा । दोन्ही मिनलीं आत्मयारामा । श्रीरामचंद्रनाममहिमा । समर्थे आज्ञा सांगितला ॥ ६९ ॥ नामरूपातीत राम । सच्चिदानंद पूर्णकाम । जय जय राम जय जय राम । तारकब्रह्म निर्धारें ॥ ७० ॥ मनमायानिवृत्तिलक्षण । श्रीरामचंद्रनाममहिमान । संतचरणीं निवेदन । यथामति केलेंसे ॥ ७१ ॥ एवं मनमाया-निवृत्ति ऐसी । सांगितली हे श्रोतयासी । पुढें अहंमायानिवृत्ति कैसी । निवृत्तिवेणी बोलेल ॥ ७२ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीराम-दासस्वामीविश्रामधाम । मनमायानिवृत्ति नाम । समास पंचम बोलिला ॥ ७३ ॥ समास ॥ ५ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जया जी आदिपुरुषा । विश्वाधारका सर्वेशा । जगदाधारा परमपुरुषा । गगनगर्भ निरंजना ॥ १ ॥ निरावलंब आनंदकंदा । सद चिद आनंद सच्चिदानंदा । नाना त्रिपुटी[1] सारूनि स्वानंदा । निजात्मबोधें प्रबोधिलें ॥ २ ॥ मिथ्या मायेनें भुलविलें । मिथ्या मिथ्यत्वें दिसोनि आलें । तद्रूपत्वें प्राप्त जालें । सद्गुरुस्वरूप तुमचें जी ॥ ३ ॥ जीवासी अहंमाया बाधिताहे । मुमुक्षु स्वामीसी पुसताहे । साधक विनति करिताहे । अहंमायानिवृत्ति ॥ ४ ॥ समर्थ सद्गुरु सर्वत्र मूर्ति । सांगिजे अहंमाया कैसी निवृत्ति । ऐकोन स्वामी कृपामूर्ति । काय अनुवादती ऐकावें ॥ ५ ॥ श्रीराम कर्ता श्रीराम भोक्ता । श्रीराम[2]करूनि अकर्ता । करून अकर्ता त्याहूनि पर्ता । निर्विकार निरंजन ॥ ६ ॥

---

१ दृश्य, ज्ञाता, दर्शन, वगैरे. २ अहंमायेची निवृत्ति होण्या साठीं.

आत्मा आणि निरंजन । द्वैत मायायोगें जाण । अहंमाया निवृत्ति-कथन । श्रोतेजनीं परिसावें ॥ ७ ॥ अहं ब्रह्म ईश्वरपण । मायोपाधि परमात्मा आपण । सच्चिदानंद ज्ञानघन । पदत्रय जाण या नांव ॥८॥ सद ब्रह्म चिद शक्ति माया । आनंद ईश्वरतनु निर्माया । सद चिद आनंद मिळोनियां । सच्चिदानंद हें नाम ॥ ९ ॥ पुढें ईश्वर माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फांपावली । अहं बहु स्यां श्रुति बोलिली । संत जाणती सर्वज्ञ ॥ १० ॥ मुळींचें बीज फळांत येतें । बीज वाढ-तां बहुत होतें । उर्ध्वमूलमधः[1]शाखा स्वरूप तें । भगवद्गीतेसी बोलिलें ॥ ११ ॥ नाना मायेचीं फडगेरें[2] फुटलीं । नाना वंडें पाषांडें वाढलीं । रज तम सत्व गुणें प्रगटलीं । शुद्धसत्व ते साधुजन ॥ १२ ॥ शुद्ध ब्रह्म साभिमानी । महत्तत्व विष्णु अभिमानी । महद्भूत प्रगटे निदानीं । धर्मस्थापनेकारणें ॥ १३ ॥ सुर साधु धर्म धरा धरी[3] । असुर संपत्ति संहारी । नाना बहिर्मुखें[4] पापकारी । द्वैत दळणें करीतसे ॥१४॥ भागवतीं अवतार बोलिले । प्रथम स्कंधीं निरोपिले । अनंत अवतार देवें घेतले । लोकसंग्रहाकारणें ॥ १५ ॥ लोक मीपणें फुंजती[5] । मी मी ह्मणोनि जन्म घेती । जन्ममूळ प्रांतं[6] प्राणी नेणती । ह्मणोन श्रवण असावें ॥ १६ ॥ श्रवणामध्यें सार[7] श्रवण । अध्यात्म कथा निरूपण । वेद शास्त्रें पुराणें मथुन । संतीं रत्नें काढिलीं ॥ १७ ॥ माया मथूनि क्षीरसागर । भोजना बैसले भोक्ते नर । अमृतसुरा[8] सुरासुर[9] । अनुक्रमें सेविती ॥ १८ ॥ अमृत ह्मणजे मोक्ष श्रुतीं । वचन पावलें वेदोक्तीं । सुरा ह्मणिजे सर्वत्र जाणती । बद्ध संसार मद्य हें ॥ १९ ॥ मद्य संसार आवडला । कपट राहो भोजनीं बैसला । अमृत श्रवणीं दुघड जाला । जीत ना मेला द्वैतार्थें ॥ २० ॥ येकरूपें द्वैत जालें । चंद्रसूर्या ग्रहण

१ उर्ध्वमूलमधःशाखम् । इ० (गी. १५-१). २ फांद्या. ३ विष्णु अवतार घेऊन देव, साधु, धर्म आणि पृथ्वी यांचें रक्षण करतो. ४ विषयलोलुप, इंद्रिय-सुखासक्त अशा पापी लोकांचें निर्दलन करतो. ५ फुगतात. ६ शेवट. ७ उत्तम, श्रेष्ठ. ८ अमृत आणि मद्य. ९ देव आणि दानव.

लागलें । लोक ह्मणती मंडळ ग्रासिलें । साधुजन आछादिले ॥ २१ ॥ आछादिले चंद्र सूर्य । ग्रासिले[1] ह्मणती हें आश्चिर्य । लक्षांतरें ते प्रभुत्वर्य । द्वैत राहो ऐलीकडे ॥ २२ ॥ पर्वकाळ मोठा केतु-राहोपर्वी । धर्म घडतो सर्वत्र सर्वी । धर्म तो अधर्म महापर्वी । संत न घेती तें दान ॥ २३ ॥ तेथील प्रतिग्रह केवळ ग्रह । धर्मसंग्रह लोकसंग्रह । अत्यंत अग्रह निग्रह । याचकलोकांसी चालेना ॥ २४ ॥ द्वैतराहोचें ग्रहणदान । केतुपर्वीचें नाना प्रदान । तेथें न शिवती साधुजन । वेदमूर्ति केवळ ॥ २५ ॥ शुक्ल वृत्ति मोक्षभिक्षा । अमृतपानी सुरवर दीक्षा । सुर पंडित सत्यपक्षा । सांभाळिती स्वानंदें ॥ २६ ॥ शुक्लवृत्ति स्वरूप आहे । ब्राह्मणदीक्षा मुख्य पाहे । ब्रह्म जानाति ब्राह्मण राहे । शुक्लवृत्ति स्वानंदें ॥ २७ ॥ एवं राहोचें निराकर्ण । पुढें अहंमायानिवृत्तिकथन । जीव-पणाची बोळवण[2] । शिवपणें ऐका हो ॥ २८ ॥ शिव शक्ति जगदीश्वर । प्रकृति पुरुष परमेश्वर । त्याचा तोचि आपण नर । कोण कैंचा भिन्नत्वें ॥ २९ ॥ प्रकृति पुरुषें ब्रह्म होतां । जीवे-श्वरासी ब्रह्मीं ऐक्यता । माहाप्रळय होणें न लगतां । विवेकप्रळयें[3] निर्मुक्त ॥३०॥ नाना जीवपणाची भ्रांती । देवें निर्मिली उत्पत्ति स्थिति । मम माया दुरत्यया[4] इति । भगवद्गीतेसी सांगीतलें ॥ ३१ ॥ मातें शरण जे येती । ते माझी माया तरैती । ऐसें वचन अ-र्जुनाप्रति । भगवद्गीतेसी बोलिलें ॥ ३२ ॥ श्रोते ह्मणती जे दुर-त्यय माया । कोणेपरी जाईल विलया । वक्ता ह्मणे जी सद्गुरु-

---

१ चंद्रसूर्य देव फार दूर असून द्वैतरूप राहू फार अलीकडे आहे, असें अस-ल्यामुळें तो चंद्रसूर्यांना ग्रासतो हें ह्मणणें अयोग्य आहे. मायेमुळें ब्रह्म ग्रासलें जात नाहीं. २ जीवपणाला शिवपणांत रजा देणें. ३ प्रळय ह्मणजे उभारणीच्या उलट क्रमानें सृष्टीची संहारणी, मायेनें मांडलेला पसारा आवरणें. ज्ञानाच्या योगानें मायामिथ्यात्व उमजणें ह्मणजे विवेकप्रळय. ४ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ भ. गी. ७-१४

आत्मा आणि निरंजन । द्वैत मायायोगें जाण । अहंमाया निवृत्तिकथन । श्रोतेजनीं परिसावें ॥ ७ ॥ अहं ब्रह्म ईश्वरपण । मायोपाधि परमात्मा आपण । सच्चिदानंद ज्ञानघन । पदत्रय जाण या नांव ॥८॥ सद ब्रह्म चिद शक्ति माया । आनंद ईश्वरतनु निर्माया । सद चिद आनंद मिळोनियां । सच्चिदानंद हें नाम ॥ ९ ॥ पुढें ईश्वर माया विस्तारली । अष्टधा प्रकृति फांपावली । अहं बहु स्यां श्रुति बोलिली । संत जाणती सर्वज्ञ ॥ १० ॥ मुळींचें बीज फळांत येतें । बीज वाढतां बहुत होतें । उर्ध्वमूलमधःशाखा[1] स्वरूप तें । भगवद्गीतेसी बोलिलें ॥ ११ ॥ नाना मायेचीं फडगेरें[2] फुटलीं । नाना बंडें पाषांडें वाढलीं । रज तम सत्व गुणें प्रगटलीं । शुद्धसत्व ते साधुजन ॥ १२ ॥ शुद्ध ब्रह्म साभिमानी । महत्तत्व विष्णु अभिमानी । महद्भूत प्रगटे निदानीं । धर्मस्थापनेकारणें ॥ १३ ॥ सुर साधु धर्म धरा धरी[3] । असुर संपत्ति संहारी । नाना बहिर्मुखें[4] पापकारी । द्वैत दळणें करीतसे ॥१४॥ भागवतीं अवतार बोलिले । प्रथम स्कंधीं निरोपिले । अनंत अवतार देवें घेतले । लोकसंग्रहाकारणें ॥ १५ ॥ लोक मीपणें फुंजेती[5] । मी मी ह्मणोनि जन्म घेती । जन्ममूळ प्रांतें[6] प्राणी नेणती । ह्मणोन श्रवण असावें ॥ १६ ॥ श्रवणामध्यें सार[7] श्रवण । अध्यात्म कथा निरूपण । वेद शास्त्रें पुराणें मथुन । संतीं रत्नें काढिलीं ॥ १७ ॥ माया मथूनि क्षीरसागर । भोजना बैसले भोक्ते नर । अमृतसुरा[8] सुरासुर[9] । अनुक्रमें सेविती ॥ १८ ॥ अमृत ह्मणजे मोक्ष श्रुतीं । वचन पावलें वेदोक्तीं । सुरा ह्मणिजे सर्वत्र जाणती । बद्ध संसार मद्य हें ॥ १९ ॥ मद्य संसार आवडला । कपट राहो भोजनीं बैसला । अमृत श्रवणीं दुघड जाला । जीत ना मेला द्वैतार्थें ॥ २० ॥ येकरूपें द्वैत जालें । चंद्रसूर्या ग्रहण

---

१ उर्ध्वमूलमधःशाखम् । इ० (गी. १५-१). २ फांद्या. ३ विष्णु अवतार घेऊन देव, साधु, धर्म आणि पृथ्वी यांचें रक्षण करतो. ४ विषयलोलुप, इंद्रियसुखासक्त अशा पापी लोकांचें निर्दलन करतो. ५ फुगतात. ६ शेवट. ७ उत्तम, श्रेष्ठ. ८ अमृत आणि मद्य ९ देव आणि दानव.

लागलें । लोक ह्मणती मंडळ ग्रासिलें । साधुजन आच्छादिले ॥ २१ ॥ आच्छादिले चंद्र सूर्य । ग्रासिले[1] ह्मणती हें आश्चिर्य । लक्षांतरें ते प्रभुत्वर्य । द्वैत राहो ऐलीकडे ॥ २२ ॥ पर्वकाळ मोठा केतु-राहोपर्वीं । धर्म घडतो सर्वत्र सर्वीं । धर्म तो अधर्म महापर्वीं । संत न घेती तें दान ॥ २३ ॥ तेथील प्रतिग्रह केवळ ग्रह । धर्मसंग्रह लोकसंग्रह । अत्यंत अग्रह निग्रह । याचकलोकांसी चालेना ॥ २४ ॥ द्वैतराहोचें ग्रहणदान । केतुपर्वीचें नाना प्रदान । तेथें न शिवती साधुजन । वेदमूर्ति केवळ ॥ २५ ॥ शुक्ल वृत्ति मोक्षभिक्षा । अमृतपानी सुरवर दीक्षा । सुर पंडित सत्यपक्षा । सांभाळिती स्वानंदें ॥ २६ ॥ शुक्लवृत्ति स्वरूप आहे । ब्राह्मणदीक्षा मुख्य पाहे। ब्रह्म जानाति ब्राह्मण राहे । शुक्लवृत्ति स्वानंदें ॥ २७ ॥ एवं राहोचें निराकर्ण । पुढें अहंमायानिवृत्तिकथन । जीव-पणाची बोळेवण[2] । शिवपणें ऐका हो ॥ २८ ॥ शिव शक्ति जगदीश्वर । प्रकृति पुरुष परमेश्वर । त्याचा तोचि आपण नर । कोण कैंचा भिन्नत्वें ॥ २९ ॥ प्रकृति पुरुषें ब्रह्म होतां । जीवे-श्वरासी ब्रह्मीं ऐक्यता । माहाप्रळय होणें न लगतां । विवेकें[3]प्रळयें निर्मुक्त ॥३०॥ नाना जीवपणाची भ्रांती । देवें निर्मिली उत्पत्ति स्थिति । मम माया[4] दुरत्ययां इति । भगवद्गीतेसी सांगीतलें ॥ ३१ ॥ मातें शरण जे येती । ते माझी माया तरती । ऐसें वचन अ-र्जुनाप्रति । भगवद्गीतेसी बोलिलें ॥ ३२ ॥ श्रोते ह्मणती जे दुर-त्यय माया । कोणेपरी जाईल विलया । वक्ता ह्मणे जी सद्गुरु-

---

१ चंद्रसूर्य देव फार दूर असून द्वैतरूप राहू फार अलीकडे आहे, असें अस-ल्यामुळें तो चंद्रसूर्यांना ग्रासतो हें ह्मणणें अयोग्य आहे. मायेमुळें ब्रह्म ग्रासलें जात नाहीं. २ जीवपणाला शिवपणांत रजा देणें. ३ प्रळय ह्मणजे उभारणीच्या उलट क्रमानें सृष्टीची संहारणी, मायेनें मांडलेला पसारा आवरणें. ज्ञानाच्या योगानें मायामिथ्यात्व उमजणें ह्मणजे विवेकप्रळय. ४ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ भ. गी. ७-१४

पाया । शरण गेलियां निवृत्ति ॥ ३३ ॥ ऐका दुरत्यय मायानिवृत्ति-कथन । कैसें जीवपणाचें निरशॅन । अहं आत्मा नेणतां जीवपण । जन्म बंधन मानीतसे ॥ ३४ ॥ ह्मणे मी श्रीमंत करंटा धाकुटा मोठा । ह्मणे मी मुका बधिर पंगु लाँठा । ह्मणे मी निर्मळ बोंगळ बोखटा खोटा । पापी सुकृती प्राणी मी ॥ ३५ ॥ ह्मणे मी चिरायु गतायु दीर्घायुषी । ह्मणे मी उपजतां मेलों अल्पायुषी । ह्मणे मी स्वर्ग नर्क पापपुण्यासी । क्षीणे पुण्ये अधःपतलों ॥ ३६ ॥ ह्मणे मी स्वप्ना-मध्यें राजा जालों । ह्मणे मी स्वप्नामध्यें राज्यभ्रष्ट केलों । ह्मणे मी अज्ञान दरिद्री हिंडों लागलों । चवऱ्यासी लक्ष योनि ॥ ३७ ॥ मग हिंडतां हिंडतां जन्मांतरीं । पुण्यसंग्रह कांहीं करी । निःकामभजनें ईश्वरीं । अनुसंधान लागलें ॥ ३८ ॥ अनुसंधानें योगभ्रष्ट । शुचि श्रीमंतागृहीं वरिष्ठ । सद्गुरुकृपें ज्ञानयोगें चुकलें अरिष्ट । जन्मकर्म निवारिलें ॥ ३९ ॥ जें जें माझें होतें भाविलें । तें तें साक्षत्वें राहिलें । साक्षत्व आत्मत्वें सारिलें । आत्मत्वें आत्मा निरंजन ॥ ४० ॥ देह आत्मा प्राण आत्मा । जीव आत्मा अंतःकरण आत्मा । ज्ञान आत्मा विज्ञान आत्मा । प्रत्यगात्मा सिद्धांत ॥ ४१ ॥ निर्गुण आत्मा मुळीं होता । तोचि तो जाला तत्वता । ब्रह्मीं ब्रह्मांश तद्रूपता । मायातीत निरंजन ॥४२॥ एवं दुरत्यय माया जीव तरले । जीव शिवपणें ब्रह्म जाले । कथासंमति श्रीगुरुदेव बोलिले । इतिहासपुरा-णांतरीं ॥ ४३ ॥ श्रोतीं व्हावें सावधान । सांगिजेल अहंमायानिवृत्ति-ज्ञान । रसाळ कथानुसंधान । स्कंधआख्यान ऐकावें ॥ ४४ ॥ स्कंध नाना जीवपणें भ्रांत । कैसा पावला येकांत । ब्रह्मनिष्ठ साधुसंत ।

---

१ उलटून जावयास कठीण अशी. २ निरसन. ३ मी आत्मस्वरूप आहें, हें न समजल्यामुळें मला जन्ममरण बंधन आहे असें मानितो. ४ थोटा. ५ वाईट. ६ पुण्य संपल्यामुळें स्वर्गांतून खालीं मृत्युलोकीं आलों. ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं । क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति । (भ. गी. ९-२१) यांत सांगितल्याप्रमाणें. ७ स्कंद, षडानन.

भले पंडित ऐकती ॥ ४५ ॥ अपूर्व कथानिरोपण । स्कंधआख्यान करावें श्रवण । स्कंधपुराणीं गुरुगीतार्थकथन । बोलिलें हरें पार्वतीप्रति ॥ ४६ ॥ गुरुगीता पठण जे करिती । गुरुसेवा अंगिकारिती । गुरुसेवक होवोनि जे ठाकती । ते कलिकाळ राहती जिंकूनियां ॥ ४७ ॥ गुरुगीतार्थ होतां श्रवण । स्कंध ब्रह्मकपाटीं रिघाला जाण । अहंमायानिवृत्तिकथन । श्रोतीं श्रवण करावें ॥ ४८ ॥ स्वामीकार्तिक पार्वतीकुमर । सेनानी ईश्वरी अवतार । दशमोध्यांई चक्रधर । भगवद्गीतेसी बोलिला ॥ ४९ ॥ क्रौंच दळणीं मोठा शूर । तारुण्यदशा अनावर । देवस्त्रिया देखूनि सुंदर । रळिया करी विनोदें ॥५०॥ बोभाट आले पार्वतीपासीं । पार्वती बोधी पुत्रासी । परि तो स्कंध लावण्यराशि । यौवनारूढ ऐकेना ॥ ५१ ॥ वरें ह्मणे प्रबोधसमयां । पुन्हा मागुती तेचि क्रिया । ऐसें ऐकोनि भर्गजाया । पुत्रराया बोधितसे ॥ ५२ ॥ ह्मणे बापा ऐकें षडानना । छळिसी देवाच्या अंगना । माझें स्वरूप सर्वत्र ना । शिवशक्ति विस्तारलें ॥ ५३ ॥ पुरुषमात्र शिवव्यक्ति । स्त्रियामात्र मी पार्वती । माझा पुत्र होवोनि दुर्मति । निवृत्ति तुझी होईना ॥ ५४ ॥ इतुकें ऐकतांचि वचन । तात्काळ जाला लज्यायमान । धन्य धन्य अंबादुग्धपान । कुमारें रान घेतलें ॥ ५५ ॥ पार्वती मागें लागली । स्कंधासी करुणा भाकिती जाली । क्रौंचदमनासी बोलिली । दुग्धबोट म्यां घातलें ॥ ५६ ॥ ह्मणे घे आपुलें दुग्धबोट । म्हणोनि वमिता जाला नीट । दुग्धबोट काजळ सुनीट । त्यागूनि कपाट घेतलें ॥ ५७ ॥ कपाटस्वामी ब्रह्मकपाटीं । माया पार्वती उभी गोरटी । तेथूनि वचनें धूर्जटी । बोलता जाला ॥ ५८ ॥ माझें जीवपण तुवां नेलें । शिवपण येकायेकीं केलें । शिवपण हेंहि घेईं आपुलें । तुजकरितां जीव शिव ॥ ५९ ॥ जीव शिव

---

१ श्रीकृष्णभगवान्. २ सेनानीनामहं स्कंदः । भ. गी. १०-२४. ३ एक पर्वत. याचें कार्तिकेयानें चूर्ण केलें. ४ पार्वतीनें उपदेश केला ह्मणजे त्या वेळेपुरता. ५ पार्वती. ६ पुरुष तेवढे सर्व. ७ रान. ८ शंकर. पण येथें कार्तिकेय पाहिजे.

परमात्मउपाधि । ब्रह्म निर्गुण निरोपाधि । गजाननें सांगीतली होती बुद्धि । तुझ्या विश्वासें मी गेलों ॥६०॥ आतां आश्रम मजला करणें नाहीं । तुझी तूंचि अवघी होईं । माझें मीपण गेलें पाहीं । कर्पूरदेह हा जळतां दिसे ॥ ६१ ॥ म झा बंधु जरी असेल । तरि तोही आश्रम न क· रील । तुझा वंशचि बुडवील । दोघें नांदा स्वानंदें ॥ ६२ ॥ तिसरें तुम्हासी कोण्ही न हो । तुमचें ब्रह्मीं मीपण जावो । अहं ब्रह्म ह्मणोनि भावो । ब्रह्मकटाहें निर्मितां ॥ ६३ ॥ माझ्या अनुष्ठानप्रचंडें । विरोन जाऊत अनंत ब्रह्मांडें । ब्रह्मदेवाचीं काय तोंडें । ब्रह्मीं ब्रह्मांडें करील ॥ ६४ ॥ ऐसें बोले कपाटस्वामी । माया अंबा राहिली भूमी । तिजला समजाविलें भक्तीं आम्हीं । आत्मारामीं स्वानंदें ॥ ६५ ॥ धन्य तुझे पोटींचें पुण्य । पुत्र निर्गुण निरंजन । आम्ही तुझीं लेंकुरें जाण । आम्हावरी तूं दया करीं ॥ ६६ ॥ बा रे येके दयेनें ऐसें केलें । लेंकरूं कपाटीं रिघालें । माझें दुग्धचि नव्हे भलें । तुम्हांसी बोल काशाचा ॥ ६७ ॥ अंबे शेवट माया तूं खरी । अजुनी लोभ कां धरितेसी अंतरीं । तुझ्या लोभें आम्हांवरी । आश्रमजाळ घातलें ॥६८॥ माते आश्रमीं तरी श्रम निवारणें । शिव शक्ति तूंचि तूं होईं आपणें । आमुचीं दवडावीं मीपणें । अहं माया निरसोनियां ॥ ६९ ॥ सद्गुरु-कृपा अंबा माउली । अहं ब्रह्मास्मि करिती जाली । अहं माया निर-सोनि गेली । सद्गुरुनाथप्रतापें ॥ ७० ॥ एवं निवृत्तिवेणी निवृत्ति-पूर्ण । अहंमायानिवृत्ति जाण । कथासंमति स्कंधआख्यान । संतसज्जनीं निवेदिलें ॥ ७१ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामीविश्रामधाम । अहंमायानिवृत्तिनाम । समास षष्ठम बोलिला ॥ ७२ ॥ समास ॥ ६ ॥

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय श्रीगुरु स्वामीकार्तिक निरंजन । सांगावें अहंमाया-निवृत्तिकथन । सप्तजन्में लाभे विद्याधन । सकामकथन लौकिक ॥ १ ॥ परलोकींचे कपाटस्वामी । तेचि मुख्य भजों आह्मी ।

१ देवस्त्रियांवर दया केल्यानें.

लोकिकांच्या लोक ऊर्मि । विषयवासना इछिती ॥ २ ॥ लोकीं अधिकारें चालावें । अधिकारपरत्वें लाभे स्वभावें । ब्रह्मानुभवें निजवैभवें । ब्रह्मगोळीं नमावों ॥ ३ ॥ वैराग्याहूनि भाग्य । आणखी नाहीं हो योग्य । धन्य ते वीतरागी सभाग्य । यथायोग्य क्रियेचे ॥४॥ जे बहुतांचे आधार । कपाटस्वामी निर्विकार । जेथें षडउर्मी विकार । अंधकार हतप्रभ ॥ ५ ॥ कपाटस्वामी सूर्यदीप्ति । मायाशक्ति राहिली खालती । स्वप्रकाशें प्रकाश कीर्ति । स्वामी कार्तिक समर्थ ॥ ६ ॥ कार्तिक मासीं कृत्तिकायोगीं । विष्णुमासीं भक्तियोगीं । जन्मा आलियां साधुसंगीं । दर्शनासी जावें स्वामीच्या ॥ ७ ॥ कपाटस्वामीतें देखिलें । जन्ममूळ पाहिलें आपुलें । पूर्ण कृपेनें अवलोकिलें । कपाटीं ठेविलें येकांतीं ॥ ८ ॥ माया ऐलीकडे राहिली । पार्वतीरूपें उभी ठेली । लोकानुग्रहें दया केली । ब्रह्मानंदें स्वानंदें ॥ ९ ॥ कपाटस्वामी सदा पर्वतीं । मायोपाधि यात्रा खालती । दर्शनासि जावें स्वामीप्रती । पुण्य-संग्रह करूनियां ॥ १० ॥ अगाधपुण्यें दर्शन जालें । आत्मसमाधि चित्त आलें । दृश्य द्रष्टा दर्शन गेलें । दर्शन घडलें स्वामीचें ॥ ११ ॥ भक्तियोगें ज्ञानयोगें । वैराग्ययोगें कर्मयोगें । कर्मे सत्कर्मे स्वामियोगें । सर्व सिद्धीसी पावलीं ॥ १२ ॥ श्रोतेजनी आक्षेपिलें वचन । ऐकिलें सद्गुरुस्वामीचें महिमान । स्वामी कार्तिक उपमा जाण । सद्गुरुसी साहेना ॥ १३ ॥ यथार्थ बोलिलां श्रोतेजन । सद्गुरु महिमा अनुपम्य जाण । सद्गुरुरूपें संत सज्जनपूर्ण । स्वामीकार्तिक उपमानिले ॥ १४ ॥ प्रथम संत सज्जन देखिले । मग सद्गुरुपदीं योग जाले । सद्गुरुरूपें संत पाउले । नमस्कारिले स्वानंदें ॥ १५ ॥ सद्गुरु संतासी भेद नाहीं । सद्गुरुपदीं संत पाहीं । संत होणे दुर्लभ देहीं । देहीं विदेही सर्वदां ॥ १६ ॥ अहं ममता निशेष नाहीं । देहीं देहभाव नुरे कांहीं । जनीं असोनि निरंजन पाहीं । स्वस्वरूपें सर्वदां ॥ १७ ॥ स्वस्वरूपें संत मूर्ति । आत्मरूपें आत्म-

मूर्ति । मूर्ति पाहतां केवळ अमूर्ति । सद्गुरुपदीं सर्वदां ॥ १८ ॥ एवं सद्गुरुरूपें संत महिमान । आतां ऐका पूर्वकथानुसंधान । अहंममता-निवृत्तिलक्षण । अहंकार निर्शन ऐका जी ॥ १९ ॥ श्रोते ह्मणती जी यथार्थ खरें । अहं ममतेचें मोठें काविरें । अहंकारनिवृत्ति होय सम्यक प्रकारें । ऐसें इतिहासद्वारें सांगा जी ॥ २० ॥ ऐका कृतायुगीं दोघे ब्राह्मण । वशिष्ठ विश्वामित्र अभिमानी पूर्ण । ज्याचेनि तेजें संतप्त त्रिभुवन । प्रति सूर्य गगनीं तपताती ॥ २१ ॥ दोघे होऊनि अति थोर पक्षी । युद्ध करिती अंतरिक्षीं । मी थोर मी थोर याचि पक्षीं । पक्षपात पृथ्वीवरि ॥ २२ ॥ चंद्र सूर्य तारांगणें । पक्षवातें चळती त्राणें । अढळ ध्रुवपद तया भेणें । ढळों पाहे बहुधा हो ॥ २३ ॥ भूमि च तों लागल्या तारा । धुधाट पक्षें अखंड वारा । खेचरां भूचरां चराचरां[1] । भय कल्पांत वाटतसे ॥ २४ ॥ उड्डाणें घेती चुंचुमारें । भूमिवरीं वृष्टि होते रुधिरें । कर्कश घोष नभांतरें । नाना उत्पात सृष्टी-वरी ॥२५॥ पक्ष तुटती सामर्थ्यें निघती । तामस विग्रही क्रोधमूर्ति । कोपले कोपें प्रळय मूर्ति । काळाग्नि काळरुद्राग्नि ॥ २६ ॥ हलकालोळ पक्षपातें । पर्वत उडती घोर घातें । सप्त द्वीपें दडपलीं निघातें । सप्त-सिंधु आंदोळले ॥ २७ ॥ रक्ष रक्ष जी भगवान । कोण ऋषीचा साभिमान । कोण करील निराभिमान । देवें चतुरानन आज्ञापिले ॥ २८ ॥ श्री भगवान प्रार्थिले ब्रह्मदेवें । आपण स्वामी तेथवरि यावें । पुत्रांसी[2] सत्पदीं बैसवावें । सत्व भूमिका देऊनियां ॥ २९ ॥ प्रस्थान करिती हरिहरमूर्ति । पुढें धाडिले वेद-मूर्ति । जयापासूनि सृष्टि उत्पत्ति । वेदशास्त्रें पुराणें ॥ ३० ॥ ब्रह्मदेव पुढें आले । वशिष्ठ विश्वामित्र डोळां देखिले । येकेक पक्षी महा भले । दाहा दाहा सहस्र योजनें ॥ ३१ ॥ अश्चिर्य करी आदि-देव । पक्षी नोळखती ब्रह्मदेव । येक्या मुहूर्तें आले चेवें । पूर्वज देव

---

१ ‘ जळचरां ’ असा पाठ दुसऱ्या पोथींत आहे. २ वासिष्ठऋषि ब्रह्मदेवाचा पुत्र. ३ तमोगुणांतून त्यास काढून. ४ ब्रह्मदेव. ५ शुद्धीवर.

नमस्कारिले ॥ ३२ ॥ पक्षी पुढें बोलते जाले । अहंकार तमें उभे ठाकले । ब्रह्मदेव बोध करिती भले । श्रोतीं श्रवण करावें ॥ ३३ ॥ बापा काय रे हें करितां तुह्मी । लीन व्हारे परब्रह्मीं । कैचें परब्रह्म आम्ही । जीव जगदीश्वराचे ॥ ३४ ॥ बरें ईश्वर स्वरूप तुह्मी पाहाणें । ईश्वरेंचि हें युद्ध करणें । आतां न्यूनाधिक कधीं होणें । कल्पांत अवधि युद्धाची ॥ ३५ ॥ आपुला कल्पांत करूनि सुखें । स्वरूपीं राहा रे स्वात्मसुखें । स्वरूपीं राहातां आम्हासी दुःखें । अहंपण आमुचें जाईल ॥ ३६ ॥ अहंपणाची काय गोडी । युद्ध करूं कल्प कोडी । अरे काळ कल्पांत सकळांसी झोडी । महा काळ आम्ही होउनि जी ॥३७॥ सर्वेश्वर येक महाकाळ । उत्पत्ति स्थिति प्रळयकाळ । काय रजतमें बरळतां बरळ । सत्व मूर्ति अवलोकणें ॥ ३८ ॥ सत्वमूर्ति शुद्ध सत्व मूर्त्ति । हरिहरमूर्ति आदिमूर्ति । तुम्हासाठीं पुण्यकीर्ति । देव दर्शना पातले ॥ ३९ ॥ एवं वशिष्ट विश्वामित्र बोधिले । आदिपुरुष लक्षूनि ठेले । तव कोटि चंद्र गगनीं प्रकाशले । ब्रह्मगोळीं ते काळीं ॥ ४० ॥ तेजें व्यापिल्या दशादिशा । अनुपम्य उदेली महद्दशा । वशिष्ट विश्वामित्रें अंतर्दशा । पक्षी देह विसर्जिले ॥ ४१ ॥ तव गरुडवहन नंदिवहन । शिवगण विष्णु पार्षदगण । त्रिदश कोटी देव गण । गगन गर्भीं देखिले ॥ ४२ ॥ मुनिचरणा लागले आनंदें । आलंगिले परमानंदें । आत्मारामीं सुख स्वानंदें । आदिपुरुष देखती ॥ ४३ ॥ मुकुट[2]धर जटाधर । किरीटिधर चंद्रशेखर । पितांबरधर चर्मांबरधर । सुधाधर विषकंठी ॥ ४४ ॥ मकरकुंडलें सर्पकुंडलें । उत्तरी सर्पोपवीत वोढिलें । केयूरें[3] कीर्तिमुखें दशांगुळें । पन्नगांचीं रत्नाचीं ॥ ४५ ॥ गंधलेपन भस्मलेपन । शांतलोचन प्रशांतलोचन । अर्धोन्मीलित सौम्यलोचन । भाळलोचन त्रिपुरारी ॥ ४६ ॥ रत्नमाळी मुंडमाळी ।

---

१ कोटी कल्प होईपर्यंत. या ओव्यांत ब्रह्मदेव आणि पक्षी यांचा संवाद आहे.
२ यां पैकीं कांहीं विशेषणें विष्णूचीं आणि कांहीं शंकराचीं आहेत. ३ बाहुभूषणें.

विश्वपाळी देवकपाळी । सिंधुबाळी[1] शैल्यबाळी[2] । रमा उमा वामांगीं ॥ ४७ ॥ सुमनहारी[3] वासुंगीहारी[4] । आजानुबाहो असुरापहारी । चक्रधारी त्रिशूळधारी । शंखधारी डमरुकर ॥ ४८ ॥ चतुर्भुज चतुर्भुज । विश्वबीज विश्वबीज । वरदराज वरदराज । वरदायक उपासकां ॥४९॥ दिव्यपादुका सिद्धपादुका । पांई शोभल्या सौख्यदायका । विश्वव्यापका-जगन्नायका । चित्त देखोनि आनंदलें ॥ ५० ॥ कर्पूरगौर[5] घनःशाम[6] । दोन्हीरूपें आत्माराम । आदिपुरुष स्वानंदधाम । चित्त देखोनि निवालें ॥ ५१ ॥ हरिहरांचें ऐक्य दर्शन । उभाचि[7] विराला अभिमान । ह्मणे काय पडिलें दुष्ट स्वप्न । पक्षिदेह घेतले ॥ ५२ ॥ ऐक्यरूपें ऐक्य जाले । आत्माराम लक्षुनि ठेले । समूळ द्वैत विसरले । ब्रह्मदेव उपदेशें ॥ ५३ ॥ आत्मारामीं ध्यान धरिलें । अहंपण निःशेष गेलें । सच्चिदघनीं मन निवालें । अहंकार निवृत्ति ॥ ५४ ॥ ब्रह्मीं ब्रह्मांश ब्राह्मण जाले । ब्रह्माकार होऊनि ठेले । वशिष्ठ विश्वामित्र भेटले । चरणा लागले विधीच्या[8] ॥ ५५ ॥ एवं विधीच्या[9] जो चरणा लागे । तो अविधि कदां वर्तों न लागे । धन्य धन्य जो स्वरूपीं जागे । सायोज्य मागे देवासी ॥ ५६ ॥ देवा देवपण सद्गुरुकरितां । संता संतपण सद्गुरुकरितां । जीवासी शिवपण सद्गुरुकरितां । शिवासी ब्रह्मपण सद्गुरुचेनी ॥ ५७ ॥ सद्गुरुचेनि कृपालेशें । अहंकार निवृत्ति निःशेषें । वशिष्ठ विश्वामित्र संतोषें । जगदोद्धार करावया ॥५८॥ जगदोद्धार संतीं केले । द्वंद्व सांडूनि निर्द्वंद्व ठेले । ऐकोनि श्रोते तद्रूप जाले । निवृत्तिबोधीं परमार्थी ॥ ५९ ॥ कोण्ही राहिले पुरुषार्थी । प्रार्थिते जाहाले श्रवणार्थी । अहं ममता निवृत्त्यर्थी । कथन अपूर्व

---

१ सागराची कन्या लक्ष्मी. २ पार्वती. ३ वनमाला धारण करणारा. ४ सर्पांचा हार घालणारा. ५ शंकर, गोरा. ६ विष्णु, काळा. ७ जागच्या जागीं. ८ ब्रह्मदेवाच्या. ९ विधि शब्दावर कोटी केली आहे. जो विधीचे ह्मणजे ब्रह्मदेवाचे पक्षीं शास्त्रविहित मार्गाचे भजनीं लागेल तो अविधीनें ह्मणजे अनुचित. मार्गानें जाणार नाहीं.

सांगाजी ॥ ६० ॥ वशिष्ठ कौशिक निर्द्वंद्व जाहाले । आह्मासी द्वंद्वीं ठेऊनि गेले । देहपाशबंधनी जीव बांधले । शुकनाळिकान्यायें[1] जी ॥ ६१ ॥ अहं ममता नसतीच माथां । मर्कट मुष्टी सांपडे सर्वथा । विषयपंचकें[2] बांधिले तत्त्वता । मृग गज पतंग मीन भृंग ॥ ६२ ॥ आतां अहंममतानिवृत्तिलक्षणी । ऐकाजी इतिहास रामायणीं । संत साधु परिसती श्रवणीं । श्रोते वक्ते स्वानंदें ॥ ६३ ॥ अहं ममता ह्मणजे जाणा । मी माझें ऐसी भावना । मी कोण माझें काय मना । आणिलें पाहिजे ॥६४॥ मी जीव माझें वैभव । मी सुंदर माझें गौरव । धन संपत्ति संतति हांव । ब्रह्मांडातें कवटाळी ॥ ६५ ॥ मी ज्ञाता माझी मान्यता । मी तपस्वी माझी उग्रता । मी सुशीळ माझी शुचिर्भूतता । लोकांसी नये ॥ ६६ ॥ मी विद्यावंत माझी प्रतिष्ठा । मी प्रतिसृष्टीचा स्रष्टा । म्या बहुतांची अप्रतिष्ठा । केली ह्मणे अभिमानी ॥६७॥ विश्वामित्र गोत्र माझें । मज जाणिजे वशिष्ठराजें । नाना अभिमानी फुंजे । अहं ममता दुर्बुद्धि ॥ ६८ ॥ सर्प वांकडेतिकडे चालती । बिळीं सरळचि प्रवेशती । तैसे अहंकार नाना विकार करिती । आत्मसदनीं येती सरळेचि ॥ ६९ ॥ किती दिवस अहंबुद्धि । घ्यावी आतां आत्मशुद्धि । रावण ज्ञाता दुसरा[3] विधि । खंडें केलीं श्रुतीचीं ॥ ७० ॥ ह्मणे चंद्र मजवरी छत्रधरी । सूर्य माझे तिष्ठे[4] द्वारीं । वरुण वायो अधिकारी । झाडी फेडी करावयाचे ॥ ७१ ॥ पुरंदर[5] तो सुमनदामिक[6] । रजक[7] माझा मुख्य पावक[8] । शतक्रतु ज्याचेनि सम्यक । होमहवनें त्रिभुवनीं ॥७२॥

---

१ दोरींत नळी घालून शेतावर बांधली असतां तीवर बसल्यानें पोपट खालीं डोकें वर पाय असा होतो, पण नळी सोडीत नाहीं; त्याला उडतां येत असूनही मोहामुळें तो तसा च रहातो आणि घाबरतो. वास्तविक त्याला कोणी बांधलेलें नसतें. ती च स्थिति जीवाच्या बंधनाची आहे. २ पांच ज्ञानेंद्रियाचे पांच विषय रूप, रस, गंध, शब्द आणि स्पर्श यांच्या नादीं लागल्यानें अनुक्रमें पतंग भृंग, हरिण, मासा आणि हत्ती यांचा नाश होतो असें नित्य उदाहरण देण्यांत येतें. ३ ब्रह्मदेवापासून वेद झाले, त्यांचें ज्ञान असल्यामुळें रावणानें त्यांची खडें केलीं, तेव्हां तो प्रतिब्रह्मदेवच होय ४ प्रकाश पाडण्यासाठीं. ५ इंद्र. ६ माळी. ७ धोबी. ८ अग्नि.

त्रिदेश[1] माझे बंदिशाळे। ह्मणोन करी नाना चाळे। कुटिल कपटी जनक बाळे। लंकेसी घेऊनि गेलासे ॥ ७३ ॥ बरें रावणें स्वहित केलें। समर्थेसी वैर धरिलें। मी माझें समुळ गेलें। सर्वही जालें रामार्पण ॥ ७४ ॥ ह्मणे भवसिंधु तरेल कोण। तेथें तरले पाषाण। सुंदर माझें अशोकवन। शोक उत्पन्न तेथें ही ॥ ७५ ॥ अक्षया माझा आयुष्मंत। त्यासी क्षय करी हनुमंत। सुवेळा[2] माझी हे निभ्रांत। तेथें ठाणें रामाचें ॥ ७६ ॥ माझी अमरापुरी अजिंक। तेथें वेंघलें[3] कपिकटक। असुर माझे सुरवर त्रासक। त्यासी त्रासक वानर हे ॥ ७७ ॥ त्रिशिरा माझा त्रिभुवन जिंकी। त्यासी वानर ॠषभ[4] जिंकी। कुंभकर्ण माझा बळसागर कीं। अगस्तिराम[5] आचमन हें ॥ ७८ ॥ अतिकाया माझा चंड काया। त्यासी मारी सौमित्र बळिया। इंद्रजित माझा पराक्रमिया। त्यासिही मारी लक्ष्मण ॥ ७९ ॥ अहिमहि माझे मित्र बंधु। त्यासी मारी प्रतापसिंधु[6]। ह्मणे करीन लक्ष्मणवधु[7]। तात्काळ उठवी द्रोणाचळ ॥ ८० ॥ मी होम करीन वाममार्गें। तों वानर भंगिती गगनमार्गें। रणांगणीं माझीं दैत्यदुर्गें। समर्थें भग्नें पाडिलीं ॥ ८१ ॥ माझी गगन भरोनि शरसुटी। क्षणार्धें तोडी रामजेठी। माझी शिरोत्पत्ति मोटी। श्रीराम फोडी कुपिका[8] ॥ ८२ ॥ जें जें मी माझें भाविलें। तितुकें पूर्व पक्षवारीं गेलें। शास्त्रज्ञासी कळों आलें। अहं ममता निरूपण ॥ ८३ ॥ पूर्व पक्ष जाला रावणाचा। सिद्धांत राम उरला साचा। मी माझें अहं ममतेचा। राम जाला चहूंकडे ॥८४॥ वाम सव्य मागें पुढें। रथ सारथी राम पुढें। गगन भरूनि रामें रोकडें। स्वरूप दाविलें सर्वत्र ॥८५॥ गगनसदृश राम जाला। पूर्व पक्ष अवघा

---

१ देव. २ लंकेतील त्रिकूटनामकपर्वत. ३ ओलांडून आलें. ४ अस्वल. ५ पणं त्या रामरूप अगस्तीनें त्या समुद्राचें आचमन केलें. ६ पराक्रमाचा सागर असा राम. ७ वध. ८ अमृताची कुपि. ९ माया हा पूर्वपक्ष आणि ब्रह्म हा सिद्धांत; ज्याप्रमाणें पूर्वपक्षाचें खंडन होऊन सिद्धांत स्थापन होतो, त्याप्रमाणें अहंकाराचा पूर्वपक्ष खंडित होऊन गेला, आणि रामरूप सिद्धांत उरला.

उडाला । खं ब्रह्म राम देखता जाला । खंडें केलीं वेदाचीं ॥८६॥ वेद शास्त्र मिथ्या नव्हे । पढत मूर्ख जरी आहे । श्रीराम त्यास भेटताहे । ईश्वरी कृपा रावणा ॥ ८७ ॥ अहं ममता निमोनि गेली । अंतर स्थिति राम जाली । मी जीव ऐसी शुद्धि[2] उडाली । अहं आत्मा निर्धारें ॥ ८८ ॥ अहं आत्मा आत्माराम । अहं[3] सोहं साक्षनि नेम । राम रावण ऐक्य वर्म । संत सज्जन जाणति ॥ ८९ ॥ अहं रावण उभा केला । अर्थ परमार्थी आणिला । जय विजय रावण गेला । वैकुंठ भुवना निश्चयें ॥ ९० ॥ सद्गुरु कृपेचेनि बळें । वैकुंठ गिळिलें सगळें । चतुर्विधा मुक्ति साक्षनि केवळें । बद्ध ना मुक्त स्वरूपीं ॥९१॥ कोणासी सांगों अध्यात्मज्ञान । जाणती संत सुलक्षण । अहं ममता निवृत्ति कथन । आत्मारामें संपविलें ॥ ९२ ॥ आत्माराम निरंजनी । अहंममतावृत्ति निवृत्तिवेणी । अध्यात्म विद्या अध्यात्म श्रवणीं । संत खुणेसी बाणती ॥ ९३ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । अहंममतानिवृत्तिनाम । समास सप्तम बोलिला ॥ ९४ ॥ समास ॥७॥

## श्रीरामकर्ता

जय जया जी मनमयोरस्वामी । जय जया जी श्रीगुरुस्वामी । जय जया जी समर्थ स्वामी । भक्तियोगें निवृत्ति सांगावी ॥ १ ॥ गजाननास तुमची बुद्धि । कुमारें[4] राहिला आत्मबुद्धि । दासी जयाच्या रिद्धि सिद्धि । सिद्धिविनायक निर्धारें ॥ २ ॥ सिद्धिविनायक सच्चिदानंद घन । त्याहूनि भिन्न तुह्मी निरंजन । तत्व-मसि त्रिपुटी क्षीण । निर्गुण ब्रह्म शाश्वत ॥ ३ ॥ हरिसंकल्प जग-दीश्वर । प्रकृतिपुरुष परमेश्वर । अष्टधा प्रकृति चराचर । पिंड ब्रह्मांडें निर्मिलीं ॥ ४ ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायक । नकळे तयाचा निश्चयो

---

१ याचा कर्ता रावण. २ भान. ३ देह अहंकार रावण निवटोनी इ० माधवदासकृत रामाचें आरतींत हे च रूपक केलें आहे. ४ कार्तिकेय.

येक । तयासी पावावया श्रवण[1] विवेक । सद्गुरुदेवें सांगीतला ॥ ५ ॥ सद्गुरु ब्रह्म निरंजन । वस्तु निर्गुण पुरातन । निर्मळ निश्चळ जैसें गगन । शुद्धबुद्ध सर्वातीत ॥ ६ ॥ गुरुत्व आलें ईश्वरासी । ईश्वर व्यापक सर्व जीवांसी । जगदोद्धार करणें त्यासी । नाना अवतार धरूनियां ॥ ७ ॥ आदिपुरुष त्रैलोक्यनायक । त्याचा करावया स्वरूपविवेक । भक्तिमार्ग हा अलौलिक । समर्थ ग्रंथीं निरोपिला ॥ ८ ॥ निरोपिलें नवविधा भजन । भक्तिमार्गें होइजे पावन । मुख्य परमात्मा आपण । सायोज्य देतो भक्तांसी ॥ ९ ॥ सायोज्य ह्मणजे निवृत्ति । निवृत्ति ह्मणजे अनन्य भक्ति । भक्तीविण तों विश्रांति । त्रैलोक्यीं ही दिसेना ॥ १० ॥ आतां श्रोतीं व्हावें सावधान । ऐका भक्तियोगें आत्मदर्शन । आत्मारामें निजस्वरूप आपण । कौसल्ये माते दाखविलें ॥ ११ ॥ सद्भक्ति माता कौसल्या । श्रीराम उदरीं प्रगटला । आत्माराम व्यापूनि ठेला । अनंत कोटि ब्रह्मांडें ॥ १२ ॥ दिव्यभुवनीं कौसल्या जननी । बैसलीसे विष्णुपूजनीं । तंव भुवननाथ अकस्मात सदनीं । आत्माराम पातला ॥ १३ ॥ कौसल्येचें हरिमंदिर कैसें । सकळ सुखाचें स्थान जैसें । अमरसदना[3] लावी पिसें । अमर येती दर्शना ॥ १४ ॥ कोटिकंदर्पजित[4] घन:शाम । तडित्प्रभा[5] श्रीसीताभिराम । भवभवानीहृदयविश्राम[6] । योगमाये जवळिके ॥ १५ ॥ मुकुट किरीटि मस्तकीं साजे । केशर कस्तुरी तिलक विराजे । सुरंग रत्नाक्षता झळकती तेजें । ऊर्ध्व पुंडें[7] श्रीभाळीं ॥ १६ ॥ चंपक तैलाभ्यंगीं कुरळ[8] । कुटिलालकं सुनीळ सरळ । बीरगुंठी[9] बांधले निर्मळ । चांचर[10] दिसती बाहेरी ॥ १७ ॥ सुमनें गुंफिलीं पिवळीं । अळिकुळ[11] गुंजारवें शोभलीं । किरीटि झळाळे कपोळीं । मुख निर्मासुरें[12] बरवंट

१ श्रवणरूप भक्ति. २ श्रीमद्दासबोधाच्या चवथ्या दशकांत. ३ स्वर्गाला, स्वर्गांतील देवांना. ४ कोटि मदनांच्या स्वरूपाला फिकें पाडणारा. ५ विद्युल्लतेप्रमाणें तेजस्वी. ६ शंकरपार्वतीचें आरामस्थान. ७ कपाळावरील गंधाच्या तिलकावर. ८ कुरळे केंस. ९ एक प्रकारच्या गांठीनें १० टोकें. ११ भुंगा. १२ नेमस्त; कोरिल्याप्रमाणें.

॥ १८ ॥ समता भृकुटी च्यापाकृती । कमळनयन[1] कर्ण स्पर्शती । मकरकुंडलें कर्णीं झळकती । गंडस्थळीं झळाळ ॥ १९ ॥ त्रैलोक्य बीकें[2] नासिकीं आलें । कोटिचंद्र वदनीं निंबलोण केलें । अधर सुरंग मंदहास्य भलें । दंत हिरकणी झळकले ॥ २० ॥ कंबु[3]कंठीं कंठमाळा । नानारत्नीं फांकती किळा[4] । कौस्तुभ पदक हृदयकमळा । यज्ञोपवीत सुदक्षणे[5] ॥ २१ ॥ आजानुबाहो बाहुभूषणें । केयूरें कीर्तिमुखें[6] शोभलीं गुणें । पोंवँचि[7] मुद्रिका वीर कंकणें । आंगोळिकें[8] दाटलीं ॥२२॥ विशाळ वक्षस्थळ उदरीं त्रिवळी[9] । ब्रह्मा जन्मला नाभिकमळीं । कटिसूत्र मेखळा कास कासिली । पीतांबरें रविकिरणें ॥ २३ ॥ क्षुद्र[10] घंटिका किंकीणी गजरें । जानु[11]जंघ गुप्त दिव्यांबरें । वांकी तोडर अंदु[12] नूपुरें । ब्रीदें[13] पाईं विराजलीं ॥२४॥ सुनीळ घोंटीं नखचंद्र मेळावा । बाळार्कें[14] टांचे अरुण तळवां । येकवीस चिन्हें सामुद्रिकीं थांवें[15] । ध्वज वज्र अंकुश पद्मरेखा ॥ २५ ॥ सुगंध उटी सुमनगंधमाळा । दुर्वादळ तनु वैजयंती गळां । भ्रमर गुंजारव करिती मेळा । धूंसर[16] आंगीं उधळलें ॥ २६ ॥ उत्तरीवस्त्र[17] बाहेळ[18] कोदंडबाण हातीं । अवतंस तुरे कर्णीं पुंजाळती । खचित[19] पादुका पाईं झळकती । मंदिर तेजें डवरलें ॥ २७ ॥ ऐसा देखिला स्वानंदघन । आदि पुरुष पुरातन । मनमोहन राजीवनयन । जानकीजीवन सर्वात्मा ॥ २८ ॥ मातेपुढें विष्णुप्रतिमा । इंद्रनीळाची अति उत्तमा । अश्चिर्य वाटलें आत्मयारामा । नवल प्रेमा भक्तीचा ॥२९॥ मातेसी केलें भावें नमन । हेंणे[20] अनंत कल्पें कल्याण ।

---

१ कमलासारखे नेत्र कानापर्यंत पोंचत होते. २ तेज. ३ कंबु म्हणजे शंख. शंखाच्या रेषांप्रमाणें ज्यावर रेषा आहेत असा कंठ भाग्याचें लक्षण आहे. ४ तेज . ५ उजव्या बाजूला. ६ ज्यावर दैत्यमर्दनासारखें कांहीं चित्र कोरलें आहे असा पदकासारखा अलंकार. ७ मनगटावरील एक अलंकार, पोंवची. ८ अंगठ्या. ९ बेंबीच्या वर असलेल्या पोटावरील तीन वळ्या. १० घागऱ्या. ११ गुढगा व मांडी यांना झांकणारें. १२ सांखळ्या. १३ फिती. १४ प्रातःकाळचा सूर्य. १५ लाभचिन्हें. १६ बुका, कस्तूरी वगैरे. १७ शेला. १८ खांद्यावरून टाकलेला सोगा. १९ रत्नजडित. २० कौसल्या म्हणे.

वत्सा बैसें तूं देवार्चन । पाहें माझें आवडीं ॥ ३० ॥ जनकनंदनी[1] सेवेमध्यें । अभिनव करी मनामध्यें । तव रामें पुसिलें परम प्रबुद्धें । निजात्मबोध व्हावया ॥३१॥ माये कोणाचें करिसी पूजन । वत्सा करितें विष्णुअर्चन । विष्णु महाविष्णु व्यापक लक्षण । कळलें तुजला जननि ये । ऐकोनि बोध चमत्कारली माया । तात्काळ लागली श्रीरामपायां । ह्मणे माझ्या सद्गुरुराया । माहाविष्णुत्व प्रकट करीं ॥ ३३ ॥ आजि आन सारिखें तुझें रूप । दिसों लागे बाहें स्वरूप । अवतारकाळींचें आदिपुरुषरूप । तें चि नेणों प्रगटिलें ॥ ३४ ॥ वशिष्ठ स्वामी ग्रहस्वा[2]मी । संवाद करिती स्वानंदधामीं । प्रकृतिदेह[3] साशंकित आह्मी । भर्तार गुरुतें पुसावया ॥ ३५ ॥ आतां निजगुज सांगोनि देईं । सायोज्य स्वरूपीं स्वयें नेईं । सद्गुरुरूपें तूं राघवे आई । वंचनार्थ कांहीं करूं नको ॥ ३६ ॥ सुमित्रा कैकेयी पातिव्रत्यें । असोतु सुखें स्वधर्म सत्यें । मज तों तुज ऐसीं अवतारें अपत्यें । स्वरूपधर्में जोडलीं ॥ ३७ ॥ वाटसी मूळमायेचा जनक । मायासंभ्रमें ह्मणतसें मी बाळक । आदिपुरुष तूं सीतानायक । श्री गुरुनायक निर्धारें ॥३८॥ ऐकोनि संतोषला पुरुषोत्तम । ह्मणे पुत्रत्व सोडी माता परम । दाखवणें लागलें निजरूपवर्म । निर्गुण सायोज्य पावावया ॥ ३९ ॥ ऐक माते सायोज्यप्राप्तिसी त्रिविध साधन । कर्मयोग ज्ञानयोग भक्तियोग जाण । भक्तियोगीं शुद्ध शबल त्रिविध लक्षण । राजस तामस सात्विकी ॥ ४० ॥ शुद्धसत्वें अभेददर्शन । पिंडब्रह्मांडदृश्यनिरशन । गगन सदृश परब्रह्म पावन । कपिलें पूर्वीं दाखविलें जननीप्रति ॥ ४१ ॥[4] तेंचि स्वरूप दाखवितों तुज प्रति । दिव्य चक्षु घेईं निगुति । मस्तकीं हस्तक सीतापति । ठेविता जाला जगद्गुरु ॥ ४२ ॥ आतां पाहें ह्मणे

---

१ या ठिकाणीं कौसल्या असें पाहिजेसें वाटतें. २ दशरथ राजा. ३ प्रकृति काय देह काय याविषयीं मला कांहीं शंका आली तर पति व गुरु यांना विचारून तिचें निरसन करून घ्यावयाला भीड वाटते, ह्मणून रामा तूंच आतां तें गुह्य मला सांग. ४ भागवत स्कंद ३ अ० ३०–३३ यांत ही कथा सांगितली आहे.

वो निजरूप आपुलें । तव एकसरें रामें त्रिभुवन व्यापिलें । महा विष्णुत्व प्रगट केलें । व्यापक मुद्रा अगोचरी ॥ ४३ ॥ स्वर्ग मृत्यु पाताळीं । राम दिसे तिहीं ताळीं । आत्माराम व्यापक सकळीं । देखती जाली कौसल्या ॥ ४४ ॥ सप्तद्वीपें सप्तसिंधु वेढे । ब्रह्मांडा भोंवते आवर्ण[1] वेढे । आवर्णा परते शून्य गर्भ वेढे । व्यापूनि राहिलें[2] श्रीराम ॥ ४५ ॥ अनंत ब्रह्मांडमणिमाळा । चिद्विलास माया प्रपंच-लीळा । स्थावरजंगम व्यापूनि सकळा । भरूनि उरला सर्वत्र ॥ ४६ ॥ पृथ्व्वादि भूतें शून्य गर्भें । विराटें दिसती गगन गर्भें । उदंड दाटलीं हिरण्यगर्भें । आत्माराम स्वरूपीं ॥ ४७ ॥ अनंत युगें अनंत व्यव-हार । अनंत माया अनंत संहार । अनंताचा अनंत पसर । रामरूपिं देखतसे ॥ ४८ ॥ अनंत युगाची मांडणी । अनंत अवतार अनंत करणी । भूत भविष्य वर्तमान गुणी । गुणी त्रिगुणी व्यापक ॥ ४९॥ सांख्य वेदांत न्याय वाद । पांच रात्र्यादि शैव शाक्त भेद । पातंजळि योग प्रसिद्ध । पाणिनि शब्द होताती ॥ ५० ॥ कर्मवादी ब्रह्मवादी आत्मवादी शून्यवादीं । द्वैतवादी अद्वैतवादी । आत्मारामीं देखतसे ॥ ५१ ॥ रज्जु सर्प माया भास । मरीचें[3] मृगांबें[4] दृश्यभास । विवर्त परिणाम शास्त्राभ्यास । ब्रह्मांड कोशीं देखतसे ॥ ५२ ॥ अनंत ब्रह्मांडीं अनंत रचना । आणितां नयेचि अनुमाना । पाहातां पाहाणें हारपे मना । मना मनपण श्रीरामें ॥ ५३ ॥ जिकडे जिकडे मन हें जाये । जिकडे तिकडे रामचि होय । आली वाट विसरूनि राहे । रामें सर्वत्र व्यापिलें ॥ ५४ ॥ अनंत तीर्थें अनंत क्षत्रें । अनंत पात्रें संतसत्पात्रें । अनं-ताचीं अनंत चरित्रें । देखती जाली कौसल्या ॥ ५५ ॥ अनंत खाणी अनंत वाणी । अनंत योनी अनंत प्राणी । अनंत ब्रह्मांडाच्या खाणी । आत्मारामीं देखतसे ॥ ५६ ॥ रोमरंध्रीं अनंत ब्रह्मांडें । अणु सारिखीं

---

१ आवरण, वेष्टण. २ श्रीमद्भगवद्गीतेंतील विराटस्वरूपदर्शनासारखेंच येथून ५८ व्या ओंवीपर्यंत वर्णिलेलें विराट स्वरूप आहे. ३ सूर्यकिरण. ४ मृगांबु, मृगजळ. रखरखित मैदानांत सूर्यकिरणामुळें दिसणारा खोटा पाण्याचा देखावा.

उडती उदंडें । स्वप्रकाश दिसती प्रचंडें । आत्माराम स्वरूपीं ॥ ५७ ॥ गगनावकाश रामीं नु पुरे । गगन भरूनि राम चि उरे । आदिपुरुषा पाहाणें पुरे । मी तूं नुरे तवरूपीं ॥ ५८ ॥ मज मी स्मरेनासें जालें । माझें मीपण रामीं गेलें । तव आत्मारामें सांभाळिलें । पूर्व[1] भूमिका दाविली ॥ ५९ ॥ तव सगुण सावळा कोदंडपाणि[2] । पुढें देखिला लावण्यखाणी । भक्तिमाता विष्णु अर्चनीं । पुष्पांजुळी घेउनियां ॥ ६० ॥ श्रीराम चरणीं लागली माया । ह्मणे माझ्या श्रीसद्गुरुराया । नवल तुझें रूप सखया । महाविष्णु सनातना ॥ ६१ ॥ तुज पुत्ररूपें मी गुरुत्व भावीं । निजरूप तुझें राहो जीवीं । जीवीं जीवपण कांहीं न ठेवीं । आत्माराम तूं माझा ॥ ६२ ॥ आतां सायोज्य मुक्तिसी कोण जाय । आत्मारामीं आत्मतन्मय । हें सुख कोण्ही अनुभविये । तें सुख लाधो त्यालागीं ॥ ६३ ॥ तथास्तु ह्मणे आत्माराम । कौसल्येचा पूर्णकाम । कोटिकंदर्प स्वानंदधाम । सद्गुरुरूपें पूजिला हो ॥ ६४ ॥ एवं कौसल्येचें समाधान । श्रीराम पंगती तीर्थ भोजन । संत प्रसादें लाभले जाण । शंकर सांगे गौरीप्रति ॥ ६५ ॥ ब्रह्मदेव सांगे नारदासी । नारद सांगे व्यासमुनीसी । व्यास सांगे सूतासी । सूत सांगे ॠषी[3] जनीं ॥ ६६ ॥ ब्रह्मांडपुराणीं उत्तरखंडीं । अध्यात्म रामायण उदंडीं । संत सज्जन अखंडीं । आत्मारामीं निमग्न ॥ ६७ ॥ ऐसें सद्गुरुनाथें सांगीतलें । सद्गुरुकृपें अनुभवा आलें । अनुभव कमळपाईं ठेविलें । शिष्य ब्रह्म संपन्न ॥ ६८ ॥ संत सज्जन विद्वजन । ऐकती अध्यात्म रामायण । निवृत्तिरामीं[4] कौसल्या लीन । निवृत्तिवेणी ह्मणताहे ॥ ६९ ॥ तव शिष्य ह्मणती जी सद्गुरु स्वामी । कौसल्या प्रविष्ठ आत्मारामीं । आह्मी भक्तियोगें पावों निवृत्तिधामीं । ऐसें देवें करावें ॥ ७० ॥ भक्तियोगें आत्माराम । पावोनि लाधो स्वानंदधाम ।

---

१ पूर्वीचें लहान लौकिक स्वरूप. २ धनुष्य धारण करणारा. ३ शौनकादिक ॠषींना. ४ निवृत्तिराम हेंच अध्यात्मरामायण. तो ऐकून निवृत्तिवेणी (गिरिधर) कौसल्येप्रमाणें लीन झाला.

प्रवृत्तिमार्गें निवृत्तिवर्म । सद्गुरुनाथें विवरावें ॥ ७१ ॥ आतां भक्तियोगें कैसी निवृत्ति । स्वामी सांगताती शिष्याप्रति । आर्त[2] देखोनि श्रोतयांप्रति । वक्ता वदे गुरुआज्ञा[3] ॥ ७२ ॥ प्रथम[4] श्रवणभक्ति निवृत्तिलक्षण । श्रवण शब्दगुण आकाशीचा जाण । आकाश अंतरात्मा देव सगुण । पुढें निर्गुण सहज चि ॥ ७३ ॥ निर्गुण ब्रह्मीं श्रवण भक्ति । भक्तिमध्यें कैची विभक्ति[5] । श्रवणमननें मना आर्तुती[6] । स्वरूपस्थिति बाणली ॥ ७४ ॥ बाणल्या अद्वैत स्वरूप ज्ञान । सुखें करावें सगुण श्रवण । चळों नेदिजे निवृत्तिलक्षण । परिक्षिति[7] पावन पुराणीं[8] ॥ ७५ ॥ ऐका कीर्तन भक्ति निवृत्तिलक्षण । वैखरी मूळ परावाचा आपण । वाचातीत निरंजन । मन उन्मन निवृत्ति ॥ ७६ ॥ गुणानुवाद हरिकीर्तन । हरिसंकल्प पुरातन । संकल्पतीत निवृत्ति जाण । सहजचि जाली आत्मत्वें ॥ ७७ ॥ नारद[9] नारायण निर्धारीं । निवृत्ति कीर्तनीं ब्रह्मचारी । मिथ्या संकल्पें कल्पिली नारी[10] । विश्वरूप देखावया ॥ ७८ ॥ सांगों स्मरणभक्तीचें लक्षण । स्मरण ह्मणिजे हरि जाण । त्याचा तोची आपण । कोण कैंचा भिन्नत्वें ॥ ७९ ॥ स्मरणरूपानें स्मरण केलें । हरिस्मरणें स्मरण जालें । विष्णुनें चि विष्णुसि स्मरिलें । स्मरण मूळ हे निवृत्ति ॥ ८० ॥ स्मरणातीत परब्रह्म । स्मरणें कळे मुख्य वर्म । प्रल्हादाचें[11] चेष्टित कर्म । वृत्तीवीण पाविजे ॥८१॥ आतां पादसेवन करणें स्वामीचें । सद्गुरुपद देखिलें साचें। सद्गुरुपदीं महदादि मायेचें । मिथ्याभान उडालें ॥ ८२ ॥

---

१ हे शब्द विशेष लक्षांत ठेवण्यासारखे आहेत. प्रवृत्तींत च निवृत्तीची खूण दिसणें शक्य आहे ह्या गोष्टीला गिरिधरांसारख्या निवृत्ताची ही साक्ष आहे. २ जिज्ञासा. ३ आज्ञेनें. ४ श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं । अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् । या श्लोकांत सांगितलेल्या नऊ भक्ति आतां क्रमानें घेऊन त्यांच्या योगानें निवृत्ति कशी होते तें दाखविलें आहे. ५ भेद. ६ उत्कंठा. ७ परिक्षिति राजा श्रवण भक्तीनें पावन झाला. ८ भागवतांत. ९ नारद कीर्तन भक्तीनें पावन झाला. १० माया. ११ प्रल्हादानें स्मरण भक्तीनें निवृत्ति करून घेतली.

आपशुद्धि[1] घेतां परशुद्धि । आत्मबुद्धि होतां परमात्मबुद्धि । देहतत्व विशेनीं समाधि । पादसेवनीं तात्काळ ॥ ८३ ॥ सेव्य सेवकभाव नुरे । ज्ञान विज्ञान वृत्ति मुरे । पादसेवनीं रमा[2] माया विसरे । सर्व लावण्य देहाचें ॥ ८४ ॥ पादसेवन हें स्वामीचें । निजधाम निवृत्तिवेणीचें । असो काम नाहीं वचनाचें । निवृत्तिवेणी ह्मणोनियां[3] ॥ ८५ ॥ आतां अर्चनीं निवृत्ति कैसी । पूजा सिद्ध केली देवासी । पूजापात्रपूजकासी । भेद नाहीं आत्मत्वें ॥ ८६ ॥ देवगुरुब्राह्मणपूजन । हविर्द्रव्य भानु हुताशन[4] । सर्वात्मा तो जगजीवन । वृत्ति निवृत्ति[5] सहजचि ॥ ८७ ॥ तेणें चि त्याचें घडे अर्चन । तेथें कैंचें वेगळेपण । पृथुरायें[6] राज्य आपण । निवृत्ति अर्चनीं लाविलें ॥८८॥ ऐका वंदन भक्तियोगें निवृत्ति । वंदन ह्मणजे सुलीन वृत्ति । सुलीन वृत्तीविण वंदन भक्ति । अहंमतीस[7] घडेना ॥८९॥ निरहंकारें नमन वृत्ति । नाहीं मन तें नमनवृत्ति[8] । सकळां वंदन साहावी भक्ति । नमन निश्चिती गुरुदेवा ॥९०॥ नमन ह्मणजे आत्माराम । अमन ह्मणजे सद्गुरुनाम । सद्गुरुवंदनीं निवृत्तिधाम । अक्रूरयोगें[9] लाधलें ॥ ९१ ॥ आतां दास्य[10] सांगों निवृत्तियोगें । करूनि अकर्तुत्वें[11] प्रसंगें । निराभिमानें अंतरंगें । देह दास्यीं सर्वदां ॥९२॥ देहीं असोनि देहातीत । नित्यानित्य अखंड पाहत । सारासार विचारें राहात । देहसेवेसी निवृत्ति ॥ ९३ ॥ पिंड ब्रह्मांड अष्टदेह[12] । प्रकृति

---

१ आपली शुद्धि. २ रमा ह्मणजे लक्ष्मी पादसेवन भक्ति करून देहभाव कशी विसरून गेली हें पांचव्या समासांत मनमायानिवृत्ति सांगतानां वर्णिलें आहे. ३ पादसेवन भक्तींत बोलण्याचें कारण च पडत नाहीं ह्मणून निवृत्ति सहज च होते हा निवृत्तिवेणी गिरिधरांचा अनुभव आहे. ४ अग्नि. ५ पूज्य, पूजक, पूजा ही त्रिपुटीच ब्रह्मरूप आहे असें समजून अर्चन भक्तीनें निवृत्ति होते. ६ पृथुराजानें अर्चनभक्तीनें निवृत्ति प्राप्त करून घेतली. ७ अहंकार उरला तेथें वंदनभक्ति शक्य नाहीं. ८ नमन शब्दावर कोटि केली आहे. ९ अक्रूराची वंदनभक्ति होती. १० ‘ दास्य योगें निवृत्ति सांगे ’ असा दुसऱ्या पोथींत पाठ आहे. ११ अकर्तृत्व. १२ कांहीं ठिकाणीं दहा देहही सांगितले आहेत. समास ४ ओंवी ४ पहा.

पुरुष होती विदेह । वृत्ति निवृत्ति करूनि स्वदेह । हनुमंतें दास्यीं तत्पर ॥ ९४ ॥ आतां सख्य निरोपिलें । सख्यरूपें ऐक्य जालें । हितगुज निवेदिलें । आत्महित निजगुह्य ॥ ९५ ॥ सखा आत्मा निवृत्तिराम जाण । शत्रु अहंकार संपूर्ण । अहंकारें वेगळेपण[2] । सख्य मीपणें घडेना ॥ ९६ ॥ दास्यादि भक्ति निराभिमानें । घडल्या सख्य[3] समाधानें । सख्य भक्ति केली अर्जुनानें । तद्धामें परम पावला ॥ ९७ ॥ आतां आत्मनिवेदन भक्ति । निवेदन ह्मणिजे केवळ निवृत्ति । सोहं हंसा सारूनि निवृत्ति । सहजस्थिति स्वानंदें ॥ ९८ ॥ देह मी मन मी जीव मी माया । मायातीत ब्रह्म निर्मायीं । आत्मनिवेदनीं अष्टही काया । निरसोनी गेल्या गुरुपाईं ॥ ९९ ॥ प्रकृतिपुरुष दोघें जणें । जगदाकारें हें संपूर्णें । पिंड ब्रह्मांडेंसी पूर्णें । परिपूर्ण जालीं परब्रह्मीं ॥ १०० ॥ आपण कोण कोठें कैंचा । ब्रह्मांश ब्रह्मीं आहे साचा । वृत्ति निवृत्ति भिन्नत्वाचा । ठाव नाहीं आत्मत्वें ॥ १ ॥ आत्मत्वें आत्मनिवेदन । निवेदितां नव्हे आपण । आत्मनिवेदनीं निवृत्ति जाण । कथिलें लक्षण यथामति ॥ २ ॥ यथामति ब्रह्मस्थिति । अन्यथामति नाना दुर्वृत्ति । सद्गुरुचरणीं नवविधा भक्ति । चतुर्विधा मुक्ति सारूनियां ॥ १०३ ॥ स्वर्गसंपत्ति सारूनि बंळि । वळी देतसे पायांतळीं । ह्मणोनि संत सज्जन महाबळी । आत्मनिवेदनीं गुरुपदीं ॥ १०४ ॥ संत सर्वज्ञ कोणी ह्मणती । नवांहीं केल्या नऊ भक्ति । बहुतांसी घडल्या नवविधा भक्ति । किती ह्मणोनि

---

१ हनुमंताची दास्य भक्ति सुप्रसिद्धच आहे. देहांत राहून देहातीत कसें व्हावें हें दास्यभक्तीनेंच समजतें. २ अहंकार आहे तों सख्य होत नाहीं. ह्मणून अहंकार निरसनपूर्वक सख्य भक्तीनें निवृत्ति होते. ३ सख्य भक्ति करतांना अर्जुनाला श्रवणादि सर्व च भक्ति होऊन गेल्या. ४ तत् ह्म० परब्रह्म त्याचें धाम ह्म० स्थान. ५ तो (परमात्मा) आणि अहं (जीवात्मा) असें भिन्नत्व टाकून. ६ माया-विरहित. ७ वळीनें आत्मनिवेदनभक्तीनें निवृत्ति मिळविली. ८ परिक्षितीपासून वळीपर्यंतच्या नऊ जणांनीं.

सांगावें ॥ १०५ ॥ शुक मुक्त ऐसें वचन । येर काय पावले बंधन । सर्व जाणती विचक्षण । संत सज्जन विवेकी ॥ १०६ ॥ नवविधा भक्तिपंथें उदंड गेले । कोणी विशेषें दिसोनि आले । भक्त मुक्त देवें केले । यदर्थी संशयो नाहीं ॥ १०७ ॥ संशयासी कारण माया । बद्ध मुक्त घेते थाया । ह्मणोनि शरण सद्गुरुपाया । आत्मत्वें गेलें पाहिजे ॥ १०८ ॥ सद्गुरुकृपें ज्ञानयोगें । अज्ञान जाईल वेगें । तत्वें तत्व विभागुनि भागें । ब्रह्म अंगें होईजे ॥ १०९ ॥ ह्मणोनि थोर सद्गुरुभक्ति । सद्गुरुभजनें ज्ञानप्राप्ति । भक्तियोगें सांगीतली निवृत्ति । ज्ञानयोगें निवृत्ति पुढें ऐका ॥ ११० ॥ ज्ञानयोगें निवृत्ति कैसी । पुढें सांगितली श्रोतयासी । संत सज्जन सौख्यराशि । श्रवण करिती स्वानंदें ॥ ११ ॥ सद्गुरु चरणीं निवृत्तिवेणी । सदासर्वदां निवृत्तिग्रंथश्रवणीं । श्रवणमननें मानवी प्राणी । पावन होती निर्धारें ॥ १२ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । नवविधा भक्तियोग निवृत्ति नाम । समास अष्टम बोलिला ॥ ११३ ॥ समास ८ ॥

## श्रीरामकर्ता

जय जय सद्गुरु परतःपरा । क्षराक्षरविहीना सर्वेश्वरा । उत्तम पुरुषा निरहंकारा । निर्मळ निश्चळ निजवस्तु ॥ १ ॥ माझें जीवपण त्वंपद तुह्मी । तत्पदीं शिवपदीं नेलें स्वामी । त्वंपद तत्पद सारूनि ब्रह्मीं । असिपदीं ठेविलें स्वानंदें ॥ २ ॥ तत्पद त्वंपद असिपद । सकळ सारूनि भेदाभेद । निजात्मवस्तु अभेद । निजात्मज्ञानें अनुभविली ॥ ३ ॥ मागुती अज्ञानदशा उभी ठेली । विज्ञानदशा माझी गेली । ज्ञानयोगें निवृत्ति जाली । पाहिजे आतां गुरुकृपें ॥ ४ ॥ ह्मणोनि श्रीगुरुस्वामी करुणाघन । सांगिजे ज्ञानयोगेंनिवृत्तिलक्षण ।

---

१ इतरही नवविधा भक्तीनें मुक्त झाले आहेत त्यांत वर सांगितलेले नऊ प्रसिद्ध आहेत एवढेंच. २ स्वतःच.

ऐकोनि सद्गुरु दयाघन । काय कौतुकें अनुवादती ॥ ५ ॥ श्रीराम आत्मलिंग स्वयंज्योति । शितिकंठकंठभूषण[1] स्थिति । लिंग धारण करूनि सुरनरांप्रति । तारक ब्रह्म निरोपिलें ॥ ६ ॥ राम गुरुपद निश्चितार्थें । ब्रह्मानंदं या श्लोकार्थें । त्रिगुणरहितं गुरु गीतार्थें । गौरीलागीं उपदेशिलें ॥ ७ ॥ राम निर्गुण निरंजन । निरोपाधि जैसें गगन । तेथें उपाधि ईश्वरपण । अहंब्रह्म ह्मणोनियां ॥ ८ ॥ जीव शिव परमात्मउपाधि । ब्रह्म निर्गुण निरोपाधि । अविद्या माया मूळमाया अनादि । ऐलीकडे अष्टधा ॥९॥ पैलीकडे ब्रह्म निर्गुण । ऐलीकडे माया सगुण । आकाशपंकीं अलिप्त जाण । निर्गुण ब्रह्म सनातन हें ॥१०॥ परब्रह्म मायेसी लिप्त नोहे । माया कौतुक दाविताहे । नामरूप सर्व पाहे । मायोपाधि ईश्वरीं ॥ ११ ॥ षड्गुणसंपन्न जगदीश्वर । मायेकरितां हा आकार । माये परता निराकार । निरंजन सदोदित ॥१२॥ एवं मायोपाधि परमात्मा । मायेकरितां देवभक्त सीमा । त्याचा तोचि जीवपणें तुह्मा । ठाव नाहीं निर्धारें ॥१३॥ ब्रह्मा विष्णु आणि शंकर । चौथा आपण जगदीश्वर । तेथील अंश भक्त साचार । पंचीकर्ण भावार्थें[2] ॥ १४ ॥ प्रकृतिपुरुषाचे ठसे । आंगीं उमटती उमसे । प्रकृतिपुरुषाच्या निरासें । आत्मा निर्गुण निरंजन ॥ १५ ॥ ऐसें शंकरें निर्धारिलें । स्कंद गजाननासी सांगीतलें । ब्रह्मादिकांसि प्रतिबोधिलें । तारकब्रह्म सर्वत्र हें ॥ १६ ॥ भक्तियोगें ज्ञानयोगें । वैराग्ययोगें वीतरागें । सर्वत्यागें संगत्यागें । तारक ब्रह्म पाविजे ॥ १७ ॥ मागां जालें निरूपण । भक्तियोगें निवृत्तिलक्षण । आतां ज्ञानयोगें निवृत्तिकथन । श्रोतीं श्रवण करावें ॥१८॥ ज्ञान ह्मणिजे अद्वैतज्ञान । अद्वैतज्ञानें द्वैतदेहनिर्शन । द्वैत अद्वैत निरूपण । मायेकरितां[3] यथार्थ ॥ १९ ॥ माया ह्मणिजे पंचभूतिक । महद्भूत त्रिगुणात्मक ।

१ शंकराच्या कंठांतील भूषण. शिति (काळा) आहे कंठ ज्याचा तो शितिकंठ. २ 'वाक्यार्थीं' असा दुसऱ्या पोथींत पाठ आहे. ३ मायेमुळें द्वैत अद्वैत हे शब्द उत्पन्न होतात.

दश देह सारूनि विदेह येक । राजा जनक विदेही ॥ २० ॥ नाना लक्ष गोदानें साळंकृत । ब्रह्मविदातें देऊं पाहत । मग याज्ञवल्की संवाद होत । ह्मणे ब्रह्म ऐकें मिथिळेश्वरा ॥ २१ ॥ ब्रह्म जाणोनि[1] नेणिजे । ब्रह्म नेणोनि जाणिजे । जाणिवनेणिवे विसरिजे । मग ब्रह्म होइजे न होनियां ॥ २२ ॥ संतसाधुसज्जनवृंदें । समस्त ऐकतीं स्वानंदें । ब्रह्मनिरूपण ब्रह्मानंदें । सद्गुरुप्रसादें प्रबोधूं ॥ २३ ॥ अन्न-ब्रह्म प्राणब्रह्म । मनोब्रह्म विज्ञानब्रह्म । पंचकोशात्मक आनंदब्रह्म । सिद्धांतब्रह्म सनातन ॥ २४ ॥ शब्द ब्रह्म ओंमितिकाक्षरब्रह्म[2] । खंब्रह्म सर्वब्रह्म । चैतन्यब्रह्म सत्ताब्रह्म । साक्षीब्रह्म सिद्धांत ॥ २५ ॥ सगुण ब्रह्म निर्गुणब्रह्म । वाच्यब्रह्म अनुभवब्रह्म । आनंदब्रह्म तदाकारब्रह्म । अनिर्वाच्यब्रह्म सिद्धांतीं ॥ २६ ॥ सर्वेश्वर तुरीय मायाब्रह्म । सोहं हंसा तत्वमसि ब्रह्म । नामरूपातीत परब्रह्म । विमलब्रह्म तें मिथिळेश्वरा[3] ॥ २७ ॥ भूत भविष्य वर्तमानीं । उत्पत्तिस्थिति प्रळयानिदानीं[4] । आद्य मध्य अवसानी । सिद्धांतब्रह्म सनातन ॥ २८ ॥ पंच भौतिकी अविद्या माया । त्रिगुणगुणी गुणक्षोभिणी माया । मूळपुरुष मूळमाया । मायातीत निरंजन ॥ २९ ॥ जीवशिवउपाधिरहित । रजतमसत्वविरहित । महदअहंकार महत्तत्व । तत्वातीत परब्रह्म ॥ ३० ॥ स्थूल सूक्ष्म कारण कारणी[5] । विराट हिरण्यगर्भ अव्याकृत मिळणी । अनादि माया ब्रह्म योगिनी । मायातीत तूं परब्रह्म ॥ ३१ ॥ घटाकाश-ब्रह्म मठाकाशब्रह्म । महदाकाशब्रह्म चिदाकाशब्रह्म । उपाधिनिरासें विमळब्रह्म । परब्रह्म अखंडित ॥ ३२ ॥ देह नव्हे अवस्था नव्हे । अभिमान नव्हे स्थान नव्हे । भोग मात्रा गुणशक्ति नव्हे । चौपुटी तत्वा अतीत ॥ ३३ ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान नाहीं । ध्येय ध्याता ध्यान नाहीं ।

---

१ कळलें पण काय कळलें । काय कळलें तें न कळलें । न कळोनि तें कळलें । कांहीं एक निज गुह्य ॥ स० ५, २० पद्य. २ ॐ इत्येकाक्षरं ब्रह्म । ३ हे जनकराजा. ४ प्रळयाच्या अंतीं. ५ 'महाकारणी' असें दुसऱ्या पोथींत आहे.

९३२४



ग्रंथ संग्रहालय नं. ता. ठाणे

दृश्य द्रष्टा दर्शन नाहीं । नाना त्रिपुटी अतीत ॥ ३४ ॥ जें जें कांहीं दृश्य भासे । तें तें देखणेपणें नासे । हेतु अहेतु निर्हेतु नसे । आनंद स्वानंद समाधि ॥ ३५ ॥ मौन व्याख्यान श्रीगुरु तरुण । शिष्य निःसंशय वृद्ध संपूर्ण । पूर्णी पूर्णपणें परब्रह्म परिपूर्ण । परब्रह्म तूं अखंडित ॥ ३६ ॥ एवं याज्ञवल्क्य गुरु कृपामूर्ति । विदेह केला संतमूर्ति । पुण्यश्लोक विदेहकीर्ति । पुराणें गाती स्वानंदें ॥ ३७ ॥ विदेह राजा देहातीत । ज्ञानयोगें निवृत्ति अहेत । श्रोते वक्ते येकचित्त । होऊनि ऐका स्वानंदें ॥ ३८ ॥ गुरुवाक्यें प्रथम स्थूळदेह जनकें । विराटीं मेळविलें सम्यकें । तत्वें विभागूनि येकें येकें । पांचपंचकें वारिलीं ॥ ३९ ॥ दुसरा सूक्ष्म देह विदेहें । हिरण्यगर्भी ठेविला पाहें । तत्वें विभागूनि लवलाहें । पांचपंचकें निरसलीं ॥ ४० ॥ तिसरा देह कारण राजा । अव्याकृतींत मेळवी वोजा । तत्वें विभागूनि आत्मकाजा । महाकारणीं प्रवेशे ॥ ४१ ॥ चौथा देह महाकारण । मूळ प्रकृतीसीं करी मेळवण । जागृति स्वप्न सुषुप्ति पूर्ण । तुर्या आदि अवस्था सारिल्या ॥ ४२ ॥ अहं ब्रह्म तुर्या ज्ञान । निवृत्ति उन्मनी विज्ञान । विज्ञानवृत्ति निवृत्ति सारून । विदेह आपण समाधि ॥ ४३ ॥ अबोलणी आत्मस्थिति । याज्ञवल्क्य बोले कृपामूर्ति । वयं तु गोग्राही निश्चिती । विदेह लक्ष गाई वांटिती ब्राह्मणा ॥ ४४ ॥ सर्वस्व केलें गुरुदेवार्पण । विदेहें सेविलें निरंजन । याज्ञवल्क्यें सेविलें तपोवन । गुरुशिष्य दोघे उदास मूर्ति ॥ ४५ ॥ राज्य जालें सर्वही उदास । ऐकोनि क्रोध आला याज्ञवल्क्यास । ह्मणे माझें राज्य जाणोनि केलेंसी वोस । गुरुद्रोही तूं निर्धारें ॥ ४६ ॥ स्वामी गुरुआज्ञा मज प्रमाण । चाल अंगिकारीं तूं भद्रासन । माझें सर्वस्व हें जाणोन । गुरुपदीं लीन

---

१ यद् दृष्टं तन्नष्टं—जें दिसतें तें विनाशी आहे, या न्यायानें. २ समाधि स्थितींत हेतु नाहीं. पण हेतु नसणें हाही हेतुच असल्यामुळें तसेंही नाहीं. ३ पंचीकृत झालेलीं पांच भूतें. ४ पिंडाच्या चारी देहांना क्रमानें ब्रह्मांडींच्या चार देहांत घालून जिरविलें.

असावें ॥ ४७ ॥ ऐसें गुरु याज्ञवल्क्यें बोलिजे । तैसेंचि विदेहें आचरिजे । भद्रासनीं भद्रपीठीं बैसिजे । गुरुपदीं भोगिजे समाधिसुख ॥ ४८ ॥ विदेह कोंदला ब्रह्मानंदें । दोंद सुटलें सच्चिदानंदें । निंदक ह्मणती चढलें मांदें । अहंब्रह्मास्मि अभिमानें ॥ ४९ ॥ यथार्थ ह्मणे विदेहमूर्ति । अहंब्रह्मास्मि सारी[1] वृत्ति । राज्यप्रवृत्ति राजयोगनिवृत्ति । राजयोगींद्र सिंहासनीं ॥ ५० ॥ आत्माराम अंतरीं स्वानंद । स्तुतिवादें ह्मणि न चढे मद । निंदक लोक वंदि त्रिविध । शांतिमूर्ति भद्रासनीं ॥ ५१ ॥ प्रंपचें परमार्थ[2] ढळेना । पवनें गगन चळेना । वृत्तीनें निवृत्ति[3] मळेना । सुख समाधि स्वरूपीं ॥ ५२ ॥ समाधि लक्षण जे शुद्ध ज्ञप्ति । ते ब्रह्मयोगिनी आत्मस्थिति । लीला प्रगटली सीता व्यक्ति[3] । आत्मा स्वयंज्योति वरावया ॥५३॥ राम केवळ विमळब्रह्म । तेथें चिद्विलास माया धर्म । प्रकृतिपुरुषें जाणिजे वर्म । धनुष्य शक्ति भंगिलें ॥५४॥ धनुष्य भंगिलें शक्ति सीतेनें । अध्यात्म रामायणींचीं वचनें । आपुला पण आपणें । सिद्धीसि नेणें परियसा ॥ ५५ ॥ जनकनंदिनी जगदंबा । ब्रह्मयोगिनी विश्वकदंबा । मूळमाया प्रगटली अंबा । सद्गुरुकृपा यथार्थ ॥ ५६ ॥ सद्गुरुकृपा ज्ञप्ति सीता । विदेहसदनीं प्रगटली माता । संत सर्वज्ञ जाणती तत्वता । निवृत्तिसीतास्वयंवर ॥ ५७ ॥ श्रोतीं करिजेल अनुमान । निर्गुणीं नाहीं सगुणध्यान । तरी सगुणध्यानें निर्गुणध्यान । काय निमित्त अनुभविलें ॥ ५८ ॥ अहो पूर्वपक्षेंविण सिद्धांत । बोलतां चि नये निभ्रांत । ह्मणोनि मूळमायेविण भगवंत । ठाईं पडेना निर्धारें ॥ ५९ ॥ मायायोगें निवृत्तिकथन । माया ब्रह्मीचें अनुसंधान एवं सगुण ध्यानें निर्गुण ध्यान । सद्गुरुकृपें अनुभविलें ॥ ६० ॥

---

१ दूर करी. २ ही ओंवी सुद्धां ज्ञानाविषयीं चमत्कारिक कल्पना बाळगिणाऱ्यांनीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी आहे. निवृत्ति (मनांतून) एकदां झाली ह्मणजे केवळ कर्मानें ती मळणें शक्य नाहीं. मोठा वारा सुटला तरी तो आकाशाला हालवूं शकत नाहीं. ३ व्यक्तरूपानें. हें सीता स्वयंवरावरील रूपक मोठें सुंदर आहे.

कर्तेंति नैयायिकीमत । सिद्ध कारितसे ब्रह्मवेदांत । प्रकृतिपुरुषें तत्व सांख्य गात । ब्रह्म सिद्धांत प्रगटिती ॥ ६१ ॥ पूर्वमीमांसा स्वर्ग काम्य-कर्म । उत्तरमीमांसा वेदांत ब्रह्मवर्म । पांचरात्र्यादि शैव शाक्त धर्म । पातंजळीं योगधारणा ॥ ६२ ॥ वेदांताचीं हें उपकर्णें । नाना शास्त्रमतें ऐकिजेति कर्णें । जैसीं प्रजापाळकें संपूर्णें । कोशगृहें राक्षिलीं ॥ ६३ ॥ कोशगृहें हीं भगवंताचीं । विश्रांतिदायकें संतांचीं । सहस्रमुखें शेषाचीं।ब्रह्म-देवाचीं [1]चतुर्मुखें ॥६४॥ नानाद्वारें ईश्वराचीं । योगविपिनें योगेश्वराचीं । नानासदनें मूळ मायेचीं । ब्रह्मअच्छादनें यथार्थ ॥ ६५ ॥ आच्छादिली जे वस्तु । तेथें लागतो बहुत हेतु । ह्मणोनि योगमायेनें गुप्त गुह्यार्थु । प्रगट केले वाक्यार्थें ॥ ६६ ॥ एवं मायातीत गुणातीत । भूतातीत दृश्यातीत । सर्वातीत देहातीत । निर्गुण ब्रह्म अनुभविलें ॥ ६७ ॥ श्रोतीं आक्षेपिलें वचन । ब्रह्मीं नाहीं शब्दमान । तरि शब्दब्रह्में परब्रह्म जाण । कोणेपरी अनुभविलें ॥ ६७ ॥ अहो परब्रह्मीं शब्द कांहींच नाहीं । विमळ ब्रह्म शुद्धबुद्ध पाहीं । व्याकर्ण[2]मतें दृष्टांत कांहीं । श्रोतेजनीं परिसावा ॥ ६९ ॥ वित्पत्ति[3] विवेक देवापासीं । विभक्ति नाहीं देवशब्दासी । उपाधि नाहीं राम नामासी । [4]सप्त विभक्ति ऐलीकडे ॥७०॥ सप्तविभक्ति सप्तसिंधु । किती पाहावा कर्मबंधु[5] । दयाकरो अनाथबंधु । व्याकर्ण[6]मूळ श्रीराम ॥ ७१ ॥ उदंड विस्तारिल्या विभक्ति । शेवटीं राम उरले निश्चिती । व्याकर्ण वित्ररण केलें श्रोतीं । विभक्तिरहित नाम हें ॥ ७२ ॥ नाना तत्वरूप विभक्ति । विस्तार वाढला शिवशक्ति । भिन्ना प्रकृति[7]अष्टधा इति । भगवद्गीतेसी बोलिले ॥ ७३ ॥ एवं

---

१ दुसऱ्या पंथींत या ओवींचा ' विश्रांति ' इ. चरण गाळून त्या ऐवजीं ' षण्मुखें स्वामी कार्तिकाचीं ' असा तिसरा चरण दिला आहे. २ व्याकरणाच्या भाषेंत. ३ व्युत्पत्ति. ४ प्रथमा, द्वितीया वगैरे. विभक्ति ह्मणजे वेगळेपण तें पर-ब्रह्मांत मुळींच नाहींत. जे भेद आहेत. ते सर्व अलीकडचे मूळ मायेपर्यंतचे आहेत. ५ कर्मबंधन. ६ सर्वांचें मूळ. ७ पंच महाभूतें, मन, बुद्धि आणि अहंकार अशी आठप्रकारची प्रकृति ' भूमिरापो नलो वयुःखं मनो बुद्धिरेव च । अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ' ॥ भ. गी. ७, ४.

विभक्तिरहित नाम । तैसें[1] मायेरहित परब्रह्म । नाना मूळ मायोपाधि ईश्वर वर्म । निरोपाधि धर्म वस्तुत्वें ॥ ७४ ॥ आत्माराम निरंजन । वस्तु निर्गुण पुरातन । शब्द निशब्द सारूनि आपण । संत सर्वज्ञ समाधि ॥ ७५ ॥ एवं पूर्व कथानुसंधान । सगुणें लक्षिलें निर्गुणध्यान । मूळ माया ज्ञप्ति सीता आपण । आत्मा स्वयंज्योति वरीतसे ॥ ७६ ॥ समाधि सीता सुमेधा कांता । जनक मिळणी मिळती तत्वता । रामीं तन्मय तद्रूपता । आत्माराम निरंजनीं ॥७७॥ आत्माराम स्वयंज्योति । वरिती जाली सीतासती । तेथें भक्त ज्ञानी निवृत्ति । निवृत्तिधामीं मिळाले ॥ ७८ ॥ व्यास वाल्मीक सौख्यसिंधु । कविर्हरि नामें नवबंधु । चर्चा करिती स्वरूपसिंधु । माजि मिळणी अखंड ॥ ७९ ॥ अखंड ज्ञानयोगें निवृत्ति । विदेह नामें संतमूर्ति । ज्याचे निष्ठे राम आदिमूर्ति । मुळेंविण[2] आला हो ॥ ८० ॥ ज्याचें अग्निमध्यें येक पाउल । दुजें सुमेधेकरीं[3] केवळ । समाधि ज्ञप्ति निर्मळ निश्चळ । सीता सोज्वळ समर्पिली ॥ ८१ ॥ सीता समर्पिल्या विदेह मुक्तता । सारूनि रामचि जाला तत्वता । विदेहपणें मीपण केला होता । पूर्वींच वारिला श्रीरामें ॥ ८२ ॥ श्रीराम तारकब्रह्म जोडलें । जनकभाग्य हें भाग्याआगळें[4] । उदंड भक्त ज्ञानी जाले योगबळें । ते जनकमिळणी मिळाले ॥ ८३ ॥ नाना तापसी वेषधारी । राजा ह्मणती हा घरबारी । नाना विळासी दुराचारी । तेथें व्यास पुराणें सांगतसे ॥ ८४ ॥ व्यासासी अंतरीं कळलें । कांहीं कौतुक व्यासें दाखविलें । पुराणसमई उभें केलें । विघ्न मोटें मायावी ॥ ८५ ॥ राज्या[5] अग्नि आला महाद्वारीं । राजा ढळेना अंतरीं । व्यास अध्यात्म

---

१ विभक्ति प्रत्यय लागून झालेल्या शब्दांत जसें शुद्ध नाम अधिष्ठानभूत असतें तसें अष्टधाप्रकृतिस्वरूप नाना वस्तूंत शुद्ध परब्रह्म आहे. २ बोलाविल्याशिवाय. राम विश्वामित्राबरोबर सहज यज्ञ पाहण्यासाठीं ह्मणून मिथिलेस गेला होता. ३ सुमेधा हें जनकाच्या स्त्रीचें नांव. ४ इतरांच्या भाग्याहून फार थोर. ५ या गोष्टीवरूनच ‘ मिथिलायां प्रदीप्तायां न मे दह्यति किंचन ’ असा न्याय ह्मणजे ह्मण प्रसिद्ध झाली आहे. या ह्मणीचा अर्थ:-माझी राजधानी मिथिला जळून गेली तरी माझें कांहीं जात नाहीं.

निरूपण करी । अचळोयं सनातन ॥८६॥ अच्छेद्य अदाह्य अक्लेद्य ब्रह्म । ब्रह्मानुभवें राजा ब्रह्म । निंदक पाषांडी जड मूढोत्तम । पुराणें सांडोनि पळाले ॥ ८७ ॥ माया वारिली परमानंदें । व्यासजनक निजानंदें । अद्वैतबोधें सुखस्वानंदें । आत्मारामीं निमग्न ॥८८॥ विदेह राजा विदेह मूर्ति । पुराणें गाती ज्याची कीर्ती । निंदक तेचि वंदू लागती । ज्ञानें निवृत्ति ते ऐसी ॥ ८९ ॥ ह्मणाल अग्निमध्यें पाउल घालावें । तरीच विदेही ह्मणवावें । कारण अनुसंधान राहावें । परमेश्वरीं ॥ ९० ॥ ज्ञानें विदेहीपण ही सारावें । सद्गुरुभजनीं तत्पर व्हावें । जैसें समाधि विसर्जुन जनकें राहावें । रघुनाथभजनीं ॥ ९१ ॥ निर्गुणीं निर्गुण आपण आहे । सद्गुरुभजनीं तत्पर राहे । मग समाधिसुख कोठें जाय । सद्गुरुचरणावेगळें ॥ ९२ ॥ कर्म कर्ता कारण आपण नोहे । आत्मा ब्रह्म स्वतसिद्ध आहे । अखंड अनुसंधान राहे । परब्रह्मीं निर्धारें ॥ ९३ ॥ सगुणें सगुण लक्षावें । निर्गुणें निर्गुण स्वयें चि व्हावें । सगुण निर्गुण जाणुनि राहावें । समाधानें गुरुवाक्यें ॥ ९४ ॥ सगुण आंगीं लागेल । ह्मणोनि भजनमार्ग जो उडवील । तो सत्य जाणा हो वाहवेल । मायापुरीं संशयें ॥ ९५ ॥ माया भयानक तरूनि जावें । तरि ईश्वरीं निःकामें भजन करावें । सद्गुरुकृपे तरावें । संसारसागरीं ॥९६॥ एवं विदेहाचे परी । सुखें वर्तावें शरीरीं । नीति न्यायें ईश्वरीं । अनुसंधान लागावें ॥ ९७ ॥ सकळांसी कैचें अनुसंधान । ह्मणोनि विरळे संत सज्जन । जनीं असोनि निरंजन । देहातीत सर्वदा ॥ ९८ ॥ ऐकोनि विदेहाची कीर्ति । शुक योगींद्र भेटीसि येती । व्यासें जाणोनि

---

१ अचलोयं सनातनः– हा आत्मा नित्य आहे. भ. गी. २ २४. २ ब्रह्म, आत्मा 'अच्छेद्योऽय मदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च' भ. गी. २,२४, यांत सांगितल्याप्रमाणें जळणें शक्य नाहीं. तदाकार झाल्यामुळें जनकही अदाह्य होता. ३ जनकाची निवृत्ति ज्ञानामुळें झाली होती हें तात्पर्य. ४ सर्वांनीं विशेषतः कोरड्या ज्ञानाची महती गाणारानीं हें लक्षांत ठेवावें. ५ निष्काम भजनानें याया तरून जातां येतें. ६ याचे पुढें तिसऱ्या चरणांत 'स्वरूपनिर्धार अंतरीं' इतके शब्द दुसऱ्या पोथींत अधिक आहेत. ७ क्वचित्.

निशंक कशपीवनीं रिघे। व्यासमुनि लागले मागमागें। मुख न पाहे पित्याचें ॥ २१ ॥ कैंचें स्तनपान मातेचें। मुखावलोकन नाहीं तिचें। अनुचित कर्म केलें साचें। वीतरागी मी म्हणोनियां ॥ २२ ॥ वैराग्ययोगें निवृत्ति खरी। परि मी मुक्त हें राहिलें अंतरीं। माता मागें रुदन करी। कायामाया धरीचना ॥ २३ ॥ सादर ऐका शुक-आख्यान। शुकें घेतलें ब्रह्मारण्य। न करी मातेचें मुखावलोकन। पुढें काय वर्तलें ॥ २४ ॥ जातां मानससरोवरीं। नग्न देखिल्या दिव्य नारी। वस्त्रें न घेतां शुकाअंतरीं। ज्ञानाभिमान झळंबला ॥ २५ ॥ व्यास देखूनि त्यांचें शंकलें मन। शुकासि आला तोचि अभिमान। मी विषयविरक्त परिपूर्ण। मुक्त संपूर्ण पित्याहुनी ॥ २६ ॥ पुत्रासि बाहे व्यासदेवो। अरण्य म्हणे वो वो वो वो। ऐसा होता जो सर्व भगवद्भावो। तो जाला वांवो क्षणार्धें ॥२७॥ मौन अरण्यीं शुक काक पिकें। तैसाचि हा हीं शुक येक बाळक। व्यासासि चिन्ह कळलें देख। ज्ञानाभिमानें बाधिलें ॥२८॥ पुत्राचा आला कळवळा। कैसा होय हा मुक्तपणावेगळा। म्हणे ऐक बापा शुका केवळा। जनकनिर्मळा भेटावें ॥२९॥ मग स्वइछा सहज वनीं विचरावें। ब्रह्मारण्यीं सुखें भरावें। जनक सांगेल तें धरावें। अंतर्यामीं निर्धारें ॥ ३० ॥ जनक आहे संसारी। नाना स्त्रियांसीं वरवारी। नाना विलासीं राज्यधारी। परि निर्विकारी निरंजन ॥ ३१ ॥ हांसिला शुक योगींद्र। नवल याचा पूर्णबोधचंद्र। पिता म्हणोनि पादारविंद। वंदिलें पाहिजे म्या शुकें ॥ ३२ ॥ नाना पुराणें कथिलीं। अशंकानिवृत्ति नाहीं जाहाली। मग भागवतलीला

१ पृथ्वी. २ अप्सरा. शुकाला पाहून त्यांना लज्जा उत्पन्न झाली नाहीं, पण व्यासाला पाहतांच त्यांनीं वस्त्रें घेतलीं. ३ हाका मारी. ४ व्यर्थ. ५ कोकिळ. ६ मी वैराग्यशील, ज्ञानी असा अभिमान झाल्यामुळें शुक खरा मुक्त झाला नाहीं, असें पाहून व्यासानें त्याला जनकाकडे पाठविलें. ७ पूर्णज्ञानरूपी चंद्र. ८ व्यासानें १८ महापुराणें, १८ उपपुराणें, महाभारत आदिकरून ग्रंथ लिहिले, परंतु मनाची तळमळ नाहींशी झाली नाहीं. म्हणून शेवटीं नारदाच्या सांगण्यावरून भक्तिप्रधान भागवत रचिलें. ९ कृष्णलीला वर्णन करणारा भागवत ग्रंथ.

नारदें उपदेशिली । तेथील बहुधा गुह्यार्थु हा ॥ ३३ ॥ बरें पाहों याचा अर्थ । ह्मणोनि चालिला शुक समर्थ । मागील मार्गे पितृवंदन करित । आला त्वरित मिथिळेसी ॥ ३४ ॥ रीघ नव्हे राजद्वारीं । उभा राहिला ब्रह्मचारी । नव्हे केवळ वेषधारी । तामस क्रोधी पाषांडी ॥ ३५ ॥ विवेकवैराग्ययोगें निवृत्ति । असंगशस्त्र घेऊनि गुप्त हातीं । उभा राहिला जनकाप्रति । काय सांगों धाडितसे ॥ ३६ ॥ मी शुक आलों भेटीसी । सांगों पाठवी जनकरायासी । द्वारपाळ सांगती नृपासी । जनकरायें जाणीतलें ॥३७॥ शुको मुक्तो वामदेवो वा श्रुति । तोचि पातला पुण्यमूर्ति । मी मुक्त हें सांख्रानि सुमति । स्वानंदमूर्ति भेटावें ॥ ३८ ॥ मग संगं त्यक्त्वा सुखी भव । सांगो धाडी मिथिळराव । ऐकोनि शुक महानुभाव । संग आपुला शोधितसे ॥ ३९ ॥ दंड कमंडलु टाकीतसे । कुपीन उत्तरीय सोडीतसे । यज्ञोपवीत हें धरितसे । आंगावेगळें अंगुष्ठीं ॥ ४० ॥ ब्रह्मसूत्र त्यागावया उदित । पुनःपुन्हा राजा उचितें धाडित । संगं त्यक्त्वा सुखी भव ह्मणत । मग शुक विचारित आपुले मनीं ॥ ४१ ॥ मी तो कोण शुक तो कोण । देह मी जीव मी आत्मा आपण । जीवात्मा शिवात्मा परमात्मा आपण । निर्मळात्मा पूर्ण चिद्व्योमीं ॥ ४२ ॥ मी शुक हे अविद्योपाधि । जीव शिव अवघी परमात्मउपाधि । निर्मळात्मा निरोपाधि । घटमठादि अवघे भंगिले ॥ ४३ ॥ आतां काया वाचा आणि हें मन । मी शुक नव्हें हें प्रमाण । अंतःकर्ण पंचप्राण । विषय इंद्रियें मी शुक नव्हें ॥ ४४ ॥ पंचभूतें गुण पंचवीस । स्थूळ सूक्ष्म देहकळा पन्नास ।

१ हें शुकाचें व्याजोक्तिपूर्वक भाषण आहे. इतके ग्रंथ लिहून हेंच काय ज्ञान व्यासानें प्रगट केलें असा उपहासपूर्वक प्रश्न २ शुक आणि वामदेव हेच काय ते मुक्त असें श्रुति वर्णन करते. ३ संग टाकून सुखी हो. ४ तयार. ५ निरोप. ६ दंड, कमंडलु, यज्ञोपवीत वगैरे सर्व टाकलें तरी आणखी संग टाकावयाचा तो कसला, असा विचार शुक करूं लागला. ७ घट किंवा मठ मोडलें ह्मणजे आकाश जसें मूळचें तेंच असतें, त्याप्रमाणें मी अमुक असा अहंकार टाकला कीं निरुपाधि आत्माच रहातो.

अपूर्व स्थिति । पुत्रेरायासी पाठविलें ॥ ९९ ॥ एवं ज्ञानयोगें निवृत्ति कथन । केलें यथामति निरूपण । पुढें वैराग्ययोगें निवृत्तिलक्षण । निवृत्तिवेणी बोलेल ॥१००॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । ज्ञानयोगनिवृत्तिनाम । समास नवम बोलिला ॥१०१॥ समास ॥ ९

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरुस्वामी निरंजन । जय जय भवगजपंचानन । सदा सर्वदा आनंदवन । वनविहारण वीतरागें ॥ १ ॥ वैराग्ययोगें निवृत्ति कैसी । सांगोनि द्यावी जी सेवकांसी । येकवेळ कृपा करावी ऐसी । जैसी आकाशीं पूर्णिमा ॥ २ ॥ समर्थमहिमा निरोपमा । निगमागमा नेणवे सीमा । श्रुति गर्जती नेतिनेति परमा । स्वानंदधामा बोलावें ॥ ३ ॥ वैराग्ययोगें निवृत्तिलक्षण । विशद करावें निरोपण । ऐकोनि गुरुकृपा वोळली पूर्ण । स्वानंदघन वर्षला ॥ ४ ॥ तेथें भक्तचातक ऊर्ध्वमुखें । आनंदजळें सेविती सुखें । संत श्रोते यथासुखें । श्रवण करिती स्वानंदें ॥ ५ ॥ विवेक वैरागी परिपूर्ण । निवृत्तिबोधें संपूर्ण । असंग शस्त्रें करीं घेउन । मायाअरण्यीं निघाला ॥ ६ ॥ नाना परीचीं झाडखंडें । नानापरींचीं नाना बंडें । विवेकबळें करूनि शतखंडें । ब्रह्मारण्यीं चालिला ॥ ७ ॥ ब्रह्मारण्य आनंदवन । विशाळ विस्तीर्ण पुरातन । अपार अप्रमय निबिड घन । राम रमणीय आरामसें ॥ ८ ॥ तेथें परमानंदें उत्साह मांडिले । भक्ति विरक्तियोगें त्याग केले । सर्वसंगपरित्याग जाले । ब्रह्मानंदें नाचतु ॥ ९ ॥

---

१ उत्तम पुत्र जो शुक त्याला. मूळ पोथींत या समासाच्या २२ ते ३३ ओव्यांबद्दल मूळच्या लिहिण्यावर कागद चिकटवून व आणखी एक पान नवीन घालून कांहीं अधिक ओव्या लिहिल्या आहेत. त्यामुळें ओव्यांच्या संख्येंत घोटाळा झालेला आहे. २ संसाररूप हत्तीला नष्ट करणारा सिंह. ३ स्पष्ट. ४ संसाररूप वृक्षाचा वैराग्य ( असंग ) रूप शस्त्रानें छेद करावा असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे म. भ. गी. १५, ३.

अहंकार नाना विकार । संसारसर्प विषयविखार । झोंविले होते मार्गी फार । राम संजीवनी उतरले ॥ १० ॥ नानापरिचीं लाव पिसीं । सुखदुःखें प्रारब्धें अहर्निशीं । लागलीं होतीं निजमानसीं । मूळमंत्रें निवारलीं ॥ ११ ॥ नानापरीचे भवस्वर्गभोग । जन्ममरणादि क्षयरोग । लागले होते कर्मयोग । स्वरूपपानें निवारले ॥ १२ ॥ मायाअरण्यीं कठिण भूमि । शीत उष्णवात उर्मी । शून्य अवकाश नास्तिधर्मी । ब्रह्म अस्तिधर्मी विश्राम ॥ १३ ॥ महद्भूत अंतःकर्ण जाणीव लक्षणें । जाणीव ह्मणजे नेणिवेसी कारणें । जाणीव नेणीव सारूनि आपणें । आपण मीपणें वारिलीं ॥ १४ ॥ मन संकल्प विकल्प आपधाक । मायावनीं सदा धुकधुक । बध कीं मुक्त निश्चयात्मक । समर्थकृपें अनुभविलें ॥ १५ ॥ बुद्धीचें निश्चयलक्षण । चित्तीं बैसलें स्वरूपचिंतन । अहं आत्मा कार्याकारण । महाकारणीं मिळाला ॥ १६ ॥ महाकारण मी ब्रह्म संकल्प । पाहतां केवळ प्रकाशदीप । परि तोहि मावळला निर्विकल्प । गुणस्नेह सर्व वारल्या ॥ १७ ॥ श्रोतेजनीं प्रश्न केला । ऐसा कोण जी योगी जाला । इतिहासद्वारें आह्माला । निरोपण कीजे ॥ १८ ॥ प्रसंगें ऐका कथानक । वशिष्ठवंशीं वंशतिलक । शक्ति पराशर व्यासपुत्र शुक । कुळदीपक प्रकाशला ॥ १९ ॥ द्वादशवर्षें मातेउदरीं । व्रतबंधकर्म तेथेंचि सारी । आश्रमश्रमाचें भय फार धरी । राहे ब्रह्मचारी निस्पृह ॥ २० ॥ दंड कमंडुलें बाहेरि निघे ।

---

१ विषय हेंच ज्यांतील विष असा संसाररूप सर्प. २ रामरूप संजीवनी मंत्रानें तें संसारसर्पाचें विष उतरलें. ३ आत्मज्ञानरूपी औषधानें जन्ममरण रोग दूर झाले. ४ बौद्धादि नास्तिक धर्मांत शून्य हाच मोक्ष पण वेदांतादि आस्तिक धर्मांत ब्रह्मरूप होणें ह्मणजे मोक्ष. ५ ब्रह्म संकल्प–वहुस्यां प्रजायेय-मीं पुष्कळ व्हावें हा संकल्प-हें स्फुरणरूप दिवा, सत्व, रजस्, तमस्, हें गुणरूपी तेल संपल्याबरोबर विझतो, आणि मग शुद्ध ब्रह्मच रहातें. ६ वसिष्ठपुत्र शक्ति, त्याचा पुत्र पराशर, त्याचा व्यास आणि व्यासाचा पुत्र शुक. ७ ही शुकाची कथा सर्वप्रसिद्धच आहे.

पंचीकर्ण हें बहुवस । पिंड ब्रह्मांड मी शुक नव्हें ॥ ४५ ॥ देह अवस्था अभिमानस्थानें । भोगमात्रा[1] गुणशक्तिज्ञानें । बत्तीस तत्वें अभिधानें । मी शुक नव्हें निर्धारें ॥ ४६ ॥ विराट हिरण्यगर्भ अव्याकृति । मी माझी हे समूळ प्रकृति । अहं ब्रह्म हे ईश्वर स्थिति । शुक कैंचा कोण हा ॥ ४७ ॥ परब्रह्म तें परिपूर्ण । तेथें शुक कैंचा कोण । दृश्य द्रष्टा सरलें दर्शन । जालें दर्शन जनकाचें[2] ॥ ४८ ॥ दर्शन जालें गेलें न ह्मणे । अबोलणेंही[3] अबोलणें । तव जनकरायें केलें धांवणें । समाधिभुवन सांडोनियां ॥ ४९ ॥ विदेहीपण हें कोदंडबंड । पूर्वीं च जालें होतें शतखंड । समाधि ज्ञप्ति महाप्रचंड । त्यागूनि वितंड धांविला ॥ ५० ॥ शुकाची हे समाधि ज्ञप्ति । तेही वारिली आत्मस्थिति । परस्परें सहजस्थिति । ऐक्यमिळणीं मिळाले ॥ ५१ ॥ मिथ्या जालें मुक्तपण । आत्माराम दाटला निरंजन । शुक योगींद्र सन्मानून । आत्मसदना आणिला ॥ ५२ ॥ अग्रह निग्रह कांहींच नाहीं । जनक शुक देही विदेही । नाना चर्चा अर्चा पाहीं । सुखस्वानंदें दाटले ॥ ५३ ॥ दत्त दिगंबर महायोगी । वैराग्ययोगें सर्वसंगत्यागी । त्रैलोक्यींचे ज्ञाते वीतरागी । शुकदर्शना पातले ॥ ५४ ॥ त्यांहीं शुक मुक्त ऐसें नाम ठेविलें । तरि काय त्याला बंधन जाहालें । प्रसंगें हरिभक्तांसि सन्मानिलें । तरि काय अपमानिलें हरिहरां ॥५५॥ तथापि बद्ध मुक्त गुणाचे ठाईं । वस्तुआंगीं[4] कांहीं च नाहीं । मायामूळ शोधूनि पाहीं । न मे मोक्षो न बंधनं[5] ॥ ५६ ॥ जेणें मुक्त केला शुक । तो काय बद्ध जाला जनक । जयासी ठाउके ज्ञानविवेक । तेचि पंडितलोक समदर्शनी ॥ ५७ ॥ समदर्शनी तो शुक जाला । मग व्यासमुनि दर्शना आला । भागवत पुत्रासी उपदेश केला । मातृदर्शना नि-

---

१ विषय. २ जनक शब्दावर कोटी आहे. जनकराजाचें दर्शन होऊन ज्ञान झालें, तसें च सर्वांचें जनक जें ब्रह्म तें समजलें आणि त्रिपुटी नष्ट झाली. ३ सर्व वृत्तींचा लय झाला. ४ ब्रह्म. परब्रह्माचें ठिकाणीं बद्धता किंवा मुक्तता नाहीं. ५ मला मोक्ष नाहीं आणि बंधनही नाहीं.

घाला योगींद्र ॥ ५८ ॥ जन्मभूमीचें अवलोकन । दोहीं पक्षीं सावधान । सहजस्थितीं विचरे वन । परीक्षिती पावन पुराणीं ॥ ५९ ॥ कैसीं रवींदुगगनीं आलीं होतीं अभ्रें । तीं सत्संगवातें जालीं निरभ्रें । जनकरायें सारूनि अहंपणें समग्रें । उदास मोकळा शुक केला ॥ ६० ॥ ह्मणोनि मुक्तांसीहि पाहिजे सत्संग । सत्संगें भक्तीचा प्रसंग । भक्तिप्रसंगें अंतरंग । आत्मारामरंग दाटला ॥ ६१ ॥ एवं वैराग्ययोगें निवृत्ति । समर्थें सांगीतली युक्ति । भावें घडल्या रघुनाथभक्ति । होय मुक्ति ह्मणियारी ॥ ६२ ॥ येका वेगळा येक योग । तो योग चि वियोग । भक्तिज्ञानवैराग्ययोग । निवृत्तिवेणी[1] श्रीचरणीं ॥ ६३ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । वैराग्ययोगनिवृत्तिनाम । समास दशम बोलिला ॥ ६४ ॥ समास ॥ १० ॥ ७

---

## श्रीरामकर्ता

जय जय सद्गुरुस्वामी भूवैकुंठपति । तुमचा निवास सदा पर्वतीं[2] । तेथील महाप्रसाद जे सेविती । ते सभाग्य होती स्वानंदें ॥१॥ भवोपसर्गाची निवृत्ति । करणें देवा आदिमूर्ति । शरण आलों स्वामीप्रति । गोभूपति गोविंदा ॥ २ ॥ स्वामी पुष्करणी स्वामी सेवा । तुह्मांसी प्रिय देवाधिदेवा । रहिवास केला अभिनवा । जडमूढ जीवा उद्धारु ॥ ३ ॥ तुमच्या स्नेहें वराहस्वामी । उत्तरभार्गी पुण्यभूमि । स्वामी पुष्करणीतीरीं आह्मीं । नमस्कारिले स्वानंदें ॥ ४ ॥ श्वेत वराह स्वामी शुक्ल देव । तुह्मी सद्गुरु देवाधिदेव । कोठें तऱ्हीं धरावा भाव । भावार्थेंवीण वाव सर्व कांहीं ॥ ५ ॥ अहंकारें बांधिले मंडप । तेथें निघती महादोषसर्प । अभिमानें बांधिले सरोवर कूप । तेथें निक्षेप

---

१ भक्तीशिवाय वैराग्य, किंवा वैराग्याशिवाय भक्ति हा खरा मार्गच नव्हे. भक्ति, ज्ञान, आणि वैराग्य यांचा मेळ जमेल ती खरी निवृत्ति. २ परळीस.

अमंगळ ॥ ६ ॥ महामंगळा भुवननाथा । तुझा महिमा नेणे विधाता । वैकुंठ वोळूनि आणिलें आतां । काय ह्मणोनि वर्णावें ॥ ७ ॥ स्वरूप सुवर्णमय गोपुरें । भोंवतीं अष्ट तीर्थें थोर थोरें । नाना मानससरोवरें । सुमनवाटिका आराम ॥ ८ ॥ ठाईं ठाईं विहारस्थानें । रथ गज तुरंग सिंहासनें । भाग्यवैभव वर्णिजे कोणें । नाना पिंजरे पक्षियांचे ॥ ९ ॥ नाना वनचरें चितळें सामरें । नाना कृष्णमृगें मनोहरें । नाना चित्ते व्याघ्र सिंह प्रकारें । सर्वेश्वरें सांभाळिजे ॥ १० ॥ अश्ववहनें गजवहनें । शेषवहनें कूर्मवहनें । हनुमंतवहनें गरुडवहनें । मयोरवहनें देवाचीं ॥ ११ ॥ नवविधा भक्ति नवमी । सहज सुखानंद विजयादशमी । मळमा[1]स नाहीं आनंदधामीं । रथोत्साह देवाचे ॥ १२ ॥ नाना यानें विमानें । छत्रें पाल[2]छत्रें सूर्यापानें । [3]आहि कीर्तिमुखें निशाणें । औ[4]षधकळा गगनीं प्रकाशली ॥ १३ ॥ नाना दुंदुभि तु[5]रें आकाशनादें । पूर्ण जालें गंभीरशब्दें । नाना कीर्तनें परमानंदें । साचार भक्त करिताती ॥ १४ ॥ खोटें देवासी सोसेना । उदंड पुरती मनकामना । देवें जोडिलें परमार्थधना । अर्थसंपन्न परमार्थें ॥ १५ ॥ मोक्षश्रीया घरीं राबती । उदंड परमान्नें निर्माण होती । देवासी क्षणक्षणा नैवेद्य समर्पिती । मग वाटिती प्रसाद ॥ १६ ॥ ज्याचें महाप्रसादीं शंकलें मन । त्यासी भवो[6]पसर्ग झोंबले दारुण । अहंकारपोटशूळ उठिले जाण । आदिनारायण विन्मुख ॥ १७ ॥ कर्मनिष्ठ कर्मठ ब्राह्मण । कर्मठपणें कर्मठ जाण । महाप्रसाद नेव[7]तां नारायण । कोपला पूर्ण यात्रेमध्यें ॥ १८ ॥ संसारलक्षण पोटशूळ । प्राणी करिताहे तळमळ । नाहीं भावार्थाचें बळ । जालें विकळ दुराग्रही ॥ १९ ॥ मग देवाचे संत काठीकार । पारपत्यें भक्त दाटले अपार । मांडले पार चौबार । चौघ चार यात्रेमध्यें ॥ २० ॥ संकल्प विकल्प मन । आत्मसुखासी आडवें विघ्न । ह्मणोनि करावें आत्मसाधन । आत्मप्रसाद लाभेल ॥ २१ ॥ ह्मणाल वर्णसंकर येकंकार । ऐसा

---

१ अधिकमास. २ मोठें छत्र ? ३ छत्र. ४ वनस्पतींचें तेज. ५ तुर्ये, एक प्रकारचें वाद्य. ६ संसाराचा त्रास. ७ न घेतां.

नाहीं हा विचार । परमात्मा स्वरूपसाक्षात्कार । तोचि प्रसाद स्वामींचा ॥ २२ ॥ प्रसादमाहात्म्य सांगीतलें । आत्मदृष्टीवरी मन आणिलें । भूवैकुंठनाथ ह्मणविलें । आत्मारामें जगदीशें ॥ २३ ॥ जगदीशें दया केलियावरी । भवोपसर्गा न उरे उरी । सद्गुरुनाथ निर्धारीं । ग्रंथांतरीं निरोपिती ॥ २४ ॥ आतां भवोपसर्गनिवृत्तिकथन । सादर करावें श्रवण । भवोपसर्ग तो कवण । निवृत्तिलक्षण तें कैसें ॥ २५ ॥ भव ह्मणजे संसार । उपसर्ग ह्मणजे उपद्रव फार । संसार-शत्रुनिवृत्तिविचार । कोणेपरी सांगावा ॥ २६ ॥ संसारशत्रु मित्रपणें । विश्वासेंचि संहारणें । मिथ्यापणें विश्वास धरणें । आपण राहाणें अलिप्त ॥ २७ ॥ संसारीं असोनि होती निराळे । नवल हें योग बोलिले । संसार त्यागूनि गेले । माहायोगी प्रत्यक्ष ॥ २८ ॥ योगी संसार सांडोनि गेले । पुन्हां लोकिकांत वर्तले । उदंड लोकसंग्रह[3] केले । परोपकारें उद्धारे ॥ २९ ॥ येक संसार सांडोनि गेले । ते संसार संसार ह्मणतांचि मेले । ते गेले चि न गेले । वेषधारी[4] संसारी ॥ ३० ॥ संसारशत्रूचा[1] मूर्ख देह । समागमेंचि लागला आहे । आत्म-सुखासी बरें न पाहे । जीवित्वें घाली मोहफांसा ॥ ३१ ॥ संसारशत्रु जीवसांगाती । पंचविषय देहसंगति । जिकडे गेले तिकडे सर्वें आसती । कळोनि न कळती मित्रत्वें ॥ ३२ ॥ पांच विषय शरीर-भावें । संसारदेहीं वर्तती स्वभावें । याचें लक्षण ऐकावें । पृथक पृथक श्रोतेजनीं ॥ ३३ ॥ पंचभूतांचे पंचविषय । अनुक्रमें सांगों यथान्याय । पृथ्वी आप तेज वायु आकाशमय । शबल विषय ऐकावे ॥ ३४ ॥ शब्दविषय आकाशनादें । श्रोत्र रंजवी शृंगारिक शब्दें । नाना कळा-वंत गुणिजन छंदें । काळ विनोदें क्रमीतसे ॥ ३५ ॥ स्पर्शविषय

---

१ संसाराच्या त्रासाला. २ जागा, अवकाश. ३ सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वन्ति भारत । कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ ( भ. गी. ३-२५ ) या भगवद्वचनाला अनुसरून ज्ञानी लोक संसारांत पडून परोपकारार्थ कर्मं करीत असतात. ४ संन्यासवेषधारी.

वायुगुणें । मृद मृदोळिया सेज सुमनें । उत्तम वस्त्रें मृद इच्छणें । हळ हळ करणें सर्वदां ॥३६॥ रूपविषय तेज नेत्रीं । भाग्य वैभव लावण्य गात्रीं । देखोनि पापी अभिलाष पात्रीं । दंड पावतो राजगृहीं ॥ ३७ ॥ रसविषयो आपलक्षणें । जिव्हा रसीं तुळु करणें । प्रसंगें नाहीं वर्तणें । तळमळ करणें सर्वदां ॥ ३८ ॥ गंधविषय पृथ्वी गुण । सुवास घ्राण इच्छी प्राण । फुलें फुलेलें सुगंध आपण । देवासी सांडोनि भोगीतसे ॥ ३९ ॥ कैंचा देव कैंचा धर्म । हें शबळ विषयांचें वर्म । तो प्राणी आचरे जऱ्ही कर्म । तरि तें अकर्म जाणावें ॥ ४० ॥ येथील विषयो पुरेतिना । ह्मणोनि इच्छी स्वर्गांगना । यज्ञादि कर्में करी नाना । फळाभिलाषें सर्वदां ॥ ४१ ॥ स्वर्गभोग इच्छी धर्मी । परि तो धर्मीच अधर्मी । कर्मं करूनि तो अकर्मी[1] । भगवद्गीतेसी बोलिलें ॥ ४२ ॥ कर्म ब्रह्मसमुद्भव[2] । शोधिजे कांहीं अभिप्राव । क्षीणे पुण्ये भवस्वर्गभाव । ते शबल माव माइक ॥ ४३ ॥ एवं शबल विषय बोलिले । भवोपसर्ग निरोपिले । आतां संसारशत्रु निर्दाळिले । कोणेपरी परियसा ॥ ४४ ॥ संसारशत्रूचें घर । भेदें घेती योगेश्वर । आत्मस्थिति निरंतर । राजे होती मंडळिक[3] ॥ ४५ ॥ नाना शत्रूनें घर घेतलें । तया शत्रूसी निर्दाळिलें । निर्दाळूनि आपुलें केलें । शेवेसि लाविले शरणागत ॥ ४६ ॥ तैसे संसारशत्रु निर्दाळिले । मारूनि अवघे पिष्ट केले । शरण आले शेवेसि लाविले । सर्वोत्तमाचे सद्भक्ति ॥ ४७ ॥ प्रपंचशत्रूचें निर्दाळण । परमार्थेंविण नव्हे जाण । परि विचारसारशस्त्र आपण । हातीं घेतलें पाहिजे ॥ ४८ ॥ ब्रह्मच्यारी अथवा गृहस्थ । सन्यासी अथवा वानप्रस्थ । कांहींयेक योग अभ्यावस्त । कामा नये सर्वथा ॥ ४९ ॥ परमहंस जऱ्ही जाला । तऱ्ही त्यासी स्वधर्म बोलिला । भलतें भलतें करूं लागला । हें भगवंतास मानेना ॥ ५० ॥ पंचविषय सर्वांसी लागले । निवृत्तियोग कैसें

---

१ कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणिच कर्म यः । स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ भ. गी. ४-१८. २ कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ॥ भ. गी. ३-१५ ३ मांडलिक.

जाले । विषयत्यागें देह चाले । हें तों न घडे सर्वथा ॥ ५१ ॥ आतां याचें निवृत्तिकथन । सादर करावें श्रवण । शुद्ध विषय कार्या-कारण । स्थापिले पूर्ण समर्थें ॥ ५२ ॥ प्रथम शब्दविषय आकाश-नादु । नित्य निरंतर स्वानंदबोधु । श्रवण कीर्तन विषयस्वादु । अवश्य घेतला पाहिजे ॥ ५३ ॥ स्पर्शविषय सद्गुरुसेवा । देव ब्राह्मण महा-नुभावा । यथाप्रसंगें त्वचेंद्रियभावा । विधिविषयें सेवावे ॥ ५४ ॥ रूपविषय देवदर्शन । संतमूर्ति अवलोकन । परदार परद्रव्य लालस मन । कामां नये सर्वथा ॥ ५५ ॥ रसविषय जिव्हारुचि । अत्यंत नसावी लालुची । स्तुति अर्चा सर्वोत्तमाची । तीर्थ प्रसाद अरोग-णा ॥ ५६ ॥ गंधाविषय परिमळ द्रव्यें । देवासि समर्पूनि अपूर्वें । निर्माल्य प्रसाद वंदिजे भावें । तेणें निजात्मवैभवें पाविजे ॥ ५७ ॥ एवं पांच विषय निजात्मलाभें । सुखें सेविजे परमार्थलोभें । दुराशा विषय देहात्मलोभें । भगवत्प्राप्ति घडेना ॥ ५८ ॥ अनंत भुजाचा दाता । तेथें किती हा मागता । मागता न साहे भगवंता । ईश्वरइच्छे वर्तावें ॥ ५९ ॥ येक भगवंतासी मागावें । तेचि सांगिजेल स्वभावें । चित्त देऊनि ऐकावें । श्रोतेजनीं सज्जनीं ॥ ६० ॥ सत्समागम सच्छास्त्र श्रवण । नाना सुमनवाटिका अरामवन । येकांतसेवन समा-धान । जयंत्या पर्वें उत्साह ॥ ६१ ॥ स्नान संध्या जप ध्यान । मानसपूजा देवार्चन । हरिकथा पुराण श्रवण । ईश्वरभजन गुरु-भक्ति ॥ ६२ ॥ गुरुदेवभक्ति वाढलियां नवविधां । मागें लागती मुक्ति चतुर्विधा । सलोकता समीपता स्वरूपता त्रिविधा । सायोज्यता सद्भक्ति ॥ ६३ ॥ भक्तिछंदें द्वंद्व निर्द्वंद । अवश्य करणें भक्तिछंद ।

---

१ शरीरयात्राऽपिच ते न प्रसिद्ध्येदकर्मण: । भ. गी. ३×८. २ विहित विषय; शास्त्रोक्तमार्गानें विषयसेवन करावें. ३ भोजनाला. ४ परमार्थाच्या लोभानें विषयांचा उपभोग घ्यावा; त्यानें भगवत्प्राप्ति च होते. पण तोच देहबुद्धीनें केल्यास ती प्राप्ति होणार नाहीं. ५ अनंत हस्तें कमलावरानें । देतां किती घेशिल दो करानें ॥ सुभाषित. ६ सरूपता.

भक्तिछंदें परमानंद । भवस्वर्गबंध तोडी गुरुकृपा ॥ ६४ ॥ नाना पंचविध उपासना । नाना भक्त नाना कामना । निःकामबुद्धि ऐक्य भावना । सद्गुरुभजनापासुनियां ॥ ६५ ॥ श्रीगुरु रामचंद्र प्राणनाथ । भवानीशंकर रमानाथ । सत्यलोक वैकुंठ कैलासनाथ । अनंतशयन जगद्गुरु ॥ ६६ ॥ आत्माराम सर्वत्र व्यापक । अनेकीं येकें निश्चयात्मक । अनंतकोटिब्रह्मांडनायक । संतसज्जन निर्धारिती ॥ ६७ ॥ अत्रि वशिष्ट कौशिक । गौतम भारद्वाजादिक । व्यास जमदग्नि वाल्मिक । ऐसीं अनंत ऋषिकुळें ॥ ६८ ॥ सद्गुरुभजन हेंचि इछिती । सद्गुरुभजनें परब्रह्मप्राप्ति । आतां भवोपसर्गनिवृत्ति । ह्मणणेंचि नलगे ॥ ६९ ॥ कैंचें भवप्रपंचभान । वंध्यापुत्राचें जन्ममरण । निवृत्ति-वेणी ह्मणे शरण । सद्गुरुचरणीं रिघावें ॥ ७० ॥ इति श्रीनिवृत्ति-राम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । भवोपसर्गनिवृत्तिनाम । समास बोलिला अकरावा ॥ ७१ ॥ समास ११ ॥ छ छ

---

## श्रीरामकर्ता

जय जय श्री सद्गुरु स्वामी श्रीशैल्यवासी । तुमचें स्वरूपशिखर पडावें दृष्टिसी । मग अजन्म जन्ममरणजन्मासी । पुन्हा न यावें संकल्पें ॥ १ ॥ आतां सर्वसंकल्पनिवृत्ति । करणें देवा आदिमूर्ति । पुनर्जन्मो नं विद्यते ह्मणती । श्रीशैल्यस्वामी देखिल्यां ॥ २ ॥ पाता-

---

१ स्वर्ग देखील अल्पकाळ टिकणारा आणि बंधनकारक आहे. २ ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते । एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ॥ भ. गी. ९, १५. ३ सद्गुरु भजनानें संसाराचें भान नाहींसें होतें. हीच निवृत्ति. निवृत्ति ह्मणजे दुसऱ्या कोठें असलेली वस्तु प्राप्त करून घेणें असें थोडेंच आहे. संसार अनादि आहे तो रहाणारच. त्याचें भान नाहींसें झालें ह्मणजे निवृत्ति झाली; असें भक्तिमार्गाचें कर्मयोगरहस्य या समासांत सांगितलें आहे. ४ कृष्णेच्या तीरावरील श्रीशैलपर्वतावर रहाणारा श्रीमल्लिकार्जुन. ५ पुनर्जन्म प्राप्त होत नाहीं.

ळगंगा नीळगंगा । कृष्णवेणी त्रिवेणी त्रिभागा । दक्षिण तुंगभद्रा भीमा उत्तरभागा । ॐकाररूपिणी गंगा हे ॥ ३ ॥ श्रीशैल्याचें अंतर । भेदूनि गेली पाताळविवर । तिचा महिमा बोलतां अपार । कृष्णाविष्णुतनु हे ॥ ४ ॥ कृष्णाविष्णुतनु गुरुदेवनिवासी । व्यापकरूपें श्रीशैल्यवासी । श्री शैल्यशिखरीं सौख्यराशी । संतसज्जन अवलोकिती ॥ ५ ॥ श्रीशैल्याच्या पाइऱ्या भक्तिं । परमानंदें भक्त चढती । नाना भक्तिमार्गें स्वामी भेटती । ब्राह्मण्यदेव निर्धारें ॥ ६ ॥ स्वरूप सुवर्णमय लखलखाटें । गोपुरें शिखरें दिसती येक थाटें । भोंवतीं असती गिरिकपाटें । योगी वसती तपस्वी ॥ ७ ॥ नानाप्रकाशरूपें आत्मदीप । स्वप्रकाशरूपें तेजोरूप । नाना भक्तिमार्गें विश्रांतिमंडप । संतमूर्ति दाटल्या ॥ ८ ॥ नाना स्थावरलोकीं जंगमजीव । अनुसंधानें सदाशिव । शिवशिव स्मरणें ब्रह्मपदीं ठाव । संकल्पनिवृत्ति हरिहरा ॥ ९ ॥ स्वानुभवें शंख गर्जती । नाना नादब्रह्में कीर्तनें होती । अनंत जन्मींच्या पारणीं फिटती । संकल्प सोडिती स्वानंदें ॥ १० ॥ श्रवण श्रावणमासीं महिमा । शिवरात्रि प्रिय सर्वोत्तमा । कां जे येकांतपूजा जगदोत्तमा । विश्वंभरासी मानली ॥ ११ ॥ दिवस रात्रि देवासि नाहीं । परि शिवरात्रि प्रिय ईश्वरास पाहीं । कां जे रात्रिभागीं येकांत कांहीं । देवा आणि भक्तांसी ॥१२॥ जों जों दिवसरजनीचा निरास । तों तों आनंद महेशास । व्योमकेश निरावकाश । आकाशलिंग सर्वत्र ॥ १३ ॥ तमा पासूनि शून्य जालें । तमासी पाहिजे वोळखिलें । अज्ञानतम[2] हें नव्हे भलें । तमोगुणांशें सर्वेश्वर ॥१४॥ केवळ तमोगुण नव्हे ईश्वराचा । रुद्र उत्पन्न तमोगुणाचा । लिंगपुराणीं जगदीश्वराचा । महिमा विचित्र बोलिला ॥ १५ ॥ अहंब्रह्म निरहंकार । परब्रह्मीं केवळ ईश्वर । हारिसंकल्प जगदीश्वर । षड्गुणसंपन्न निर्धारें ॥ १६ ॥ सम स्वतंत्र निर्गुण । गुणापेक्ष सर्वज्ञ । तृप्तकाम परिपूर्ण । षड्गुणसंपन्न ईश्वरु ॥ १७ ॥ नाना उत्पत्ति

---

१ भक्तीनें. २ तम ह्मणजे अज्ञान असें ह्मणणे योग्य नव्हे. कारण शंकर तमोगुणी आहे; तेव्हां तमोगुणाचें स्वरूप ओळखिलें पाहिजे.

स्थिति संहार । स्वयें ईश्वर त्रिगुण गुणविकार । विकार नसतां जो निर्विकार । तो निर्विकल्प निरंजन ॥ १८ ॥ एवं हरिसंकल्प जगदीश्वर । स्मार्तभागवतविचार । मुळीं अभेद ते हरिहर । भेद विकार मतांतरें ॥ १९ ॥ मतांतरें ऐलिकडे संकल्प । संकल्पें वाढती विकल्प। मुळीं पाहतां हरिसंकल्प । ईश्वर तोचि जगदीश्वर ॥ २० ॥ सद्गुरुचरणीं निवृत्तिगंगा । संकल्पविकल्प कळिमळभंगा । मार्ग दाऊनि अंतरंगा । आत्मरामपद दाखवीतसे ॥ २१ ॥ सद्गुरुकृपेचा अपार महिमा । प्रविष्ट होइजे आत्मयारामा । परमानंद पुरुषोत्तमा । भक्त निश्चयें पावले ॥ २२ ॥ ऐसें तीर्थ कोण आहे । जें जन्ममरण वारिताहे । पुनरावृत्तीसि कारण पाहे । महिमे सांगती पुराणीं ॥२३॥ पुराणें सर्वत्र ऐकती । पुराणपुरुषा थोडे जाणती । संत पुण्यसंग्रह श्रवण नौका करिती । संसारसिंधु तरावया ॥२४॥ सर्व संकल्पप्रान्तोस्थोहं[1] श्रुती । बरी आणावी आत्मप्रचीति । तेचि आतां कथा निगुती । संत श्रोतीं परिसावी[2] ॥ २५ ॥ मुख्य संकल्पातीत निरंजन । तेथें हरिसंकल्प हरि आपण । प्रकृति पुरुष शिवशक्ति ईश्वरपण । जीवशिवपण संकल्पें ॥ २६ ॥ मी जीव हा संकल्प । पुढें अविद्या देहविकल्प । मी देह इंद्रियें प्राण जल्प । नानापरी करीतसे ॥ २७ ॥ नानापरींचें तत्वज्ञान । मी जीव मानी प्रमाण । माझी कांता स्वजनधन । संतति संपत्ति संकल्परूप[3] ॥ २८ ॥ संकल्परूप बळावळें । पिंड ब्रह्मांड उभें जालें । नानातत्वरूपें उभारलें । पुनःपुन्हा किती बोलावें ॥ २९ ॥ अधोर्ध्व संकल्प जों पाहिला । तो मुळींचा चि शेवटासि आला । शेवटींहूनि मुळास गेला । संतसंगें विचार ॥ ३० ॥ आपुला संकल्प हरिसंकल्प । मग आपुला कैंचा जीवसंकल्प । आतां करणें वाउगा जल्प । तरि मिथ्या

---

१ सर्व संकल्पाच्या कडेला मीं पोंचलों आहे. २ या ओवीचे अखेरचे तीन चरण दुसऱ्या पोथांत निराळे आहेत; ते असे, हरिसंकल्प माया वेद गर्जती । अठराहि पुराणें अनुवादती । संकल्पातीत अंतरात्मा ॥ २५ ॥ ३ दुसऱ्या पोथांत या चरणाबद्दल ‘ संतति संकल्प मिथ्यारूप ’ असें आहे.

विकल्प जीवत्वें ॥ ३१ ॥ जीवित्वसंकल्प निश्चयें गेला । हरिसंकल्प सहजचि जाला । त्याचा तोचि आपणाला । ठाव नाही जीवपणें ॥ ३२ ॥ तथापि जीवपण कांहीं लागलें । तऱ्ही हरिसंकल्पें चि वर्तलें । कर्म उपासना ज्ञान विवरिलें । त्रिकांड वेद प्रमाण ॥ ३३ ॥ वेदशास्त्रार्थें परमार्थ शोधिला । तों हरिसंकल्प अवघा जाला । संकल्पातीत निर्धार केला । निर्विकार निरंजन ॥ ३४ ॥ एवं पूर्वकथानुसंधान । सर्व संकल्पातीत निरंजन । सर्व संकल्पप्रान्तोस्थोहं[१] वचन । श्रुतिसमंती अनुभविलें ॥ ३५ ॥ प्रसंगें ऐका कथानक । उद्धव यादव वंशतिलक । संकल्पातीत करूनि देख । ब्रह्मशापीं रक्षिला ॥ ३६ ॥ मो उद्धव जीवसंकल्प । तोचि जाला हरिसंकल्प । संकल्पातीत केला निर्विकल्प । पूर्ण कृपा देवाची ॥ ३७ ॥ स्वयें वाळीचें शत्रुसळ । सिद्धी नेलें मिथ्या सकळ । उद्धव रक्षिला परम निर्मळ । बद्रिकाश्रमा पाठविला ॥ ३८ ॥ देऊनि शुद्ध स्वरूपज्ञान । सांगूनि सगुणभजन ध्यान । स्थापूनि मस्तकीं पादुका पूर्ण । व्यास सान्निध ठेविला ॥३९॥ तैसाचि बिभीषण चिरंजीव केला। घोर समरंगणीं अर्धींच रक्षिला । अहंसंकल्पें रावण गेला। हरिसंकल्पें राहिला भागवत[२] ॥४०॥ हरिजन उद्धव प्रल्हाद ध्रुव । भागवत राहिले निरुपद्रव । त्याचें ऐकिलें कथालाघव । संतसज्जनीं श्रोतेजनीं ॥ ४१ ॥ ह्मणोनि आधीं भागवत व्हावें । भगवत्स्वरूप विवरावें । भगवद्भजनें तरावें । संसारसागरीं ॥ ४२ ॥ संसारसिंधु श्रीगुरुअगस्ति । आचमन करिती वरदहस्तीं । हस्तकमस्तक सामर्थ्यगति । संसार निर्गति क्षारत्वें ॥ ४३ ॥ क्षार संसार गोड करिती । संत मेघमुखें वर्षती । येऱ्हवीं संसारसिंधु क्षार निश्चिती । मछमगरजीवाश्रयें ॥ ४४ ॥ स्वरूपसिंधुशुक्ति स्वाती जळ । गुरुकृपेचें परमनिर्मळ । तेथें निर्माण मुक्तपणें मुक्ताफळ। याचा पाल्हाळ वारिला शुकें ॥ ४५ ॥

---

१ परमार्थ शोधिल्यानें 'मीं सर्व संकल्पाच्या टोंकाला गेलों' असें जें श्रुतिवचन आहे त्याचा अनुभव आला. २ भगवद्भक्त बिभीषण.

मुक्तपणाची संकल्पनिवृत्ति । शुकादि मुक्त वोविले सगुणभजनगुण-तंतीं । येणें श्रवणमननें होतसे सद्गति । हे स्वात्मबोधीं समर्थी बोलिलें ॥ ४६ ॥ भगवद्वचनीं अविश्वास । तरि मग संकल्पें गर्भवास । ह्मणोन शरण जावें देवास । संकल्पनिवृत्तीकारणें ॥ ४७ ॥ शरणागताची संकल्पनिवृत्ति । करिताति स्वामी कृपामूर्ति । सद्गुरुभजनें ब्रह्मप्राप्ति । संकल्पातीत निरंजन ॥ ४८ ॥ एवं सर्व संकल्पनिवृत्तिकथन । जालें पूर्ण कथाअनुसंधान । निवृत्तिवेणी ह्मणे लीन । सद्गुरुचरणीं असावें ॥ ४९ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । सर्वसंकल्पनिवृत्तिनाम । समास बोलिला बारावा ॥ ५० ॥ समास ॥ १२ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरुस्वामी निरंजना । विश्वव्यापक पुरातना । सच्चिदानंदा स्वानंदघना । त्रिगुणमायाविलक्षण तूं ॥ १ ॥ तुझें मायायोगें वर्णन करावें । मायातीत तूं वस्तु स्वभावें । तेणें सुखें म्या निवांत असावें । कांहीं बोलावें कृपे करुनी ॥ २ ॥ विशेष संतीं केलें कृपावलोकन । ह्मणती सांगें कांहीं अध्यात्मकथन । बोलिल्या साटीं अमृतभोजन । आत्मतृप्ति जाइना ॥ ३ ॥ आतां द्वासुपर्णानिवृत्तिकथन । केलें पाहिजे निरूपण । जीवशिव पक्षी दोघेजण । काय कौतुकें अनुवादती ॥ ४ ॥ द्वासुपर्णा इति श्रुति ।

---

१ सगुणभजनरूप दोऱ्यांत शुकादि मुक्त ( ह्मणजे मोतीं ) ओविलीं. २ अमृतभोजन करून तृप्त झाल्यावर तृप्त झालों असें ह्मणण्यानें जशी तृप्ति नाहींशी होत नाहीं तद्वत् एकदां झालेली निवृत्ति कांहीं अध्यात्म भाषणानें नाहींशी होत नाहीं. ३ द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते । तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्न्यो अभिचाकशीति । मुंडकोपनिषत् ३, १, १. मित्र असलेले दोन पक्षी एकाच ( संसाररूप ) वृक्षावर बसलेले असतात. त्यांतील एक ( जीवात्मा ) त्या वृक्षाचें गोड फळ खातो ( संसारांत आसक्त होतो ) आणि दुसरा ( परमेश्वर ) तें न खातां ( अलिप्त राहून ) पहात असतो. या अर्थाचें विवेचन पुढें केलें आहे.

समर्थें सांगितली युक्ति । विचित्र कृपेची स्थिति । संत जाणती सर्वज्ञ ॥ ५ ॥ ऊर्ध्वमूलमधःशाखामाया । कोणीयेक[1] वृक्ष विराटकाया । अधोर्ध्वपक्षी बैसले तया ठाया । प्रपंची आणि परमार्थी ॥ ६ ॥ सकाम निकाम दोन्ही पक्षी । पूर्वपक्ष सिद्धांतलक्षी । त्याहूनि वेगळा अंतर-साक्षी । साक्षीभूत[2] निरंजन ॥ ७ ॥ साक्षीभूत ह्मणतां उठती संशय । स्वरूप रूपाचा पाहावा अन्वय । साक्षीभूत गगनसदृशं होय । अवस्था न होय साक्षिणी ॥ ८ ॥ एवं निरंजन निर्मळात्मा । तेथें मूळमायो-पाधि परमात्मा । गुणमायोपाधि शिवात्मा । अविद्योपाधि जीवात्मा निश्चयें ॥ ९ ॥ जीव शिव परमात्म उपाधी । निर्मळात्मा निरोपाधि । तेथें जीव शिव पक्षी देहात्मबुद्धि । मायातरुवरीं आरूढले ॥ १० ॥ शिवसुपर्ण ह्मणे रे जीवात्मया । दृष्टी घालीं परमात्मया । परमात्माहि निर्मळात्मया । आत्मदृष्टी देखतसे ॥११॥ मायोपाधि कांहीं खरी नाहीं । माया माईक जाणोनि राहीं । निराश्रितें तीं चातकें पाहीं । तथा चकोरें चंद्रस्थें ॥१२॥ तैसा स्वरूपचंद्रीं[3] स्वरूपघनीं[4] । चकोर चातकापरी तृप्त गगनीं । गगनसदृशं स्वरूप सघनीं । निर्विकल्पीं मग्न हो ॥१३॥ तुज निर्विकल्प तरूचीं फळें । आणूनि देईन मी ब्रह्मरसाळें । अविद्या वृक्षींचीं माईक फळें । दुःखकारकें भक्षूं नको ॥ १४ ॥ ऐसा बोले तो ऊर्ध्वपक्षी[5] । उत्तर देतसे अधोपक्षी[6] । भला भला रे मित्रा साक्षी । आकाशफळें[7] तूं दाविसी ॥ १५ ॥ निर्विकल्प तरूचें फळ । कल्पिलें न जाय जें केवळ । तेथील रसप्राप्ति मी सुपर्ण शबळ । कैसीं पावेन लौकरी ॥ १६ ॥ क्षुधिस्थ व्रतस्थ म्या राहावें । कौतुक तुवां दृष्टिसी पाहावें । थिर्‍या जिवित्वासी मुकावें । हे कोण्या देवें सांगीतलें ॥ १७ ॥

---

१ भगवद्गीतेच्या १५ व्या अध्यायांत वर्णिलेला संसारवृक्ष. २ जीव आणि शिव यांहून ब्रह्मस्वरूप निराळेंच आहे. ३ आत्मस्वरूपी चंद्राच्या ठिकाणीं. ४ परमात्मरूप मेघाच्या ठिकाणीं. ५ शिवात्मा. वृक्षाच्या मूळाशीं असलेला. संसार-वृक्षाचें मूळ वर आहे, आणि खांद्या खालीं आहेत. ६ जीवात्मा. खांदीवर असलेला. ७ कोरडी आशा दाखवितोस. ८ असलेल्या.

माझी दैवतें कोट्यानकोटी । असंख्य मंत्रावली शक्ती मोटी । चौऱ्यासी लक्ष योनि फळें गोमटीं । आणूनि मातें देताति ॥ १८ ॥ माझें मुख्य आराध्य दैवत ब्रह्मांडीचें । अपूज्य पूज्य लोकीं साचें । रजोगुण अधिष्ठात्रें विश्वाचें । ब्रह्मदेव या नावें ॥ १९ ॥ त्याचे कृपे मी शबल पक्षी । धर्मअर्थकाम फळें भक्षीं । तूं उगाचि मोक्षाभिमानी अंतरसाक्षी । सूक्ष्मरूपा विहंगमा ॥ २० ॥ माझे नाना मार्ग भवस्त्रीभोगें । मंत्र यंत्रादि अघोरयोगें । नाना निग्रहें हठयोगें । इच्छिलीं फळें पावतसें ॥ २१ ॥ मज काळाग्नीची क्षुधा । तृप्तता नाही कदा । भूतपंचकें कर्मबाधा । अजीर्ण मातें होतसे ॥२२॥ भोक्ता मोटा मी सुपर्ण । उरों नेदी नासकें पर्ण । नासकें विटकें समर्पण । उंच नीच न ह्मणें रे ॥२३॥ विधिनिषेध तुझ्या ठाईं । थोरपण मज कांहींच नाहीं । येकपणें मी सर्वत्र राहीं । ऐक सुक्ष्मा सुपर्णा ॥ २४ ॥ इंद्रपदाऐसीं सेवितों फळें । सर्वे चि सार्वभौमफळें वर्तुळें । चक्रवती होऊनि बळें । नाना फळें सेवितसें ॥ २५ ॥ नाना कापट्य देह तापस सुपर्ण माझे । जे अविद्यावनींचे राजे । नाना करामती अजमती दुर्मति वोजे । म्लेंछ असुर राजे सुपर्ण हे ॥२६॥ चतुर्युगीं माझा वास । कलयुगीं मोटा रहिवास । पाषांडपक्षी नाना तापस । मी च अवघे सुपर्णा ते ॥ २७ ॥ देव देवळें चुंचुबळें । लकलकां हालउनि पाडि सळें । माझी निंदा करिती ब्राह्मणकुळें निर्मळें । तीर्थी क्षत्रीं बैसोनियां॥२८॥मजसारिखा दुसरा हटी । द्वैत पक्षी नाहीं धूर्जटी । शबल आवेशें चुंचुपुटीं । विरंचिअंड[2] फोडितसें ॥ २९ ॥ ज्ञानी गरुड माझ्या कुळांतुनी भ्रष्टला । तो म्या वाहिर घातला । त्याचा बोध बंधु अरुण भ्रमों लागला । माझ्या भेणें[3] गगनामध्यें ॥३०॥ यथार्थ माझें हें बोलणें । माझीं वेदशास्त्रें पुराणें । माझ्या भेणें तारांगणें । मेरूभोंवतीं भ्रमताति ॥ ३१ ॥ तेथेंहि मी सुपर्ण व्यापक । स्वर्गलोक मृत्यलोक । पाताळलोक नाना लोक । जीव सुपर्ण सर्वा-

---

१ सूक्ष्मा. २ ब्रह्मांड. ३ अरुण सूर्याचा सारथी होऊन आकाशांत भ्रमण करितो.

मध्यें ॥३२॥ नाना परकाया प्रवेश करीं । नानापरीचीं मी सुखें घरीं । तें उगाचि बैसोनि ऊर्ध्व डाहाळीवरी । निंदा करिसी निराहारी श्वेतांगा[1] ॥३३॥ खात्यासी नखातें[2] बरवें पाहेना । लोकीं वाक्य पाहातां खरें हें ना । मित्रपणें होसी शत्रु तूं ना । गोत्रज[3] माझा निश्चयें ॥ ३४ ॥ माझी संपत्ति तुज देखवेना । माझी फळप्राप्ति तुज साहवेना । अनिवार माझी मनोभावना । देखत आलासि तूं मुळींहुनी ॥ ३५ ॥ म्यां इंद्ररूपें सेविलें अहिल्याफळ[4] । चंद्ररूपें सेविलें ताराफळ[5] । विष्णुरुपें वृंदाफळ[6] । रुद्ररूपें मोहिनी[7] ॥ ३६ ॥ कौशिकरूपें[8] सेविलीं मेनिका फळें । तपोधनें वेंचूनि सकळें । आदिपर्वींचीं[9] समूळें मूळें । ऐकोनि लोक होती पावन ॥ ३७ ॥ नाना ऋषींचीं फळेंमूळें । सांगों जातां आसढाळें । माझेंनि मिसें गोकुळीं गोपाळें । सेविलीं फळें घरोघरीं ॥ ३८ ॥ अरे[10] अरे सुपर्णा । काय बोलसी तूं परिपूर्णा । आपुलें कर्म तूं लाविसी निर्गुणा । तोंडागळ्या पांखिरा ॥ ३९ ॥ कपटरूपें फळें सेविसी । त्याचीं फळें पुण्यें सर्व चि भोगिसी । इंद्र चंद्र ऋषि मुनि तापसी । विटाळिले त्वां चांडाळा ॥ ४० ॥ मग ते ज्ञानगंगेंत सुस्नात जाले । अनुतापअग्नींत निवोनि आले । मूर्ख पाषांडी लक्षित ठेले । नदीमुळें ऋषिमुळें ॥ ४१ ॥ सुरासुरीं त्वां सेविलीं फळें । शेवट जालीं तें निर्फळें । किती बोलसी तोंडबळें । कर्मटसळें सुपर्णा ॥ ४२ ॥ ऐक चतुर्मुख तुझें मुख्य दैवत । तें नाभिकमळीं ज्याचे जन्मत । शतवर्षें उदरीं भ्रमत । नाहीं अंत लागला ॥ ४३ ॥

१ शिवात्मा स्वच्छ, निर्मळ आहे व जीवात्मा शबल, काळा, मलिन आहे; ह्मणून शिवात्म्याला श्वेतांग ह्म० स्वच्छ अंगाचा ह्मटलें आहे. २ न खातें खात्याचा मत्सर करतें ही ह्मण. ३ एका कुळांतला, संबंधी. ४ गौतम ऋषीची भार्या अहल्या. ५ देवगुरु बृहस्पतीची पत्नी. ६ अहिरावणाची पत्नी; ही रामावर अनुरक्त झाली होती. परंतु एकपत्नीव्रतामुळें तिचा स्वीकार तेव्हां न करतां कृष्णावतारीं केला. ७ (अमृत विभागणीचे वेळीं) विष्णूनें घेतलेलें स्त्रीरूप. ८ विश्वामित्र. ९ महाभारताच्या आदिपर्वांत विश्वामित्रमेनकेची कथा आहे. १० येथून पुढें शिवात्म्याचें उत्तर आहे.

नाभिकमळीं संदेहीं पडलिया अहंरूपें । निःसंदेह केलें हंसरूपें । तप तप अक्षरें ऐकोनि तपें । किती दिवस मांडिलीं ॥ ४४ ॥ मग हे सृष्टि निर्माण केली । शबलसुपर्णा तुझी डाहाळी । आतां ऊर्ध्वमूळासी तूं दृष्टि घालीं । तुझें दैवत सांगतसे ॥ ४५ ॥ तुझ्या दैवताचें तुज ज्ञान । नकळे तेणें तूं अज्ञान । मज अग्रजासी शरण येसी सज्ञान । तरी तुज विज्ञानफळ देईं ॥ ४६ ॥ इहलोक परलोक केले चतुराननें । वेद शास्त्र पुराण श्रवणें । नाना गीतार्थ अनुवादणें । अवतारमाळा देवाच्या ॥ ४७ ॥ नवविधा भक्ति चतुर्विधा मुक्ति । सद्गुरुभजनें प्राणी पावती । सलोकता समीपता स्वरूपता स्थिति । सायोज्यता मुक्ति वरिष्ठ रे ॥ ४८ ॥ मी जीव हे संकल्प । त्यावरी जाले ग्रंथकल्प । पाहतां मुळीं हरिसंकल्प । संकल्पातीत निरंजन ॥ ४९ ॥ निरंजनीं गेले मदंश सुपर्ण । ऐक पाखिरा देऊनि कर्ण । आत्महितासी करीं तूं आकर्ण । अंतःकरण घालोनियां ॥ ५० ॥ उद्धव अक्रूर जनकादिक । शुक शौनक सनकादिक । भीष्म प्रल्हाद नारदादिक । बळी सुपर्ण पाताळीं ॥ ५१ ॥ दत्त दिगंबर नाना तापसी । ज्ञाते दिगंबर संन्यासी । ऋषि महर्षि राजर्षि । देवर्षि महर्षि सुपर्ण हे ॥ ५२ ॥ भक्त रुक्मांगद धर्मांगद । नाना नळ नीळ सुग्रीव अंगद । अनंत भक्त ज्ञानी सांगतां विशदें । ग्रंथ वाढेल सुपर्णा ॥ ५३ ॥ व्यास वाल्मीक पुण्यमूर्ति । नानापरीच्या अवतारमूर्ति । नाना भूमंडळीं संतमूर्ति । सद्गुरुरूपें अवलीळा ॥ ५४ ॥ तेथें भावें शरण जावें । निजरूप आपुलें देखावें । किती ह्मणोनि सांगावें । तुजलागीं आतां ॥ ५५ ॥ उगाचि अभिमानें भरीं भरसी । सेखीं विवरविवरों तुरसी । अहं ब्रह्मेति भावें मुरसी । परब्रह्मीं सुपर्णा ॥ ५६ ॥ तूं पैरवांचें सुपर्णु । तुजहूनि माझा अधिक मानु । तुझे मायेकरितां मी परिपूर्णु । परमात्मरूप विसरलों ॥५७॥

---

१ जीवरूप पक्ष्या. २ मायावृक्षाची खांदी. ३ ब्रह्म. ४ वडील बंधु शिवात्मा. ५ ब्रह्मदेवानें. ६ माया. ७ मायेपलीकडील परब्रह्म. ८ श्रवण. ९ स्पष्ट. १० शेवटीं. ११ जीवात्मा शिवात्म्याहून लहान आहे. १२ परमेश्वर वस्तुतः परिपूर्ण असून जीवात्म्यासाठीं मायोपाधि घेतो

तुझें जीवपण म्यां हरावें । मग म्यां तां निर्गुणीं भरावें । जीव शिव द्वैत हें नुरावें । येक उरावें परमात्मरूप ॥ ५८ ॥ परमात्मयासी माझी उपाधि । तोही होईल निरुपाधि । निर्मळ ब्रह्मीं कैंची उपाधि । माया भुजंगरज्जूचा ॥ ५९ ॥ घेसील बोध मज सुपर्णाचा । तरि तूं ब्रह्मांश चि ब्रह्मींचा । नाहीं जन्ममरणप्रळयाग्नीचा । तडक तुजला बैसेल ॥ ६० ॥ तेव्हां माझें हें बोलणें । सत्य वाटेल बहुतां गुणें । आधींच वेगीं करावें धावणें । सद्गुरुचरणीं लागावें ॥ ६१ ॥ ऐसा बोले शिव सुपर्ण । शरण आला जीव सुपर्ण । जीव शिव ऐक्य जाले पूर्ण । परमात्मरूपीं मिळाले ॥ ६२ ॥ अविद्यामाया मूळमाया हरली । जीवशिव परमात्मउपाधि सरली । परब्रह्मपावनस्थिति उरली । सद्गुरुनाथउपदेशें ॥ ६३ ॥ एवं द्वासुपर्णी निवृत्तिकथन । सादर करिती जे कां श्रवण । तात्काळ होती ब्रह्मसंपन्न । निवृत्तिवेणी ह्मणताहे ॥ ६४ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । द्वासुपर्णानिवृत्तिनाम । समास बोलिला तेरावा ॥ ६५ ॥ समास ॥ १३ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय जी सद्गुरु सिद्ध कपिलमुनि । सांख्य परात्पर महामौनि । येकांतधामीं ब्रह्मसदनीं । सहजानंदवनीं समाधिस्थ तूं ॥ १ ॥ गुरु परमगुरु परात्परगुरु । विश्वव्यापक विश्वंभरु । निर्मळ निश्चळ निराकारु । गगनगर्भ सद्वस्तु ॥ २ ॥ प्रकृतिपुरुषासी तेथें अस्तु । उदयअस्तेंविण प्रशस्तु । परात्पर ते परब्रह्मवस्तु । विजयजयोस्तु आशिर्वचितां ॥ ३ ॥ प्रकृतिपुरुषें ब्रह्म करितां । जगडंबर हें ब्रह्मीं नुरितां । ईश्वरमायेची वार्ता । कोण्ही नुरवितां सांगात्रया ॥ ४ ॥ ऐसी निर्मळ निश्चळ स्थिति ।

---

१ जीव आहे ह्मणून शिव आहे. जीव नाहींसा झाला ह्मणजे शिवालाही ठिकाण नाहीं च. दोघेहि निर्गुण ब्रह्मांत मिळून जातात. २ जीव खरोखर उपाधि टाकल्यावर ब्रह्मरूपच आहे. ३ हा बोध सर्वांनींच हृत्पटलावर कोरून ठेवण्यासारखा आहे. ४ हें सर्व उपदेशाचें सार होय. ५ विजयी हो, असा हा आशीर्वाद देतांच.

तेथें साधनें असाध्य होती । तद्रूपत्वें तुमची प्राप्ति । पिंड ब्रह्मांड सारूनियां ॥ ५ ॥ आतां अभ्यासयोगनिवृत्तिलक्षण । विशद करावें निरूपण । ऐकोन कृपासागर पूर्ण । उचंबळती स्वानंदें ॥ ६ ॥ तेथें संत स्वानंदभोक्ते । प्रसंगें परमामृतवक्ते । विरक्त योगी गुणसंपन्न श्रोते । परमानंदें सादर ॥ ७ ॥ अष्टांगयोगनिवृत्तिकथन । उभयपक्षीं केलें निरूपण । प्रथम अभ्यासयोग कर्मबंधन । सोहं आत्मा लक्षण दुसरें ॥ ८ ॥ स्वर्गकामें[1] यज्ञकर्में । पुनरावृत्ति[2] पावती नेमें । पुढिले समासीं ब्रह्मकर्में । विशद स्वधर्में सांगीतलीं ॥ ९ ॥ कर्मामध्यें मुख्य सत्कर्में । भक्ति ज्ञान वैराग्यें स्वधर्में । मागील समासीं यथानुक्रमें । विशद वर्मे निरोपिलीं ॥ १० ॥ अभ्यासयोगनिवृत्तिवर्म । अष्टांगयोगनिवृत्तिधर्म । ज्ञानयोगें स्वरूपवर्म । विशद अनुक्रमें ऐकावें ॥ ११ ॥ योगाभ्यासीं कर्मबंधें । वायोधारणी पवनछंदें । प्राणायाम साधूनि परमानंदें । सुक्षम नादा वरपडे ॥ १२ ॥ सोहं आत्मा स्वानंदघन । सहजानंद पुरातन । तेथें वापुडें पिंडज्ञान । तत्वज्ञानही कोणेकडे ॥ १३ ॥ ह्मणती शाब्दिक तुमचें ब्रह्मज्ञान । आमुचें देखणें प्रत्यक्ष ध्यान । तरि यद्दृष्टं[3] तन्नष्टं वेदप्रमाण । अप्रमाण कोण करी ॥ १४ ॥ ब्रह्मीं शब्द जाये शब्दार्थ राहे । ब्रह्मीं देखणें जाय ब्रह्म राहे । ब्रह्मीं ब्रह्मांड लया जाय । पिंडज्ञानी काळवंचनी ॥ १५ ॥ पिंड करावा जतन । तेव्हां योगियांचें ध्यान । पिंडोसी होय ना कां पतन । ब्रह्मज्ञान ढळेना ॥ १६ ॥ सूर्याकरितां मृगजळ । हेलावलें जैसें तुंबळ । तैसें सर्वेश्वरीं दृश्य सकळ । निरावलंबीं अवलंबलें ॥ १७ ॥ परब्रह्मीं नाहीं दुजेपण । तेथें देखणें देखेल कोण । आत्मा

---

१ स्वर्ग आहे फळ ( काम ) ज्याचें अशा कर्मानें. २ ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं। क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशन्ति । एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभन्ते । भ. गी. ९,२१. मुंडकोपनिषदांतही असेंच ह्मटलें आहे. इष्टापूर्तं मन्यमाना वरिष्ठं नान्यच्छ्रेयो वेदयन्ते प्रमूढाः । नाकस्य पृष्ठे ते सुकृतेऽनुभूत्वेमं लोकं हीनतरं वा विशंति ॥ १, २, १०. ३ जें दिसतें तें नष्ट होतें. ४ योग्याहून ब्रह्मज्ञानी श्रेष्ठ हें तात्पर्य.

ग्रंथ संग्रहालय नं. ... ता. ... क्र. ...

वायु चंचळ गुण । समाधिलक्षण हें नव्हे ॥ १८ ॥ आत्मा वायु गगनीं विरे । लवणसिंधूंत जळबिंदु नुरे । देखणें देखूनि योगी[1] जीवपणें उरे । बरें पाहणें विवेकें ॥ १९ ॥ ह्मणती जीवपण आमुचें गेलें । ब्रह्मरंध्रीं ऐक्य जालें । संतीं केवळ निर्धारिलें । येकदेशी समाधिसुख ॥ २० ॥ योगसमाधि देहभाव जाती । योगमार्गें योगी फिरती । नानालावण्यरूपें धरिती । ब्रह्मसमाधि अरूप ॥२१॥ ब्रह्मयोगसमाधि परम पावन । आधीं करावें सगुणमूर्तिध्यान । सगुणध्यानें मूर्तिध्यान । संतसंगें अनुभविजे ॥ २२ ॥ संतसंगेंविण समाधियोग । तो योग नव्हे वियोग । उगाचि शरीराचा भोग । काळवंचन समाधि ॥ २३ ॥ सहजींसहज स्वरूपसमाधि । हे खूण कांहीं शोधीं आधीं । जेथें योगाभ्यासांगउपाधि । निरसोनि जाय निर्धारें ॥ २४ ॥ कैसें अभ्यासयोगनिवृत्तिकथन । सांगा स्वामी निरोपण । ऐक योगाभ्यासांगलक्षण । नाना शास्त्रीं बोलिलें ॥ २५ ॥ आधारीं[2] लिंगीं[3] नाभी[4] हृदईं[5] । तालुमूलीं[6] ललाटीं[7] भृठाई[8] । ब्रह्मांडीं ब्रह्मरंध्रीं[9] ऐक्यसमई । षड[10] चक्र धारणा[11] योगियां ॥ २६ ॥ आहार निद्रा इंद्रियधर्म । शनै शनै लोपूनि ब्रह्मकर्म । हळुहळु त्यागूनि आश्रमधर्म । शरीर सूक्ष्म करिताती ॥ २७ ॥ आसनें[12] जय प्राणायाम[13] । अनिवार आंवरूनि[14] मनोधर्म ।

---

१ योगी ब्रह्माला पहातो; पण ब्रह्मज्ञानी ब्रह्मच होतो. 'ब्रह्मविदाप्नोति परम्' तै. उ, २११. २ मूलाधारचक्रांत (हें गुदाजवळ असतें). ३ या ठिकाणीं (शिवणीजवळ) स्वाधिष्ठानचक्र असतें. ४ नाभीजवळ मणिपूरचक्रांत. ५ हृदयाजवळच्या अनाहतचक्रांत. ६ तालूच्या जवळील बलवान् नामक चक्रांत. ७ अमृतचक्र. ८ भ्रू. येथें आज्ञाचक्र असतें. ९ मस्तकाच्या कवचीच्या मध्यावर, १० यांपैकीं सहा चक्रें मुख्य मानिलीं आहेत. ११ देशबंधश्चित्तस्य धारणा । अशी पतंजलीनें धारणेची व्याख्या केली आहे. वर सांगितलेल्या चक्रांवर अनुक्रमें चित्ताच्या वृत्तींची स्थापना करणें याला धारणा ह्मणतात. १२ 'स्थिर सुखमासनम्' अशी पातंजलसूत्रांत आसनाची व्याख्या दिली आहे. ज्याच्या योगानें शरीराला कंप न होतां सुख होईल अशा स्थितीला आसन ह्मणतात. हीं आसनें पुष्कळ असून त्यांत पद्मासन, सिंहासन, इत्यादि मुख्य आहेत. हीं आसनें सिद्ध केल्यानें योग सुलभ होतो. १३ 'श्वासप्रश्वासयोर्गतिविच्छेदः प्राणायामः' बाहेरच्या वायूला आंत जाऊं न देणें व आंतल्याला बाहेर येऊं न देणें ह्मणजे प्राणायाम; हाच कुंभक होय. १३ 'योगश्चित्तवृत्तिनिरोधः' या सूत्राला अनुसरून मनाच्या वृत्ति प्रतिबद्ध होणें योगांत अवश्यच होय.

लक्षमुद्रा[1] धरूनि नित्यनेम । प्रणव[2] सिद्ध करिताति ॥ २८ ॥ मग प्राणा[3]पाना करूनि भेटी । अधोर्ध्वमार्गें वृत्ति उफराटी । मीनमार्गें भेदूनि भृकुटी । ब्रह्मरंध्रीं पावले ॥ २९ ॥ कुंडलिनीशक्तीच्या उर्ध्वबळें । सेत्रावीचीं[4] स्रवती अमृतजळें । चंद्रसूर्य[5] मिळती ऐक्यमेळें । वायोबळें मन चक्षू ॥३०॥ मन पवन येकवट जाले । षड्चक्रें भेदूनि गेले । देहीं देहभाव सहजचि राहिले । काळ[6] वंचिले योगींद्रें ॥ ३१ ॥ काळवंचन नाहीं केलें । चित्त चैतन्यीं मेळविलें । समाधि उच्चाटण नाहीं जालें । ह्मणजे बरे योगींद्र ॥ ३२ ॥ आधीं देहकोठार शुद्ध केलें । पापपुरुष काढोनि जाळिले । नानापरीचे अपघात रक्षिले । ह्मणजे बरे योगींद्र ॥३३॥ वायोधारणीं योगाभ्यासीं । योगींद्र पडले या सायासीं । आत्मा नेती ब्रह्मांडासी । ब्रह्मरंध्रीं निर्धारें ॥ ३४ ॥ आत्मा नेती आत्मा उतरिती । ब्रह्मीं मात्र कहीं हे पावती । गगनसदृशं खं ब्रह्म लक्षिती । नेती उतरिती प्रभंजन ॥३५॥ वायो नीट गेला तरी गेला । नाहीं तरी फुटोनि निघाला । योगाभ्यासाचा गलबला । येणें रितीं दुर्गम ॥ ३६ ॥ श्रोते ह्मणती जी दुर्गम खरें । नाना हठयोग काळवंचनविचारें । आतां राजयोग सहजस्थितिप्रकारें । सुगमोपाय सांगा जी ॥ ३७ ॥ ऐका सुगम सहज अजपाज्ञान । येकाग्र होऊनि पाहावें ध्यान । धरितां सोडितां प्रभंजन[7] । सोहं सोहं शब्द हे ॥ ३८ ॥ देहधारक मात्र प्राणी । स्वासोस्वासेंवीण नाहीं कोण्ही । ऐसी अजपा पूर्णपणीं ।

---

१ योगाभ्यास करतांना ठेवण्याची शरीराची एक विशिष्ट स्थिति. या मुद्रा, महामुद्रा, महाबंध, महावेध, खेचरी, उड्डियान, मूलबंध, जालंधरबंध, विपरीत करणी, वज्रोली आणि शक्तिचालन अशा दहा आहेत. २ ‘तस्य वाचकःप्रणवः’ प्रणव ह्मणजे ओंकार हा परमेश्वराचा वाचक होय. ३ ‘अपाने जुव्हति प्राणं प्राणापानं तथाऽपरे’ या गीतावचनाप्रमाणें. ४ जीवनकलेचीं. ५ इडा व पिंगला या नाड्या ( डावी व उजवी नाकपुडी ). ६ चित्त ब्रह्मरूप झालें नाहीं तर योग ह्मणजे कालाचा अपव्यय होय. ७ वायु. श्वासोच्छ्वास करितांना सोहं असा शब्द होतो हाच अजपा जप होय. दा. बो. १७,५ पहा.

पिंडीं ब्रह्मांडीं पुरवली ॥ ३९ ॥ येकवीस सहस्त्र साहाशें जप । सोहं अजपेचें स्वरूप । यथानुक्रमें कथितों अल्पस्वल्प । श्रोतेजनीं परिसावें ॥ ४० ॥ आधारीं होतो साहा शतें जप । लिंगीं होतो साहा सहस्त्र जप । नाभीं हृदयीं मिळोनि समान जप । अठरा सहस्त्र साहा शतें ॥ ४१ ॥ कंठीं भृकुटीं ब्रह्मरंध्रीं । तीन सहस्त्र जप समान समग्रीं । येकविस सहस्त्र साहा शतें जप सामग्री । अनुक्रमें घटिका ऐकिजे ॥४२॥ आधारीं दोनि घटिका चाळीस पळें । लिंगीं सोळा घटिका चाळीस पळें । नाभीं सोळा घटिका तितुकींच पळें । हृदईं संख्या नाभीपरी ॥ ४३ ॥ दोनि दोनि घटिका चाळीस पळें । कंठीं भृकुटीं वायो खेळे । दोन घटिका ब्रह्मरंध्रमेळें । स्वासोस्वासें वर्ततसे ॥ ४४ ॥ एवं छपन्न घटिका दोनशें चाळीस पळें । मिळोन साटी घटका अहोरात्रें मेळें । आत्मा वायो स्वासोस्वासमेळें । चक्रवाडी फिरताहे ॥ ४५ ॥ सोहं सोहं तो मी तो मी । अजपानादें अंतर्यामीं । सहजसमाधि आत्मयारामीं । बावन मात्रा[2] कुरवंडिती ॥ ४६ ॥ च्यारी मात्रा आधारचक्रीं । साहा दाहा मात्रा लिंगनाभिचक्रीं । द्वादश षोडश हृदयकंठचक्रीं । दोनी दोनी भृकुटीं ब्रह्मरंध्रीं ॥ ४७ ॥ एवं आसनें घालोनि संख्या करावी । गणना मनामध्यें आणावी । अर्धमात्रा हे बावंनावी । ब्रह्मरंध्रीं नांदतसे ॥ ४८ ॥ ते सत्रावी जीवनकळा । जे ब्रह्मविद्येचा जिव्हाळा । सहस्त्रदळकमळ कल्पित लीळा । शास्त्रकार बोलती ॥४९॥ गणपति ब्रह्मा विष्णु शिव । जीवात्मा परमात्मा गुरुदेव । मूळाधारापासूनि सर्व । योगमार्गें प्रतिष्ठिले ॥ ५० ॥ चक्रें कमळें दैवतें तत्वें । कल्पूनि नेमिलीं समस्तें । पिंडीं प्रचित पाहा आधिदैवतें । ब्रह्मांडींचीं निर्धारिलीं ॥ ५१ ॥ मूळाधारचक्रीं गणपति दैवत । चतुर्दळकमळीं पृथ्वीतत्व । स्वाधिष्ठानचक्रीं विष्णुसुत । षडदळकमळीं आपतत्वीं

---

१ दर मिनिटास निरोगी माणसाचे १५ श्वासोच्छ्वास होतात. ह्मणजे प्रत्यहीं १५×६०×२४=२१६०० वेळां सोहं असा जप होतो. २ अक्षरें.

॥ ५२ ॥ मणिपूरचक्रीं विष्णु आपण । दशदळकमळीं तेजतत्व जाण । अनहतचक्रीं रुद्रदेव पूर्ण । द्वादशदळकमळीं तत्व वायु ॥ ५३ ॥ विशुद्धचक्रीं जीवात्मा दैवत । षोडशदळकमळीं आकाश तत्व । आज्ञाचक्रीं परमात्मा नित्य । द्विदळकमळीं मनतत्व माया ॥ ५४ ॥ ब्रह्मरंध्रीं गुरुदेव दैवत । सहस्रदळकमळ परिपूर्ण भरित । योगाभ्यासीं योगमार्ग धरित । येणें पंथें वायुबळें ॥ ५५ ॥ नाना बळें नाना कमळें । प्रचित पाहावी विवेकबळें । कल्पित जाणावीं सकळें । नाना कमळें सृष्टिमध्यें ॥ ५६ ॥ शिरकमळें नेत्रकमळें । मुखकमळें हृदयकमळें । करकमळें पदकमळें । नाभिकमळें विष्णूचीं ॥ ५७ ॥ कमळाकार भलतें कल्पिलें । तरि काय तें कमळचि जालें । ब्रह्मकमळीं ब्रह्मांड बोलिलें । इछारूप माया कमळाकृति ॥ ५८ ॥ नाना वर्ण नाना स्थिति । नाना तत्वरूप कमळें असती । नाना कमळें कल्पनावृत्ति । संत जाणती सर्वज्ञ ॥ ५९ ॥ एवं शास्त्रगर्भींचें ब्रह्मांडकथन । निरोपिलें हें पिंडज्ञान । सोहं सोहं अजपा प्रमाण । आत्मप्रचित शास्त्रार्थें ॥ ६० ॥ सहज सांडूनि सायासयोग[1] । जन्मांतरींचा कर्मभोग । सद्गुरुकृपें ज्ञानयोग । सोहं आत्मा निर्धारें ॥ ६१ ॥ स्वात्मबोधीं समर्थें सांगीतलें । अजपानिरूपण पूर्ण केलें । सोहंभावें प्रत्यया आलें । आत्मनिवेदन गुरुपदीं ॥ ६२ ॥ सद्गुरुवचन मनीं धरी । तो ममपण सांडूनि आत्मा वरी । आत्माराम तो चराचरीं । संत सर्वज्ञ जाणती ॥ ६३ ॥ हृदईं असतां आत्माराम । पाहातें पाहाणें गेला भ्रम । साध्य होतां साधनधर्म । सद्गुरुपदीं हारपले ॥ ६४ ॥ ह्मणाल योगाभ्यास काय देवें उडविले । बापा कठिण मार्ग योगींद्रें क्रमिले । सुगमपंथ असतां शुद्ध मोकळे । शबळाकडे कासया वेधावें ॥ ६५ ॥ नाना मनोजयाकारणें । अभ्यासयोग[2] लागे करणें । राजविद्या राजयोग अगत्य वरणें ।

१ वर वर्णिलेला हठयोग. २ प्राणायामादि योग. असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलं । अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते । भ. गी. ६।३५

भगवद्गीतेसीं सांगीतलें ॥ ६६ ॥ भक्तियोगाची बरोबरी । योगाभ्यास न पवे सरी । गीता भागवत श्रवण चतुरीं । केलें असेल निर्धारें ॥६७॥ तथापि पूर्वी योगी जाले । सूर्यमंडळ भेदूनि गेले । देवलोकीं वृत्तिरूपें राहिले । सायोज्य पावले कल्पांतीं ॥ ६८ ॥ ज्ञानयोगासी कांहीं उपयोगीं । युगानयुगी जाले योगी । परि निवृत्ति बाणली पाहिजे आंगीं । नाहीं तरी हें बरें न्हे ॥ ६९ ॥ भागवतीं निरोपिलें भगवंतें । सिद्धि छळों येति योगपंथें । नाना भावना काम्यकर्मपंथें । ध्यान धारणा विक्षेपा ॥ ७० ॥ नाना बहुरूपी वायो साधिती । चिरकाळें माहाराज ह्मणोन त्यागें मागति । योगी पाकनिष्पत्ति जाली नाहीं वो ह्मणती । बहुताकाळें स्त्रीयेसी ॥ ७१ ॥ किती ह्मणोनि हें बोलावें । सर्वां सर्वत्र ठाउकें स्वभावें । योगभ्रष्टें जन्मासि यावें । मग पावन व्हावें परब्रह्मीं ॥ ७२ ॥ बहूनां जन्मनां अंतीं । योगभ्रष्ट पावे भगवंतीं । ज्ञानयोगें होतां निवृत्ति । निवृत्तिपद लाधलें ॥ ७३ ॥ एवं अंतरीं पाहिजे निवृत्ति । करावी श्रीसद्गुरुभक्ति । सारासारविचारें सद्गति । विलंब नाहीं निर्धारें ॥ ७४ ॥ काशासाटीं वायु न्यावा वर्ता । वेगीं आत्मसाधनीं प्रवर्ता । वायुचक्रकर्मगर्ता । पडणीं न पडावें चिरकाळें ॥ ७५ ॥ करणेंचि असेल योगाभ्यास । तरि अवश्य करणें अभ्यास । ज्याचें कर्म त्याचें त्यास । आमुचें काय वेचलें ॥ ७६ ॥ ऐका स्वामी कोण्ही एक योगाभ्यासी । गुज सांगतसे शिष्यासी । आत्मा नेतों मी ब्रह्मांडासी । शरीर माझें रक्षावें ॥ ७७ ॥ ह्मणे चिंता करूं नका माझी । कांता सौभाग्यवती माझी । कांहीं दिवसें समाधि माझी । देहात्मबुद्धि येईल ॥ ७८ ॥ नवल योगाभ्याससमाधि । चुकली नाहीं देहात्मबुद्धि । पुढें काय वर्तलें ते

---

१ योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना । श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ भ. गी. ६/४७. २ भिक्षा. ३ अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् । भ. गी. ६/४५; बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान्मां प्रपद्यते । ७/१९. ४ योग्याला अनेक जन्मानीं भगवत्प्राप्ति होते; पण ज्ञानी भक्ताला ताबडतोब होते.

विबुधीं । संतसज्जनीं ऐकावें ॥ ७९ ॥ येकांतीं स्त्रियेसी सांगीतलें । संकल्परूप ध्यान धरिलें । मग गोसावियाहीं केलें । वायोप्रयाण समाधि ॥ ८० ॥ दीर्घप्रयाण[1] ह्मणती शिष्य । जवळि नाहीं कोण्हीं सत्शिष्य[2] । मिळाले ब्राह्मण उत्तरविधीस[3] । कोणाचेंही नायकती ॥ ८१ ॥ स्त्रीबुद्धि कोण्ही न मानिती । ब्राह्मण कार्यासी प्रवर्तों ह्मणती । देह-प्रारब्धें कोण्हाप्रति । कोणें शब्द ठेवावा ॥ ८२ ॥ सजीव आत्मा ब्रह्मांडीं होता । मग सूज्ञ ब्राह्मणीं नाहीं केली चिंता । कर्मणोगति गहन तत्वता । ह्मणोनि सत्कर्मकर्मे आचरावीं ॥ ८३ ॥ पुढें गोसावि-याचा गुंतला हेत । योगें काळांतरें वायोचक्रीं भ्रमत । शुचिश्रीमंत घरें धुंडित । स्वप्नीं बोलत रागें जाउनी ॥ ८४ ॥ ह्मणे रे असत्शिष्या मूर्खा । कोठें गेला होतासि तूं शतमूर्खा । जन्म घेणें लागलें देखा । समाधि देहकाळें विसर्जिलें ॥ ८५ ॥ ह्मणोनि स्वप्न दाविलें शिष्यासी । शिष्य शरण येउनि पुसे संतांसी । संत ह्मणती सद्गुरुपाशीं । पुस याचा गुह्यार्थ रे ॥ ८६ ॥ सद्गुरुनाथजीसी विचारिलें । देवें पिंड ब्रह्मांड अवघें निर्शिलें । ज्ञानविवेकें मिथ्या केलें । मिथ्या भान मायेचें ॥ ८७ ॥ मायामिथ्याभान उडोनि जाये । तेथें देहसमा-धि कैंची राहे । दश देह ब्रह्मीं निरसोनि पाहें । सत्शिष्य सहज समाधि ॥ ८८ ॥ सहज समाधि परब्रह्मीं । तेथें राहिलें तो मी तो मी । सोहं हंसा सारूनि ब्रह्मीं । ब्रह्मीं ब्रह्मचि निर्धारें ॥ ८९ ॥ यम नियम प्राणायाम । प्रत्याहार इंद्रियधर्म । आसन मुद्रा ध्यान धारणा परम । अष्टांग योग संपले ॥ ९० ॥ एवं अभ्यासयोग-निवृत्तिकथन । अष्टांगयोगी आला शरण । कर्म कर्ता कार्य कारण । सद्गुरुचरणीं वोवाळिलें ॥ ९१ ॥ निवृत्तिवेणीच्या समर्थें । योगी बोधिले परमार्थें । ऐशी कथा सुखस्वार्थें । संतसज्जन ऐकती ॥ ९२ ॥

---

१ मृत्यु. २ जाणता शिष्य. ३ योगी मृत्यु पावला असें समजून मंडळी त्या तयारीला लागली.

इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । अभ्यासयोग निवृत्ति नाम । समास बोलिला चौदावा ॥ ९३ ॥ समास ॥ १४ ॥

---

## श्रीरामकर्ता

जय जय जी सद्गुरु दक्षदमना । जय जय मायाआवर्तहुताशना । जय जय ज्ञानाग्निकर्मदहना । परम गहना यज्ञमूर्ति ॥ १ ॥ तुमचे निजकृपे संतमूर्ति । खुणे पावले पुण्यकीर्ति । ब्रह्मार्पण कर्मे तुह्मी आदिमूर्ति । निष्कामफळ देतसां ॥ २ ॥ सकाम स्वर्गाकडे लोक । शबळ बळें चालिले निःशंक । माझें चित्त निश्चयात्मक । निजात्मकबुद्धि श्रीचरणीं ॥ ३ ॥ कर्म उपासना सगुणभजन । ब्रह्मज्ञानें ब्रह्मसंपन्न । श्रुतिसंमतशास्त्रदर्शन । निःकामभजन गुरुकृपें ॥ ४ ॥ आत्मलाभेंविण कथा । नावडे ती श्रीगुरुसमर्था । वेदांत सिद्धांत मतें पाहतां । निर्गुणब्रह्म प्रतिपाद्य ॥ ५ ॥ निःकामभजनें चित्त आराम । मन करावें आत्माराम । ह्मणोनि सद्गुरु स्वानंदधाम । विनति केली श्रीचरणीं ॥ ६ ॥ आतां स्वर्गकामाची निवृत्ति कैसी । समर्थे सांगीजे अह्मासी । ऐकोनि कृपार्णवें मानसीं । उचंबळिजे स्वानंदें ॥ ७ ॥ ऐक कर्मामध्यें ब्रह्मकर्म । ब्रह्मकर्म हें स्वधर्म । स्वधर्म सांडोनि अधर्म । धर्मअर्थकाममोक्षादि ॥ ८ ॥ धर्म ह्मणिजे स्वात्मधर्म । अर्थ ह्मणिजे परमार्थवर्म । काम[1] ह्मणिजे निःकामकर्म । मोक्ष परब्रह्म निर्धारें ॥ ९ ॥ ज्योतिष्टें[2] होमादि स्वर्गभोग । स्वर्गभोगें भवोपसर्ग । भवोपसर्गें भवरोग । पुनरावृत्ति मागुती ॥ १० ॥ ब्राह्मणाचे मुख्यधर्म । ब्रह्म जानाति ब्राह्मण स्वधर्म । स्वधर्म ह्मणिजे स्वरूप धर्म । सांभाळिला पाहिजे ॥ ११ ॥ तथापि यज्ञादिक कर्मे । सुखें करणें असेल स्वधर्मे । तरी निःकामबुद्धीनें सत्कर्मे । केलीं पाहिजे अवश्य ॥ १२ ॥ निःकामबुद्धीनें कर्म करिता । तरी ईश्वरें[3] दक्ष कां निंदिता । कर्माभिमानें भरीं भरतां । अजत्व वदनीं ठाकलें ॥ १३ ॥ मी ब्राह्मण दक्ष प्रजापति । ह्मणतां कोपली आदिशक्ति[4] ।

---

१ कर्म. २ ज्योतिष्टोम वगैरे यज्ञ. ३ शंकर. ४ शंकराची स्त्री सती.

षडगुणसंपन्न आदिमूर्ति । न कळे तयासी निर्धारें ॥ १४ ॥ मग सत्वगुणाचें शुद्ध सत्व । प्रगट जालें महत्तत्व । महद्भूत परमात्मा भगवंत । तेणें दक्ष उद्धरिला ॥ १५ ॥ मग कर्मांगकर्मीं आज्ञापिला । अजत्ववदनीं अजत्व पावला । अजरामर अमृतरूप जाला । मोक्ष संपन्न केला ईश्वरीं ॥ १६ ॥ मोक्ष ह्मणिजे अमृत । अमृत ह्मणजे नाहीं मृत्य । अमर पावती मृत्युपंथ । त्यातें मोक्षअमृत ह्मणों नये ॥ १७ ॥ अपूर्णकामें पूर्णकाम । अमर भरतखंडीं मागती जन्म । ह्मणोनि कर्मभूमीसी करावें सत्कर्म । सद तें ब्रह्म विवरावें ॥ १८ ॥ ब्रह्मज्ञानें विरक्त होउनी । अखंड रहावें भगवद्भजनीं । ईश्वर ऐसा शूळपाणी । विष्णुस्मरणीं सर्वदां ॥ १९ ॥ पशुमांलभ स्वर्गकामीं[1] । क्षीणेपुण्ये[2] कर्मभूमी[3] । प्राप्त होती जन्मकर्मीं । पशुहत्या निरसावया ॥ २० ॥ बाळहत्यारा पशु अश्वत्थामा । द्रौपदी पुढें बांधोनि आणिला साउमा । कृष्ण ह्मणे मारीं नरवीरोत्तमा । सदय परमा सोडवी द्रौपदी ॥ २१ ॥ अपराधी पशु भागवत[4] न मारिती । मा[5] निरापराधी वेदबळें[6] केवी अवदानिती[7] । पशु अवघे येउनि उभे ठाकती । स्वर्गलोकीं टोंचिती लोहशृंगें ॥ २२ ॥ पुराणसंमती नारदोक्तकथन । मिथ्या नव्हे निरोपण । सकामकर्में पावती पतन । नहुष सर्प पुराणीं ॥ २३ ॥ ययातीतें लोटून दिधलें । त्रिशंकूतें अंतरिक्ष धरिलें । नाना कुचिर्ध[8] देवांत वर्तलें । देव दुरूनि वंदावे ॥ २४ ॥ अवदानें[9] घ्यावया सिद्ध होती । सांगोपांगकर्मीं[10] व्यंगाव्यंग पाहाती । विधिविधानीं अपभ्रंश करिती । स्वर्गीहूनि देति ढकलूनियां ॥ २५ ॥ श्रुति करिती यज्ञस्तवनें । हविर्द्रव्यें करिती रुदनें । मग विरक्त होऊनि ब्राह्मणें । ब्राह्मण आरण[11] आरंभिलें ॥ २६ ॥ पृथुरायें यज्ञ केले ।

---

1 स्वर्गाची इच्छा करणारा ( यज्ञांत ) पशूला कापितो. २ पुण्य संपलें ह्मणजे. ३ मृत्युलोकास. ४ भक्त. ५ मग. ६ वेदांत सांगितलें आहे एवढ्यावरून. ७ कापितील. ८ दुर्बुद्धि. ९ यज्ञांतील हविर्भाग. १० सर्वांगांनीं पूर्ण झालेल्या. ११ वेदान्त ज्ञान.

नव्याण्णौ यज्ञ पूर्ण जाले । शतमख होतां इंद्रें नेले । शामकर्ण चोरूनियां ॥ २७ ॥ नाना पाषांडें केलीं । नाना बंडें उठविलीं । नाना कर्में सृष्टींत चालिलीं । ब्रह्मकर्मविध्वंसनें ॥ २८ ॥ देवें समजाविला पृथुराजा । शरण गेला अनंतभुजा । परमानंदें आत्मकाजा । स्वर्ग आनंदा विसरला ॥ २९ ॥ अपुर्ण कर्म देवासी वावें । परि पूर्णकर्में इंद्र न व्हावें । अपूर्ण पूर्ण होईल स्वभावें । जैसें शाकपत्र द्रौपदीचें ॥ ३० ॥ ह्मणोनि स्वर्गसुख तें केवळ्याचें । धन्य भाग्य पृथुवैन्याचें । पद लाधलें विष्णूचें । सच्चिदानंद सनातन ॥ ३१ ॥ सनकादिक जयाचे घरीं । निरंतर राहिले सौख्यकारी । स्वर्गसुखासि ब्रह्मसाक्षात्कारीं । वांकुल्या दाविती कौतुकें ॥ ३२ ॥ नारदादिक जेथें कीर्तनीं । महानुभाव तापसी सिद्धमुनि । कैलासीं ऐकोनि शूळपाणि । भागवतधर्में निवाला ॥ ३३ ॥ राज्यभार प्रधानप्रकृतीकडे । आपण अखंडस्वरूपाकडे । अर्चनभक्ति करितां वाडें कोडें । स्वर्गकामें पृथु कुरवंडितो ॥ ३४ ॥ ऐसीच बळीची कथा । वामन अवतारीं तत्वता । स्वर्गकाम निवृत्तिपंथा । त्रिपथगामिनी आणिली ॥ ३५ ॥ ज्याचे भक्तिसी देव वामन । ज्याचे दानोदकें भेदी गगन । ज्याचेनि वचनें पावला बंधन । नामें बंधनें तोडी जो ॥ ३६ ॥ ज्याचे द्वारीं देव याचकपणें । ज्यातें भेऊनि कपटी होणें । ज्याचेनि निष्टें शुक्रें तेणें । नेत्रकमळ वाहिलें देवासी ॥ ३७ ॥ ज्याचे धर्में धर्म लाजे । ज्याचेनि कर्में कर्म साजे । ज्याचे सभेसी रावण वोजे । विस्मय पावला चिरकाळें ॥ ३८ ॥ अभेद ब्रह्म होईल ह्मणउनी । न्याय भेद करी गौतममुनि । परि तो आत्मनिवेदनीं । अभेद भजनीं सर्वदा ॥ ३९ ॥ एवं महाबळी सुतळभुवनीं । स्वर्गकामाची निवृत्ति करुनि । महावैष्णव अध्यात्म खाणी । आत्मनिवेदनीं आराम ॥ ४० ॥ ह्मणाल बळि बैसेल इंद्रपदीं । वशिष्ट बैसेल

---

१ शंभर यज्ञ पूर्ण झाले आहेत ज्याचे असा. २ यज्ञिय अश्व. ३ वाहावें, अर्पण करावें. ४ वेनराजाचा पुत्र पृथुराजा. ५ सचिवाकडे. ६ स्वर्गाची इच्छा. ७ निष्ठेमुळें.

ब्रह्मपदीं । नानादेव ऋषि बैसती नाना पदीं । तरि निवृत्ति कैशी बाणली ॥४१॥ अहो ब्रह्मार्पणकर्मे केलीं । ईश्वरें नाना पदें दिधलीं । जैसी जनकें भोगिलि शुकें त्यागिलीं । भोगी त्यागी उदासीन हे ॥४२॥ भोगीं त्यागीं उदासीन ।जनक शुक योगींद्र जाण । सकामकर्में पाविजे पतन । निःकाम-भजनकरावें ॥४३॥ ह्मणाल निःकाम काम तरि काम । कामेंविण घडेना निःकाम । अहो निःकाम नव्हे स्वर्गकाम । स्वर्गकाम क्षणभंगुर ॥४४॥ उत्तरमीमांसक व्यासमुनि । पूर्व मीमांसक शिष्य जयमिनी । श्री गुरु वचन निःकाम जनी । शिष्यवचन सकाम ॥ ४५ ॥ व्यासें जयमिनी भारत बुडविलें । नाना काम्यकर्म संतीं उडविलें । महाभारत देवें रक्षिलें । भगवद्गीतार्थ प्रगटावया ॥ ४६ ॥ स्वर्गसुख उरेना कल्पांतीं । येक राहेल स्वरूपस्थिति । हरिः ॐ अध्यनें निश्चिती । कोण्हीयेकें करावीं ॥ ४७ ॥ नाना षोडश महावाक्यें विवरतां । अहं ब्रह्मास्मि वस्तु तत्वता । तेथें कैंची स्वर्गकाम कथा । ब्रह्मवृंद ब्राह्मण जाणती ॥४८॥ ह्मणोनि स्वर्गभोगीं विटे मन । आत्माराम सनातन । गीता भागवत पुराण श्रवण । संतसज्जन निर्धारिती ॥४९॥ तथापि स्वर्ग कामाची निवृत्ति । जरी अद्यापिहि न होय मनोवृत्ति । तरि केलीं कर्में प्राणी पावति । आमुचें काय गेलें हो ॥ ५० ॥ शुद्ध शबल कर्म धर्म सीमा । अधिकार परत्वें लाभे महिमा । परमपुरुष आत्मयारामा । सद्गुरुकृपे-विण न पाविजे ॥५१॥ ऐका योगवाशिष्ट येकांती । रघुनाथजी आपण ऐकती । तव वशिष्ट हांसिले कौतुक देखती । श्रीरामरायें अक्षेपिलें ॥ ५२ ॥ स्वामी हांसावया काय कारण । रामा पाहें हें कृष्ण कीटक आपण । चवदावेळ इंद्र होउन । पादछेदन पावलें ॥ ५३ ॥ मागुनि जातसे लवडसवडी । पुढें गेलें कृष्णकीटक तांतडी । ऐशा जीवाच्या होती जन्म कोडि । आत्म स्वरूप नेणतां ॥५४॥ हांसावया हें चि कारण ।

---

१ यावदधिकारमवस्थितिराधिकारिणाम् । या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें ते आपला अधिकार चालवितात. त्यांत आसक्ति ठेवीत नाहींत. २ वेदांतसूत्रांचा कर्ता व्यास. ३ अहं ब्रह्मास्मि, तत्वमसि, इत्यादि जीवब्रह्माचें ऐक्य प्रतिपादणारीं सोळा वाक्यें. पुढें समास २१ ओंव्या ६२–७० पहा.

केलें स्वर्गकामनिवृत्तिकथन । शतमख इंद्र कीटक आर्पण । मी जीव या संकल्पें ॥ ५५ ॥ ह्मणोनि जीवपण त्यागावें । तत्वें तत्व विभागावें । अहं आत्मा हें स्वभावें । शिष्यप्रश्नेत्रकेवलं ॥ ५६ ॥ ऐसें बोले सद्गुरु[1] मोक्षपाणि । ऐकोनि सुखें गुणरत्न खाणि । लीलाविग्रही कोदंडपाणि[2] । सद्गुरुचरणीं विनटला ॥ ५७ ॥ तेथें इतरांचा कोण पाड । श्रीरामकथा चरित्र गोड । स्वर्गकाम कथा निवाड । अध्यात्मयोगें सांगीतली ॥ ५८ ॥ सद्गुरु वेगळी नाही[3] गति । ऐसें संत महंत बोलती । वेद शास्त्र पुराण संमती । ह्माचि अनुवादती वाक्यार्थु ॥ ५९ ॥ नाना सदय दयबुद्ध जाला । कलयुगीं अवतार[4] घेतला । ज्ञानयोगें उद्धार केला । जपयज्ञ करविला संकीर्तनी ॥ ६० ॥ कलौ कीर्तनीं नाम वरिष्ट । नाना युगीं यज्ञकर्मश्रेष्ट । कलौ धन्या कवि स्पष्ट । बोलोनि गेले निर्धारें ॥ ६१ ॥ ह्मणाल बौद्धमतें तुह्मी बोलिलें । ब्राह्मणासी विरुद्ध जालें । अहो ब्राह्मण्य येथें प्रतिष्ठिलें । भगवद्भजन निःकामता ॥ ६२ ॥ श्रीराम तारक ब्रह्म नामें । रामकृष्णादि जन्मकर्में । श्रवण करितां जन्मकर्मे । प्राणियांचीं निवारती ॥ ६३ ॥ नाम घेतां आत्माराम । पंचभूतादि माया अराम । अरामरामीं स्वानंदधाम । तद्धाम परम पाविजे ॥ ६४ ॥ आपस्तंभें वेदीं[5] स्वर्गमानंदा । वर्णन केलें परमानंदा । परमानंदा ब्रह्मानंदा । नाना आनंद वोवाळिले ॥ ६५ ॥ भृगुसी वारुणी[6] उपदेश । अन्न प्राण मन विज्ञान आनंद कोश । ये काढूनि येक विशेष । संत सर्वज्ञ जाणती ॥ ६६ ॥ निवृत्तिवेणी विनवी संता । ऐसी स्वर्ग काम निवृत्तिकथा । न्यून पूर्ण ग्रंथ भावर्था । श्रोतीं क्षमा करावें ॥ ६७ ॥ इति श्री निवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । स्वर्गकामनिवृत्ति नाम । समास बोलिला पंधरावा ॥ ६८ ॥ समास ॥ १५

---

१ वसिष्ठऋषि. २ राम. ३ सद्गुरु वांचोनि सांपडेना सोय । तुका०; इ० ४ श्रीसमर्थरूप. ५ यजुर्वेदाच्या तैत्तिरीय शाखेंत. ६ तैत्तिरीयोपनिषदाच्या भृगुवल्य ध्यायांत वरुणाचा पुत्र भृगु यानें पित्याला 'मला ब्रह्म शिकवा' असें सांगितल्यावरून पित्यानें त्याला पायरी पायरीनें अन्नापासून आनंदापर्यंत आणून पोंचविलें असें वर्णन आहे.

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु सुगंध संत मलयानिल । मधुमास वसंत अनंत निर्मळ । नाना त्रिताप शमन बुद्धि कोकिळ । कुंजे[1] वैखरी स्वानंदें ॥ १ ॥ जय जय सद्गुरु स्वानंदजीवन[2] । भवार्कमाध्यान्हताप निर्शन[3] । नाना रवेंदु[4] जीमूत[5] घन दर्शन । चातक चकोर चक्रवाक बर्ही[6] ॥२॥ जय जय सद्गुरु ब्रह्म गगन । तुजमाजि विराला अहं पवन[7] । नाना मनोविहंगमा[8] उल्लंघन । न करवेचि खं ब्रह्मीं ॥३॥ जय जय सद्गुरु ब्रह्म निराकार । तुज माजि ईश्वर मायेचा आकार । अनंत गोळ विस्तार । औदुंबरें ब्रह्मांडें ॥ ४ ॥ जय जय सद्गुरु आदिपुरुष । निर्विकल्प निराभास । ब्रह्मगोळरचना सावकाश । माया योगें विस्तारली ॥ ५ ॥ आतां ब्रह्मगोळनिवृत्तिकथन । केलें पाहिजे निरूपण । संत साधु विद्वज्जन । अनुसंधानीं तत्पर ॥ ६ ॥ श्रोते ह्मणती जी सर्वज्ञ । सांगा ब्रह्मगोळ निवृत्तिकथन । वक्ते वग्तृत्वें सावधान । ब्रह्मगोळ निवृत्ति बोलावया ॥ ७ ॥ ब्रह्मीं ब्रह्मगोळ कैसे जाले । निवृत्तियोग कैसे पावले । क्षीर नीर निवडिती भले । राजहंस योगींद्र ॥ ८ ॥ शाखा चंद्रमसीति[9] न्यायें । दशमस्त्वे[10] असि उपायें । नाना सृष्टिक्रम व्यतिरेक अन्वयें । निवृत्ति ब्रह्म अनुभविजे ॥ ९ ॥ ऐक परब्रह्म निर्मळ निश्चळ । तेथें मिथ्यामाया प्रपंच खेळ । अष्टधा प्रकृति दृश्य समूळ । शुद्ध शबळ विस्तार हा ॥ १० ॥ ब्रह्म निर्गुण निरंजन । तेथें मिथ्या मायेसि

---

१ गायन करी. २ ब्रह्मानंदरूप जल. ३ संसाररूप सूर्याच्या भर दोनप्रहरच्या प्रखरतेचें निवारण करणारा. ४ रवींदु; सूर्य, चंद्र. ५ मेघ ६ मोर. सूर्य, चंद्र, पर्जन्य आणि मेघ दर्शन यानीं अनुक्रमें चक्रवाक, चकोर, चातक, आणि मोर यांना आनंद होतो. ७ अहंकाररूप वायु ब्रह्मरूप आकाशांत सद्गुरुकृपेनें विरून जातो. ८ जीवनरूप पक्ष्यांना. ९ चंद्र वस्तुतः फार दूर असून व्यवहारांत तो झाडाच्या खांदीपाशीं आहे असें ह्मणतों. त्याप्रमाणें कांहीं तरी उपाधीच्या साहाय्यानेंच ब्रह्माचा निर्देश करावा लागतो. १० दहा जण एकत्र बसले असतां त्यांची गणना करतांना मोजणारा आपल्याला वगळून नऊच मोजतो. तेव्हां ‘ अरे तूं स्वतः दहावा ’ असें त्याला सांगावें लागतें.

कर्ता कोण । मायोपाधि ईश्वर आपण । महाकारण कर्तुत्वें ॥ ११ ॥ ब्रह्म निर्गुण पुरातन । तेथें शुद्धसत्व ईश्वर आपण । ईश्वरापासूनि तिन्ही गुण । गुणापासूनि पंचभूतें ॥ १२ ॥ परब्रह्म असतां निर्गुण । तेथें अहंब्रह्म ईश्वर सगुण । महद्भूत अंतरात्मा पूर्ण । षड्गुणसंपन्न जगदीश्वरु ॥ १३ ॥ परब्रह्मीं कांहीं कर्तुत्व नाहीं । कर्तुत्व अवघें ईश्वरीं पाहीं । ईश्वरीं पाहातां कर्तुत्व नाहीं । कर्तुत्व अवघें मायेचें ॥ १४ ॥ माया नाहीं स्वतंत्र । तियेसी निर्मिता सर्वेश्वर । परब्रह्म वस्तु निर्विकार । वेदांत शास्त्र प्रतिपाद्य ॥ १५ ॥ एवं परब्रह्म निर्गुण निरंजन । तेथें मायोपाधि ईश्वरत्व पूर्ण । माहाकारण मूळमाया आपण । नेळणीं[1] ब्रह्मा प्रसवली ॥ १६ ॥ ब्रह्मा सृष्टि निर्माणकर्ता । विष्णु जाणोनि प्रतिपाळिता । शंकर नेणूनि संहारिता । सृष्टि मिथ्या ह्मणोनियां ॥ १७ ॥ उत्पत्ति स्थिति संहार तें । सर्वेचि पुन्हा उत्पन्न होतें । ईश्वरसत्ते अवघें वर्ततें । त्रिगुण आणि पंचभूत ॥ १८ ॥ आकाशापासूनि पवन । पवनापासूनि अग्न । अग्नि पासूनि जीवन । जीवनापासूनि भूगोळ॥१९॥ एवं गगनासारिखें ब्रह्म अखंड । तेथें मूळमायोपाधि ब्रह्मांड । विरंचीनें[2] निर्मिलें अंड । ईश्वरसत्ते उभारलें ॥ २० ॥ अनंत ब्रह्मांडें बोलती । ईश्वरमायेची विचित्र गति । सामर्थ्यावरी गोष्टी येती । मिथ्या कोण ह्मणेल ॥ २१ ॥ छपन्नकोटी[3] गोळ विस्तीर्ण । भोवतें घातलें कुंचका[4]-वर्ण । आवर्णापरतें ब्रह्म निर्गुण । येथून तेथवरी दाटलें ॥ २२ ॥ उदक आळोनि[5] भूगोळ केला । दडपण[6] मेरु मध्यें ठेविला । दिग्गजांच्या[7] माथां दिधला । शेप आधार पाताळीं ॥ २३ ॥ मुख्य मेरु मध्यपीठीं । भोंवती मही पन्नासकोटी । सप्तद्वीपापरती दाटी । लोकालोक[8] पर्व-

१ कमलिनी. २ ब्रह्मदेवानें. ३ ही आकाशांतील तेजोगोलांची संख्या. ४ कंचुकावरण. कंवचीसारखें झांकण. ५ घट्ट करून. ६ वजन. ७ ऐरावत, पुंडरीक, वामन, कुमुद, अंजन, सुप्रतीक, सार्वभौम, आणि पुष्पदंत असे आठ हत्ती आठ दिशांना पृथ्वीला धारण करीत असतात, अशी कल्पना आहे. ८ हा पर्वत पृथ्वीभोंवतीं असलेल्या समुद्रांपैकीं [illegible] पाण्याच्या समुद्राच्या पलीकडे असून प्रकाश व काळोख यांची मर्यादा झालेला आहे.

ताची ॥ २४ ॥ ब्रह्मीं खगोळ छपन्नकोटी । नानाशास्त्रीं शास्त्रगोष्टी । प्रचीत पाहावी आत्मदृष्टि । शास्त्रें पुराणें प्रत्ययें ॥ २५ ॥ खमध्य मेरु खमध्य लंका । शास्त्रांशास्त्रां विरोध देखा । रविचक्र भ्रमण भिन्न भिन्न लोकां । अस्त उदय भिन्न ॥ २६ ॥ नानापुराणीं भूगोळरचना । कल्पपरत्वें नाना कल्पना । नाना ऋषींची नाना भावना । सत्य मिथ्या ह्मणों नये ॥ २७ ॥ असो पंचाशत कोटि गोळ विस्तीर्ण । पूर्व पश्चिम उत्तर दक्षण । मध्यें मेरु विशाळ गगनें[1] । चुंबित कितेक योजनें ॥२८॥ भूगोळ समर्थें सांगीतला । समर्थकृपें मागुती बोलिला । मेरु आवर्त विस्तार ऐकिला । पाहिजे श्रोतीं ॥ २९ ॥ मेरू वरते सर्वही देव । ब्रह्मा विष्णु महादेव । आदिपुरुष देवादिदेव । सर्वांतरीं नांदतसे ॥ ३० ॥ तिहीं देवाहूनि ईश्वर भिन्न । तरिहरिहराचें कां हो स्तवन । अहो ईश्वरचि त्रिगुणांशें आपण । हरिहरविधि अवतरला ॥ ३१ ॥ हरिहराचें करितां स्तवन । मूळ पुरुषासी पावलें जाण । मूळ पुरुष तोचि आपण । हरिहरविधि निर्धारें ॥ ३२ ॥ मेरु ह्मणजे मध्य नाभ । तेथें नांदती हिरण्यगर्भ । आदिपुरुष मूळारंभ । आत्माराम चिंतिती ॥ ३३ ॥ पिंडब्रह्मांडऐक्य पाहती । ब्रह्मांडीं तेंचि पिंडीं ह्मणती । माया ब्रह्म ईश्वरस्थिति । पिंडब्रह्मांडऐक्यता ॥ ३४ ॥ पिंडीं पंचभूतें ब्रह्मांडीं पंचभूतें । पिंडीं जीवेश्वर सर्वेश्वर तेथें । पिंडीं ब्रह्मांडीं परब्रह्म तें । सर्वीं सर्वत्र व्यापक ॥ ३५ ॥ एवं मेरू माथां विधिहरिहर । मेरू वेष्टित सुरासुर । मेरू भोंवते खाणि विस्तार । धरामर[2] धरणीवरी ॥ ३६ ॥ अतळें[3] वितळें सुतळें । तळातळें महातळें पाताळें । अवघ्या खालतीं रसातळें । भगवंताचीं तळघरें ॥ ३७ ॥ मयें मायासुर हटकेश्वर । बळी दानव वासुगी विषधर । अवघिया खालता संकर्षण ईश्वर । सहस्त्रफणी[4] भगवंत हा ॥ ३८ ॥

---

१ 'गहन । गगनचुंबित,' असा पाठ दुसऱ्या पोथींत आहे. २ ब्राह्मण. ३ अतळ, वितळ वगैरे जे एका खालचे एक लोक, तेथें मय, मायासुर इत्यादि अनुक्रमें आहेत. ४ शेष.

ईश्वर अंशें भूगोळ धरिला । मस्तकमणिवरी परमाणु[1] ठेविला । येक-विस स्वर्गें भार त्याला । कांहींच नाही ॥ ३९ ॥ काळचक्र ज्योतिश्चक्र । शैशुमारचक्र कुंडलिनीचक्र । वायोचक्र ईश्वरीचक्र । मेरू भोंवतें भ्रमताहे ॥ ४० ॥ चंद्र सूर्य तारांगणें । ध्रुवा[2] वेष्टित करिती भ्रमणें । संख्या बोलिती पुराणें । योजनसंख्या परियसा ॥ ४१ ॥ लक्ष योजनें सूर्यमंडळ । दोनि लक्ष चंद्रमंडळ । दोनि दोनि लक्ष ग्रहमंडळ । शुक्र बुध मंगळ बृहस्पति ॥ ४२ ॥ शनि वरता अवघ्यांहूनी । राहो केतु खालता सूर्याहूनी । मध्यें सूर्य आत्मा प्रकाशक[3] अवनि । त्रैमयी त्रिगुणी भगवंत हा ॥ ४३ ॥ रवि खालते[4] दाहासहस्र योजन । नाना पिशाच भूतगण । यक्ष राक्षस सिद्ध चारण । शत योजनें मेघमाळा ॥ ४४ ॥ सप्त ऋषि शनीवर्ते । अकरालक्ष योजन पर्ते । तेरा लक्ष योजन अर्ते । ध्रुव लक्षिती विष्णुपदें ॥ ४५ ॥ विष्णुपदी ह्मणजे पादुकास्थान । ध्रुवा वर्ते तेरालक्ष योजन । भूमी पासूनि संख्या लक्षण । छत्तीस लक्ष योजनें ॥ ४६ ॥ भूर्लोक भुवर्लोक स्वर्लोक । महर्लोक जनलोक तपोलोक । सत्यलोक ह्मणिजे ब्रह्मलोक । वैकुंठ कैलास मेरू वर्ते ॥ ४७ ॥ मेरूवर्ती नाना शृंगें । नवरत्नांची माहा अभंगें । मेरूवेष्टित अंतरंगें । नाना ह्रद तुंबळले ॥ ४८ ॥ मेरूवर्ती नाना वनें । नाना नद्या नाना जीवनें । पूर्व पश्चम उत्तर दक्षण । नाना लोक दाटले ॥ ४९ ॥ इंद्र अग्नि यम नैर्ऋत्य वरुण । वायुदेव कुबेर ईशान । सेना संपत्ति विराजमान । अष्ट दिक्पाळ अष्टेदिशे ॥ ५० ॥ मेरू आधारें च्यारी पर्वत असती । दाहा दाहा सहस्र योजन दिसती । जंवू कदंब आम्रवृक्ष वसती । सहस्र योजनें गिरि-माथां ॥ ५१ ॥ नाना स्वर्ग संपत्ति वर्णवेना । नारायणाची गुण वर्णना । अनंतकोटिब्रह्मांडनायक जाणा । ब्रह्मांडकटाह विदारी

---

१ एवढा भूगोल पण शेषाला केवळ परमाणुसारखा वाटतो. २ ध्रुव ह्मणजे खगोलाच्या आंसाचें टोंक असल्यामुळें त्याभोंवतीं सर्व विश्व फिरतें आहे असें वाटतें. ३ पृथ्वीवर प्रकाश पाडणारा. ४ तळीं.

॥ ५२ ॥ तेथूनि त्रिपथगामिनी गंगा निघाली । भोगावती गेली पाताळी । मंदाकिनी राहिली स्वर्गमंडळीं । गंगा चंद्रमौळि धरीतसे ॥ ५३ ॥ एवं मेरूवर्ते पडे आवर्णोदक । जें त्रिविक्रम[1] पदींचें गंगोदक । जेथें सदाशिव वोढवी मस्तक । च्यारी वोघ गेले चहूं दिशे ॥५४॥ सीता माळिनी भद्रा गंगा । चौथी अलकनंदा गंगा । जे कां जंबुद्वीपीं दक्षण भागा । भगीरथ प्रेत्नें भागीरथी ॥ ५४ ॥ मेरू भोवतें इळावर्त खंड । जेथें भवानीशंकर देव अखंड । भोंवती जंबुनदी महा प्रचंड । तेथें जांबुनंद[2] सुवर्ण उत्पन्न ॥ ५५ ॥ जंबुद्वीप हें नवखंड । मेरु वेष्टित उमावनखंड । त्या इळावर्ता वेष्टित उदंड । अष्ट खंडें अनुक्रमें ॥५६॥ जंबु प्लक्ष शाल्मलद्वीप । कुश क्रौंच शाकद्वीप । पुष्कर सातवें श्वेत द्वीप । जेथें शेषशयनीं नारायण ॥ ५७ ॥ प्लक्षापासुनि सात सात खंडें । सात पंचे पंचतीस खंडें । नाना पर्वतशिखरें उदंडें । नानानद्या खंड खंडीं ॥ ५८ पुष्करद्वीप उभय खंड । मध्यें मानसोत्तरगिरि प्रचंड । जेथें उगवतो मार्तंड । सूर्य चक्षु जनाचा ॥ ५९ ॥ नाना सरिता कुळाचळ[3] । सप्त सिंधु परिघ तुंबळ । सप्त द्वीपीं वेष्टिले प्रबळ । जंबुद्विपीं लवणाब्धि ॥६०॥ जंबुद्वीपीं क्षारोदकसिंधु । पुष्करद्वीपीं शुद्धोदक सिंधु । मध्यें पांच द्वीपीं पांच सिंधु । दधि मधु युक्षु[4] आज्य दुग्धें ॥ ६१ ॥ येकाहून येक लक्ष द्विगुण । सप्तसिंधुपरिघे जाण । मध्यें धरणी विशाळ विस्तीर्ण । द्विगुणें द्विगुण द्वीपांतरीं ॥ ६२ ॥ पुढें तेजोभूमि लोकालोक[6] पर्वत । तेथूनि गाढांधकार धरा अंत । ब्रह्मगोळ ब्रह्मकटाह संख्या समस्त । छपन्नकोटी योजनें ॥ ६३ ॥ छपन्न कोटी ब्रह्मगोळ । पन्नास कोटी मध्य भूगोळ । साहा कोटी कटाह गोळ । ब्रह्मांड संख्या पुराणीं ॥ ६४ ॥ ब्रह्मांडाभोंवतीं कंचुकावर्णें । जळाग्नि[5] वायु शून्यावर्णें । अहंकार महत्तत्व सप्तावर्णें । परब्रह्म तेथूनि

---

१ वामन. २ जंबुनदींत सांपडणारें सोनें. ३ कुलपर्वत. महेंद्र, मलय, सह्य, शुक्तिमान, ऋक्ष, विंध्य आणि पारियात्र हीं त्या पर्वतांचीं नावें होत. ४ इक्षु, उंसाचा रस. ५ घेर. ६ मागें ८९ पाना वरील टीप पहा.

पैलीकडे ॥ ६५ ॥ परब्रह्म ह्मणिजे परात्पर दुरी । अंशें ब्रह्म ब्रह्मांडोदरीं । तया विमळाची सरी । द्यावया दुजें दिसेना ॥ ६६ ॥ ब्रह्मगोळ सांगावया हेंचि कारण । अनंत गोळ व्यापूनि ब्रह्मपूर्ण । ब्रह्मनिष्ठ ब्रह्मवृंद ब्राह्मण । ब्रह्माकार अखंडित ॥ ६७ ॥ पिंडीं आत्माअनात्मा विवेक करिती । ब्रह्मांडीं सारासारविचार पाहाती । निर्गुणब्रह्मीं मिळोनि जाती । ब्रह्माकार योगींद्र ॥ ६८ ॥ ब्रह्माकार होणें जाणें । वाच्यांश[1] लक्षांश अनुवादणें । जैसा सिद्धांत साधाया कारणें । पूर्वपक्ष मांडिती शास्त्रज्ञ ॥ ६९ ॥ एवं ईश्वरें ब्रह्मांड केलें । श्रवणें जन पावन जाले । ब्रह्मांडा वेगळें निर्धारिलें । ईश्वरस्वरूप निर्धारें ॥ ७० ॥ पंचभूतिक ब्रह्मगोळ । त्रिगुणमायारूप सकळ । अष्टधा प्रकृति दृश्य समूळ । ईश्वर साक्षी वेगळा ॥ ७१ ॥ ब्रह्मांडकर्ता ईश्वर सगुण । ईश्वरा परतें ब्रह्म निर्गुण । निर्मळ निश्चळ जैसें गगन । संत सर्वज्ञ जाणती ॥ ७२ ॥ ईश्वरा परतें परब्रह्म ह्मणतां । ईश्वर मायोपाधि काल्पितां । ईश्वर परब्रह्म कां तत्वता । ह्मणों नये गुरुदेवें ॥ ७३ ॥ अहो ईश्वर आहे मायोपाधि । परब्रह्म आहे निरोपाधि । निरसल्यां ईश्वराची उपाधि । ईश्वर ब्रह्म सनातन ॥ ७४ ॥ ईश्वर आहे सर्वज्ञपणें । ब्रह्मीं जाणणें ना नेणणें । करूनि अकर्ता ईश्वर ह्मणणें । करणें न करणें ब्रह्मीं नाहीं ॥ ७५ ॥ ईश्वरीं मायाअवलंब आहे । निरावलंब ब्रह्म पाहें । सगुणआधारें निर्गुण लाहे । भाविकजनास निर्धारें ॥७६॥ हरिसंकल्प उपासना । उपासना पाववी निरंजना । भिन्नाभिन्न मनोभावना । द्वैताद्वैत सर्वेश्वरीं ॥ ७७ ॥ सर्वेश्वराचें निजरूप वर्म । निर्मळ निश्चळ परब्रह्म । नाना तद्धाम परमं[2] मम । भगवद्गीतेंसी बोलिलें ॥७८॥ एवं सिद्धांत जैसा पूर्वपक्षीं । तैसा ईश्वर मायासाक्षी । द्वासुपर्णा जीवशिव पक्षी । प्रकृतियोगें सर्वेश्वरीं ॥ ७९ ॥ प्रकृति असतां विवेक केले । विवेकप्रळय होउनि गेले । ब्रह्मगोळ असतांचि नाहीं जाले ।

---

१ तूं ब्रह्म च आहेस इत्यादि महावाक्यांचा अर्थ. २ तें (ब्रह्मस्वरूप) माझें उच्च स्थान होय. भ. गी. १५/६

सद्गुरुनाथ प्रतापें ॥ ८० ॥ दृश्य द्रष्टा दर्शन सरलें । गगन सदृशं ब्रह्म उरलें । पाहातें पाहणें हारपोनि गेलें । अनिर्वाच्य निजवस्तु ॥ ८१ ॥ संत सज्जन श्रोतेजन । जालें ह्मणती समाधान । मायातीत निरंजन । सद्गुरुकृपे अनुभविलें ॥ ८३ ॥ सद्गुरुचरणीं निवृत्तिवेणी । स्वरूप सिंधूमाजि मिळणी । ब्रह्मगोळभूगोळअध्यात्मश्रवणीं । सद्गुरुकृपे विराली ॥ ८४ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । ब्रह्मगोळ-निवृत्तिकथनं नाम । समासबोलिला सोळावा ॥८५॥ समास ॥ १६ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जयाजी परमपुरुषा । परात्पर परा देवाधीशा । सद्गुरुनाथ श्रीसर्वेशा । सृष्टिक्रमनिवृत्ति सांगाजी ॥ १ ॥ श्रोते ह्मणती जी विच-क्षण । सांगिजे सृष्टिक्रमनिवृत्तिलक्षण । निवृत्तिमार्गें ब्रह्म निर्गुण । सद्गुरुकृपे विवरावें ॥ २ ॥ विष्णुपदीं कित्तेक लक्ष योजनें । भागवतीं बोलिलीं विष्णुस्थानें । सर्वं[1] विष्णुमयं वचनें । सद्गुरुकृपें अनुभविजे ॥ ३ ॥ अवर्णापरतें ब्रह्म ह्मणावें । लोकीं तेथें कैसें जावें । घट मठ व्यापक ब्रह्म स्वभावें । निजपद देखावें सन्निध ॥ ४ ॥ सन्निध देव देखिल्यावरी । सृष्टिक्रमासी न उरे उरी[2] । अथवा सृष्टिक्रम उपसंहारीं[3] । परब्रह्म पावावें ॥ ५ ॥ स्वर्गासुखा वर्पडे[4] न व्हावें । काम्य कर्मीं न लिंपावें । निवृत्ति ब्रह्मीं मिळोनि जावें । ऐसा योग सांगाजी ॥ ६ ॥ काम्यकर्में जे जे करिती । ते ते स्वर्गावरुते चढती । क्षीणे पुण्ये[5] पतन पावती । सार्वकाश[6] भूमीतें ॥ ७ ॥ ह्मणोनि सद्गुरुनाथीं शरण जावें । निष्कर्म[7] कर्म आचरावें । आत्माराम होऊनि राहावें । मग पतन न घडे कल्पांतीं ॥ ८ ॥ यज्ञमूर्ति विष्णु शबल जाला । स्वर्गकामें मोक्ष

---

१ हें सर्व ( विश्व ) विष्णु मय आहे. २ थारा. ३ सृष्टिक्रमाचें निरसन झाल्यावर. ४ लुब्ध. ५ क्षीणे पुण्ये मर्त्य लोके विशंति । या भग० वचनाप्रमाणें. ६ यथाक्रम. ७ ‘ निष्काम ’ असा पाठ दुसऱ्या पोथींत आहे. अर्थ एक च. भक्त झाल्याबर देखील निष्काम कर्मांची अवश्यकता आहे असें गिरिधर सांगत आहेत.

दाविला । हंसरूपें विधि उपदेशिला । शुद्धमोक्ष दिधला स्वरूपीं ॥ ९ ॥ पुष्पितौ[1] वाणी देवांची[2] । निष्फळा फळदायक कर्माची । निष्कामकर्में परब्रह्माची । वाट सांगे भगवद्गीता[3] ॥ १० ॥ सत्वस्थ प्राणी ऊर्ध्वमुखें चढती । राजस प्राणी मध्यस्थ राहती । तामस प्राणी अधोगति । त्रिगुण गुणाची सृष्टि हे[4] ॥ ११ ॥ शुद्धसत्वीं केवळ ब्रह्मों भावना । ते सकामकर्में मानीतना । सनकादिक ज्ञानी नाना । निवृत्तिपंथें चालिले ॥ १२ ॥ निवृत्तिमार्गें कोण कोण गेले । निवृत्तियोग कोण कोण पावले । निवृत्ति ब्रह्मीं कोण मिळाले । कृपाकरूनि सांगाजी ॥ १३ ॥ नाना मतीं भेद नाना । नाना विस्तारली कल्पना । कल्पना माया मिथ्या जाणा । सत्यब्रह्म तें विवरावें ॥ १४ ॥ शुद्ध कल्पनेचा स्वार्थ । अद्वैत ब्रह्मीचा निश्चितार्थ । स्वात्मबोधीं स्वामी समर्थ । बोलिले वाक्यें ॥ १५ ॥ वेद शास्त्रें पुराणें सांगती । अद्वैत ब्रह्म निश्चितार्थ करिती । येकें ब्रह्म द्वितीय नास्ति ह्मणती[5] । तेंचि देवें विवरावें ॥ १६ ॥ ऐसे बोलती सूज्ञ श्रोते । उत्तर देती संत वक्ते । निवृत्तिराम ग्रंथ कथे । सादर व्हावें सर्वज्ञ हो ॥१७॥ धन्य धन्य तुमची ब्रह्मी भावना । सृष्टिक्रमीं कोठें लिंपेना । तुमच्या प्रश्नें इतरजना । पावन केलें ॥ १८ ॥ आतां सृष्टिक्रम[6] तुह्मीं ऐकावे । सृष्टिक्रमीं बरें विवरावें । मग सृष्टिक्रमांतीं स्वभावें । परब्रह्म अखंडित ॥ १९ ॥ ह्मणाल परब्रह्म आह्मी अपेक्षिलें । सृष्टिक्रम कां आरंभिलें । अहो सृष्टिक्रम हें निरोपिलें । परब्रह्मीं पावावया ॥ २० ॥ नाना सृष्टिक्रमीं मन गुंतलें । तेथूनि पाहिजे मन निघालें । ह्मणोनि सृष्टिक्रम हें विवरिलें । पाहिजे श्रोतीं ॥ २१ ॥ सृष्टिक्रमी ज्ञानी जाले । सृष्टिक्रमा बाहेरि गेले । सद्गुरुनाथें

---

१ मोहक. २ वेदाची असें असावें काय? ३ 'निष्काम कर्मानें परब्रह्माची वाट गीता सांगते ' असें सांगून समर्थ शिष्य गिरिधरानीं तिलककृत गीतारहस्याची जणूं पूर्वं तयारीच केली ह्मणावयाची. ४ ऊर्ध्वं गच्छन्ति सत्वस्था मध्ये तिष्ठन्ति राजसाः । जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छन्ति तामसाः ॥ भ. गी. ( $\frac{१४}{१८}$ ). ५ एकमेवाद्वितीयम् ।. ६ दा. बो. १२।६ पहा.

मुक्त केले । सारासारविचारें ॥ २२ ॥ श्रोते ह्मणती जी बहु बरें । सृष्टिक्रम सांगिजे विस्तारें । पुढें नित्यानित्यविवेक विचारें । निवृत्ति ब्रह्म अनुभविजे ॥ २३ ॥ सांगा सृष्टिक्रम कैसे जाले । निवृत्तिपंथें कोण कोण गेले । अनुक्रमें सांगोनि द्यावें भलें । निवृत्ति ब्रह्मी पावावया ॥ २४ ॥ ऐका शुद्धशबललक्षण । नानाग्रंथीं केलें निरूपण । नाना वेदशास्त्रपुराण । गीता भागवतसंमतीं ॥ २५ ॥ शुद्ध राजसी भक्तिमार्गी । शुद्ध सात्विकीं ज्ञानमार्गी । शुद्ध तामसी वीतरागी । प्रथमसृष्टि निर्माण ॥ २६ ॥ शुद्ध सत्व साभिमानी होती । त्यापासूनि चालेना उत्पत्ति । ब्रह्मयापासूनि ज्ञानी प्रगटती । ब्रह्मयास सांगती सज्ञान ॥ २७ ॥ शबळ रजोगुणाचें अंग । मग चाले सृष्टीचा प्रसंग । शुद्धशबलसंग निःसंग । सृष्टीमध्यें वर्ततसे ॥ २८ ॥ नाना कर्दमापासूनि सृष्टिकर्दम । नाना दक्षापासूनि यज्ञदीक्षा धर्म । नाना कश्यपां पासूनि देवदैत्यवर्म । मनु पासूनि मानवी ॥ २९ ॥ नाना उपब्रह्में प्रजापति । नानापरीची वंशसंतति । नाना सृष्टिविस्तार भागवतीं । नाना पुराणें बोलिलीं ॥ ३० ॥ कर्दम मुनीचे कपिल मुनि । ब्रह्मनिष्ट ब्रह्मज्ञानी । कर्दमीं आकाश अलिप्त अवनि । तैसे कर्दमा वेगळे ॥ ३१ ॥ प्रजापतिपोटीं सनत्कुमार । प्रजाहीन त्यांसी व्यवहार । मायादधि मथुनि वेती ब्रह्मसार । असार संसार दृश्य हें ॥ ३२ ॥ दक्ष आपुले कर्मी दक्ष । अत्रि दुर्वास सत्यपक्ष । दत्त दिगंबर अंतरसाक्ष । आकाशपंथें विचरती ॥ ३३ ॥ किती सांगावा विस्तार । अनंत माया चराचर । कळायासाठीं विचार । अल्प संकेत बोलिला ॥ ३४ ॥ नारद नारायण सनातन । ब्रह्मदेवाचें संतान । मनूपासूनि प्रजाजन । मनुसृष्टि विस्तारली ॥ ३५ ॥ मनु शतरूपा ब्रह्म सावित्री । शारदा अभिलाषीं उत्पन्न गात्रीं । देहविसर्जनीं कौतुक नेत्रीं । ब्रह्मदेवें दाखविलें ॥ ३६ ॥ ब्रह्मदेव देव सर्वज्ञ । प्रपंच परमार्थी सावधान । सृष्टिक्रमाचा बोळला पूर्ण । नाना मनुभेद प्रगट करी ॥ ३७ ॥ स्वायंभव स्वारोचस उत्तम तामस । रैवत चाक्षुष वैवस्वत वास । पुढें सप्त सावर्ण

मनु वेदव्यास । बोलूनि गेले पुराणीं ॥ ३८ ॥ सूर्यसावर्ण ब्रह्मसावर्ण । ऋषिसावर्ण धर्मसावर्ण । देवसावर्ण रुद्रसावर्ण । इंद्रसावर्ण मनु चौदावा ॥ ३९ ॥ दैनंदिन प्रळयाप्रति । चौदा मनु इंद्र होऊनि जाती । त्यांत स्वायंभवमनुसंतति । भागवतधर्में ऐका जी ॥ ४० ॥ मनु उत्तानपाद ध्रुव वैन्यकिती । मनु प्रियव्रत[1] अग्निध्रादि संतति । दोनी वंश-विस्तार भागवतीं । मेरु आवर्त सांगीतले[2] ॥ ४१ ॥ स्वायंभव मनु प्रथम जाला । सप्त द्वीपींचा अधिपत्य केला । भागवतीं हा विस्तार कथिला । तोचि आतां ऐकाजी ॥ ४२ ॥ मनूपासुनि प्रियव्रत । प्रतिसूर्य गगनीं असे तपत । रात्रि दिवा सिंधु परिघ करित । अंधकार न ठेवी दृष्टी-पुढें ॥ ४३ ॥ ऐसा प्रियव्रत प्रतापी । प्रतिसूर्य भासे स्वरूपीं । अखंड राहे स्वस्वरूपीं । पुण्यश्लोक धर्मात्मा ॥ ४४ ॥ न करी योगयाग व्रतें दानें । कृतायुगीं मुक्त ईश्वरध्यानें । भागवतधर्में अनुसंधानें । भगवद्भजनीं तत्पर ॥ ४५ ॥ आत्मव्रतीं प्रियव्रत । म्हणोनि नामें तो प्रियव्रत । धन्य साधु जे कां प्रियव्रत । आत्मव्रतीं तत्पर हो ॥ ४६ ॥ प्रियव्रताचें व्रत घेतां । प्रियव्रत भेटे तत्वता । भागवतधर्में प्रिय-व्रत कथा । निवृत्तिपंथें सांगीतली ॥ ४७ ॥ प्रियव्रत तो आत्माराम । आत्मव्रतें[3] तो आराम । सद्गुरुभजनें पूर्णकाम । पावला हे निर्धारें ॥४८॥ प्रियव्रताचे सप्त कुमर । सप्तद्वीपींचे सप्त नृपवर । सात सात जाले त्यांसी कुमर । सप्त सप्तखंडीं विभागिले ॥ ४९ ॥ सप्तद्वीपीं चक्रवर्ति[4] जाले । पुण्यश्लोक महा भले । पुत्रांसी राज्य देऊनि निघाले । निवृत्तिपंथें लवलाहें ॥ ५० ॥ पांच द्वीपीं सात सात खंडें । जंबुद्वीपींचीं नवखंडें त्यामाजि दक्षणे भरतखंड । भरत देव राजा भरतवर्षी ॥ ५१ ॥ जंबुद्वीपीं अग्निध्र संतति । नाभिऋषभदेव भरत नृपति । भरता-पासूनि नाना सुमति । कितेक राजे निर्माण ॥ ५२ ॥ भरत देव मृग-ममताबुद्धि । जड भरत जाला सद्बुद्धि । मग ज्ञानें चुकऊनि देहात्म-

१ स्क. ४, अ. १. २ स्क. ५ अ. १, १५. ३ दुसऱ्या पोथींत या ऐवजीं ‘ अनुभवें विश्रांतिधाम ’ असा तिसरा चरण आहे. ४ सार्वभौम राजे.

बुद्धि । आत्मबुद्धि विचरतसे ॥ ५३ ॥ ब्रह्मसंपन्न ब्रह्मीं होतां । जड पिशाच्य उन्मत्त फिरतां । तस्करीं त्यासी बळीसी अर्पितां । तस्कर संहारिले देवीनें॥५४॥ पुढें सहज स्थिति भारवाहक । रहूगणाचा मुक्तिदायक। सिंधु सौविर देशपाळक । जीवन्मुक्त केला संसारीं ॥ ५५ ॥ जीवन्मुक्त राजा कैसा केला । जडभरत त्यासीं काय बोलिला । श्रोतीं संवाद ऐकिला । पाहिजे आतां ॥ ५६॥ रहूगण ह्मणे रे भारवाही । येरु ह्मणे तूं भार-वाही । रहूगण ह्मणे तूं स्थूळदेही । तूं स्थूळदेही जीवित्वें ॥ ५७ ॥ रहूगण ह्मणे रे दिससी सूक्ष्म । येर ह्मणे तूं स्थूळ सूक्ष्म । रहूगण ह्मणे रे बोलसी अधम । तुं अधमोधम जीवित्वें ॥५८॥ रहूगण ह्मणे मी राज्यधारी । येरू ह्मणे मी साम्राज्यधारी । रहूगण ह्मणे मी मोक्षाधि-कारी । आरे मी निर्विकारी निजात्मा ॥ ५९ ॥ ऐकोनि जडभरत गुरुवाक्यें । रहूगण बोधला महावाक्यें[1] । वहनातळी[2] उतरोनि ऐक्यें । नमन केलें साष्टांगें ॥ ६० ॥ ह्मणे धन्य माझें जीवित्व मुनि । जीवित्व निरसूनि घातलें निर्गुणीं । तत्वातीत मी परब्रह्म मिळणी । सद्गुरुचरण-प्रसादें ॥ ६१ ॥ ऐसें परस्परें ऐक्यत्व पावले । जडभरतें पूर्ववृत्तांत निवेदिले । पश्चम सिद्धांतीं दोघे राहिले । निवृत्तिरामीं स्वानंदें ॥ ६२ ॥ शुक परिक्षितीसी सांगे कथा । जडभरत बाधिला होता मृगममता । माहे जिवासी केवळ अहंममता । बाधिली न जाय कैसी हो ॥ ६३ ॥ प्राचीनबर्हि राजा यज्ञमूर्ति । नारदें प्रबोधिला श्रीभागवतीं[3] । पुरंजन पुरंजनीं जाली अंतीं मति । ह्मणोनि जीवबुद्धि कामा नये ॥ ६४ ॥ कंडु मुनीसी रंभा छळी । प्रजा कन्या विसर्जी वृक्षमुळीं । दश प्रचेते वरिती येक बाळी । जैसी पांचाळी[4] पांचांची[5] ॥ ६५ ॥ सामर्थ्ययोगें अघटित केलें । सृष्टिक्रम चालोसें जालें । नदीमूळ[6] ऋषिमूळ पाहाणें नव्हे भलें । आधार लोकीं घेऊं नये ॥ ६६॥ देव[7] करीती तें न करावें

---

१ तत्वमसि इत्यादि वाक्यानीं. २ पालखीखालीं. ३ स्कं. ४ अ. २५-२६ ४ द्रौपदी. ५ पांडवांची. ६ नदीचें मूळ आणि ऋषीचें कुळ हीं शोधूं नयेत ही ह्मण सुप्रसिद्ध च आहे. ७ ' न देवचरितं चरेत् ' असें वाक्य आहे.

देव सांगती तें वर्तावें । कामने पाठीं न लागावें । सकामकर्में पतन हें ॥ ६७ ॥ सकाम पुराणें उदंड कथिलीं । मनाची विश्रांति नाही झाली । मग भागवतलीला प्रगट केली । नारदोपदेशें श्रीव्यासें ॥ ६८ ॥ स्वात्मबोधीं समर्थें सांगीतलें । निःकामभजन प्रतिष्ठिलें । भवस्वर्गसुख कुरवंडिलें । सद्गुरुचरणीं निर्धारें ॥ ६९ ॥ ह्मणाल स्वर्गसुख थोर आहे । कल्पांतकाळीं कांहीं न राहे । सायोज्य मुक्ति थोर पाहे । कल्पांतकाळीं चळेना ॥ ७० ॥ एवं सकामकर्में पाविजे पतन । निःकामभजनें होइजे पावन । धन्य धन्य ते साधुजन । परब्रह्मीं पावले[1] ॥ ७१ ॥ नाना दक्ष पुत्र नारदें उपदेशिले । वीस सहस्त्र निघोनि गेले । मग नारद मुनि दक्षें शापिले । जगदोद्धार केले परिभ्रमणें ॥ ७२ ॥ परिभ्रमण करिती साधु । करावया[2] निर्वाण[3]बोधु । सृष्टिकर्मतमार्कइंदु[4] । सृष्टीमध्यें विचरती ॥ ७३ ॥ आत्मानात्मविवेक करिती । नित्यानित्य अखंड पाहाती । सारासारविचारें राहाती । परब्रह्मीं निर्धारें ॥ ७४ ॥ प्रियव्रत तेजें प्रतिसूर्य । तैसे ह्मणों तरी ज्ञाते वर्य । तरि हेंहि उपमेचें आश्चिर्य । कांहींच नाहीं पाहतां ॥ ७५ ॥ प्रियव्रत बाह्य प्रकाशरूपें । ज्ञाते ज्ञानसूर्य स्वप्रकाश स्वरूपें । ऋषभ देव विष्णूच स्वस्वरूपें । तैसे भूदेव मनुवंशीं ॥ ७६ ॥ खट्वांग अंबर्षि भागवत ज्ञानी । हरिश्चंद्रादि दानशूर अवनीं । निवृत्तिमार्गें संतसेवनीं । सद्गुरुभजनीं निर्मुक्त ॥ ७७ ॥ सोमवंश सूर्यवंश । नाना उत्तम ब्राह्मणवंश । अवघा मिळोनि ईश्वरअंश । नाना गोत्रें ऋषीचीं ॥ ७८ ॥ नाना सृष्टि घालमेली । सृष्टिक्रमीं होत गेली । आदि मध्य उत्पत्ति बोलिली । नाना वर्ण प्रगटले ॥ ७९ ॥ मुख्य सत्वगुणें ब्राह्मणवर्ण । रजसत्वें क्षत्रियवर्ण । रजतमत्वें वैश्यवर्ण । केवळ तमोगुण शूद्राचे ॥ ८० ॥ कृता-

---

१ 'कृतकर्म पुरुषोत्तमा अर्पिती' असा पाठ दुसऱ्या पोथींत आहे. २ 'अकरा' असा दुसरा पाठ. ३ 'भवनिवारणनिवृत्तिबोधु' असा दुसरा पाठ आहे. ४ सृष्टिक्रमरूपी अंधकार नाहींसा करणारे सूर्यचंद्र.

युगीं[1] वर्णविभाग नाहीं । पुढें पुढें वर्णविभाग जाला पाहीं । पुरूरवा जाला कर्ममार्गी कांहीं । उर्वशीभोगानिमित्तें ॥ ८१ ॥ तेणें सकाम स्वर्गाकडे घातले लोक । जीवांसी नाठवे परलोक । नाना यज्ञयागकर्में पूर्वमीमांसक । याज्ञिक वैदिक करिताती ॥ ८२ ॥ सुखें करावीं ब्रह्म कर्में । नि:[2]काम बुद्धीनें सत्कर्में । ब्रह्मवृंद ब्राह्मण स्वधर्में । स्वरूपधर्में सर्वदा ॥ ८३ ॥ पूर्वमीमांसा[3] उत्तरमीमांसा । विचार आणिजे निजमानसा । स्वर्ग नर्क[4] भवफांसा । वेदांत मतें तुटतसे ॥ ८४ ॥ प्रकृति कांहीं खरी नाहीं । पाहतां पाहतां राहात नाहीं । परब्रह्मीं स्थिति पाहीं । संत संगें स्वानुभवें ॥ ८५ ॥ संतसंग नाहीं ज्याला । विमळ ब्रह्म कैंचें त्याला । वृथा मायेमध्यें गुंडाळला । कोहं कोहं ह्मणतसे ॥ ८६ ॥ सोहं सोहं ज्ञानविचारें । कोहं कोहं अज्ञानवारें । अहं सोहं जाऊनि खरें । परब्रह्म सनातन ॥ ८७ ॥ या स्वानुभवाच्या गोष्टि । अनुभवा येती आत्मदृष्टी । केवळ जीवाची चर्मदृष्टि । देखिलें खरें मानावें ॥ ८८ ॥ देखिलें खरें येक मानावें । सगुणध्यान सुखें करावें । निर्गुण निरूपणें विवरावें । सद्गुरुचरण प्रसादें ॥८९॥ अष्टधा प्रकृति जीव बुद्धि सृष्टि । ज्ञानाग्नींत दिघली पुटीं । सत्वें शुद्धसत्वें गोमटीं । स्वरूप सुवर्णें निघालीं॥९० ह्मणाल स्वरूप आ[5]टिलें पि[6]टिलें । ऐसें नाहीं हें अनुवादलें । स्वरूप जैसें तैसें संचलें ।किडाळें[7] जाळिले जीवाचें ॥९१॥ सोनें अळंकार तंतु त्रि[8]जीवे-

१ कृतयुगांत सत्वाचें साम्राज्य असल्यामुळें काम्य कर्म नाहीं आणि ह्मणून वर्णभेदही नाहीं. काम्य कर्म आणि वर्णभेद यांची ही येथें दाखविलेली सांगड लक्षांत ठेवण्यासारखी आहे. काम्यकर्में अनेकविध असल्यामुळें त्यांचा प्रसार आहे तों वर्णभेद नष्ट होणें शक्य नाहीं. २ ज्ञानाला निष्काम कर्माची आडकाठी होत नाहीं. ३ पूर्वमीमांसा ह्मणजे कर्मकांड आणि उत्तरमीमांसा ह्मणजे ज्ञानकांड यांची ही एकवाक्यता लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ४ स्वर्गप्राप्ति नरकप्राप्ति इत्यादिरूप संसाराचें बंधन. ५ अग्नींत घालून सोन्याप्रमाणें आटविलें. ६ ऐरणीवर घणानें ठोकिलें. ७ या ओवींत ' तदेतत्सत्यं यथा सुदीप्तात्पावकाद्विस्फुलिंगाः सहस्रशः प्रभवन्ते सरूपाः । तथाऽक्षराद्विविधाः सोम्य भावाः प्रजायन्ते तत्र चैवाऽपि यन्ति ' या मुंडकोपनिषदांतील वचनाचा अनुवाद केला आहे. ८ स्रव.

9328

श्वर शिवेश्वर सर्वेश्वर । नाना दृष्टांत देती ग्रंथकार । परब्रह्मीं ऐक्यत्वें ॥ ९२ ॥ स्वात्मबोधीं समर्थें निरोपिलें । गगनसदृशं खं ब्रह्म बोलिलें । श्रुति संमति अनुभवा आलें । निर्विकार निरंजन ॥ ९३ ॥ पिंडीं जीवाची उपाधि गेली । ब्रह्मांडीं शिवाची उपाधि सरली । पिंड ब्रह्मांड उपाधि वारली । सद्गुरुकृपे परब्रह्मीं ॥ ९४ ॥ जे जे सद्गुरूसी शरण आले । ते ते सृष्टिक्रमा वेगळे जाले । येर ते सृष्टिक्रमें गुंतले । कृतकर्मयोगें भवबंधें ॥ ९५ ॥ सृष्टिक्रमा परता ईश्वर । त्रिगुण माया सर्वेश्वर । जेथील तेथें जीवेश्वर । ऐक्य जालें गुरुकृपे ॥ ९६ ॥ चंचळी चंचळ ऐक्य जालें । निश्चळीं निश्चळ स्वरूप संचलें । गगनसदृशं खं ब्रह्म दाटलें । ब्रह्मीं ब्रह्मांश सदोदित ॥ ९७ ॥ श्रोतीं परब्रह्म पुसिलें । परब्रह्म सांगो येक्या बोलें । मीपण महत्तत्वा सरिसें गेलें । निखिल उरलें परब्रह्म ॥ ९८ ॥ श्रोते ह्मणती समाधान । येक्याचि बोलें केलें जाण । श्रीगुरुकृपेचें बाणलें चिन्ह । ऐक्यीं ऐक्य निवृत्ति ॥ ९९ ॥ एवं सृष्टिक्रमनिवृत्तिकथन । पिंडब्रह्मांडदृश्यनिर्शन । त्रिगुणमाया विलक्षण । निवृत्तिवेणी श्रीचरणीं ॥ १०० ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । सृष्टिक्रमनिवृत्तिनाम । समास बोलिला सत्रांवा ॥ १०१ ॥ समास १७ ॥ ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जया जी सद्गुरुनाथा । परात्परा स्वामी समर्था । भेदाभेद निवृत्तिकथा । निवृत्तिपंथें सांगा जी ॥ १ ॥ नाना मतीं नाना भेद । भेदें होती नाना खेद । जीवपणाचे अप्रमाद[2] । देवें चुकविले पाहिजे ॥ २ ॥ केवळ अभेद ब्रह्म जरी ह्मणावें । आधींच भेद तोडोन राहावें । तरी कर्म उपासना ज्ञान विज्ञान देवें । त्रिकांड वेद निरोपिला ॥ ३ ॥

---

१ जीवशिवाचें ब्रह्मरूप ऐक्य सिद्ध करण्यासाठीं, सोनें व दागिनें, सूत व वस्त्र अशीं उदाहरणें देण्याचा परिपाठ आहे. २ मोठा प्रमाद, अचपळ प्रमाणें.

आतां भेदाभेद निवृत्तिकथन । समर्थ करिताती निरूपण । संतश्रोते सावधान । सभेमाजी परियसा ॥ ४ ॥ अभेद ह्मणतां[1] जीव । विशाद मानिती माध्व[2] वैष्णव । जीवशिव अभिप्राव । उपाधियोगें सर्वेश्वरीं ॥५॥ मी जीव हा संकल्प । तेथें कैचा हरिसंकल्प । ह्मणोनि जेथील तेथें निर्विकल्प । जीव ब्रह्मांश करावा ॥ ६ ॥ मुळिंचा ऐक्य जीव ब्रह्मांश आहे । माईक जीवतत्वीं गुंतला पाहे । जैसा शुकनलिके[3] राहे । विहंगममार्गे उडेना ॥ ७ ॥ विहंगममार्गे जीव उडाला । गगन भेदून पैलाड गेला । शून्यत्व सारूनि ब्रह्म जाला । संतसंगें विचारें ॥ ८ ॥ पिंडज्ञान तत्वज्ञान । आत्मज्ञान ब्रह्मज्ञान । पिंड ब्रह्मांड ऐक्य लक्षण । सद्गुरुकृपें विवरिलें ॥ ९ ॥ स्थूळावडील सूक्ष्म देह । सूक्ष्मावडील कारण देह । कारणावडील महाकारण देह । महाकारणावडील अंतरात्मा ॥ १० ॥ विराटावडील हिरण्यगर्भ काया । हिरण्यगर्भावडील अव्याकृति माया । अव्याकृतीवडील मूळमाया । मूळमायेवडील परमात्मा ॥ ११ ॥ परमात्मा नाम दोहींकडे । ब्रह्माकडे ईश्वराकडे । चंचळ चैतन्य निश्चळ ब्रह्म निवाडे । साधु वित्पन्न जाणती ॥ १२ ॥ घटबिंब दृष्टांत आत्म्यातें । घटाकाश दृष्टांत ब्रह्मातें । दोन्ही येक कीं भेद यातें । संत सर्वज्ञ जाणती ॥ १३ ॥ घटबिंब आलें गेलें पाहीं । घटाकाश आलें गेलें नाहीं । ईश्वर ब्रह्मीं भेद कांहीं । सद्गुरुनाथ सांगती ॥ १४ ॥ आत्मा वायु चंचळ देहीं । ब्रह्म आकाश निश्चळ देहीं । चंचळ निश्चळ विवरूनि राहीं । मौन्यगर्भा सत्शिष्या ॥ १५ ॥ ईश्वर ब्रह्मांडीं नित्य मुक्त जैसा । जीवेश्वर पिंडीं जीवन्मुक्त तैसा । बद्ध मुक्त माया विनोद ऐसा । परब्रह्मीं बोलों नये ॥ १६ ॥ ईश्वरीं माया कर्तुत्व बोलणें । परब्रह्मीं कर्तुत्व न बोलणें । चंचळ निश्चळ समजोनि राहाणें । कत-

---

१ जीव ब्रह्माचें ऐक्य आहे असें ह्मटलें असतां. २ द्वैतवादी. ३ शेतांत दोरी बांधून तींत नळी अडकविली असते; तीवर पक्षी बसले ह्मणजे नळी दोरी वरून घसरून पक्ष्याचें खालीं डोकें वर पाय होतें व तो घाबरतो. तो मनांत आणील तर त्याला उडतां येईल पण मोहांत सांपडून त्याला कांहीं करवत नाहीं. तशी जीवाची स्थिति होते.

कारण ऐलीकडे ॥ १७ ॥ घट मठ महद चिदभास । तेणें बद्ध मुक्त नव्हे ब्रह्माकाश । निर्मळ निश्चळ निराभास । गगनगर्भ निरंजन ॥१८॥ खं ब्रह्म वस्तु सर्वत्र व्यापक । ब्रह्मांश ब्रह्मीं मिळती देख । उपाधि-निर्शनीं ऐक्यीं ऐक्य । जीवशिव भाव उडाले ॥ १९ ॥ एवं ज्याची अविद्या निरसली । त्यासी मुक्तता सिद्ध ठेली । असतांचि माया नाहीं जाली । सद्गुरुनाथप्रतापें ॥ २० ॥ सद्गुरुपदीं अनन्य शरण । ते जीव ब्रह्मांश ब्रह्मीं जाण । येती जाती जीव वासनात्मक प्राण । नेणते अज्ञान भिन्नत्वें ॥ २१ ॥ आतां भिन्नत्व अवघें निर्शलें । पिंड ब्रह्मांड विवरण जालें । मायातीत ब्रह्म अनुभवलें । श्रोतेजन बोलती ॥ २२ ॥ एवं भेदाभेदनिवृत्तिविचार । परब्रह्मींचा : निर्धार । ईश्वरापासूनि शबलविस्तार । त्रिगुण माया ऐलीकडे ॥ २३ ॥ श्रोते ह्मणती कर्ता ईश्वर । तरि जीवासी पापपुण्य कां व्यवहार । ईश्वराहूनि भिन्न इतर । जीवपण नाहीं निर्धारें ॥ २४ ॥ मुख्य बिंब तेंचि प्रतिबिंब । तरि प्रतिबिंब कां नव्हे बिंब । बिंब प्रतिबिंब स्वयंभ । ईश्वर जीवेश्वर कां नव्हे ॥ २५ ॥ जरी भेद नाहीं जीवाशिवासी । तरि बंध मोक्ष तो कोणासी । जन्ममृत्यु योनी लक्ष चौऱ्यासीं । भोगितो कोण ॥ २६ ॥ ऐका याचें प्रत्योत्तर । उपाधिभेदें ईश्वरीं अंतर । ह्मणोनि मीपणें संसार । जीवबुद्धीसी लागला ॥ २७ ॥ मीपण हेंही ईश्वराचें । ऐसें मत पाषांडयाचें । पापपुण्य करणें त्याचें । पाप करू पुण्य करू ॥ २८ ॥ बरी ऐसी हो कां ईश्वर बुद्धि । मग पाषांडी नव्हे त्रिशुद्धि । यज्ञ[1]कर्ता मी ह्मणे कुबुद्धि । गोहत्या कर्ता ईश्वरु ॥ २९ ॥ ह्मणोनि जीवाचीं कर्में जीवाच्या माथां । स्वर्ग नर्क भोगिती आतां । नाना सूर्यां[2]गीं कर्में लाविता । सूर्य कर्म फळें भोगीना ॥ ३० ॥ विद्या अविद्या ईश्वरी माया । अविद्योपाधि जीवेश्वर काया । द्वासुपर्णा सजुजा सखाया । बोलिली श्रुति ॥ ३१ ॥ नाना स्वर्ग नाना नरक । कर्माकर्में[3] भोगिती

१ सत्कर्में तेव्हडीं मीं करितों, आणि पाप तेव्हढें ईश्वर करवितो. २ मागें ' द्वासुपर्णानिवृत्तिकथन ' समास ७ पहा. ३ चांगल्या व वाईट कर्मांमुळें.

लोक । लोकांमध्यें पुण्यश्लोक । लोकां सारिखें नव्हती ॥ ३२॥ जाणती भोगीना यातना । नेणता भोगी यमयातना । सूर्य खद्योत सम तुकेनां[1] । सर्वज्ञ नव्हे किंचितज्ञ ॥ ३३ ॥ ईश्वरें नाना भेद केले । ईश्वरभेदें सृष्टि चाले । सृष्टिक्रम धरूनि जे बैसले । ते ते पडले कर्माधीन॥३४॥ ईश्वरआज्ञेनें वर्तावें । ईश्वरबुद्धि कर्म करावें । ईश्वरीं सर्वस्व अर्पावें । पावन व्हावें परब्रह्मीं ॥ ३५ ॥ एवं ईश्वर साक्षी माये वेगळा । जीवें[3] अविद्ये भुळविला । राजपुत्र स्वप्नीं दरिद्री जाला । ब्राह्मण गेला नीच याती ॥ ३६ ॥ सकामकर्में स्वर्ग चढे । स्वर्गीहूनि मागुता पडे । दीर्घ स्वप्न माया उजेडे । गुरुकृपा जागृति जालिया ॥ ३७ ॥ निःशंक दुरात्मा करितो पाप । आणि जालों ह्मणतो मी निःपाप । तरी कशा-साठीं अनुताप । वाल्मीकादिकीं धरिला हो ॥ ३८ ॥ नेणूनि घडलीं पापें । तें जाणूनि जालीं निःपापें । नाना पुण्यक्षेत्रीं केलीं पापें । वज्र-लेपें यथार्थ ॥ ३९ ॥ बोलकेपणें पाषांडी । आपुलें कर्म ईश्वरीं मांडी । न्याय नीति मर्यादा सांडी । तो पढतमूर्ख बोलिला ग्रंथांतरीं ॥ ४० ॥ कर्ता भोक्ता ईश्वर । याचा ऐका हो विचार । येथें मीपणाचा संहार । जाला पाहिजे ॥ ४१ ॥ वारंवार किती सांगणें । कळ्हो[6] उदंड उठती मीपणें । मीपण ईश्वरीं दवडणें । मग कर्ता भोक्ता तोचि तो ॥ ४२ ॥ रज तम सारूनि सत्व । सत्व सारूनि शुद्धसत्व । शुद्धसत्वा सारूनि ईश्वरत्व । ईश्वरत्वें निरंजन ॥ ४३ ॥ कर्म उपासना ज्ञान । ज्ञानें पाविजे विज्ञान । विज्ञानवृत्ति होतां लीन । परब्रह्मीं ऐक्यता ॥ ४४ ॥ ह्मणालँ[7] ब्रह्मीं ऐक्यता कोणासी आहे । ब्रह्मांड जेव्हां विलया जाय ।

---

१ तुलनेला लागेना. २ सृष्टिक्रम खरा धरून केलें तें कर्म बंधक होतें; ह्मणून तें परमेश्वरार्पण बुद्धीनें करानें ह्मणजे ब्रह्मप्राप्ति होते. ३ जीव आणि ईश्वर यांत हें च अंतर. एक मायेंत गुरफटलेला तर दुसरा मायेचा चालक झालेला. वस्तु तः भेद नाहीं. याला खालील उदाहरणें पहावीं. ४ स्वर्ग प्राप्ति किंवा नरक प्राप्ति इत्यादि सर्व च स्वप्नवत् आहे. गुरुकृपेनें ज्ञान झाल्यावर याची प्रतीति येते. ५ श्री दासबोध २·१०.६ कलह. ७ कसलें आलें जीवब्रह्माचें ऐक्य! प्रळय हाच मोक्ष! ही शंका. तिला पुढल्या ओव्यांत उत्तर दिलें आहे.

तेव्हां सकळांसी मोक्ष होय । येऱ्हवीं मोक्ष नाही हो ॥ ४५॥ यज्ञ[1] मंडप विध्वंसावे । मग पिंड पुरोडाश सेवावे । नाना यज्ञमंडपीं यज्ञ-शेष घ्यावे । ऐसें कळेना ॥ ४६ ॥ तैसें वर्तत असतां ब्रह्मांड । ब्रह्मांडीं ब्रह्म दाटलें उदंड । नाना ज्ञानयज्ञीं शेष सेवावें अखंड । हें मूर्खलोकांसी कळेना ॥ ४७॥ दुरत्यय माया मतांतरें । अपभ्रंश करती नाना विकारें । श्रवणमननें साक्षात्कारें । मतांतरें हारपती ॥४८॥ 'ब्रह्मणासह[2] मुच्यंते' ह्मणती । संत सर्वज्ञ अर्थ जाणती । ब्रह्मीं ब्रह्मांश विधि वाक्यें ऐक्य होती । उद्धार न करिती मोक्षाचा ॥ ४९ ॥ उत्क्रामंते[3] समवलीयंते[4] । अज्ञान प्राणी उत्क्रामंते । आत्मज्ञानी समवलीयंते । वेदश्रुति बोलती वाक्यार्थें ॥ ५० ॥ ह्मणोनि धन्य ते साधुजन । जयांसी जालें आत्मज्ञान । तया साधूचें महिमान । काय ह्मणोनी वर्णावें ॥ ५१ ॥ अंतीं[5] मति राम जाला दशरथ । शुद्ध मति राम बंधु भरत । ऐक्य मति सीताराम हनुमंत । आत्माराम स्वरूपीं ॥ ५२ ॥ कौसल्या माता श्रीरामरूपें । प्रबोधिलीसे स्वात्मस्वरूपें । अध्यात्मरामायण सद्गुरु-रूपें । आत्मारामें उपदेशिलें ॥ ५३ ॥ वशिष्ट विश्वामित्र ऋषि । राजर्षि आणि ब्रह्मर्षि । ऐक्य मिळणीं अहर्निशीं । रामावतारीं सख्यत्वें ॥ ५४ ॥ कृष्णावतारीं उद्धव अर्जुन । गीता भागवत करिती श्रवण । अंतीं मति तेचि गति पावला दुर्योधन । ज्यासी दुर्वास प्रसन्न छळणार्थें ॥ ५५ ॥ अवधूत ज्ञानी यदूसी बोधी । वसुदेवासी नारद[6]

---

१ यज्ञाचा विध्वंस केल्याशिवाय पुरोडाश मिळत नाहीं असें नाहीं. पण असुर तसें न करितां यज्ञाचा नाश करितात. तसें च ब्रह्मांड चालू असतां ही ब्रह्मतादात्म्य होऊं शकतें. त्याला प्रळयाची च गरज आहे असें नाहीं. पण आसुरी वृत्तीच्या मूर्खांना हें समजत नाहीं. ह्मणून प्रळय हा च मोक्ष असें ते ह्मणतात. २ 'ब्रह्माबरोबर च मुक्त होतात' याचा खरा अर्थ संतानां च कळतो; इतरांना नाहीं. ब्रह्म नित्य असल्यामुळें मोक्ष ही नित्य आहे. ३ अज्ञानी जीव संसारांत पडतात. ४ ज्ञानी ब्रह्मांत लीन होतात. ५ 'अन्ते मतिः सा गतिः' किंवा 'यं यं वापि स्मरन्भावं त्यजन्त्यन्ते कलेवरम् । तं तमेवैति कौन्तेय सदा तद्भावभावितः' या । (१/६) भगवद्वचनाप्रमाणें. ६ भागवताच्या ११ व्या स्कंधांत.

प्रबोधी । नाना सिद्ध साधक स्वात्मबोधीं । ब्रह्मबोधीं बोधले ॥ ५६ ॥ जैसी जयाची मति । तैसी तयासी जाली गति । ह्मणोनि अंतर[1] लागे भगवंतीं । तोचि मुक्त संसारीं ॥ ५७ ॥ एवं शुद्ध शबल सृष्टिस्थिति । जीव नेणों जाले किती । चौऱ्यासीं लक्ष योनीची उत्पत्ति । नाना प्रकारें विस्तारें ॥ ५८ ॥ जैसी देंठासी फळें लागती । मुळींच्या प्रभावें वाढती । तैसे नाना जीव मुळींचेचि[2] असती । बिजीं फळें फळीं बीजें ॥ ५९ ॥ निजबीज शोधूनि पाहावें । निजगुज विवरूनि राहावें । ब्रह्मीं ब्रह्मांश होऊनि जावें । मग भजित[3] बीजें परब्रह्मीं ॥६०॥ भवस्वर्ग न धरावी आस । विवेक पाहाणें सावकाश । ऐक्य जीव हे ब्रह्मांश । ब्रह्मीं ब्रह्मचि निर्धारें ॥ ६१ ॥ जे जे घट मठ मांडिले । ते ते आकाशें जैसे व्यापिले । तैसे ब्रह्मीं ब्रह्मांश भले । न्यून पूर्ण न ह्मणावे ॥ ६२ ॥ न्यून हेंचि दृश्य भान । पूर्ण तेंचि ब्रह्मज्ञान । ज्ञानेंसहित विज्ञान । परब्रह्मीं मावळलें ॥ ६३ ॥ परब्रह्म तें अंखड । ब्रह्मीं कैचें ब्रह्मांड । असतांचि नाहीं हें प्रचंड । ज्ञाते उदंड बोलती ॥ ६४ ॥ ज्ञात्यांचीं जरी मिथ्या उत्तरें । तरि अज्ञानाचें मत काय खरें । एवं न्याय केला ईश्वरें । प्रपंचीं आणि परमार्थीं ॥ ६५ ॥ परमार्थ संपन्न जगद्गुरु । भुवननाथ भुवनसुंदरु । आत्माराम जगदीश्वरु । अनन्यभाक्ति पाविजे ॥ ६६ ॥ जे जे सृष्टिक्रमीं निर्माण जाले । ते ते प्रकृतिप्रळयें[4] विलया गेले । विवेकप्रळयें ज्ञानी राहिले । स्वरूपाकार योगींद्र ॥ ६७ ॥ चतुर्युगसहस्राणि[5] । श्लोकार्थ पाहाणें प्रळयमानीं । ब्रह्माविष्णु रुद्र अवसानीं[6] । सर्व-

१ अन्तःकरण. २ ब्रह्मांतील. ३ भाजून पेरलेले बीं जसें उगवत नाहीं तसें. ४ कृतयुग ( ४८०० वर्षे ) त्रेता ( ३६०० वर्षे ) द्वापर ( २४०० वर्षे ); आणि कलि ( १२०० वर्षे ) अशीं चार युगें ह्मणजे देवांचें एक युग ( मनु $\frac{१}{७१}$ ). अशीं देवांचीं १००० युगें ह्मणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस ( मनु $\frac{१}{७२}$ ) व तेवढीच त्याची रात्र या दिवसाच्या शेवटीं प्रळय व रात्रीच्या ह्मणजे प्रळयाच्या शेवटीं पुनः सृष्टि होते. ( मनु० $\frac{१}{७४}$ ) हा प्रकृतिप्रळय होय. पण ज्ञानाच्या योगानें ब्रह्मरूप होणें हा विवेकप्रळय. ५ प्रळयाच्या काळाचें प्रमाण समजण्यासाठीं ६ शेवटीं.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. १०७

श्वरीं यथार्थ ॥ ६८ ॥ सर्वेश्वर देव सर्वज्ञ । तुर्या मायेचा सर्वज्ञ । तुरीय ईश्वर अभिज्ञ । टाकी अधिष्ठान निर्विकारी ॥ ६९ ॥ निर्विकार निरंजन । तेथें मिथ्या माया दृश्यमान । ब्रह्मीं न घडे आरोप जाण । ईश्वरीं माया उद्भवली ॥ ७० ॥ आली गेली वंध्या माया । ब्रह्मीं न घडे तिचा थाया । खऱ्यापासूनि खोटें वायां । जालें गेलें न ह्मणावें ॥ ७१ ॥ ईश्वरीं दृश्य जालें निमालें । पुनःपुन्हा होत गेलें । ब्रह्म निर्गुण संचलें । निर्विकार निरंजन ॥ ७२ ॥ ऐसें समर्थें उपदेशिलें । शास्त्रमतें अनुभवा आलें । येक ब्रह्म द्वितीय नास्ति बोलिलें । द्वैत निर्शलें मायेचें ॥ ७३ ॥ एवं भेदाभेदनिवृत्तिकथन । ऐकतां होइजे परमपावन । निवृत्तिवेणी अनन्यशरण । आदिपुरुषीं निर्धारें ॥ ७४ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । भेदाभेद निवृत्तिनाम । समास बोलिला आठरावा ॥ ७५ ॥ समास ॥ १८ ॥ ७ ॥

---

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरुस्वामी समर्थ । भीमरथी मूळमाया मूळअनंत । नाना भवरोग परळी वैद्यनाथ । ॐकार केदार निवृत्ति ॥ १ ॥ नाना स्वयंजोति जोतिलिंगें । वट मठ व्यापूनि अभंगें । आकाश अवकाश अंतरंगें । वृत्तिनिवृत्ति पाविजे ॥ २ ॥ आतां नाना अशंका योगनिवृत्ति । करणें देवा आदिमूर्ति । ऐकोनि स्वामी कृपामूर्ति । बुद्धियोगें प्रगटले ॥ ३ ॥ नाना अशंका निवृत्ति कथानक । निवृत्तिमार्गें ऐकूत लोक । स्वात्मबोधग्रंथीं शुद्ध विवेक । सद्गुरुरायें सांगीतला ॥ ४ ॥ समर्थें लोकसंग्रहीं कारणें । नाना निश्चय अनुवादणें । नाना निवृत्तियोग करणें । विमळें बाळबोधार्थीं ॥ ५ ॥ मुख्य माया अशंका निवृत्ति

---

१ अनंत व्याप करून मग वृत्ति निवृत्त होते. २ या समासांत शंका घेऊन त्यांचें निरसन केलें आहे. ३ या ( ५, ६ ) ओंव्या कर्मयोगरहस्य स्पष्ट शब्दांनीं वर्णीत आहेत. त्या वाचकांनीं हृदयाशींच बाळगाव्या. ४ स्पष्ट. ५ सुलभ.

जाली । सद्गुरुचरणीं वृत्ति निमाली । लोकसंग्रहार्थ सभामंडळी । चर्चा करिती स्वानंदें ॥ ६ ॥ नामधारक संतांप्रति । साधक पुसती पुण्यमूर्ति । नाना अशंका योगनिवृत्ति । स्वात्मबोधें परिसाजी ॥ ७ ॥ सद्गुरुनाथें ग्रंथ केले । ग्रंथकर्तार कोण जी जाले । ग्रंथकर्तार सर्वेश्वर गमले । सद्गुरु ब्रह्म सनातन ॥८॥ सद्गुरु ब्रह्म सनातन । तरी अज्ञानभ्रांतिछेदक कोण । अज्ञानभ्रांतिछेदकजाण । बुद्धि निधान सर्वेश्वरु ॥९॥ सर्वेश्वर बुद्धीचा दाता । तरी शारदा माया कोण आतां । शारदामाया ईश्वरसत्ता । ईश्वरमाया भिन्न नाहीं ॥१०॥ ईश्वरमाया भिन्न नाहीं । तरि श्रीगुरुवंदन कोणे ठाईं । सद्गुरु वंदन ईश्वरीं पाहीं । ईश्वरापरतें गुरुपद॥ ११ ॥ गुरुपदीं संतऐक्य जालें । तरी सद्गुरु संत भिन्न कां केले । सद्गुरुपदीं संत मिळाले । श्रोते वक्ते जगदीशमूर्ति ॥१२॥ श्रोते वक्ते जगदीशमूर्ति । तरी ग्रंथश्रवण कांहो करिती । ग्रंथश्रवण करणें निश्चिति । ऐश्वर्य आपुलें देखावया ॥ १३ ॥ ऐश्वर्य कवि वाखाणिति । तरी कवि ज्ञानी कांहो नव्हती । कवि ज्ञानी ब्रह्मची निश्चिति । योगींद्र ते चि कवींद्र ॥१४॥ कवि ज्ञानी संत सभे । तरि संतसभे देव कांहो नलभे । संतसभेसी देव लाभे । भक्तापासीं तिष्ठतु ॥१५॥[1] भक्तापासीं तिष्ठे देवो । तरी प्रपंच भक्तांसी लागला कांहो । प्रपंचीं घेती परमार्थ लाहो । नर ते चि होती नारायण ॥ १६ ॥ नर ते चि होती नारायण । सांगा स्वामी कैसें कथन । ऐसा श्रोता पुसे खूण । वक्तयाप्रति नरदेहीं । ॥ १७ ॥ नरदेहीं प्राप्त नारायण । नरदेह कां हो मूर्ख आपण । नरदेह मुर्ख अकर्में[2] जाण । सत्कर्में[3] होय उत्तम गति ॥ १८ ॥ सत्कर्में होय उत्तम गति । तरी कुविद्या कांहो अभ्यासिती । कुविद्यापंथें दुर्गुण जाति । भक्तिपंथें सद्गुण ॥१९॥ त्रिगुण गुणाची सृष्टि पाहीं । तरि कोणासी कोणें दूषणें काईं । सत्वगुणें रजतम दूषिले पाहीं । सद्विद्या

१ ' मद्भक्तायत्रगायंति तत्रतिष्ठामिनारद ' असें भगवंताचेंच ह्मणणें आहे. २ स्वर्गादिभोगांच्या इच्छेनें केलेलें कर्म तें अकर्म. ३ लोकसंग्रहार्थ निष्कामपणें केलेलें कर्म तें सत्कर्म. अशा सत्कर्मानें च ' कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ' या भगवद्वचनाप्रमाण उत्तम गति ह्मणजे मोक्ष सिद्ध होतो.

हे प्रगटतां ॥२०॥ सद्विद्या हे थोर आहे । तरी अविद्या कां हो लागली आहे । अविद्या विरक्तां बाधूंन लाहे । विरक्तें व्हावें संसारीं ॥२१॥ विरक्त-लक्षणें ऐकिलिं ग्रंथीं । तरी पढतमूर्ख कांहो होती । पढत मूर्ख प्रपंचें दिसती । परमार्थ नकळे ह्मणऊनियां ॥ २२ ॥ परमार्थ नसतां काय जी जालें । देवें पाहिजे निरोपिलें । श्रोतीं सादर ऐकिलें । पाहिजे आतां ॥ २३ ॥ परमार्थ नसतां ऐसें जालें । प्रपंचसुख मानूनि राहिलें । प्रपंचयोगें जन्मासी आलें । गर्भवासीं पुनःपुन्हा ॥ २४ ॥ पुनःपुन्हा होती गर्भवास । तरि संसाराचा कां नये त्रास । संसार-संगें नाना विळास । संतति संपत्ति स्त्रीयोगें ॥ २५ ॥ स्त्रीयोगें प्राणी कष्टले । तरी दुसरें लग्न कां हो केलें । दुसरें लग्न यैदं निमित्य केलें । संतति व्हावी ह्मणऊनियां ॥२६॥ संतति कर्में वाढेना । तरी कां करितो उपाय नाना । नवससायास करितां जना । दैवतें होतीं प्रसन्न ॥२७॥ देवें दिल्हें कर्में नेलें । तरी कां प्राणी कष्टी जाले । कष्टी आपुल्या कर्में केले । मग तिसरें लग्न वृद्धपणीं ॥ २८ ॥ वृद्धपणीं लग्न कांहो केलें । अन्न निपजेनासें जालें । सापत्न लेंकीं बापासी मारिलें । सौख्य देखिलें पुत्राचें ॥ २९ ॥ पुत्रें मारिल्या शंखनाद । तरी कां नव्हे हो अद्यापि बोध । त्रितापतापें उदंड खेद । कष्टी जाहाला वार्धिक्यीं ॥३०॥ वार्धिक्यपणींची बहु विपत्ति । तरी कां नव्हे हो कांहीं उपरति । अंतीं मति तेचि गति । मृत्यु पावला प्राणी हो ॥ ३१ ॥ मृत्यु पावल्या काया पडली । वासना हेतु मागें उरली । यमयातना सिद्ध ठेली । सुकृत नाहीं ह्मणोनियां ॥ ३२ ॥ सुकृत केल्या स्वर्गवास । दुष्कृत केल्या नरकवास । स्वर्ग नर्क पापपुण्यास । साधुजन नातळती ॥३३॥ साधुजनीं प्रबोध करितां । वैराग्य उत्पन्न जालें आतां । सद्गुरुचरणीं

---

१ 'कर्मण्यकर्मयः पश्येत्' इत्यादि वचनाप्रमाणें कर्म करून त्याच्या फळाची आशा सोडल्याने मायेची बाधा नाहींशी होते. २ परमार्थाचा विचार न केल्यामुळें ३ हा सर्व प्रकार श्रीदासबोधाच्या तिसऱ्या दशकांत पहिल्या पांच समासांत सुंदर रीतीनें वर्णिला आहे. ४ या कारणास्तव [ इदंनिमित्त ]. ३ मोहून किंवा भिऊन जात नाहींत.

शरण जातां । मुक्ति लाभे सद्भक्ति ॥ ३४ ॥ भक्ति कैसी मुक्ति कैसी । वैराग्यदशा उत्पन्न कैसी । सायोज्यदशा बाणली कैसी । देवें गुह्यार्थ सांगावा ॥ ३५ ॥ गुह्यार्थ न कळतां वेर्थ गेलें । जननमरण सिद्ध ठेलें । जननमरण तेव्हां सरलें । जेव्हां वैराग्य उत्पन्न॥३६॥वैराग्ययोगें भक्तिज्ञान । भक्तिभेद करी हरि आपण । अभेदभक्ति अद्वैत जाण । सद्गुरुचरणप्रसादें॥ सद्गुरुचरणीं अभेद भक्ति । तरी नवविधा कांहो वेगळ्या भक्ति । नवविधा मिळोनि येकाचि भक्ति । श्रोतीं श्रवण करावें ॥ ३८ ॥ श्रवण-भक्ति सार्थक जालें । तरी कीर्तन कांहो आरंभिलें । श्रवण कीर्तन येकचि केलें । विष्णुस्मरणीं सर्वदां ॥ ३९ ॥ विष्णुस्मरणें सार्थक जालें । तरी पादसेवन कांहों केलें । पादसेवन मुख्य हें बोलिलें सद्गुरुपद पावावया ॥ ४० ॥ सद्गुरुपद सेविल्यावरी । अर्चनभक्ति कोणेपरी । अर्चनभक्ति सौख्यकारी । अर्चन करावें देवाचें ॥५१॥ देवार्चन सांग घडलें । मग वंदन भक्ति काय केलें । वंदन भक्ति पूर्ण जालें । समाधान अभिवंदनीं ॥ ४२ ॥ वंदनभक्ति समाधान आतां । तरी दास्य कांहो करणें सर्वथां । दास्यभक्ति करणे तत्वता । देह दास्यीं लावावया ॥ ४३ ॥ देहे दास्यीं सर्वस्व लाविलें । मग सख्य भक्तीसी काय उरलें । सख्यभक्ति जीवित्व उरलें । आत्मनिवेदन पावावया ॥ ४४ ॥ आत्मानिवेदनीं आत्मा जाण । मग आत्मनिवेदन करी कोण । आत्मानिवेदनीं पावतां खूण । आपण कैंचा हारपला ॥ ४५ ॥ आपण कोण कोठें कैंचा । ब्रह्मांश ब्रह्मीं मुळीं साचा । एवं नवविधा भक्तिमार्गीचा । वृत्तांत कथिला गुरुकृपें ॥ ४६ ॥ गुरुपदीं जाली सायोज्यमुक्ति । मग त्रिविधा[1] मुक्ति अंतवंत मुक्ति । कर्मबंधनें स्वर्गकाम पावती । आपुलाल्या संकल्पें ॥ ४७ ॥ संकल्पातीत निरंजन । मग स्वर्ग संपात्ति मानी कोण । हरिसंकल्प पुरातन । सद्गुरुचरणीं ऐक्यत्वें ॥ ४८ ॥ सद्गुरुचरणीं निर्धार आतां । पुढें

---

१ सलोकता, समीपता, आणि सरूपता या मुक्ति सायुज्य मुक्तीच्या मानानें फारच कमीप्रतीच्या आहेत.

कैसी वर्तली कथा । वक्तयाप्रति सुज्ञ श्रोता । पुसता जाला गुरुकृपें ॥ ४९ ॥ गुरुमार्ग जनीं फार जाले । निर्धार स्वामी कोण केले । सद्गुरु ते चि निर्धारिले । सद्वस्तूचे प्रतिपाद्यें ॥ ५० ॥ सद्वस्तूसी ग्राहिक न मिळे । विरुळा कोण्ही सज्जन मिळे । असत्शिष्य उदंड जाहाले । नाना उपदेश मतांतरीं ॥ ५१ ॥ मतांतरें कां जी जालीं । ज्ञानवल्ली फांपावली । ज्ञानवल्ली तुर्या निमाली । विज्ञानब्रह्म उपदेशें ॥ ५२ ॥ ब्रह्मोपदेशें बद्ध सिद्ध जाले । मग बद्ध मुमुक्षु होऊनि ठेले । मुमुक्षु केव्हां मोक्षासी गेले । साधक जाले जेधवां ॥ ५३ ॥ साधकवृत्ति केव्हां गेली । सिद्धस्वरूपीं जेव्हां निवृत्ति जाली । सिद्ध जाल्यां कायजी दशा वर्तली । कथा सांगिजे पुढारी ॥ ५४ ॥ सिद्ध जाल्यां देवस्वयें । देव दर्शन कोण्या उपायें । देवदर्शन श्रवणोपायें । संतसाधुसमागमें ॥ ५५ ॥ सत्समागम विशेष कैसा । ब्रह्मोपदेश होतसे ऐसा । ब्रह्मोपदेश सांगीजे कैसा । ब्रह्मोपदेश तत्वांतीं ॥ ५६ ॥ तत्वातीत कैसें केलें । तत्वासरिसें मीपण गेलें । मीपणाअंतीं काय उरलें । काय उरलें तोचि जाणे ॥ ५७ ॥ तोचि जाणे तोचि कोण । आत्मा निर्गुण निरंजन । निरंजन माया विलक्षण । ब्रह्मवृंद जाणती ॥ ५८ ॥ ब्रह्मवृंद ब्रह्म स्वयें । मायाविवरण करिती कां हें । माया ब्रह्म तरुणोपायें । सद्गुरुमुखें विवरती ॥ ५९ ॥ सद्गुरु ब्रह्म सनातन । तरी जीवभूत कां सनातन । जीवभूत सृष्टि मिथ्याभान । मिथ्याभूत दिसतें हें ॥ ६० ॥ मिथ्याभूत दृश्य कां जी दिसतें । मिथ्याभूतासी मिथ्या दृश्य दिसतें । रघुनाथभजनें सत्यज्ञान कळतें । रघुनाथभजन करावें ॥ ६१ ॥ रघुनाथभजन थोर आहे । तरि निर्गुणब्रह्मीं कोण जाये । निर्गुणब्रह्म स्वतासिद्ध आहे । सगुणब्रह्म उपासना ॥ ६२ ॥ उपासनेची यथार्थ आण ।

---

१ भोंदु गुरु. २ आत्मवस्तूचें प्रतिपादन करणारे ते च खरे गुरु. ३ मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः' भ. गी. ७/३. आत्मस्वरूपाची ओळख करून घेण्याची खरी इच्छा करणारे फार थोडे. ४ सनातन ब्रह्म जीवरूपांत कां आलें.?

देहींच विदेही होणें जाण। देह विदेह सारूनि आपण। अनिर्वाच्य समाधानी ॥६३॥ अनिर्वाच्य समाधान। बोलिल्याविण न कळे जाण। कळलेंपणहीं सारूनि आपण। अजन्मा हा अबोलणा ॥ ६४ ॥ बोलणें नाहीं अजन्म्यातें। तरि कां पुसिजेतें संतातें। पुसणें सांगणें गुरुशिष्यातें।अनिर्वाच्य वस्तु व्हावया ॥ ६५ ॥ [1]अनिर्वाच्य वस्तु बाणली। पुढें कायजी कथा वर्तली। चतुर्दशें[2] ब्रह्में देवें कथिलीं। बृहदारण्य श्रुतीतें ॥ ६६ ॥ चौदा ब्रह्मांत कोण जी ब्रह्म। अनिर्वाच्य शाश्वत ब्रह्म। येक ब्रह्म द्वितीय नास्ति ब्रह्म। सद्गुरुनाथ सांगती ॥ ६७ ॥ सद्गुरुकृपेची कैसी स्थिति। मनेंविण ते ब्रह्मप्राप्ति। मनेंविण ते कैसी प्राप्ति। मन तों पाहिजे लक्षावया ॥ ६८ ॥ लक्षावया मात्र मन असावें। निर्विकल्पीं मन नसावें। शुद्ध कल्पनें ब्रह्म कल्पावें। निर्विकल्प सहजचि ॥ ६९ ॥ निर्विकल्प विमळ ब्रह्म। तरि बद्धमुक्त कांहो भ्रम। बद्ध मुक्त माया संभ्रम। नित्य मुक्त ते साधुजन ॥ ७० ॥ साधुजनीं कैसें राहावें। [3]साधन सुखें करीत जावें। साधन कांहो सिद्धें करावें। साधन न करितां सिद्ध बद्ध ॥७१॥ सिद्धपणें बद्ध होय। साधन करितां सिद्ध होय। सर्वांसी साधन श्रवण उपाय। अद्वैतग्रंथ परमार्थी ॥७२॥ अद्वैतग्रंथ परमार्थी श्रवण साधु अखंड करिती। गुरुभक्तियोगें सायोज्यमुक्ति। पाठीं लागे गुरुभक्तां ॥ ७३ ॥ गुरुभक्तांसी बद्धता नाहीं। मग सायोज्यमुक्ति घेणें काई। बद्धता मुक्तता विसरूनि पाहीं। सद्गुरुभजन करावें ॥७४॥ सद्गुरुभजनें पावन व्हावें। मग सत्संगें काय जी विवरावें। सत्संगें आत्मज्ञान विवरावें। माया ब्रह्म सर्वेश्वर ॥ ७५ ॥ माया ब्रह्म ईश्वर कोण। समर्थें केलें निरूपण। माया तो चि मूळ पुरुष आपण। परब्रह्म तें निरुपाधि ॥ ७६ ॥ परब्रह्म निरुपाधि। तरी मायेचा तो कोण उपाधि। मायेचा तो ईश्वर उपाधि। मायेसी निर्मिता सर्वेश्वरु ॥७७॥ सर्वेश्वरीं सर्वही लागलें। कार्यकारण कर्तुत्व आपुलें। परब्रह्म निर्गुण

---

१ श्रीदासबोध ६/३. २ श्रीदा. बो. ७/३ या पुढील ओव्यांत संक्षेपानें सांगितलेले विषय श्री. दा. बो. ७ व्या शतकांत निरूपिले आहेत. ज्ञानोत्तर ज्ञानांनीं कर्मे करीत रहावें असें ग्रंथकार स्पष्ट व सकारण सांगत आहेत.

संचलें । सर्वेश्वरु लक्षीतसे ॥ ७८ ॥ सर्वेश्वरें लक्षिलें ब्रह्म । जीवेश्वरासी कैसें ब्रह्म । गगनसदृशं परब्रह्म । जीवेश्वरासी उपदेशिलें ॥७९॥ जीवेश्वराची गेली अविद्या । स्थूळ सूक्ष्म कारण विद्या । प्रपंचभूतातीत ब्रह्म सद्या[1] । सद्गुरुनाथें अनुभविलें ॥ ८० ॥ सद्गुरुनाथ दाविती ब्रह्म । दुश्चित प्राणी नेणती ब्रह्म । किती दिवसां परब्रह्म दृष्टि पडेल सांगा जी ॥ ८१ ॥ सांगा किती दिवसां होईल गति । कासया लागेल दिसगति । सावध साक्षपी दक्षासी गति । संत संगति तात्काळ ॥ ८२ ॥ संतसंगति कैसा मोक्ष । तत्वनिर्शनीं अंतरसाक्ष । अंतरसाक्ष पूर्वपक्ष । साक्षिभूत मावळला ॥ ८३ ॥ अंतरसाक्ष मावळला । ब्रह्मांश ब्रह्मीं मुळीं संचला । घटमठमहदाचिदभास गेला । आकाश ब्रह्म सनातन ॥ ८४ ॥ आकाश ब्रह्म सनातन संत । कैसे वोळखावे महंत । अमृत सेविल्या काया लखलखित । अंतरबाह्य दिसताहे ॥ ८५ ॥ अंतर्बाह्य लक्षणें संत । वोळखावे हे संत महंत । अंतरस्थिति पाहतां अनंत । अंतप्रांत साधुजन ॥ ८६ ॥ अंतप्रांत पावले साधु । साधुसंगमें सर्वत्र साधु । सर्वत्र कैंचे होती साधु । आपुलाल्या संकल्पें ॥ ८७ ॥ संकल्पें नाना अनुभव बोलिले । अंतीं निश्चय कोण केले । आत्माराम होऊनि ठेले । आत्मज्ञानी शून्यातीत ॥ ८८ ॥ शून्यातीत वस्तु साधु आपण । पुढें काय जी वर्तलें निरूपण । गुणरूप देवें केलें पूर्ण । गुणातीत व्हावया ॥ ८९ ॥ गुणरूप देवें कैसें केलें । गुणरूप अहंता मूळ जालें । अहंता ह्मणे मी स्वरूप संचलें । स्वरूपीं न साहे अहंपण ॥ ९० ॥ स्वरूपीं न साहे अहंपण । मीं मौनी ह्मणतां मौनभंग जाण । कांहींच नसावें असोन । जाणणें प्रमाण निर्धारिलें ॥ ९१ ॥ जाणपण कांहीं नुरावें । तरी जाणपण कां जी धरावें । जाणजाणों चि विवरावें । सकळ कांहीं ॥ ९२ ॥ सकळ कांहीं पिंड ब्रह्मांड । जाणोनि सांडिलें त्रिगुण[2] बंड ।

---

१ सद्यः, तत्काळ. २ हा विषय श्री दा. बो. ८-६-७ मध्यें निरूपिला आहे.

अनुमाननिर्शन करूनि अखंड । प्रकृतिपरतें परब्रह्म ॥ ९३ ॥ प्रकृती-परता परेश आहे । प्रकृति कैसी निर्शन होय । प्रकृतिज्ञान निरसोनि जाये । प्रकृति हेतु जन्माची ॥९४॥ प्रकृति हेतुस्मरणमात्र । स्मरणासी कैसें जन्मसूत्र । स्मरणरूप वायु स्वतंत्र । हेतुरूपें जन्मतसे ॥ ९५ ॥ कार्यकारणकर्तुत्व हेतु । मूळमायेचा मूळतंतु । माया ब्रह्मांड उभें करितु । पिंडीं हेतु मूळमाया ॥ ९६ ॥ पिंड ब्रह्मांड ब्रह्मीं सिरकलें । ब्रह्मासी कैसें परतें केलें । खन्यासी लटिक्यानें सारिलें । गर्भांधें देखिलें वंध्ये उदरीं ॥ ९७ ॥ वंध्ये उदरीं उदंड जालें । जालें तैसें निमालें । भ्रमेणाहं भ्रमेणत्वं बोलिलें । सद्गुरुनाथ समर्थें ॥ ९८ ॥ सद्गुरुकृपे आत्माराम । आदि अनादि विमळब्रह्म । विशाळ बुद्धि परब्रह्म । वृत्ति वितळूनि पाहावें ॥ ९९ ॥ वृत्ति वितळूनि काय पाहावें । पाहातें पाहाणें अवघें जावें । साध्यें नलगे साधन करावें । श्रवणमननें निजवस्तु ॥ १०० ॥ श्रवणमननें वस्तुरूप केलें । गुणातीत होऊनि ठेलें । पुढें काय समर्थें बोलिलें । श्रवण करणें समस्तीं ॥ १ ॥ समस्तांचें अंतःकरण । येक कीं हें वेगळाले जाण । वेगळें नव्हे येकचि आपण । विष्णुरूपें जगदांतर ॥ २ ॥ जगदांतरीं जाणता विष्णु । चतुर्भुज नव्हे विष्णु । चतुर्भुज तो विग्रहें[३]विष्णु । सर्वज्ञ विष्णु मुळमाया ॥ ३ ॥ मुळीं पाहातां तिन्ही निर्गुण । तिन्ही गुणापरता ईश्वर जाण । ईश्वरचि त्रिगुणांशें आपण । हरिहरविधि बीजोद्भवें ॥ ४ ॥ बीजोद्भव कैसे जाले । श्रोते जनीं प्रश्न केले । समर्थदेवें निरोपिले । आकाशब्रह्मीं सर्वेश्वरु ॥५॥ आकाश ब्रह्मीं वायु जाला । मूळमाया ईश्वर बोलिजे त्याला । अष्टधा प्रकृतिविस्तार केला । द्विविधा रूपें मूळवायु ॥ ६ ॥ वायुदेव अग्निदेव । अपोनारायण आपदेव । भूमिगर्भीं कितीयेक देव । सर्वज्ञदेव वायुरूपें ॥ ७ ॥ वायु जगजोति द्विधा जाण । अग्निआप पृथ्वीगुण कल्प कल्पों सृष्टि आपण । ब्रह्मदेवें केलीसे ॥ ८ ॥ ब्रह्मदेवें सृष्टि

---

१ श्री दा. बो. ६/३ पहा. २ मी ही भ्रमानें आणि तूं ही भ्रमानें च ( निराळे आहों असें भासतें ) ३ शरीरधारी विष्णु.

केली । विष्णुदेवें प्रतिपाळिली । रुद्रदेवें संहारिली । सर्वकर्ता सर्वेश्वरु ॥ ९ ॥ सर्वेश्वरें सर्व केलें । महा प्रळई संहारिलें । विवेकप्रळयें अनुभवा आलें । शाश्वत ब्रह्म सनातन ॥ १० ॥ शाश्वतवस्तु परब्रह्म । सर्वेश्वरीं माया संभ्रम । त्रिकांड वेद अनुक्रम । सोपानमार्ग मुक्तीला ॥ ११ ॥ सोपानमार्ग सांगा कवण । कर्म[1] उपासना आणि ज्ञान । सगुणभजन ब्रह्मज्ञान । सद्गुरुमुखें विवरावें ॥ १२ ॥ सद्गुरुकृपें उपासना । बुद्धियोगें प्रसन्न जाणा । सद्यप्रचित पाहतां नाना । मायाब्रह्म अनुभवलें ॥ १३ ॥ मायाब्रह्म कैसें अनुभवलें । चंचळ निश्चळ विवरण केलें । चंचळ चैतन्य ईश्वरत्व जालें । आकाशब्रह्म निश्चळ ॥ १४ ॥ निश्चळ ब्रह्म चंचळ देव । त्रिधा नामें नामरूप सर्व । स्त्रीलिंग पुल्लिंग नपुंसक भाव । मूळपुरुषीं सर्वेश्वरीं ॥ १५ ॥ लोकामध्यें दोनी पुरुष । क्षर अक्षर कूटस्थ पुरुष । क्षराक्षरातीत उत्तम पुरुष । निष्कळंक सर्वत्रीं ॥ १६ ॥ सर्वत्रांसीं हेचि सांगणें । श्रवणमनन अखंड करणें । निजध्यासें तात्काळ पावणें । साक्षात्कार स्वरूपीं ॥ १७ ॥ स्वरूप देवें अनुभवा आणिलें । जें जें पुसिले तें सांगीतलें । पुढें सिद्धांत निरूपण कैसें केलें । समर्थें तें चि सांगावें ॥ १८ ॥ सिद्धांतनिरूपण निर्धारीं । चंचळ तितुकें विकारी । निश्चळ ब्रह्म निर्विकारीं । दृश्य द्रष्टा दर्शनातीत ॥ १९ ॥ दर्शनातीत ब्रह्म पाहीं । दर्शनासी कांहीं आहे किं नाहीं । प्रतिमा अवतार अंतरात्मा[2] देहीं । परब्रह्मीं पाववया ॥ २० ॥ परब्रह्म परमपावन । तरी कां कर्म उपासना ज्ञान । कर्मउपासना समाधान । परमार्थ साधन बोलिलें ॥ २१ ॥ परमार्थसाधन कैसें आतां । सारविवेक करणें तत्वता । निश्चळ ब्रह्म सार सर्वथा । चंचळ माया माईक ॥ २२ ॥ मूळमाया सर्वांसी कारण । प्रपंच परमार्थ राजकारण । राजयोग साकल्य विवरण । लिहिणें वाचणें महंती ॥ २३ ॥ महंतें गुप्तेश्वरासि देखिलें । गुप्तगंगेसी[3] स्नान केलें । स्नान घडतां सर्वांग निवालें । वृत्तिशून्य योगेश्वर ॥ २४ ॥ वृत्तिशून्य

---

१ कर्म, उपासना आणि ज्ञान या मोक्षमार्गरूप जिन्याचा पायऱ्या होतें

२ अंतरात्माला. ३ आत्मज्ञानरूप गंगेंत.

योगेश्वर । उपदेश करिती निरंतर । मुख्य तत्व जगदांतर । तत्वातीत निजवस्तु ॥ २५ ॥ वस्तुरूप निर्मळ निवांत । अंतरात्मा संतमहंत । अंतरस्थिति राखोनि अनंत । महंत महंत करीतसे ॥ २६ ॥ महंतें महंत कैसे केले । विवेकवैराग्यें लोक बोधिले । प्रत्यय येतां निवाले । हरिकथा निरूपणें ॥ २७ ॥ हरिकथानिरूपण । निरूपणीं दोनी गोष्टी जाण । देव कोण आपण कोण । देवभक्त ऐक्यत्वें ॥ २८ ॥ देवभक्तां ऐक्यत्व जालें । विवेकवैराग्यें सकळ त्यागिले । भजन भाग्य उदंड भोगिलें । सांग महंती सन्मार्ग ॥ २९ ॥ सन्मार्गें त्रिधा निवेदन । जड चंचळ निश्चळ जाण । जेथील तेथें तदंश आपण । वाचातीत परात्पर ॥ ३० ॥ वाचातीत निरंजन । तेथें हरिसंकल्पें सृष्टिकथन । सृष्टिप्रळयें ब्रह्म निर्गुण । मायातीत सर्वदां ॥ ३१ ॥ मायातीत सर्वदां ब्रह्म । विषय त्याग कैसें वर्म । शबल विषयत्याग धर्म । शुद्ध विषय सन्मार्गें ॥ ३२ ॥ सन्मार्गें जो काळ गेला । तो काळ कार्यासी आला । कार्यकारण भास सरला । मायातीत निरंजन ॥ ३३ ॥ [1]मायातीत निरंजन साधु । दुर्बळांसी करिती ज्ञानबोधु । यत्न सिकऊनि विज्ञानबोधु । सांग[2] महंती करिताती ॥ ३४ ॥ सांग महंती उत्तमपुरुष । उत्तम[3] गुणें तो विशेष । जगदाधार परमपुरुष । जगदोद्धार करीतसे ॥ ३५ ॥ जगदोद्धार कैसे केले । आत्माअनात्मा विवेक जाले । सारासार विचार पाहिले । परब्रह्मीं पाववया ॥ ३६ ॥ परब्रह्मीं ब्रह्मगोळ । ब्रह्मप्रळईं गेला सकळ । सृष्टिकाहाणी बोलिली केवळ । प्रकृतिपुरुषें निवांतें ॥ ३७ ॥ प्रकृतिपुरुषें निवांत ब्रह्मीं । लघुबोध तत्वीं स्वानंदधामी । आदिपुरुष आत्मारामी । लघुबोध जाला स्वानंदें ॥ ३८ ॥ निर्मळ निश्चळ बोध केला । निर्मळ निश्चळ आत्मा जाला । आत्मा वायु चंचळ केला । ब्रह्म आकाश निर्मळ ॥ ३९ ॥ ब्रह्म आकाश

---

१ पुनः कर्मयोगरहस्य ! साधूंचें कर्तव्यच हें आहे. त्या शिवाय आह्मीं अज्ञ पामरांनीं काय करावें? २ सर्व बाजूंनीं पूर्ण. ३ उत्तम गुणी ( ज्ञानी ) असल्याशिवाय लोकसंग्रहाचें काम चांगलें होणार नाहीं. ह्मणून ज्ञान्यांचें काम जगदुद्धार करण्याचें आहे.

निश्चळ । कर्ता कोण सांगा केवळ । आपुला आपण कर्ता सकळ । आत्माराम सर्वत्रीं ॥ १४० ॥ आत्माराम कर्ता भोक्ता । देहात्मयोगें सर्व सत्ता । निरंजनासी उपमा देतां । निरोपम्य निरंजन ॥ ४१ ॥ निरंजन वर्तवीना जन । जग वर्तवी जगजीवन । जगजीवनें निरंजन । संतसंगें अनुभविलें ॥ ४२ ॥ संतसंगें निर्भय स्थिति । भिक्षा कवित्व कीर्तनें करिती । हरिभक्ति विरक्ति ईश्वरप्राप्ति । हरिभक्त होती विरक्त ॥ ४३ ॥ हरिभक्त विरक्त चातुर्यनिधि । युगधर्म त्यांतें कदा न बाधी । अखंडध्यानें आत्मसिद्धि । निर्गुण ब्रह्म अनुभविलें ॥ ४४ ॥ निर्गुण ब्रह्म पावल्यावरी । मिथ्या माया बाजिगिरी । सद्गुरुनाथें दृष्टांतद्वारीं । मायाभान वारिलें ॥ ४५ ॥ मायानिरासें चातुर्य निस्पृह । पुढें जाला व्यापक निस्पृह । श्रेष्ठात्मा तो वडील देव । अंतरात्मा साक्षत्वें ॥ ४६ ॥ साक्षत्वाचा तत्व दोरा । पाहे सारासार विचारा । खांजणी भांजणी भूत पसारा । परब्रह्मीं वारला ॥ ४७ ॥ शाश्वत ब्रह्मीं चंचळ माया । महद्भूत महत्तत्व काया । उपासना ईश्वर मूळमाया । हरिसंकल्प भगवंतु ॥ ४८ ॥ हरिसंकल्प प्रत्ययें पाहाती । चौदा पिढ्या ठाईं पाडिती[1] । अधोर्ध्व माया सांडोनि जाती । चंचळ चक्रा पैलीकडे॥ ४९ ॥ चंचळ-चक्रीं सूक्ष्म जीव । पिंडोत्पत्ति नाना स्वभाव । पिंड ब्रह्मांड व्यापक सर्व । आत्माराम उपासना ॥ ५० ॥ आत्माराम उपासना । नेऊनि घाली निरंजना । वाक्यार्थ शोधितां नाना । सिद्धांत ब्रह्म सनातन ॥ ५१ ॥ सिद्धांत ब्रह्म सनातन । पुढें काय जी बोलिलें निरूपण । वाल्मिकातें केलें वंदन । शतकोटि कथा संकीर्तनी ॥ ५२ ॥ शतकोटि चरित्रें सूर्यवंशीं[2] । म्हणोनि स्तविलें प्रभाकरासी । पृथ्वी आधार सर्व जीवांसी । पृथ्वीस्तवन केलें हे ॥५३॥ पृथ्वीस्तवन जाहल्यावरी । आपो-नारायण निर्धारी । आप अमृत लोकोत्तरीं । सुरनर पन्नग जीवन हें ॥५४॥ जीवनावडिल अग्निनारायण । रघुनाथजीचा श्वशुर जाण । म्हणोनि अग्नीचें स्तवन । अनुक्रमें सर्वत्रीं ॥ ५५ ॥ सर्वांसी मान्य अग्निदेव ।

---

१ चौदा पिढ्यांचा उद्धार करितात. २ सूर्यवंशांत अवतरलेल्या रामाचें.

अग्नीवडिल वायुदेव । वायुदेवें ब्रह्मांड सर्व । चैतन्यरूपें धरिलेंसे ॥५६॥ चैतन्य चंचळ वायु पवन । पवनावडिल अंतरात्मा आपण । महद्भूत जगजीवन । महत्तत्व मूळमाया ॥५७॥ मूळमाया जगदीश्वर । प्रकृतिपुरुष परमेश्वर । दंपत्यत्यायोगें चराचर । नानापरि विस्तारलें ॥ ५८ ॥ नानारूप दृश्य विस्तारलें । मूळरूपें दिसोनि आलें । प्रकृतिपुरुष ठसावले । अंतरात्मा महद्भूत ॥ ५९ ॥ महद्भूत उपासना । नानापरीच्या लोकभावना । सकाम निःकाम भजना । नाना लोक प्रवर्तले ॥ ६० ॥ सकळ लोकांचें मूळ । अंतरात्मा असे केवळ । मुळीं घालितां जळ । पानोपान[1] पावतसे ॥६१॥ पावावया जगदीशातें । नाना पंथ नाना मतें । सद्गुरुकृपें निश्चितार्थें । आत्माराम अनुभविला ॥६२॥ आत्माराम महद्भूत । त्रिगुण त्याचें अंगभूत । परलोकींचा सुखस्वार्थ । समर्थ राम उपासना ॥६३॥ उपासना सर्वांसि थोर । करणे देव साक्षात्कार । शिवशक्तिरूप चराचर । प्रत्यक्ष आलें अनुभवा ॥६४॥ अनुभवें जों करी श्रवण । तत्व झाडा निरूपण । सारासार विचारें पूर्ण । परब्रह्म अनुभविलें ॥ ६५॥ परब्रह्म विमळ ब्रह्म । भ्रमासी ह्मणों नये ब्रह्म । द्रष्टा साक्षी सत्ता ब्रह्म । संदेह नाना धरूं नये ॥ ६६ ॥ नानापरीचे योगमार्ग । अजपा सोपा ज्ञानमार्ग । सोहं सोहं परता विज्ञानमार्ग । अहं सोहं सारूनियां ॥६७॥ अहं आत्मा तो देहात्मा । सुखदुःख भोगी तो जीवात्मा । जगजीवन जाणता आत्मा । आत्माराम सर्वांघटीं ॥ ६८ ॥ आत्माराम तत्वातीत । तनुचतुष्टय दृश्य जात । पंचीकर्णतत्वें समस्त । आत्मारामीं वारलीं ॥ ६९ ॥ आत्माराम अनुभविला । जाणता तो समजोनि राहिला । टोणप सिद्ध उगाचि बैसला । आत्माराम नेणेंचि ॥ ७० ॥ आत्माराम निरंजन । काय जाणेल मूर्ख जन । सत्शास्त्रें करावीं श्रवण । जें जें मागां निरोपिलीं ॥७१॥ मागां निरोपिलें तें ऐकिलें । पुढें देवें काय जी बोलिलें । सर्व देवाचें स्तवन केलें । आत्मारामीं पावावया ॥ ७२ ॥

---

१ झाडाच्या प्रत्येक पानाला.

आत्माराम कळे कैसा । सर्वज्ञसंगें कळे ऐसा । सर्वज्ञ देव जैसा तैसा । त्यांतें तोचि जाणे हो ॥ ७३ ॥ त्यातें तोचि जाणे देव । संत महंत तरुणोपाव । श्रवणमननें नाना जीव । आत्मारामीं मेळविले ॥ ७४ ॥ आत्मारामीं कैसे मिळती । देहात्मयोगें विचार पाहती । देह दुर्लभ जाणोनि निश्चिति । सार्थक करिती सत्संगें ॥७५॥ संतसंगें कष्टपरिहार । खरें खोटें निवडिती सार । सारासारें निर्विकार परब्रह्म पावती ॥ ७६ ॥ परब्रह्मीं नाही दृष्टि । उगाचि करी चाट गोष्टि । उत्तमगुणें मान्य सृष्टि । गुण देणें ईश्वराचें ॥ ७७ ॥ ईश्वर सांडिला[1] अंतर्देव । ह्मणे मजला कांहीं देवें । देव ह्मणतां येतसे खेवें[2] । जनस्वभाव लालची ॥ ७८ ॥ जनस्वभाव परता करा । अंतरदेव अंतरीं धरा । कर्म उपासना ज्ञान विवरा । विज्ञानब्रह्मीं पाववया ॥ ७९ ॥ विज्ञान ब्रह्मीं पावे कोण । निद्राविळासीं दाटले जन । निद्राभंग करिती साधुजन । जागृतिब्रह्म बिंबलें ॥ ८० ॥ जागृति जालियां देखे स्वप्न । तरी तो श्रोता अवलक्षण । समर्थें जागृति आणिला पूर्ण । येकांतभुवनीं प्रबोधिला ॥ ८१ ॥ येकांतभुवनीं काय केलें । अक्षर सुंदर देवें करविलें । ग्रंथविवरण पुढें जालें । अर्थभेद अध्यात्म ॥ ८२ ॥ अर्थभेद अध्यात्मविवरण । नेणे तेव्हां करंट लक्षण । सकळ जाणतां सदेव लक्षण । उत्तमगुणें समर्थ ॥ ८३ ॥ समर्थें देव ठाईं पाडिला । कर्ता ईश्वर अनुभवा आणिला । कर्तुत्वभास वेगळा केला । आत्मा निर्गुण निरंजन ॥८४॥ आत्मा निर्गुण नेणती जन । ह्मणोनि सिकविती संतजन । परमार्थी विवेकी सज्जन । परमात्मा वोळखती ॥८५॥ आत्मारामीं निश्चलबुद्धि । बुद्धीपासीं कार्यसिद्धि । ह्मणोनि बुद्धिवाद नाना विधि । गुरुनाथें सांगीतले॥८५॥ सद्गुरुनाथ हित सांगती । प्रपंचीं लोक उपाधि आसती । कांहीं गलबल्यांत निवळ होती । संत साधु समागमें ॥८७॥ संत[3] साधुज्ञानी उदास । जगदोद्धाराचा हव्यास ।

---

१ ग्रावें. २ मिठी मारण्याची उत्कंठा. ३ या दोन ओव्यांत लोकसंग्रहाचें दुमणें ज्ञान्याच्या मागें नित्य कां असतें तें पुनः स्पष्ट सांगितलें आहे.

येकांतीं राजकारणें सावकाश । राजयोगें विवरिती ॥ ८८ ॥ राजयोगें[1] भक्तियोगें । ज्ञानयोगें वैराग्ययोगें । जगदोद्धार लागवेगें । विवेकी संत करिताती ॥ ८९ ॥ विवेकी संतीं काय केलें । पूर्णापूर्ण व्यापक विवरिलें । आत्मा निरंजन विभागूनि दिधलें । पूर्ण व्यापक निरंजन ॥९०॥ पूर्ण व्यापक निरंजनीं । त्रिविध सृष्टि उपलक्षणीं । मूळमाया भूतें च्यारि खाणि । सूक्ष्म नाम सिद्धांत पुढें ॥९१॥ सूक्ष्म नाम सिद्धांत जाला । निर्गुण देव अनुभवा आला । नामरूप भास गेला । च्यारि खाणि ऐलीकडे ॥ ९२॥ ऐलीकडे सर्वही नामें । स्थूळ सूक्ष्म अनुक्रमें । कर्ता देव सृष्टिक्रमें । निश्चळ ब्रह्म सनातन ॥९३॥ निश्चळ ब्रह्म चंचळ देव । आपुला माईक स्वभाव । चत्वार जिनस अभिप्राव । परब्रह्म माया भूतें खाणि ॥९४॥ परब्रह्मीं पाववी उपासना । उपासना ब्रह्म कां ह्मणावीना । मायोपाधि निर्शतां नाना । ईश्वर ब्रह्म सनातन ॥९५॥ ईश्वर ब्रह्म सनातन । मायोपाधि निर्शतां जाण । यावन्माया भास त्रिगुण । अनंत गुण आत्मयाचे ॥ ९६ ॥ आत्मयाचे नाना गुण । परब्रह्म जाणावें निर्गुण । नाना देहयंत्रीं अंतरात्मा आपण । विधि प्रपंच चालवी ॥ ९७ ॥ आत्माराम विधिप्रपंचकर्ता । कर्ता अकर्ता माईक वार्ता । करूनि अकर्ता त्याहूनि पर्ता । निर्विकार निरंजन ॥ ९८ ॥ निरंजन तें परब्रह्म । चंचळ माया भास भ्रम । सूक्ष्म नाम सिद्धांत वर्म । पिंडीं शोधूनि पाहावें ॥ ९९ ॥ पिंड ब्रह्मांड विवरण केलें । विमळ ब्रह्म सर्वत्र जालें । गगनाकार सदोदित संचलें । येकरूप पुरातन ॥ २०० ॥ येकब्रह्म पुरातन । निर्मळ निश्चळ निरंजन । निरंजन ह्मणावया जन । सद्गुरुपदीं उरेना ॥१॥ सद्गुरुपदीं ऐक्य त्रिवेणी । ह्मणोनि नामें निवृत्ति वेणी । निवृत्तिराम ग्रंथश्रवणीं । स्वात्मबोध ग्रंथार्थें ॥ २ ॥ इतिश्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । स्वात्मबोधनिवृत्तिनाम । येकोणिसांवा समासु ॥ १९ ॥ ॥ छ ॥

---

१ या दोन ओव्यांत लोकसंग्रहाचें ह्मणणें ज्ञान्याच्यामागें नित्य कसें असतें तें पुनः स्पष्ट सांगितलें आहे.

॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरुस्वामी कृपामूर्ति । मूळमाया कैसी निवृत्ति । समर्थं सांगीजे आह्मांप्रति । निर्गुण ब्रह्मीं पावावया ॥ १ ॥ मूळमाया योगनिवृत्तिकथन । केलें पाहिजे निरूपण । संतसाधु विद्वज्जन । श्रोतेजन श्रवणार्थी ॥ २ ॥ श्रोते पुसती सभामंडळीं । केवळ निर्मळ निश्चळीं । ब्रह्मापासूनि मूळमाया मुळीं । कैसी जाली कर्तुत्वें ॥ ३ ॥ कार्यकारण कर्तुत्व हेतु । प्रकृति बोले[1] गीता अर्थु । ईश्वर कर्ता कोण्ही समर्थु । देव आहे कीं नाहीं जी ॥ ४ ॥ अविद्यागुणें बोलिजे जीव । मायागुणें बोलिजे शिव । मूळमायागुणें बोलिजे देव । परब्रह्म आहे कीं नाहीं जी ॥ ५ ॥ ब्रह्म येवढें निश्चळ नाहीं । देवा येवढें चंचळ नाहीं । देव निश्चळ आहे कीं नाहीं । चैतन्य चंचळीं खंब्रह्म ॥ ६ ॥ एवं परब्रह्म निर्गुण निरंजन । तेथें सृष्टिकर्ता कोण । मायाब्रह्म सर्वेश्वर कथन । समर्थं केलें पाहिजे ॥ ७ ॥ ऐकोनि आर्त श्रोतयाचें । समर्थ सांगती ज्ञान साचें । निर्गुणब्रह्मीं मूळमायेचें । अनुसंधान ऐका हो ॥ ८ ॥ मुख्य आत्माराम परब्रह्म निरंजन । तेथें ईश्वरत्व माया विवर्तभान । मूळमायानिवृत्तिकथन । श्रोते जनीं परिसावें ॥ ९ ॥ माया ब्रह्मीची मांडणी । कथिली अध्यात्मरामायणीं । रामगीता रामहृदय महेश शूलपाणि । कैलासीं गौरीसी सांगतसे ॥ १० ॥ ब्रह्मदेव सांगे नारदाप्रति । नारद सांगे व्यासाप्रति । सूत सांगे ऋषींप्रती[2] । नैमिषारण्यीं यथार्थ ॥ ११ ॥ चित्रकूटवनीं भरतोत्तम बोधिला । जनस्थानी लक्ष्मण बोधिला । भद्रासनीं हनुमंतजीला । आत्माराम बोधितसे ॥ १२ ॥ प्रथम राम वियोगाची अवस्था । न साहेचि बंधु

---

१ ‘ कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ’ भ. गी. $\frac{१३}{२०}$. शरीरादि कार्य आणि इंद्रियादि कारण यांच्या उत्पत्तीचें कारण प्रकृति ( मूळमाया ) आहे.
२ शौनकादिक ऋषींना. सर्व कथापुराणें अगदीं सरते शेवटीं सूत नामक पुराणिकानें शौनक आदिकरून ऋषी नैमिषारण्यांत सत्र करीत असतां त्यांना सांगितलेलीं आहेत.

भरता । श्रीरामकृपासिंधु सर्वथा । वशिष्ठा मुखें उपदेशी ॥ १३ ॥ वशिष्ठें नेउनी येकांतीं । भरत बोधिला राम निवांतीं । ह्मणे वा भरता तुजप्राति । राम अद्यापि न कळला ॥ १४ ॥ राम केवळ विमळब्रह्म । राम केवळ परब्रह्म । राम केवळ निर्गुण ब्रह्म । ब्रह्मादिकांसी दुर्लभ ॥ १५ ॥ षड्गुणसंपन्न जगदीश्वर । मायोपाधि कर्ता ईश्वर । ब्रह्मा विष्णु महेश्वर । जगदाकारें जगदात्मा ॥ १६ ॥ मायामानुषविग्रह सूर्यवंशीं । ब्रह्मदेवें प्रार्थिलें यासी । सीता रमा माया निश्चयेंसी । देव कार्यासी अवतरला ॥ १७ ॥ शेषशयनीं नारायण । लक्ष्मण तोचि शेष आपण । शंख चक्र तुह्मी द्विभुज जाण । चापपाणि गदाधर ॥ १८ ॥ गदा पद्म कोदंड शर । लीळाकमळें मारी असुर । जैसे कमळकोशीं भ्रमर । मृत्यु पावती परागें ॥ १९ ॥ सुंदर कोप याचि कारणें । लीळा कमळें युद्धि खेळणें । येऱ्हवीं भ्रूभंग[1] क्रोध वळणें । अनंत ब्रह्मांडें भस्मति[2] ॥ २० ॥ एवं लीळा कमळ-शरपाणि[3] । सुमनविशिख[4] सौंदर्यखाणि । नाना शंबरदशकंधर[5][6] दळणीं । रतिपति[7] राम विराजे ॥ २१ ॥ रतिपतीचा शंकर शत्रु । सीतापतीचा शंकर मित्रू । आत्माराम हा जगन्मित्रु । शत्रु मित्रु नाडळे ॥ २२ ॥ शंख चक्र धरणें नाहीं । ह्मणोनि निमित्य केली कैकेयी । कैंचा वनवास याचे देहीं । दशरथ राम निर्धारें ॥ २३ ॥ शंखचक्र अयोध्या रक्षणीं । ठेऊनि जातो च्यापपाणि । ह्मणसी साहित्यें बोलिली ब्रह्मवाणी । यथार्थ मानी भरतोत्तम ॥ २४ ॥ एवं सगुण निरोपिलें ध्यान । निर्गुणीं लावीं अनुसंधान । आत्माराम स्वानंदघन । तुज वेगळा नाहीं रे ॥२५॥ पाहें पाहें दशदेह सारुनी । स्थूळ सूक्ष्म माहाकारणीं । पिंडब्रह्मांड वारूनि आत्मारामस्वानंदजीवनीं । बुडी देईं सर्वथा ॥ २६ ॥ ऐसया सद्गुरु महर्षिबोलें । भरतें आपणा शोधूनि पाहिलें । तो लवणद्वैत[8] हें मानस

---

१ भ्रू भंग, डोळे वटारणें. २ भस्म होतात. चमत्कारिक प्रयोग. ३ कमलरूप-बाण धरणारा. ४ पुष्पशर-मदन-त्याप्रमाणें सौंदर्यवान्. ५ मदनाचा शत्रु दैत्य. ६ रावण. ७ मदन. ८ मीठ समुद्रापासून निराळें असतेंसें वाटतें ; पण पाण्याचा संयोग झाल्यावर जसें त्याचें वेगळेपण राहात नाहीं, त्या प्रमाणें भरतरूप मीठ रामरूप समुद्रांत विरालें.

विरालें। आत्माराम स्वरूपार्णवीं ॥२७॥ गेली रामवियोगअवस्था। अवस्था सारूनि रामचि तत्वता। वशिष्ठ ह्मणे समाधि अवस्था। कोणेपरि सारील हो ॥२८॥ सगुणध्यानीं अत्यंत मोहो। सगुणध्यान यासीं सांगोन पाहों। ह्मणे बा भरता श्रीरामरावो। वनाभिगमनीं चित्रकूटीं ॥२९॥ चित्रकूट ऐकोनि कानीं। शीघ्र उठिला सारूनी उन्मनी[1]। सगुण भजनीं निरत नयनीं। कोदंडपाणि अभिवंदिला ॥ ३० ॥ ह्मणे जय जय जी जगजीवना। पूर्ण व्यापक पुरातना। आत्मयारामा स्वानंदघना। तुझी आज्ञा प्रमाण जगद्गुरु ॥ ३१ ॥ तव रामें दिधलें आलिंगन। नकळे राम कोण भरत कोण। भरतें केलें चरणीं नमन। अनन्य बंधु विराजे ॥ ३२ ॥ मग सद्गुरुरामचरणींच्या पादुका। श्रीरामरूपें स्थापिल्या मस्तका। अनंतकोटिब्रह्मांडनायका। पूर्ण व्यापका नमस्कारी ॥३३॥ मुरडे अयोध्ये माझारीं। तव रामचि देखे सचराचरीं। नंदिग्रामीं निवास करी। स्वानंदधामीं सुखरूप ॥ ३४ ॥ एवं कथानुसंधान। कथिलें अध्यात्मरामायण। शिवपार्वतीसंवाद गहन। पुढें काय वर्तलें ॥ ३५ ॥ ऐका पंचवटिकाजनस्थानीं। कथा अध्यात्मरामायणी। कोटि कंदर्प लावण्यखाणी। मनोहर विराजे ॥३६॥ तेथें लक्ष्मण तोचि जीवात्मा। श्रीराम स्वयें परमात्मा। मध्यें सीतामाया मनोरमा। ब्रह्मयोगिणी वागतसे ॥३७॥ गौतमीचें[2] करूनि स्नान। पंचवटिके राजीवनयन। सहजासनीं स्वानंदघन। सीताजीवन वल्कली ॥३८॥ लक्ष्मणें पुसिलें सर्वोत्तमा। परमपुरुष आत्मयारामा। मायाब्रह्म निरोपण मोक्षधर्मा। समर्थें केलें पाहिजे ॥३९॥ भरत शत्रुघ्न चित्रकूटीं। वशिष्ठें बोधिले कृपादृष्टि। तेणें सुखें स्वानंददृष्टि। नंदिग्रामीं राहिले ॥ ४० ॥ माझें वैभव चरणसेवन। परि कळलें पाहिजे अध्यात्मज्ञान। जेणें ज्ञानें सदाशिव आपण। मुक्तपुरी वसवीतसे ॥४१॥ निजज्ञान निरोपणें सद्गुरु समर्था। ह्मणोनि चरणीं ठेविला माथा। कृपा उचंबळली लोकनाथा। काय बोले सर्वोत्तम ॥ ४२ ॥ साधु

---

१ समाधिस्थिति. २ गोदावरीचें.

साधु सहस्रफणि । धन्य धन्य तुझी प्रश्नवाणी । वनवासमिसें गुणरत्न-खाणि । लोकानुग्रहें पुससी ॥ ४३ ॥ आता गुरुपरंपराज्ञानें । वशिष्टें केलीं जीं निरुपणें । तेंचि वत्सा तुजकारणें । लोकानुग्रहा उपदेशुं ॥ ४४ ॥ ऐक लक्ष्मणा माया ब्रह्म । मोक्षमार्गीचें मुख्य वर्म । जेणें निरसे जन्मकर्म । आब्रह्मस्तंबपर्यंत ॥ ४५ ॥ आदियेक परंब्रह्म । तेथें ईश्वर माया सृष्टिक्रम । तोचि आतां अनुक्रमधर्म । संकेतचिन्हें दाखऊं ॥ ४६ ॥ परब्रह्म निर्मळ निश्चळ । तेथें नाहीं मायामळ । अष्टधा प्रकृति दृश्य समूळ । ईश्वरीं विवर्त गुणमाया ॥ ४७ ॥ निर्गुण नव्हे सगुण । सगुण नव्हे निर्गुण । ईश्वर सगुण ब्रह्म निर्गुण । न्याय वेदांतप्रतिपाद्य ॥ ४८ ॥ सांख्यमतें प्रकृति कर्ती । वेदांतमतें पुरुष प्रकृति । निर्गुण ब्रह्मीं कर्तुत्व लाविति । महामूर्ख शिरोमणि ॥ ४९ ॥ परब्रह्मीं मायेचें झोंबडें । लावील तें ज्ञातें वेडें । वेड्यासी ह्मणों नये वेडें । महा विषाद मानील ॥ ५० ॥ पाहतां त्याचा काय अन्याय । ईश्वर माया दुरत्यय । मायाब्रह्म सत्य प्रत्यय । येऊं नेदी मतांतरें ॥ ५१ ॥ ब्रह्म निर्गुण निरोपाधि । ईश्वरीं अवघी माया उपाधि । मूळमाया गुण-माया अविद्याउपाधि । परब्रह्मीं लागेना ॥ ५२ ॥ आधीं मुख्य परब्रह्म-पद । तेथूनि पुढें ईश्वरपद । ईश्वरापुढें त्रिगुण त्रिपद । ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ ५३ ॥ ईश्वरची परब्रह्म । मायोपाधि नसतां भ्रम । ब्रह्म न ह्मणे अहंब्रह्म । अहंब्रह्म सर्वेश्वर ॥ ५४ ॥ ह्मणोनी मायोपाधि पर-मात्मा । निरोपाधि निर्मळात्मा । घटमठमहदचिद अनुक्रमा । आकाश ब्रह्म विवरावें ॥ ५५ ॥ मुळीं हरिसंकल्प मायेसी कर्ता । त्यासचि

---

१ शेषावतार लक्ष्मण. २ दोरीवर सर्पाप्रमाणें. ३ कपिलकृत सांख्य दर्शनांत प्रकृतीचा च सर्व खेळ असून पुरुष निर्विकार आहे असें मानतात. वेदांतांत पुरुष प्रकृतीच्या साहाय्यानें पसारा मांडतो व ब्रह्म दोहोंच्याही पलीकडे आहे असें ह्मणतात. पण या शिवाय उरलेले मूर्ख निर्गुण ब्रह्माचा च सर्व पसारा आहे असें ह्मणतात. ४ उतरून जाण्यास कठीण. ५ कांहीं तरी तरंग उत्पन्न करून माया सत्य ब्रह्माचा प्रत्यय येऊं देत नाहीं. ६ ‘ मूळमायोपाधि ’ असा दुसरा पाठ.

ह्मणती करूनि अकर्ता । ईश्वर ब्रह्म सत्य वार्ता । मायोपाधि निर्शनें ॥ ५६ ॥ एवं परब्रह्म तें निभ्रम । तेथें ईश्वरमाया मिथ्या भ्रम । मायेमध्यें दोनी संभ्रम । विद्या आणि अविद्या ॥ ५७ ॥ विद्यामाया स्वरूपोन्मुख । अविद्यामाया स्वरूपीं विन्मुख । ज्ञान अज्ञान अवश्यक । स्थूळसूक्ष्म पंचभूतीं ॥ ५८ ॥ अंतःकरणपंचकें वायोपंचकें । ज्ञानेंद्रियपंचकें कर्मेंद्रियपंचकें । पंच तन्मात्राविषयपंचकें । स्थूळ सूक्ष्म ब्रह्मांडीं ॥ ५९ ॥ स्थूळ विराट सूक्ष्म हिरण्य कारण । अव्याकृति मूळप्रकृति महाकारण । प्रकृतिपुरुषें दशदेह जाण । पिंडब्रह्मांड मिळोनिया ॥ ६० ॥ विक्षेप अवर्ण माया अविद्या । कार्य कारण कर्तुत्व सद्या । स्वतःप्रमाण परतःप्रमाण शास्त्रविद्या । अध्यात्मविद्या वेदांत ॥ ६१ ॥ एवं जें जें देखिलें ऐकिलें स्मरलें । तें तें मायेमध्यें आलें । क्षराक्षर मायेंत सांपडलें । उत्तम पुरुष वेगळा ॥ ६२ ॥ त्या उत्तम पुरुषाची शुद्धि । अहंब्रह्म माया ज्ञप्ति बुद्धि । वेदांतशास्त्र प्रतिपाद्य विधि । नानाशास्त्रें उपकर्णें ॥ ६३ ॥ ह्मणोनि उत्तम पुरुष तो अद्वय । तेथें असावें अनन्य । नाहीं तरी तूं अन्यअन्य । मायेमध्यें गुंडाळसी ॥ ६४ ॥ एवं मायानिवर्तक ज्ञान । विगत ज्ञान तें विज्ञान । विज्ञानवृत्ति होत लीन । परब्रह्म स्वयें चि तूं ॥ ६५ ॥ तुवां माया ब्रह्म मोक्षधर्मं पुसिलें । तें संक्षिप्तमार्गें सर्वही सांगीतलें । लोकानुग्रहें प्रगट केलें । पंचवटिके माझारीं ॥ ६६ ॥ आतां अध्यात्मज्ञान व्हावया जतन । साधन संपत्ति

---

१ ब्रह्म विद्या आणि अविद्या दोहोंच्याही पलीकडे आहे. त्यांत ब्रह्माकडे वळलेली ती विद्या, त्यापासून दूर जाणारी ती अविद्या. २ स्थूळ, सूक्ष्म, कारण, महाकारण आणि प्रकृति हे पिंडाचे पांच देह, आणि विराट, हिरण्यगर्भ, अव्याकृत, माया, मूळमाया आणि पुरुष हे ब्रह्मांडांचे पांच. आठ देह असें येतें तेव्हां प्रकृति आणि पुरुष हे गाळावयाचे. ३ आवरण, वेष्टण. ४ सद्यः, तात्काल. ५ वेद, श्रुति. ६ मन्वादि स्मृति. ७ सांख्य, योग, न्याय इत्यादि शास्त्रें. ८ क्षर ह्मणजे पंचभूतादि सृष्टि आणि अक्षर ह्मणजे निर्विकार चैतन्य या दोन पुरुषांहून वेगळा तो परमात्मा उत्तम पुरुष. ' क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ।' भ. गी. १५,१६-१७. ९ न्याय वगैरे शास्त्रें वेदांतचीं साधनें होत.

पाहिजे जाण । तें चि वत्सा निरूपण । सांगीजेल तें ऐकें ॥ ६७ ॥ अहिंसा समता सहनशक्ति । शम दम साधन सद्गुरुभक्ति । स्वधर्मनिरत उदास वृत्ति । वैराग्यशीळ सर्वदां ॥६८॥ मत्कीर्तनीं प्रेमळस्थिति। सत्समागमीं प्रेमळवृत्ति। जयंत्यापर्वीं विष्णुव्रतीं। भागवतधर्मी तत्पर ॥६९॥ सदउपासना सद्वासना । परद्रव्य वर्ज परांगना । मर्यर्पित मनोभावना नवविधाभजनें संतृप्त ॥ ७० ॥ नाना सद्विद्येचीं लक्षणें । किती ह्मणोनि अनुवादणें । साधन संपत्ति तुज कारणें । मोक्षधर्में सांगितली ॥ ७१ ॥ बद्ध मोक्ष मायाधर्म । मायातीत मी परब्रह्म । अहंब्रह्मास्मि तुज वर्म । साध्य साधन निरोपिलें ॥ ७२ ॥ ऐसें कमळपत्राक्ष बोले । ऐकोनि चक्षुश्रवण निवांत डोले । श्रवण नयन येक केले । पूर्वीच नेणों सहस्त्रफणि ॥ ७३ ॥ ह्मणे जें जें समर्थें उपदेशिलें । तें तें तद्रूपत्वें प्राप्त जालें । याचि साटीं अरण्य घेतलें । सेवा भाग्य लाधलों ॥ ७४ ॥ तूंचि ब्रह्म जी अनादि मूर्ति । तुझी योगमाया सीता ज्ञप्ति । अनन्यपणें सेवावृत्ति । मोक्षमुक्ति पाईं कुरवंडिल्या ॥ ७५ ॥ ऐसें सजळ नयनें सौमित्रें बोलिलें । समर्थें गाढ आलिंगन दिधलें । लक्ष्मणें चरणीं नमन केलें । तों सुमनवृष्टि जाली देवांची ॥ ७६ ॥ विश्वकदंबा जगदंबा । जगदाधार मूळस्तंभा । देव भक्तांसी अविलंबा । कुरवंडि अंबा करीतसे ॥ ७७ ॥ कैलासीं शंकर गिरिजेप्रति । सांगता जाला परमप्रीति । ब्रह्मदेव सांगे नारदाप्रति । सूत ऋषींप्रति नैमिषारण्यीं ॥७८॥ श्रोते ह्मणती सर्वज्ञ । रसाळ अध्यात्म रामायण । हेचि कथा परमपावन । अध्यात्मकथन सांगा जी ॥७९॥ ऐका सादर संत सज्जन । शिवपार्वतीसंवादगहन । ब्रह्मदेव नारदासी पुरातन । कथा सांगे रामायणीं ॥८०॥ मारिला भुवनकंटक रावण । भद्रासनीं रघुनंदन । बंधु भरत शत्रुघ्न लक्ष्मण । पुढें हनुमान उभा असे ॥८१॥ कोटि कंदर्प विनोदें । माया वोवाळी परमानंदें । सहजासनीं परमानंदें ।

---

१ मय्यर्पित, माझ्या ठायीं अर्पण करून. २ श्रवण कीर्तनादि. ३ राम. ४ शेषाचा अवतार लक्ष्मण. ५ सर्पाचे डोळे व कान मिळून एक च इन्द्रिय असतें असें ह्मणतात. ६ वनवास. ७ जगाला त्रास देणारा.

ज्ञानमुद्रा सव्यहस्तीं ॥ ८२ ॥ निरोपम्य लावण्य शोभा । उपमा लाजिल्या वाचारंभा । मनमूळ आत्माराम मूळारंभा । मनोवाचा ना कळे ॥ ८३ ॥ ऐसा जो कां आदिमूर्ति । त्यांतें नमन करूनि मारुति । ह्मणे अध्यात्मज्ञान मजप्रति । समर्थें उपदेश करावा ॥ ८४ ॥ माझी केवळ सेवावृत्ति । परि अध्यात्मज्ञान व्हावें चित्तीं । निवृत्तिब्रह्मीं होऊनि निवृत्ति । मोक्षमुक्ति पाईं कुरवंडीन ॥ ८५ ॥ ऐसें बोलिल्यां हनुमान । श्रीरामें दिधलें आलिंगन । ह्मणे धन्य धन्य तूं प्राणनाथ पवननंदन । विश्वव्यापक विश्वंभरा ॥ ८६ ॥ लोकोपकारें पुससी । उपदेशपद्धति चालविसी । पाहें सीते हा गुणराशि । विश्वपाळक विश्वंभर ॥ ८७ ॥ सलज्ज माया पाहे खालति । न बोलोनि बोलें ह्मणे वृत्ति । तों रामें संकेतिलें जानकीप्रति । मारुतीसी उपदेश करावा ॥ ८८ ॥ मज उपदेशासी नाहिं ह्मणसी अधिकारु । तरि मूळमायेंत मी सर्वेश्वरु । माझ्या स्वरूपाचा करावया निर्धारु । तुज आहे अधिकार गुरुत्वें ॥८९॥ विशेष गुरुआज्ञा समर्थ आहे । मारुति तुजला प्रिय आहे । तुझें भक्तिशोधन येणें केलें आहे । आणि वायोमध्यें जगजोति तूं ॥ ९० ॥ मग समर्थबोलें जनकतनया । वामांगीं शोभली मूळमाया । ह्मणे ऐक बापा वायुतनया । रामगीता सांगेन मी ॥ ९१ ॥ मग बलभीमें नमिलें चरणकमळ । सीता वदती जाली प्रांजळ । ऐक पावना निर्मळ निश्चळ । येकाग्र मन करूनियां ॥ ९२ ॥ सद्गुरु राम केवळ ब्रह्म । आदि अनादि परब्रह्म । तेथें अनादिमाया नास्ति धर्म । सर्व करणें हें माझें ॥ ९३ ॥ राम निर्गुण निरुपाधि । श्रीराम सगुण मायोपाधि । माया श्री हे आदि अनादि । श्रीराम ब्रह्म सनातन ॥ ९४ ॥ एवं मायोपाधि परमात्मा । मजकरितां नामरूपमहिमा । माहाकारण महद्भूत सीमा । ॐकार त्रिगुण मांडणी ॥ ९५ ॥ आदिनारायण शेषशयनीं । वैकुंठ कैलास सत्यलोकभवनीं । त्रिगुण गुणाची मी स्वामिणी । नाना अवतार हे माझे ॥ ९६ ॥ मछकूर्मादि रुपें धरिलीं । नाना धर्मस्थापना केली ।

---

१ रामाच्या सांगण्यावरून.

सांप्रत लीला प्रगट जालि । कौसल्योदरीं श्रीराम ॥ ९७ ॥ भरत शत्रुघ्न लक्ष्मण हनुमंतु । कैकै सुमित्रामाता पिता दशरथु । नाना सूर्यवंश संत श्रीमंतु । वशिष्ठ कौशिक हे माझे ॥ ९८ ॥ ताटिकाकंदन मखरक्षण[1] । अहिल्योद्धरण कार्मुकभंजनें[2] । माझें मीच पाणिग्रहण । परमानंदें करीतसें ॥ ९९ ॥ भार्गवदमन[3] साकेतगमन[4] । राज्यविक्षेप[5] वनाभिगमन । वल्कल दीक्षा चित्रकूटवन । दंडकारण्य म्या घेतलें ॥ १०० ॥ जयंतु विराध[6]-नयन दमन । अत्रि अनुसया शरभंग दर्शन । सुतीक्ष्णादि मुनिस्तवन । अगस्ति अर्चन जटायु ॥ १ ॥ पंचवटिका जनस्थानीं । शूर्पनखा विटंबणी । खरदूषण राक्षसदमनीं । शक्ति सीता मी माया ॥ २ ॥ मायामृगममता माया । लंकेसी गेलि माझी छाया । हा हा सीता ऐकोनि आली भर्गजाया[7] । तेथें सर्वसाक्षी सीता मी ॥ ३ ॥ जटायु कबंध शबरीदर्शन । पंपासरोवरीं हनुमंतदर्शन । सुग्रीवसख्य वाळिनिग्रहण । सप्त ताळ म्यां छेदिले ॥ ४ ॥ माझें शोधन म्यांचि केलें । अशोक वन हें म्याचि भंगिलें । लंकादहनचरित्र वर्तलें । पाहें बापा विचारूनि ॥ ५ ॥ मुद्रादर्शन शिरोमणि । सिंधु बांधिला पाषाणीं । सुवेळारूढ[8] कोदंडपाणि । अरिमर्दनीं मी सीता ॥ ६ ॥ लंकालाग राक्षसहनन । वधिले कुंभकर्ण अरिनंदन । म्याचि मारिला दशानन । सुरबंध[9]-मोचन म्या केलें ॥ ७ ॥ बिभीषणासीं अढळपदीं स्थापिलें । श्रीराम होऊनि मीं आलिंगन दिधलें । सीताराम विश्वजन बोलिलें । नटरूप दाविलें मायावि ॥ ८ ॥ पुष्पकारूढ सीताराम । भरतभेटि स्वानंदधाम । वल्कलें त्यागूनि मंगलधाम । भद्रासनीं[10] मी बैसें ॥ ९ ॥ शतकोटि चरित्र अनुक्रम । राज्यसंभ्रम सीताराम । नाना अवतार चरित्र उत्तम । मूळपुरुष मी सामर्थ्यें ॥ १० ॥ क्षरअक्षर दोनी पुरुष ।

---

१ विश्वामित्राच्या यज्ञाचें रक्षण. २ धनुष्याचा भंग ( सीतास्वयंवराच्या वेळचा ). ३ परशुरामाचा पराभव. ४ अयोध्येला येणें. ५ राज्यत्याग. ६ हे दैत्य होते. ७ पार्वती. ८ लंकेजवळचा पर्वत जो सुवेल त्यावर चढलेला. ९ देवानां रावणाच्या कैदेंतून सोडविणें. १० सिंहासनावर.

माया ब्रह्म अनुसंधान । ज्ञान विज्ञान माझेनि ॥ १२ ॥ शुद्ध शबल अवघी माया । निर्गुण ब्रह्मीं नाहि थाया । नाना विग्रह नाना काया । प्रकृतिपुरुष शिवशक्ति ॥ १३ ॥ शिवशक्तिरूप चराचर । मायातीत ब्रह्म निर्विकार । निर्मळ निश्चळ निराकार । गगनगर्भ निरंजन ॥ १४ ॥ एवं सर्व करणें तें माझें । मज जाणिजे योगिराजे । सांख्य वेदांत ब्रह्मबीजें । नाना शास्त्रें वाखाणिती ॥ १५ ॥ ब्रह्म निर्मळ निश्चळ । माया चंचळ चपळ । सद्गुरुनाथ केवळ । सत्शिष्यासी उपदेशिती ॥ १६ ॥ एवं सद्गुरुराम केवळ ब्रह्म । आदि अनादि परब्रह्म । शंकरें पार्वतीसी वर्म । हें चि बापा निरोपिलें ॥१७॥ ब्रह्मानंद या श्लोकार्थें । निजगुज सांगीतलें परमार्थें । सद्गुरुध्यानें गुरुगीतार्थें । ब्रह्मादिकांसी उपदेशिलीं ॥ १८ ॥ रामगीता तुज म्या सांगितली । सांगती ऐकती मीच भली । अनिर्वाच्य मी ब्रह्मबोली । राम ब्रह्म निर्धारें ॥१९॥ मग मारुतें श्रीमुख अवलोकिलें । श्रीरामसमर्थें काय बोलिलें । ह्मणे मारुता जें जें वैदेह्या उपदेशिलें । तें तें पावना यथार्थ ॥१२०॥ माया वित्पन्न शिरोमणि । कर्तव्य लावीना निर्गुणीं । माझें ऐश्वर्य वाखाणी । निर्गुण ब्रह्म प्रतिपाद्य ॥ २१ ॥ माया परब्रह्मप्रभा आहे । मायामृगजळें गोदा वाहे । माया निर्मळ दर्पण पाहे । आकाश ब्रह्म बिंबलें ॥१२२॥ आकाशबिंब दर्पण नाहीं । सहज सदोदित ब्रह्म कांहीं । गगन गर्भ निरंजन पाहीं । पाहता पाहणें हारपलें ॥ १२३ ॥ एवं नामरूप मायें लागलें । मायेनेंचि मायेतें निरसिलें । सद्रूप चिद्रूप तद्रूप जालें । सद्रूप ब्रह्म सनातन ॥१२४॥ इतुकें श्रीरामहृदईचें ऐकोनि वचन । तन्मयाकार जाला हनुमान । मना सबाह्य आत्माराम आपण । ज्ञप्तिसीता विराजे ॥१२५॥ ज्ञप्तिसीता रामगीता । राम ब्रह्मीं जाली ऐक्यता । ऐसी रसाळ रामकथा । सदाशिव सांगे पार्वती ॥१२६॥ सीताराम हनुमंतु । भरत शत्रुघ्न सुमित्रासुतु । ऐक्यमिळणीं समाधिभूतु । सुरनर किन्नर विद्याधर ॥१२७॥ वसिष्ठादि माहानुभाव । आत्माराम अंतर्भाव । रामगीता ऐकोनि

१ सीतेनें. २ समाधिरूप झालेले.

कैलासराव । परमानंदीं निमग्न ॥१२८॥ पुनः पुन्हा करीतसे नमन । ह्मणे समर्था जालों पावन । ब्रह्मसंपन्न मोक्षसंपन्न । भक्तिसंपन्न भावार्थें ॥१२९॥ आदि अनादि तूं परब्रह्म । तुझी योगमाया सीता उत्तम । उभयचरणीं माझें प्रेम । कल्पकोटी राहो कां ॥ १३० ॥ मग रामें दिधलें आलिंगन । तव रामचि जाला हनुमान । तेथें योगमाया सीता आपण । भक्तभावना सांभाळी ॥ ३१ ॥ देवीं केली पुष्पवृष्टि । कोंदाटली स्वानंदसृष्टि । सत्यलोक कैलास वैकुंठपीठीं । टाळी पिटिली स्वानंदें ॥ ३२ ॥ ब्रह्मदेव सांगे नारदासी । सूत सांगे ऋषिजनासी । तेचि कथा श्रोतयांसी । सद्गुरुकृपें निवेदिली ॥ ३३ ॥ संत सज्जन विद्वज्जन । ऐकती अध्यात्मरामायण । ब्रह्मीं ब्रह्मांडपुराण कथन । उत्तरखंडीं निरोपिलें ॥ ३४ ॥ एवं भरत बोधिला चित्रकूटीं । लक्ष्मण बोधिला प्रथम पंचवटीं । हनुमान बोधिला भद्रपीठीं । भद्र कल्याण सर्वांचें ॥३५॥ जनामध्यें जे सज्जन । श्रीरामगीता करिती श्रवण । इतर पाषांडी दुर्जन । त्यांसी नें मने[1] रामगीता ॥ ३६ ॥ असो मूळमाया निवृत्तिकथन । रामगीता अनुसंधान । श्रोते वक्ते पुण्यपावन । संतसज्जन परमार्थीं ॥३७॥ एवं मूळमाया निवृत्तिरामीं । निवृत्तिवेणी स्वानंदधामीं । आदिपुरुष आत्मारामीं । सद्गुरुचरणीं निर्धारें ॥३८॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । मूळमायायोगनिवृत्ति नाम । समास बोलिला विसांवा ॥ १३९ ॥ समास ॥ २० ॥

---

## ॥ श्रीरामसमर्थ ॥

जयजय सद्गुरु स्वामी विश्वेश्वर । सेतुबंध श्रीरामेश्वर । भवाब्धि उतरूनि पैलपार । भक्त वानर पावविले ॥ १ ॥ जीवेश्वर गेले ईश्वरपदीं । जीवशिव निर्शन परमात्मपदीं । परमात्म निर्शन परब्रह्मीं । सद्गुरुपदीं निजऐक्य ॥ २ ॥ सद्गुरु तुह्मी विमळ ब्रह्म । निर्मळ निश्चळ परब्रह्म । ईश्वर ह्मणे मीचि ब्रह्म । ह्मणोनि माया उपाधि ॥ ३ ॥ मायेपासूनि सत्व रज तम । तमापासूनि भूतसृष्टिकर्दम । अष्टधा प्रकृति अनुक्रम

---

१ आवडत नाहीं.

चंचळ माया वायुरूपें ॥ ४ ॥ वायो पासूनि भूतत्रय । महद्भूतीं गुणत्रय । वायो जाणीवचतुष्टय । अष्टधा प्रकृति विस्तार हा ॥ ५ ॥ पिंड ब्रह्मांड पंचीकर्णभास । व्यापूनि ठेलें ब्रह्मावकाश । सद्गुरुस्वरूपीं सर्व निरास । व्याप्य व्यापक बोलों नये ॥ ६ ॥ आतां पंचीकर्णयोगें[1] लोकनिवृत्ति । करणें स्वामी कृपामूर्ति । ऐकोनि बोलिले स्वानंदमूर्ति । संतमूर्ति परिसोत कां ॥ ७ ॥ श्रोतयांसी कळावया विवेक । समर्थ सांगती कथानक । आदिपुरुष रघुनायक । दक्षणे श्रीराम पातला ॥८॥ शतपथ सेतु शत योजनें । दशदेह रुंदी दश योजनें । नाना कुशाग्रबुद्धि दर्भशयनें । योगनिद्रा संपादिली ॥९ ॥ स्वरूप सुवेळाचळीं टाणें । बळेंचि अहंकार दुर्ग घेणें । नाना दैवीसंपत्ति सोडवणें । असुरसंपत्ति संहारुनी ॥ १० ॥ अहं रावण दश इंद्रिय कंठ । जयासी सकाम प्रसन्न नीळकंठ । तो निष्काम बाणें मारिला उद्भट । हृदयकुपिका[2] फोडिली ॥ ११ ॥ श्रीरामनाम संहिता चरित्र शतकोटी । वर्णन करिती कवि कोट्यानुकोटि । परमानंदें त्रिदशकोटि । भक्त वानर गर्जिनले ॥ १२ ॥ भक्त बिभीषण भद्रासनीं । अढळपदीं । स्थापिला अवनीं । सवें निघाला स्वानंदभुवनीं । निजगुज कांहीं पुसावया ॥ १३ ॥ अव्यक्त पुरुषाची सीताव्यक्ति । घटाबिंबीं बिंबली दशमुखाप्रति । दशकंठ अभावें स्वयंजोति । जेथील तेथें चंद्रिका ॥ १४ ॥ पुष्पकविमानीं स्वरूपगगनीं । आत्माराम स्वानंदभुवनीं । सद्भाव भरता भेटूनि अवनीं । सहज सिंहासनीं आरूढ ॥ १५ ॥ भुवन जालें निःकंटक । वारले कुतर्कदैत्यकंटक । अकरा सहस्र वर्षे नेमक । साम्राज्य कर्तव्य त्रिभुवनीं ॥ १६ ॥ श्रोते ह्मणती जी कोण हे आकरा । निवृत्तिमार्गें काय आकरा । सद्गुरुकृपें करूनि आकरा । संत सज्जनीं निवेदिजे ॥ १७ ॥ स्वामी आणि सेवक येक । वक्ते आणि श्रोते येक । सिद्ध आणि साधक येक । येकीं येक आकरा ॥ १८ ॥ पुरुष आणि प्रकृति येक । परब्रह्मीं ईश्वर

१ 'योगें निवृत्ति,' दुसरा पाठ. २ रावणाच्या हृदयांतील अमृताची कुपी. ही कुपी फोडण्यापूर्वी रावणाचीं शिरें तुटलीं तरी पुनः त्या अमृतामुळें उत्पन्न होत.

येक । हरिहर दोनी मिळोनी येक । येकीं येक आकरा ॥ १९ ॥ जीवात्मा आणि शिवात्मा येक । निर्मळात्मा आणि परमात्मा येक । ब्रह्म आणि ब्रह्मांश येक । येकीं येक आकरा ॥ २० ॥ सद्गुरु आणि सच्छिष्य येक । देव आणि भक्त येक । रघुनाथजीपुढें बळभीम येक । येकींयेक आकरावा ॥ २१ ॥ आकरा आकरा उदंड असतीं । कांही निरोपिलें यथामति । रघुनाथजीपुढें मारुति । महारुद्र आकरावा ॥२२॥ एवं येकीं येक आकरा कथन । पुढें ऐका कथानुसंधान । भद्रासनीं स्वानंदघन । सुरवर वानर दाटले ॥ २३ ॥ बिभीषण लंकेसी आज्ञापितां । मारुति सेवक सन्निध असतां । अपूर्व वर्तली येक कथा । श्रोतेजनों परिसावी ॥ २४ ॥ बिभीषणें चरणीं विनंति केली । वियोग अवस्था मनीं दाटली । ह्मणे देवा किती दिवस म्या भूमंडळीं । तुजवेगळें असावें ॥ २५ ॥ इतुकें ऐकोनि आत्माराम । जो सर्व सुखाचा आराम । काय बोलिला स्वानंदधाम । तारक ब्रह्म चराचरीं ॥ २६ ॥ ज्यासी ध्यातसे कांत गौरी । जगजीवन जो सचराचरीं । ह्मणे सख्या तुज अंतरीं । काय हे अवस्था दाटली ॥ २७ ॥ चिरंजीव पद तुज दिधलें । चिरंजीवित्व तुजला नाहीं कळलें । मारुतीप्रति जें उपदेशिलें । तेंचि तुजला उपदेशितों ॥ २८ ॥ नाशवंत अवघे हे पदार्थ । पदार्थी वेगळी वस्तु शाश्वत । समस्त विश्व हें अंतवंत । ब्रह्मादिपिपीलिकापावतों ॥ २९ ॥ आतां रुद्रासारिखें तुज मानिलें । पंचक्रित देह हें अमर केलें । याचें आधिदैवतं[1] बंधन तोडिलें । लंकेमाजीं समरंगणीं ॥ ३० ॥ तुजसाटीं तुझीं आधिदैवतें । समस्त मुक्त केलीं येथें । सुखानंद स्वानंदभरितें । निजमोक्षापंथें लाविलीं ॥ ३१ ॥ सर्वही दैवतें मुक्त जालीं । तेथें तुज बद्धता कोठें राहिली । जेथील अंश तेथें घालीं । विचारें राहें निराळा[1] ॥ ३२ ॥ मी देह ह्मणतां वियोग वेथा । नसतीच वाढे

---

1 रावणरूप. रावण हा अहंकार होय. तो गेल्यावर परमेश्वरापासून वेगळेपणा उरत च नाहीं.

जीवाच्या माथां। चिरंजीव आत्माराम तूं आतां। वियोग सर्वथा अबद्धें ॥ ३३ ॥ आत्मा वै पुत्र नामासि हा वेदु। अध्यात्मज्ञान पाहावें विशदु। तत्वमसि तें तूं ब्रह्म निजबोधु। वियोग खेदु कशाचा ॥ ३४ ॥ स्वरूपस्वानंदाची घडी। त्यामाजी जाती कल्पकोडी। येऱ्हवीं जीवासी दुःखाची घडी। लोटत नाहीं निर्धारें ॥ ३५ ॥ कैंचा योग कैंचा वियोग। घेईं स्वरूपस्वानंद भोग। बाधिना तुज भवोपसर्ग। पंचीकर्णवाक्यार्थें ॥ ३६ ॥ आतां पंचीकरणयोग निवृत्ति। ऐक सांगतों तुजप्रति। जेथील तेथें तत्व निर्गति। करूनि राहें स्वानंदें ॥ ३७ ॥ सोहं आत्मा स्वानंदघन। ब्रह्मीं ब्रह्मांश तूं सनातन। आतां माया प्रपंच मिथ्या भान। ईश्वर स्फुरण अहंप्रकृति ॥३८॥ मूळप्रकृतीचें अहंपण। मूळमाया गुणमाया अविद्या जीवपण। जीवपणाचें देहभान। पंचभूतें आकारलें ॥३९॥ आकाश अंतरात्मा अंतःकरण पंचक। विवरण करणें निश्चयात्मक। अंतःकर्ण विष्णु मन चंद्रमा देख। बुद्धि ब्रह्म निर्धारें ॥४०॥ चित्त नारायण सहजचि जालें। अहंकारतत्व रुद्रांत गेलें। अंतःकरण पंचक निवेदिलें। पंचीकर्ण निवृत्ति ॥ ४१ ॥ आतां वायोपंचक येणें रीति। प्राणापान व्यान उदान समान देहीं वसती। ते नाग कूर्म कृकल देवदत्त धनंजयांत मिळती। प्राणपंचक निरोपिलें ॥ ४२ ॥ आतां तेजपंचक येणेचि परी। चक्षु श्रोत्र त्वचा जिव्हा घ्राण गुण शरीरीं। ते सूर्य दिशा पवन वरुण अश्विनौ देवाभीतरीं। ज्ञानेंद्रियपंचक निवेदिलें ॥ ४३ ॥ आतां आपपंचक ऐशाचि गुणें। वाचा पाणि पाद शिश्न गुद लक्षणें। तें वन्हि इंद्र उपेंद्र विधि नैऋत्यपणें। कर्मेंद्रियपंचक समर्पिलें ॥ ४४ ॥ आतां पृथ्वीपंचक विषय पंचविध। शब्द स्पर्श रूप रस गंध। ते आकाश वायो तेज आप पृथ्वींत विशद। यथानुक्रमें मेळविले ॥ ४५ ॥ शब्दविषय आकाशीं गेला। स्पर्श-

---

१ वियोगाची कल्पना च कशी तुला आली. २ तत्वांत तत्वें मिसळून देऊन आपण निराळें व्हावें. ३ जीवपण पंचमहाभूतांच्या रूपानें आकाराला आलें.

विषयो वायोंत गेला । रूपविषयो तेजीं मिळाला । रस गंध मेळविला आप पृथ्वी ॥ ४६ ॥ एवं पृथ्वी आप तेज वायु आकाश । हिरण्यगर्भ ब्रह्मांडीचें देह सावकाश । हिरण्यगर्भाच्या सूक्ष्म देहास । हिरण्यगर्भी समर्पिलें ॥ ४७ ॥ आतां विराटदेहींचा स्थूळदेह । पंचभूतिक सांगताहें । जेथील तेथें निवेदिताहें । येकाग्र मानस करावें॥ ४८ ॥ स्थूळ विराटीं आकाश गुण। काम क्रोध शोक मोहोभय जाण । जेथील तेथें उत्पन्न लीन । सर्वां सर्वत्र स्वभावें ॥ ४९ ॥ स्थूळ विराटीं वायो गुण पंचक । चळण वळण प्रासारणादिक । जगदाकारें अवश्यक । सर्वां सर्वत वर्तती ॥ ५० ॥ स्थूळ विराटीं तेजोगुण । क्षुधा तृष्णा आलस्य निद्रा मैथुन । ते काळ जळशोष विराम कल्प सृष्टि उत्पन्न । अनुक्रमें समजावें ॥ ५१ ॥ स्थूळ विराटीं आपलक्षण । शुक्लित शोणित लाळ मूत्र स्वेद गुण । ते मेघ भूजळ पाझर क्षार सिंधु द्रव जाण । यथानुक्रमें जाणावे ॥ ५२ ॥ विराट स्थूळीं पृथ्वीपंचक धर्म । अस्ति[1] मांस त्वचा नाडी रोम । तयाच्या स्वरूपाचा अनुक्रम । समजोनि घ्यावा येणें रीती ॥ ५३॥ अस्ति पाषाण रत्नें मांस सुवर्ण मृत्तिका । त्वचा निरोध पवन नाडी भूगर्भोदका । रोम कल्पद्रुम वनस्पति ऐका । विराटदेह ब्रह्मांडीचें ॥५४॥ एवं स्थूळदेह विराटीं घातलें । सूक्ष्मदेह हिरण्यगर्भीं समर्पिलें । कारण अव्याकृतींत मेळविलें। महाकारण मिळालें मूळप्रकृति ॥ ५५ ॥ मूळप्रकृति पुरुषप्रकृति । अष्टधाप्रकृति शिवशक्ति । शिवशक्ति ईश्वर स्थिति । अहं ब्रह्म निर्धारें ॥५६॥ मायेकारितां[2] अहंब्रह्म । मायातीत तें परब्रह्म । ब्रह्मीं ब्रह्मांश होतां भ्रम । जीवपणाचा वारला ॥ ५७ ॥ अहंब्रह्म नवा म्हणीं म्हणसी। अहं ब्रह्मास्मि निश्चयेंसी । सोहंहंसा तत्वमासि । तें तूं आहेसी परब्रह्म ॥५८॥ बिभीषण म्हणे जी आदिमूर्ति । जाली पंचीकर्ण योग निवृत्ति । षोडश महावाक्यें विचारस्थिति । आत्मसंन्यासें बोधावी ॥ ५९ ॥ षडंगन्यासी

१ अस्थि, हाडें. २ माया आहे म्हणून मी ब्रह्म आहें असा भेदरूप प्रत्यय येतो, माया निरसन झाल्यावर हा प्रत्यय हीं नाहींसा होतो.

सन्यासी । विचारवंत सर्व संन्यासी । वृत्ति शिखा वासनासूत्र त्यासी । कर्मत्यागें फळत्यागें ॥ ६० ॥ ऐकोनि बोले श्रीराम करुणाघन । ऐक षोडश महावाक्यें विवरण । प्रश्नमाळिका उत्तरें पूर्ण । ब्रह्मदायकें सांगेन हें ॥ ६१ ॥ प्रथम तत्वमसि वाक्य । तें तूं ब्रह्म आहेसी ऐक्य । दुसरें ब्रह्माहमस्मि वाक्य । ब्रह्म मी आहें निर्धारें ॥ ६२ ॥ अयमात्मा ब्रह्म वाक्य तिसरें । हा आत्मा तोचि ब्रह्म खरें । ब्रह्मैवेदं सर्व उत्तरें । ब्रह्मचि हें सर्वत्रीं ॥ ६३ ॥ इदं सर्वं ब्रह्म पंचम । हें सर्व ब्रह्मवाक्य वर्म । य एतदयमात्मा ब्रह्म । जो आत्मा तो ब्रह्मचि ॥ ६४ ॥ हंसः सोहमात्मा ऐसें । मी तो तो मी ब्रह्म तैसें । यएंतदयमात्मा अमृतमयसें । अंतर्यामीं अजरामरं ॥ ६५ ॥ सयश्चायंपुरुषे उत्तर । तें ब्रह्म या पुरुषीं निरंतर । यश्चासावादित्ये तत्पर । तो हा आत्मा आदित्यीं ॥ ६६ ॥ सएकः प्रज्ञा प्रतिष्ठा वचन । तो येक आत्मा प्रज्ञा प्रतिष्ठा जाण । प्रज्ञानं ब्रह्म द्वादशी वचन । अत्यंतिक ज्ञान ब्रह्मचि ॥ ६७ ॥ विज्ञानमानंदं ब्रह्मवाक्य । विज्ञान आनंद ब्रह्म ऐक्य[१] । सत्यज्ञानमनंतं ब्रह्म असंख्य । सत्य ज्ञान अनंत ब्रह्म ॥ ६८ ॥ येकमेवाद्वितीयं ब्रह्म । येकचि हें अद्वितीय ब्रह्म । नेह नानास्ति किंचन वर्म । या ब्रह्मीं कांहीं दृश्य नाहीं ॥ ६९ ॥ एवं दृश्यातीत तें परब्रह्म । पंचीकर्ण महावाक्य वर्म । षोडश महावाक्य धर्म । अनुक्रमें सांगितले ॥ ७० ॥ षोडश कळा चंद्रमंडळीं । प्रकाश येकचि दिग्मंडळीं । तेविं षोडशमहावाक्यमेळीं । स्वप्रकाश येक ब्रह्मत्वें ॥ ७१ ॥ याचा विचार अंतरीं करावा । करूनि सदृढ जीवीं धरावा । निजात्मज्ञानें काळ क्रमावा । कल्प कोटि चिरंजीव ॥ ७२ ॥ परब्रह्मीं अखंड दृष्टि । त्यासी मृत्यु न पाहे दृष्टि । जेविं आकाश ज ब्राह्मणी मृत्यु हिंपुटी । योगवाशिष्टीं सांगीतला ॥ ७३ ॥ एवं अहं ब्रह्मास्मि वाक्यार्थें । अखंड राहणें परमार्थें । निज गुज हें सुखस्वार्थें ।

---

१ जीवब्रह्माचें ऐक्य प्रतिपादणारीं श्रुतिवचनें.

उपदेशिलें तुज लंकेशा ॥ ७४ ॥ आतां कर्मउपासना सद्वासना । भागवतधर्मे धरीं मनो भावना । उन्मत्त द्रव्य परांगनादि सेवना । शुद्ध संप्रदाई कामा नये ॥ ७५ ॥ जयंत्या पर्वे अखंड करावीं । देवदेवा· लयें उभारावीं । संत सज्जन माहानुभावीं । परमार्थचर्चा अखंड ॥७६॥ दृश्य सकळ मिथ्या जालें । परि भजन पाहिजे जतन केलें । पदार्थी पाहिजे उदास वर्तलें । सद्गुरुभजनीं संतुष्ट ॥७७॥ मी मुक्त ह्मणोनि राहसी । तरी बद्धता लागेल मानसीं । मी ज्ञानी ह्मणोनि फुंजसी । तरी अज्ञान दशा लागेल ॥७८॥ ह्मणोनि निःकामबुद्धि उत्साह । निकुंबळे सुवेळे मोह-छाह । लंकेमध्यें परमोछाह । अन्नछत्रें घालावीं ॥७९॥ ब्रह्मसंतर्पणें हरि-कीर्तनें । करीत जावीं अयन अयनें । जे जे प्रसंगीं विधिवचनें[2] । ते ते प्रसंगीं करावीं ॥८०॥ मूर्खस्यै[3] प्रतिमा ह्मणोनि । देवार्चनें सांडिती मूर्ख ज्ञानी । ते शतमूर्ख ज्ञानाभिमानी । देहाभिमानी नाडले ॥ ८१ ॥ देहात्मयोगें[4] उपासना मिरवीं । आत्मारामीं मीपण नुरवीं । तेणें पावसी अचळ पदवी । चिरंजीवी अमरत्वें ॥ ८२ ॥ बलभीम तैसा चिरंजीव । तैसाचि तूं हि चिरंजीव । मुख्य प्राणनाथ व्यापक सर्व । विश्वपाळक विश्वंभर ॥ ८३ ॥ ब्रह्मांड उपाधि पावनें[5]देहीं । निरोपाधि तूं लंकेसि राहीं । संकटीं निर्वाणीं लवलाहीं । धावणी करील हनुमंतु ॥ ८४ ॥ बलभीमा हा बिभीषणु । तुझ्या करीं हा माझा प्राणु । तूं सर्वांचा मुख्यप्राणु । तुज सांगणें नलगेचि ॥ ८५ ॥ सर्वस्व वाहें भक्त वोझें । कदा धरूं नको यासी दुजें । रामउपासकांचीं निजात्म काजें । करणें तुजला उचित ॥८६॥ तुजला चिरंजीव केलें भूमंडळीं । कीर्तिवितान दिग्मंडळीं । भगवद्भक्त निजमंडळीं । रक्षावया स्वानंदें ॥ ८७ ॥ अत्र परत्रीं सावधान । कैपक्षी तूं मुख्य प्राण । प्राणनाथ तूं सर्व सुजाण । आत्माराम तूं निर्धारें ॥ ८८ ॥ मज तुज नाहीं भिन्न भेद । हनुमान बिभीषण अभेद । माझी

---

१ विभीषणा. २शास्त्रांत सांगितलेलीं कर्तव्यें. 'विविध' दुसरा पाठ. ३मूर्ख असतील त्यांनीं प्रतिमापूजा करावी असा डौल घालून. ४ देह हाच आत्मा असें समजून. ५ मारुति-देहाला ब्रह्मांडाची उपाधि ( काळजी ) आहे.

ज्ञान शक्ति सीता प्रसिद्ध । आत्मस्थिति तुजपासीं ॥ ८९ ॥ आत्मस्थिति आत्माराम । आत्मारामीं चित्त आराम । सद्गुरुभजनीं स्वानंदधाम । सुख भोगीजे चिरकाळें ॥९०॥ निखिळ सुखदुःखा वेगळें । तेंचि सुख सर्वांगळें । सायोज्यपदा आरति सकळें । सुखें नाशैती पुण्यांतीं ॥ ९१ ॥ एवं देव भक्त भिन्न नाहीं । ह्मणोनि दुःखासी ठाव नाहीं । योग वियोग न मनिजे कांहीं । भक्तियोग आचरावा ॥९२॥ लोकानुग्रहें हें बोलिलें । भगवद्भक्तासी हें उपदेशिलें । हनुमंत जी तुझ्या आभारीं घातलें । कल्प-कोटि संरक्षण ॥९३॥ ऐकोनि हनुमानें धरिले श्रीचरण । बोलता जाला मुख्यप्राण । आत्माराम तूं सर्वत्र आपण । भक्तां रक्षिसी सबाह्य ॥९४॥ देह बुद्ध्या त्वदासोह मिति । मी श्लोकार्थ ईछितों आदिमूर्ति । तथास्तु ह्मणती श्रीराममूर्ति । वरदान मारुति लाभले ॥ ९५ ॥ एवं हनुमंत आणि बिभीषण । येक करिती सीतारमण । जय जय करिती वानर-गण । राक्षसगण आनंदले ॥९६॥ देव करिती पुष्पवृष्टि । कोंदाटली स्वानंदसृष्टि । सत्यलोककैलासवैकुंठपीठीं । टाळी पिटिती स्वानंदें ॥ ९७ ॥ ऐसा बिभीषण आत्मारामें । सद्गुरुरूपें पूर्णकामें । ज्ञानसंपन्न करूनि श्रीरामें । पूर्ण स्नेहें अवलोकिला ॥ ९८ ॥ बिभीषणें चरणीं ठेविला माथा । नमस्कारिलें लोकनाथा । परमानंदें जाला बोलता । समर्थाप्रति ते काळीं ॥ ९९ ॥ जयजयाजी आदि-मूर्ति । विश्वंभरा कोदंड राममूर्ति । हृदईं तुझी स्वानंदमूर्ति । स्वयंभमूर्ति बिंबली ॥ १०० ॥ समर्थें केलें समाधान । जालें पिंड ब्रह्मांड अवस्था निर्शन । सच्चिदानंद सनातन । परब्रह्म पावन मी जालों ॥ १ ॥ मीपणाची करूनि कुरवंडी । बत्तीस तत्त्वें वाती उजळूनि पिंडीं । तुझें स्वरूप अनंत ब्रह्मांडीं । वोवाळिलें स्वानंदें ॥ २ ॥ आह्मी ब्रह्म राक्षस साक्षर उदंड । वेदवादांग करूं अखंड । आतां कर्म उपासना ज्ञानकांड । शुद्ध त्रिकांड लाधलों ॥ ३ ॥ पंचीकृता वेगळें जालों ।

१ सर्वांहून श्रेष्ठ. २ अलीकडे असलेला. ३ 'क्षाणे पुण्ये मर्त्य लोकं विशंति' या वचनाप्रमाणें. ४ बत्तीस तत्वरूप दिवे लावून.

अपंचीकृत विसरूनि ठेलों । महावाक्यीं प्रवेशलों । समर्थकृपे करूनियां ॥ ४४ ॥ ह्मणोनि बिभीषण चरणीं ठेवी माथा । श्रीरामें वरदहस्त ठेविला माथां । ऐसी रसाळ रामकथा । समर्थें स्वमुखें सांगितली ॥ ५ ॥ अध्यात्मरामायण कथन । सर्व जाणती संत सज्जन । गुरुशिष्य संवाद गहन । पंचीकर्ण निरोपिलें ॥ ६ ॥ एवं पंचीकर्णयोगनिवृत्ति । महावाक्यीं प्रवेशली मति । निवृत्तिवेणी ह्मणे संतीं । न्यून पूर्ण क्षमावें ॥ ७ ॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । पंचीकर्णयोग निवृत्तिनाम । येकविसांवा समासु बोलिला॥ १०८॥ ॥ समास २१॥

---

## ॥ श्रीरामकर्ता ॥

जय जय सद्गुरु ब्रह्मसनातन । आदिपुरुष पुरातन । निर्गुण निरावयव निरंजन । निर्विकार सदोदित ॥ १ ॥ निर्गुण ब्रह्म परमपावन । जेथें वारलें चतुःशून्य । गगन सदर्श स्वरूप सघन । सद्गुरुस्वरूप तुमचें जी ॥ २ ॥ तुमचेनि श्रीगुरु कृपालेशें । तत्वमसि ब्रह्मोपदेशें । ब्रह्माहमस्मि ब्रह्म अशेषें । सत्शिष्यास बाणलें ॥ ३ ॥ शिष्यें सारिली अविद्याउपाधि । ईश्वरें सांडिली माया उपाधि । मूळमाया परमात्म उपाधि । सद्गुरुपदीं हारपली ॥ ४ ॥ सद्गुरु ब्रह्म सनातन । तेथें कैचें मायाभान । प्रकृतिपुरुषा समाधान । ज्ञान विज्ञान तुमचेनि ॥ ५ ॥ सर्वेश्वराचें निजरूप तुह्मी । ऐसें निरोपिती संत भूमी । प्रकृतिपुरुषें परब्रह्मीं । ब्रह्म होती तुमचेनि ॥ ६ ॥ तुमचेनि श्रीगुरु अभयंकरें । जीवशिव माया तम अधारें । निरसोनि गेलें येकसरें । सूर्यमंडळीं तम नाहीं ॥ ७ ॥ तुमचेन सद्गुरु कांहीं येक कळलें । संतचरणीं निवेदन केलें । साकल्य विवरण पाहिजे जालें । सर्व सिद्धांत निवृत्ति ॥ ८ ॥ आतां सर्व सिद्धांतयोगनिवृत्ति । करणें स्वामी कृपामूर्ति । नाना योग नाना निवृत्ति । निवृत्ति ग्रंथीं अनुवादल्या ॥ ९ ॥ सद्गुरुनाथ कृपामूर्ति । सर्व सिद्धांत अनुवादती । वक्ता ह्मणे श्रोतयांप्रति । येकाग्र मनें ऐका हो ॥ १० ॥ अहमस्मि ब्रह्म सिद्धांत वचन । मनो वाचातीत

निरंजन। अनिर्वाच्य समाधान। निर्गुण ब्रह्म प्रतिपाद्य ॥ ११ ॥ स्वस्वरूप शुद्धबुद्ध । जेथें राहिला बोध प्रबोध । बद्ध मुक्त माया विनोद । स्वरूप संचलें सर्वदां ॥ १२ ॥ स्वरूप नेणतां गर्भवास । सकाम कर्मे भवस्वर्गवास । पतन पातन सावकाश । जीवबुद्धीस लागलें ॥ १३ ॥ बरें करी बरें पावे । भक्तियोगें भगवंत फावे । सायोज्य सांडोनि स्वर्गा धांवे । भगवंताचा अन्याई ॥ १४ ॥ नाना वेदबळें करूनि हिंसा । हिंसा नव्हे हे अहिंसा । कर्म ब्रह्म पूर्व मीमांसा । कर्ममार्ग प्रतिपादिती ॥ १५ ॥ दुर्ब्राह्मणत्व हरावया । सिद्ध हिंसा करावया। वेदांचि बोलिला तया । कोण शब्द ठेवील ॥ १६ ॥ वेद बोलिला पूर्वपक्ष । जीवासि दाविला स्वर्गमोक्ष । ब्रह्म जानाति ब्राह्मण दक्ष । वेदांत सिद्धांत प्रतिपादिती ॥ १७ ॥ ब्रह्म जाणोनि मायेंत बुडावें । पुनः पुन्हा जन्मासि यावें । वित्पन्नासी मानेना स्वभावें । सनकादिक हांसती ॥ १८ ॥ ब्रह्म होवोनि ब्राह्मण गेले । मग वेदपरंपरा कैसी चाले । अहो वेदेंचि वैदिक मुक्त केले । अवशिष्ट राहिले परंपरे ॥ १९ ॥ एवं स्वर्गाभिमान न घेणें माथां । वेदांत सिद्धांत पाहणें आतां । अहं ब्रह्मास्मि ब्रह्म सर्वथां । सद्गुरुमुखें । विवरावें ॥ २० ॥ यतो वाचोनिवर्तते[1] । ब्रह्म जानाति ब्राह्मण वक्ते । सकामकामें कर्मकर्ते । सकामफळें भोगिती ॥ २१ ॥ सकाम निःकाम दोनी भेद । वदे बोलिला परम विशद । अधिकार परत्वें भेद अभेद । नाना मतें चालिलीं ॥ २२ ॥ नाना मतें जेणें केलीं । त्याची शुद्धि[2] पाहिजे केली । वेदशास्त्रें पुराणें बोलिलीं । पुराण पुरुषवेगळा ॥ २३ ॥ निःकाम कर्मे आचरावीं । ईश्वरीं सर्वस्व अर्पावीं । भर्जितबीजें[3] सर्व करावीं । ज्ञानाग्नि कुंडीं ब्रह्माडीं ॥ २४ ॥ त्रिगुण माया सृष्टिक्रम कर्दम । कर्दमा वेगळें परब्रह्म । शुद्ध शबल अनुक्रम । प्रपंच आणि परमार्थ ॥ २५ ॥ ईश्वरापासूनि विद्या अविद्या । कर्म-

---

१ ‘ ज्याचा ठाव न लागल्यामुळें वाणी मनासह परत फिरते ’ अशा अर्थाची श्रुति. २ शोध, तपास. ३ ज्याचीं बीजें भाजिलेलीं आहेत अशीं कर्मे करावीं; ह्मणजे त्यांचीं फळें मिळणार नाहींत. हीं बीजें भाजण्याचा अग्नि ह्मणजे ज्ञान.

उपासना ज्ञानसंध्या । आगम निगम शास्त्रविद्या । अहं ब्रह्म ब्रह्मास्मि ॥२६॥ ह्मणाल ब्रह्मज्ञानासी देव द्वेषिती । तरी देवही ब्रह्मज्ञान ब्रह्मदेवासी पुसती । ब्रह्मगीता ब्रह्मदेवें बोलिली स्मृति । द्वेष तेथें घडेना ॥ २७ ॥ आभूत्यानाचरंति[1] श्रुति । अकल्याणं भक्तातें देव नाचरती । किं प्रजया[2] करिष्यामो भक्त ह्मणती । प्रजा न लिंपती भक्तातें ॥ २८ ॥ प्रजोत्पत्ति हा सृष्टिभाव । सृष्टि वेगळा अंतर्भाव । सद्गुरुनाथ देवाधिदेव । परब्रह्म सनातन ॥ २९ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण गेलें । संचित विज्ञान फळासी आलें । प्रारब्ध देहें भजन-भाग्य भोगिलें । क्रियमाण नाहीं भक्तांसी ॥३०॥ एवं देव आमुचीं आधि-दैवतें । ब्रह्मज्ञान हें मान्य त्यातें । तेणेंचि करितां होतें । परमार्थविवरण ॥३१॥ देव आमुचे पूर्वज देख । ब्रह्मादिक इंद्रादिक । सखे सोयरे सुहृद लोक । आत्मसमंधी आत्मत्वें ॥ ३२ ॥ देव आमुचे गुरुबंधु । त्यासी आह्मासी आत्मसमंधु । कार्यकारण शरीरसमंधु । आदरस्थं[3] प्रत्यादर ॥ ३३ ॥ आपुले कुळीं भाग्यासी आलें । ब्रह्मसंपन्न कोण्ही जालें । सनकादिकांचें काय केलें । ब्रह्मदेवें सांगाना ॥ ३४ ॥ तथापि सकामकर्में गेलीं । ब्रह्मीं निमाली विधिवंशवल्ली । देवऋषि पितृ बोली । ब्रह्मज्ञानें बुडविलें ॥ ३५ ॥ पितृ स्वरूपी जनार्दन । देवरूपी स्वयें भगवान । सद्गुरु ब्रह्म सनातन । आत्माराम सर्वत्र ॥ ३६ ॥ आत्मारामीं द्वंद्व नाहीं । द्वंद्व मायेमध्यें पाहीं । स्वरूपीं पाहतां माया नाहीं । माया माउली भक्तांची ॥ ३७ ॥ ब्रह्मज्ञानें कुळ तारिलें । ब्रह्म-संपन्न कुळीं जालें । ३ॐ भवति पक्षा रक्षिलें । ब्रह्म जानाति ब्राह्मण ॥ ३८ ॥ एवं दैवी कृपेचाचि आशीर्वाद । देवचि करिती हा अनुवाद । पंचीकर्ण ऐक्य तत्वबोध । पिंड ब्रह्मांड ऐक्यत्वें ॥ ३९ ॥ तत्वरूप देव असती । तत्वांतीं निर्गुण ब्रह्म प्राप्ति । नाना तत्वें सांडोनि

१ 'अभूत्या' इ० श्रुतीचा हा अर्थ. २ प्रजा आह्मास काय करणार ? ३ आदराला उलट आदर. ४ सनकादिक ब्रह्मदेवाचे मानस पुत्र. ते संसारांत न पडल्यामुळें ब्रह्मदेवाचा वंश च खुंटला.

सतीं । आत्मज्ञान निरोपिलें ॥४०॥ आत्मारामीं कोण्ही द्वंद्व धरिती । ते केलीं कर्में पावती । आत्माराम आमुचे चित्तीं । द्वंद्व तेथें उरेचिना ॥४१॥ देव आमुच्या सदाशिवाचे । तथा बंदिजन रावणाचे । आत्मारामें सोडिले साचे । आह्मासि विघ्नें करीतना ॥ ४१ ॥ देव आमुच्या समर्थाच्या द्वारीं । विमानीं दाटती नभांतरीं । देव आमुचे साह्यभूत सर्वोपरी । आत्माराम सर्वत्र ॥ ४२ ॥ देवाधिदेवाचे देव । आज्ञाधारक असती सर्व । सद्गुरुकृपेचें गौरव । लाधलें आह्मा ॥ ४३ ॥ उत्तम पुरुष उत्तम भाग । आह्मासि लाधला आत्मयोग । सद्गुरुकृपेच्या संयोग । ब्रह्मादिकांसि दुर्लभ ॥ ४४ ॥ भवस्वर्गासी आह्मी [1]मानूंना । भवस्वर्ग आह्मी नाणिले मना । मना पावविलें उन्मना । उन्मन स्वरूपीं हारपलें ॥४५॥ देवपदासी आम्ही इछावें । तरी देवीं आह्मासीं द्वंद्व धरावें । आम्ही स्वर्गसुखाचे नावें । शून्य घेतलें गुरुपदीं ॥ ४६ ॥ सकामकर्म केलेंचि नाहीं । मग स्वर्गसुख कैंचें काई । आमुची माया जन्मलीच नाहीं । सद्गुरुनाथ सांगती ॥ ४७ ॥ निःकाम भजनाचें कौतुक । पाहों येती देव सम्यक । ह्मणति हेंचि सुख येक । होऊनि असावें ॥ ४८॥ स्वर्गसंकल्पें गुंतलों । पुण्यप्रभावें जालों । क्षीणे पुण्ये पतन पावलों । किती वेळा पुण्यांतीं ॥५०॥ गुरुभक्त भागवत धन्य । पापपुण्या वेगळे जाण । सर्वस्व केलें रामार्पण । ब्रह्मसंपन्न दिसताती॥५१॥ वैकुंट कैलास यासी नलगे । सत्यलोक सांडिला मागें । त्रिगुणमायावेवाद [2]वाउगे । मानिले यांहीं ॥ ५२ ॥ देहधारी भक्त दिसती । देहे विदेह सांडूनि राहती । भागवतधर्म [3]आचरताती । जयंत्या पर्वें अपूर्वें ॥ ५३ ॥ स्वर्ग सुखाची कुखंडी । स्वसुखें करिती अखंडी । हेचि येक पहाता ब्रह्मांडीं । थोराहूनि थोर ॥ ५४ ॥ वेद शास्त्रें पुराणें सांगती । भगवद्भक्त पुण्यमूर्ति । कां जे भगवद्रूपीं जिहीं चित्तवृत्ति । वोवाळिल्या स्वानंदें ॥ ५५ ॥ भक्तांसाटीं अवतार धरिले । मग आम्हासी उपयोगी जाले । मुख्यभक्तचि देवा आवडले । ह्मणोनि देवा-

---

१ व्यर्थ, खोटे. २ विदेही भक्तांनाही कर्तव्य आहे च.

धिदेव भजावा ॥५६॥ ऐसा देवसमुदाव बोलताहे । भगवद्भक्तांसी पुसताहे । स्वामी तुमचें आत्मसुख कैसें आहे । कृपा करूनि सांगाजी ॥ ५७ ॥ अहो देव होऊनि आह्मासी पुसतां । देवांसी सांगों नये सर्वथा । आतां अगत्य जालें तत्वता । कां जे विरागे[१] पावलां तुम्ही ॥ ५८॥ तुम्ही आम्ही गुरुबंधु । तुम्हासी आम्हासी आत्मसमंधु । सद्गुरुनाथ कृपासिंधु । दया करो तुम्हावरी ॥ ५९ ॥ सद्गुरुकृपा असेल जयासी । आत्मसुख कळेल तयासी । शरण येईल तयासी । सांगणें ऐसी गुरुआज्ञा ॥ ६० ॥ ऐका आमुचें आत्मसुख ऐसें आहे । पाहणार पाहणें जात आहे । दृश्य द्रष्टा दर्शन रोहे[२] । अदृश्य शून्य उरेना ॥ ६१ ॥ ध्येय ध्याता ध्यान जातें । ज्ञेय ज्ञाता ज्ञान रोहातें[२] । सोहं हंसा हंसः सोहं रूप तें । अहंब्रह्म ब्रह्मास्मि ॥ ६१ ॥ सच्चिदानंद पदा परतें । तत्वमसि हें त्रिपद आरतें । नाना त्रिपुटी चौपुटी वरतें । निजगुज निगम प्रतिपाद्य ॥ ६३ ॥ मन उन्मन वृत्ति निवृत्ति । देह विदेह सहज स्थिति । संग निःसंग संग त्याग मति । मति सुमति वेगळें ॥ ६४ ॥ पिंड ब्रह्मांड तत्वविवरण । पाहातां अवघें प्रथमाचरण । सृष्टिक्रम उपसंहरण । आत्मसुख ऐकावें ॥ ६५ ॥ स्थूळ विराट देह निवृत्ति । सूक्ष्म हिरण्यगर्भी प्रवेशल्या मति । सूक्ष्म हिरण्यगर्भ निवृत्ति । कारण अव्याकृति प्रवेशल्या ॥ ६६ ॥ कारण अव्याकृति निवृत्ति । माहाकारणीं प्रवेशल्या मति । माहाकारण मूळमाया निवृत्ति । ईश्वर ब्रह्मीं प्रवेशल्या ॥६७॥ ईश्वर ब्रह्म पूर्णस्थिति । परब्रह्मीं गेलिया मति । परब्रह्मीं जातां कैंची मति । तें गति अवगति वेगळें ॥ ६८॥ परब्रह्मींचा प्रवेश । तेथें सर्वांचा आदेश । आदेश शून्य निरावकाश । आकाशब्रह्म सर्वत्र ॥ ६९ ॥ घट निवृत्ति मठीं जाली । मठ निवृत्ति महदीं जाली । महद निवृत्ति चिद्रूपीं केली । चिद्रूप निवृत्ति परब्रह्मीं ॥ ७० ॥ घटमठमहदचिदभास । उपाधि योगें भासलें

---

१ वैराग्य. २ अलीकडेच रहातें, म्हणजे जातें.

साभास । उपाधि निरासें सावकाश । आकाश ब्रह्म संचलें ॥ ७१ ॥ घटाकाश अंशें ब्रह्म जीव । मठाकाश अंशें ब्रह्म शिव । महदाकाश अंशें ब्रह्मदेव । चिदाकाश ब्रह्म निरुपाधि ॥ ७२ ॥ आकाश आदि-अंतीं निरुपाधि । माया कल्पित हे उपाधि । ब्रह्म निर्गुण निरुपाधि । श्रुति स्मृति शास्त्रार्थें ॥७३॥ जीवात्मा आणि शिवात्मा । परमात्मा आणि निर्मळात्मा । अवघा मिळोनि येक आत्मा । सद्गुरुनाथ निरोपिती ॥७४॥ नित्यानित्य विवेक विचार । माया ब्रह्म सारासार । हेतुतीत ब्रह्म निर्विकार । पिंडब्रह्मांडसंहारें ॥ ७५ ॥ तत्वमसि हें पदत्रय । दुसरें सच्चिदानंद पदत्रय । नाना त्रिपुटीतीत ब्रह्म अद्वय । वृत्ति निवृत्ति अनुभवलें ॥ ७६ ॥ अनुभवेंवीण अनुभव । आठवेंवीण आठव । नाना शब्दांचे शब्द गौरव । परब्रह्मीं हारपले ॥ ७७ ॥ ध्येय ध्याता ध्यानें । ज्ञेय ज्ञाता ज्ञानें । नाना त्रिपुटी वाक्याभिधानें । परब्रह्मीं हारपलीं ॥ ७८ ॥ त्वंपद जीव तत्पद शिव । असिपद ईश्वर स्वानुभव । विमळब्रह्म निरावयव । परब्रह्म अखंड हें ॥ ७९ ॥ कार्य ह्मणिजे सायास । कारण ह्मणिजे अध्यास । कर्ता अधिपत्य भास । परब्रह्मीं हारपले ॥ ८०॥ अनंत ब्रह्मांडाची खाणि । ईश्वरमाया पट्टराणी । माया दुहिता ब्रह्मघाणी । अष्टधा ब्रह्मीं हारपली ॥८१॥ येकें दोंनी तीनें पांच । पांच पंचवीस ऱ्हा प्रपंच । प्रपंचातीत निःप्रपंच । परब्रह्म सनातन ॥८२॥ येक ईश्वर दुसरी माया । तीन गुण पंचभूत माया । पाच पंचकें काया माया । मायातीत निरंजन ॥८३॥ अनंत ब्रह्मांडें उभारलीं । अनंत ब्रह्मांडें संहारलीं । अनंत ईश्वरीं जालीं गेलीं । अनंत ब्रह्म सनातन ॥ ८४॥ आह्मी आपुला करूनि अंत । सद्गुरुकृपें निवांत । निवांत वृत्तीचा करुनी प्रांत । आत्मसुखें संपन्न हो ॥८५॥ आत्मसुख तुह्मी पुसिलें । पुसिलें तरीं हें सांगीतलें । ऐकोनि परम समाधान जालें । स्वर्गस्थ काय बोलती ॥८६

१ त्रिपुटीच्या पलीकडे. २ प्रकृति. ३ परब्रह्म. ४ प्रकृति, पुरुष. ५ तीन गुण. सत्व, रजस्, तमस्. ६ पंच महाभूतें. ७ सर्वमिळून तत्वें. ८ पंचभूत पांचतत्वें मिळून झालेलें शरीर. ९ देव.

धन्य धन्य साधु तुह्मी । आह्मासि नेलें परब्रह्मीं । आत्मसुखीं स्वर्गसुखें आह्मी । कुखंडिलीं स्वानंदें ॥ ८७ ॥ धन्य धन्य तुमचा सत्संग । सत्संगें भक्तीचा प्रसंग । भक्तिप्रसंगें निजात्मरंग । आत्मारामीं अराम आह्मी ॥ ८८ ॥ एवं स्वर्गस्थ देवीं आत्मसुख पुसिलें । भगवद्भक्तें गुरुकृपें सांगीतलें । यथाविधि श्रवण केलें । संत सज्जनीं श्रोतेजनीं ॥ ८९ ॥ श्रोते ह्मणती जी सर्वज्ञ तुह्मी । समजोनि गेलां परब्रह्मीं । निज गुज तुमचें न कळोनि आह्मी । अनुमानरूपें राहिलों ॥९०॥ कायजी भिन्नत्वें बोलतां । तुह्मी श्रोते देवरूप तत्वतां । तुह्माचि साटीं निवृत्तिरामकथा । आत्मसुखें सांगीतली ॥९१॥ तुमचें आह्मासी मुख्य प्रयोजन । देवरूप श्रोते जन । तुह्मी भवस्वर्ग काम उपेक्षून । आत्मस्वरूप इछीतसां ॥ ९२ ॥ तथापि स्वर्गस्थांसी निजगुज सांगीतलें । सद्गुरुकृपे निरूपण केलें । आतां तुह्मी आत्मत्वें आत्मरूप इछिलें । तरी तुमचें तुह्मासी सांगों हो ॥ ९३ ॥ ह्मणाल ब्रह्मज्ञान बोलत गेले । ब्रह्मस्वरूप कोण जाले । ब्रह्म पाहोनी कोण आले । कोण गेले तया ठायां ॥९४॥ ब्रह्म पाहोनि येतां नये । ब्रह्म सांगोनि सांगतां नये । ब्रह्म हातीं देतां नये । ब्रह्म होणें सत्संगें ॥ ९५ ॥ खोटें दृश्य सांडोनि देणें । खरें ब्रह्मनाणें घेणें । साधक आटोनि ब्रह्म होणें । होणें न होणें सारूनियां ॥ ९६ ॥ विचारवंत संत महंत । येकांत स्थळीं बैसले निवांत । निवांतवृत्तीचा करूनि प्रांत । अंत प्रांतासी अलिप्त हे ॥ ९७ ॥ प्रवृत्ति सांडोनि निवृत्ति । प्रपंच सांडोनि परमार्थीं । अहंब्रह्मास्मि वाक्यार्थीं । बोलिलें समर्थीं ऐकावें ॥ ९८ ॥ आत्माअनात्मा विवेक विचार । नित्यानित्य सारासार । माया असार ब्रह्म सार । वेदांत सिद्धांत प्रतिपाद्य ॥ ९९ ॥ पूर्वपक्ष माया प्रधान प्रकृति । सांख्य योगींद्र विचार पाहती । वेदांत मतें माया म्हणती । नाम मात्र वेगळें ॥ १०० ॥ एवं परब्रह्म सूर्याची प्रभा । मृगांबु अंबा जगदंबा । नाना चुंबकसंगें अवलंबा । निरावलंबीं अवलंबली ॥ १ ॥

---

१ 'गुरुदेवें तुह्मासि' असा दुसरा पाठ. २ संशयामुळें. ३ नाहीं. तर सांगण्याचें प्रयोजन नव्हतें. ४ मृगजळ. ५ माहा. ६ लोह चुंबक.

चुंबकसंगें लोह चंचळ । तैसा ईश्वरसंगें मायाखेळ । परब्रम्ह तें निर्मळ निश्चळ । ईश्वर ब्रह्म सोपाधि ॥ २ ॥ उपाधि करितां ईश्वर ह्मणणें । उपाधियोगें कर्तृत्व लावणें । उपाधिनिरासें पूर्णपणें । ईश्वर ब्रह्म सनातन ॥ ३ ॥ कर्तेति नैयायिकि ह्मणती । ब्रम्हेति वेदांती प्रतिपादिती । सांख्य वेदांत ऐक्य होती । मूळप्रकृति कर्तृत्वें ॥ ४ ॥ एवं ईश्वरमायेचें कर्तृत्व । शुद्ध तत्व महत्तत्व । मूळमाया माहाकारणत्व । कारण माया अव्याकृति ॥ ५ ॥ अष्टधाप्रकृति पिंड ब्रह्मांड । स्थूळ सूक्ष्म कारण उदंड । कार्याकारण कर्तृत्व बंड । हेतु माया मूळमाया ॥ ६ ॥ विद्या अविद्या विवरावी । विवरोनि वृत्ति मुळीं न्यावीं । ब्रह्माकारवृत्ति नुरावी । नुरलेपण ही नुरावें ॥ ७ ॥ मायाआवर्तीं न पडावें । मायेमधूनि निघोनि जावें । जावें यावें नलगे स्वभावें । जेथील तेथें चि निजवर्म ॥ ८ ॥ आदि अनादि परब्रह्म । आदिपुरुष आत्माराम । माया अविद्या मिथ्या भ्रम । भवस्वर्ग संभ्रम मानूं नये ॥ ९ ॥ स्वर्गा वरुतें विष्णुपदीं स्थान । भूमीपासूनि कित्तेक लक्ष योजन । परतें परतें अवघें शून्य । खगोळ छपन्नकोटि हा ॥१०॥ सप्तकंचुक ब्रह्मांड । ब्रह्मांडा परतें ब्रह्म उदंड । निर्मळ निश्चळ स्वरूप अखंड । सहज सदोदित सनातन ॥११॥ परता परता पर नाहीं । पाहतां पाहतां आधार नाहीं । निराधार आकार नाहीं । शून्य नव्हे मा देखावें ॥१२॥ पाहतां दुरि दुरांतर । अंतर पाहतां निरंतर । निरंतर ह्मणतां अंतर । अंतरसाक्ष मावळला ॥ १३ ॥ देखतां देखतां ज्ञानचक्षु । निरसोनि गेले चर्मचक्षु । चर्मचक्षु ज्ञानचक्षु । पूर्वपक्षु निर्धारें ॥ १४ ॥ सिद्धांत ब्रह्म सनातन । शक्तिपातें तेंचि तें आपण । आपण ह्मणतां येईल मीपण । अहंब्रह्म ह्मणतां नये ॥ १५ ॥ अहं ब्रह्मास्मि उपदेशु । अहं ब्रह्म नाही लेशु । कळायासाठीं सर्वेशु । महावाक्यें उपदेशी ॥ १६ ॥

---

१ उपाधीमुळें ईश्वरत्व होतें. २ ईश्वर जगताचा कर्ता आहे असें न्यायशास्त्र ह्मणतें. ३ सांख्य आणि वेदांत या दोन्ही मतांत पुरुष कर्ता नसून सर्व कर्तृत्व मायेकडे आहे. ४ 'ब्रह्माकार झालों' अशी वृत्ति नाहींशी होऊन, वाल्लिलय झाल्याचेंही भान उरतां कामा नये. ५ सात आवरणांनी युक्त.

गुरु मौनी ।शिष्य मौनी । संत मौनी ग्रंथ मौनी । श्रोते वक्ते सर्व मौनी । मौनगर्भ विचारणा ॥ १७ ॥ मौनगर्भा पैलिकडे । आता सांगणें केवीं घडे । किती बोलावें मौन पडे । वेदश्रुतीसी निर्धारें ॥ १८ ॥ बोल बोलूनि अबोलणे ह्मणती । विपरीत संत अनुवादती । बोलणें तितुकी माया अर्ति । माये परती समाधि निद्रा ॥१९ ॥ समाधिनिद्रा योगनिद्रा । योगनिद्रेसी पातली निद्रा । तेथूनि निर्गति योगींद्रा । कदापि नाहीं ॥२०॥ एवं ब्रह्मजिज्ञासु विचार पाहाती । उपनिषदार्थ अनुवादती । भक्ति-मार्गें भगवंतीं । ऐक्य होती योगींद्र ॥२१॥ ब्रह्मज्ञानें कर्म उडवावें । मग ब्रह्मज्ञानी कैसें ह्मणवावें । कर्माकर्म विचारावें । विचाररूप सत्कर्म ॥२२॥ सत्कर्म[२] सद्वस्तु प्रतिपाद्य । असत्कर्म[३] भवस्वर्ग संपाद्य । ब्रह्मनिष्ठ ब्रह्मवृंद आद्य[४] । आद्य ब्रह्म विचारिती ॥ २३ ॥ श्रोते ह्मणती जी अनुभवलें आत्मस्वरूप अनुभवा आलें । सद्गुरुस्वरूप अनुभविलें । पाहिजे आतां ॥ २४ ॥ वक्ता ह्मणे काय जी बोलतां । जाण जाणोनि नेणीव येतां[५] । आत्मरूप ब्रह्मरूप प्रत्ययो येतां । सद्गुरुस्वरूप पुसतां जी ॥ २५ ॥ धन्य धन्य तुमची प्रश्नवाणी । जेथें कुंटित वेदवाणी । ग्रंथराज मुकुटमणी । सद्गुरुनाथ ऐका जी ॥ २६ ॥ सद्गुरुनाथ निरं-जन । वस्तु निर्गुण पुरातन । विमळब्रह्म सनातन । श्रुति संमति शास्त्रार्थें ॥ २७ ॥ वेदांतसिद्धांतप्रतिपाद्य वस्तु । जेथें सर्व मायेसी अस्तु । उदयअस्तेंवीण प्रशस्तु । आकाश ब्रह्म खं ब्रह्म ॥२८॥ गगन सदृशं स्मृतिवचन । अछेद्य अदाह्य अक्लेद्य पूर्ण । पूर्णा अपूर्णातीत परिपूर्ण । विशाळ विस्तीर्ण विश्वंभर ॥२९॥ अरूप अदृश्य अचिंत्य । निर्वि-कल्प निराभास कल्पनातीत । निरामय निरावयव व्योमातीत । गगनगर्भ सद्वस्तु ॥३०॥ मन बुद्धि अगोचर । अलक्ष ब्रह्म अपरांपर । निर्मळ निश्चळ निराकार । निर्विकार निजवस्तु ॥३१॥ सर्वधी साक्षिभूत ह्मणती ॥ तुरीय नव्हे ब्रह्म निश्चिति । गगनसदृशं खं ब्रह्म इति । साक्षिभूत निरंजन ॥ ३२ ॥

---

१ यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमंमम ॥ या वचनाप्रमाणें. २ निष्काम कर्मानें. ३ सकाम कर्मानें. ४ यांपैकीं पाहिलें ह्मणजे निष्कामकर्म. ५ अस्त, निरास.

गगन साक्षिभूत सर्वांचें । साक्षभूत नव्हे कोणाचें । उपाधींत सांपडलें ह्मणोनि यांचें । नाव घेती तत्वज्ञ ॥३३॥ तथापि मौनी साक्षि ठेविला । ध्यानस्थ गांहिसी लिहिला । तैसा शब्द निर्गुण ब्रह्माला । सर्वसाक्षत्वें लाविती ॥३४॥ ह्मणोनि सर्व सांक्षत्व तुर्येचें । तुर्या साक्षत्व ईश्वराचें । ईश्वरापरतें परब्रह्म साचें । सद्गुरुस्वरूप अखंड ॥ ३५ ॥ सद्गुरुकृपेचें बोलणें । बोलत असतांचि अबोलणें । बोलण्याचा उबेग धरणें । तरी जगदोद्धार घडेना ॥ ३६॥ बोलण्याचा उबग यावा । अबोल बोलें बोलें बोलावा । शब्द ब्रह्मीं साधकें निष्णात व्हावा । परब्रह्मीं पावावया ॥ ३७ ॥ ऐसीं वेदशास्त्रें बोलती । शब्दब्रह्मीं निष्णात होती । वाच्यांश लक्षांश सांडूनी जाती । परब्रह्मीं निर्धारें ॥३८॥ आतां वृत्तीसी न कळे निवृत्ति । निवृत्तीसी न कळे वृत्ति । वृत्तिनिवृत्ति सहजस्थिति । सद्गुरुकृपें अनुभविजे ॥ ३९ ॥ वृत्तिनिवृत्तिरूप पान्हेरा । अहेतुहेतु हेतु खरा । तरी वृत्तिनिवृत्ति व्यवहारा । बोलिलें पाहिजे परमार्थें ॥ ४० ॥ नाना कथानक संमति । वेदशास्त्र श्रुति स्मृति । आत्मशास्त्र गुरुप्रचिति । अवश्य बोलिली पाहिजे ॥ ४१ ॥ नाना आकाशीं होतां शब्दनाद । आकाश जैसें तैसें स्वतसिद्ध । तैसे नाना करितां बोध प्रबोध । स्वरूप संचलें सर्वदां ॥ ४२ ॥ शब्द गुण आकाशाच्या ठाईं । वस्तु आंगीं कांहींच नाहीं । निर्गुण निरंजन निःप्रपंच पाहीं । निर्विकार सदोदित ॥ ४१ ॥ गुरुमुखें निरूपणें विवरणें । नाना वृत्तिनिवृत्ति करणें । जैशा विद्युल्लता लवोनि निमणें । तैशा वृत्ति स्वरूपीं ॥ ४२ ॥ वृत्तिनिवृत्ति स्वरूपीं जाली ।

---

१ ग्वाहीस, साक्षिस. २ कंटाळा. ३ आपल्याला कांहीं मिळवावयाचें आहे या हेतूनें बोलण्याचा कंटाळा यावा. ज्ञान झाल्यावर असा कंटाळा येतो. ४ गीतेंतही हा च अर्थ सांगितला आहे, "यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति । तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ।$\frac{2}{52}$. ५ फलाच्या आशेनें बोलण्याचा कंटाळा आल्यावर तें च बोलणें निष्काम बुद्धीनें लोककल्याणार्थ बोलावें. अशा निष्काम बोलानें लोकसंग्रह होतो. ६ वृत्तींचा लय ज्यांत झाला अशी. ७ समाधि अवस्था. ८ 'पाहेरा' असा दुसरा पाठ.

मिथ्यापणें जनीं वर्तली । नाना सहगमनीं नारी मिरवितां देखिली । तैसि मनीं उन्मनी योगियां ॥ ४३ ॥ येकदेशी दृष्टांत बोलिला । संत जनीं क्षमा केला । कां जे शब्द मात्र मिथ्या जाला । शब्दार्थ राहिला शाश्वत ॥ ४४ ॥ मन उन्मन जालें स्वरूपीं । अवस्था निर्शन आत्मरूपीं । वृत्ति निवृत्ति स्वात्मस्वरूपीं । कांहीं हेतु उरेना ॥ ४५ ॥ कांहीं तऱ्ही उरे हेतु । तरी तो मूळमायेचा मुळतंतु । परब्रह्म तें तों निवांतु । मायातीत निरंजन ॥ ४६ ॥ मायातीत निरंजन । मायेकरितां संकेतवचन । संकेत नव्हे चंद्रदर्शन[1] । संतसज्जन जाणती ॥ ४७ ॥ संतजाण जाणोनि बोलती । तरी काय शब्द ब्रह्मींच वर्तती । अनुभव आनंद तदाकार वृत्ति । अनिर्वाच्य समाधान ॥ ४८ ॥ वेदें वेदांत सिद्धांत केले । तरी काय वेद शाब्दिकचि जाले । शास्त्रज्ञ शास्त्रार्थ उदंड बोलिले । तरि काय विसरले सिद्धांत ॥ ४९ ॥ उदंड पूर्वपक्ष केला । तरी काय सिद्धांत उडाला । जों जों पूर्वपक्ष मांडित गेला । तों तों सिद्धांत निश्चयें ॥५०॥ तैसें जें जें अनुभवें अनुभवलें । तें तें वृत्तिरूप दिसोनि आलें । वृत्ति निवृत्ति द्वैत निर्शलें । अद्वैत उरलें निरंजन ॥५३॥ अद्वैत ब्रह्म द्वैत माया । द्वैत अद्वैत घेते थाया । आतां निरसोत दशहि काया । सद्गुरु ब्रह्म सनातन ॥ ५४ ॥ सद्गुरुकृपेचें बोलणें । बोलण्यामाजी अबोलणें । संत सज्जन पावती खुणें । मी काय जाणे अज्ञान ॥ ५५ ॥ निवृत्ति निवृत्ति निवृत्ति । ह्मणतां कांहींतरी उठे वृत्ति । वृत्तिवीण निवृत्ति । बोलतांचि नये ॥ ५६ ॥ पूर्वपक्षेंवीण सिद्धांत । बोलतांचि नये निभ्रांत । वृत्तिवीण निवृत्ति ग्रंथ । करितांचि नये ॥ ५७ ॥ सद्गुरुनाथें दया केली । वृत्ति निवृत्ति राम जाली । राम उपासना बोळली । प्रगट निशाण रामाचें ॥५८॥ आतां श्रोते वक्ते निवृत्तिराम । संत सज्जन निवृत्तिराम । गुरुशिष्य निवृत्तिराम । सद्गुरुनाथप्रतापें ॥५९॥ निवृत्तिराम उपासना । निवृत्तिराम मनोभावना । निवृत्तिराम ग्रंथकथना ।

---

1 गणेशचतुर्थीला चंद्रदर्शन झाल्यानें चोरीचा आळ येतो. तशी स्थिति संकेतांत नाहीं. पुढील ओंवी पहा. संकेतानें बोललें ह्मणून ब्रह्म कांहीं संकेतरूप होत नाहीं.

निवृत्तिरामें संपविलें ॥ ६० ॥ ग्रंथाचें करावें स्तवन । तरी कर्ता राम मी नव्हे आपण । जैसें संताचें करितां स्तवन । भिन्नत्व जाण उडालें ॥ ६१ ॥ समर्थदेवें ग्रंथ केला । समर्थकृपें पूर्ण जाला । निवृत्तिरामअन्वयाला । श्रोतेजनीं परिसिलें ॥ ६२ ॥ श्रोते ह्मणती जी समाधान जालें । ग्रंथश्रवण संपूर्ण केलें । निवृत्तिरामीं मन निवालें । ग्रंथान्वयो ऐकिला ॥ ६३ ॥ समर्थ आख्यान प्रथम जालें । गुरुकृपास्तवन दुसऱ्यांत केलें । ब्रह्मानुभवकथन ऐकिलें । तिसऱ्या समासीं ॥ ६४ ॥ चवथ्या समासीं ग्रंथानुभवकथन । तेथुनी पुढें ग्रंथानुवर्णन । अनुक्रमें नाना प्रश्न । ग्रंथगर्भी परिसिले ॥ ६५ ॥ मनमाया निवृत्ति जाली । अहंमाया निवृत्ति जाली । अहंममतानिवृत्ति जाली । निवृत्तिराम ग्रंथार्थी ॥ ६६ ॥ भक्तियोगें निवृत्तिलक्षण । ज्ञानयोगें निवृत्तिलक्षण । वैराग्ययोगें निवृत्तिलक्षण । निवृत्तिरामीं बोलिलें ॥ ६७ ॥ भवोपसर्गनिवृत्तिकथन । सर्वसंकल्प निवृत्तिकथन । द्वासुपर्णानिवृत्तिकथन । निवृत्तिग्रंथीं ऐकिलें ॥ ६८ ॥ अभ्यासयोग निवृत्ति । स्वर्गकाम निवृत्ति । ब्रह्मगोळनिवृत्ति । निवृत्तिग्रंथीं बोलिली ॥ ६९ ॥ सृष्टिक्रमनिवृत्तिकथन । भेदाभेदनिवृत्तिकथन । स्वात्मबोधनिवृत्तिकथन । निवृत्तिरामीं ऐकिलें ॥ १७० ॥ मूळमायानिवृत्तिकथन । पंचीकर्णनिवृत्तिकथन । सर्वसिद्धांत निवृत्तिकथन । निवृत्तिग्रंथीं ऐकिलें ॥ ७१ ॥ ऐसें श्रोतेजन बोलिले । ग्रंथगर्भ होऊनि ठेले । समर्थस्तवनें करिते जाले । परमानंदें अल्हादें ॥ ७२ तरावया संसारसागरु । समर्थग्रंथ मुख्य तारूं । तेथील उपग्रंथ निवृत्ति विचारु । निवृत्तिराम या नावें ॥ ७२ ॥ समर्थ ग्रंथ सहस्रकरें । ज्ञानप्रकाशें महा थोर । तेथलि उपग्रंथ ऐक्यें करें । निवृत्तिराम या नावें ॥ ७३ ॥ समर्थग्रंथ महाद्वारीं । द्वारपाळ असती ब्रह्मच्यारी । तेथील उपग्रंथ ऐक्य ब्रह्मच्यारी । निवृत्तिराम या नावें ॥ ७४ ॥ समर्थग्रंथ मुख्य राजन्यँ ।

१ निवृत्तिराम ग्रंथाच्या पहिल्या समासांत सांगितलेल्या कथेला. २ ग्रंथाचा ठसा ज्यांच्या अंतःकरणावर उत्तम उमटला आहे असे. ३ श्रीदासबोध. ४ सूर्य. ५ केवळ एक. ६ किरण. ७ राजा ( सार्वभौम ).

9328

राजन्यापुढें उदंड प्रधान । तेथील उपग्रंथ ऐक्य प्रधान । निवृत्तिराम या नावें ॥७५॥ समर्थग्रंथ परमहंस । भोंवते विचारवंत योगी तापस । तेथील उपग्रंथ ऐक्य तापस । निवृत्तिराम या नावें ॥७६॥ समर्थग्रंथ सर्व संन्यासी । तेथील उदंड पडंगन्यासी । तेथील उपग्रंथ ऐक्य संन्यासी । निवृत्तिराम या नावें ॥ ७७ ॥ समर्थग्रंथ मुख्य ब्रह्मा । तेथें नारदादि पुत्रसमूह महिमा । तेथील उपग्रंथ वशिष्ठनामा । निवृत्तिराम या नावें॥७८॥ समर्थग्रंथ महाविष्णु । व्यापकरूपें देव जिष्णु । तेथील उपग्रंथ पार्षद सहिष्णु । निवृत्तिराम या नावें ॥७९ ॥ समर्थग्रंथ सर्वेश्वर । पुढें सन्मुख नंदिकेश्वर । तेथील उपग्रंथ शिवगण मनोहर । निवृत्तिराम या नावें ॥ ८० ॥ समर्थग्रंथ आत्माराम । पुढें उभा मारुति भीम । तेथील उपग्रंथ ऐक्य वैष्णवनाम । निवृत्तिराम या नावें ॥ ८१ ॥ समर्थग्रंथ निरोपमा । उपमा लाजिल्या मनोरमा । निवृत्तिराम ग्रंथमहिमा समर्थग्रंथीं विस्तारला ॥ ८२ ॥ समर्थग्रंथ स्वयंजोति । तेथील प्रकाशें प्रकाशकीर्ति । निवृत्तिरामग्रंथ सत्कीर्ति । समर्थकृपें अनुभविला ॥८३॥ समर्थग्रंथ श्रीदासबोध । तेथूनि सर्वही बोध प्रबोध । विमळज्ञान बाळबोध । सच्छिष्यांसी बाणेल ॥ ८४ ॥ एवं श्रीदासबोध समर्थग्रंथ । तेथूनि सर्वही परमार्थ । जाणती योगी संत महंत । ग्रंथराज मुगुटमणि ॥ ८५ ॥ ऐसे श्रोतेजन बोलती । संत सज्जन अनुमोदनें देती । निवृत्तिरामग्रंथ भावार्थी । समर्थचरणीं ठेविला ॥ ८६ ॥ समर्थसंदेश कृष्णातीरीं । ग्रंथ संपला गोदातीरीं । विजयनामे संवत्सरीं । संतसज्जनीं अवलोकिला ॥ ८७ ॥ सद्गुरुचरणीं निवृत्तिवेणी । निवृत्तिरामग्रंथ श्रवणीं । श्रवणमननें मानवी प्राणी । पावन होती सत्संगें ॥८८॥ इति श्रीनिवृत्तिराम । श्रीरामदासस्वामी विश्रामधाम । सर्व सिद्धांत निवृत्तिनाम । द्वाविंशति समासु ॥ ८९ ॥ समास ॥ २२ ॥ श्रीनिवृत्तिराम ग्रंथ संपूर्णमस्तु ॥ श्रीसद्गुरुनाथार्पणमस्तु ॥ श्रीपदभक्तिरस्तु ॥

---

१ आत्मनिष्ठ. २ जिंकणारा. ३ प्रचंड. ४ कीर्तिरूप प्रकाश. ५ पहिला समास पहा. ओंवी ९४–१०१. ६ शके १६३५.

॥ श्रीराम ॥

# श्रीगिरिधरकृत निवृत्तिराम ग्रन्थांतील नांवें, विषय, इत्यादिकांची

# सूची

( ज्ञान, भक्ति, निवृत्ति इत्यादि वारंवार येणाऱ्या शब्दांचा महत्त्वाचा निर्देश मात्र पुढील सूचींत केला आहे. पहिला अंक समासाचा व दुसरा ओंवीचा समजावा )


### अ

अकरा—संख्येचा उलगडा २१-१७ ते २१, २२

अक्रूर—वंदनभक्ति ८-९१, १३-५१

अक्षया ७—६६

अगस्ति-श्रीगुरुरूप १२-४३,२०-१०१

अग्नीध्र—राजा १७—४१

अंगद १३—५३

अजपा १४-३८ इ०, १४—६०

अतिकाया ७—७३

अत्रि ११-६८, १७-३३, २०—१०१

अद्वैत ४—४२, ८—५१, ८—७५, ९-१९, १७-१५, १७—१६, १९-३७, १९-७२ इ०,२२-१५४

अध्यात्म रामायण ८—६७, ९-५५, १८-१३,२०-१०, ३५, ३६, ७९, १३४, २१—१०६

अनसुया २०—१०१

अपभ्रंश १-८४, २-१६, ४-४४, १५—२५, १८—४८

अंबरीष १७—७७

अंबा २-१, राम अंबा एक २—१३, २०—७७, २२—१०१

अयोध्या २०-२४, २०—३४, साकेत २०-१००

अरुण १३—३०

अर्जुन ६—३२, ८—९७ सख्यभक्ति १८—५५

अवधूत १८—५६, ...गीता ४-४६

अश्वत्थामा १५—२१

अहल्या-गौतमपत्नी १३-३६,२०-९९

अहिमहि ७—८०

### आ

आनंद—संवत्सर १—१०१

आपस्तंभ—वेदशाखा १५—६५

आश्रमधर्म ५—३३

### इ

इंद्र-पुरंदर, रावणाचा माळी ७—७२, ...पद १३-२५, १३-३६, १३-४०, १५—२७, १५—३०, १५—४१, १५—५५

इंद्रजित ७—७९

### उ

उत्तर-मीमांसा ९—६२, १५—४५, १७—८४

उत्तानपाद १७—४१

उद्धव ४—४५, ५-३६, १२-३६ इ., १२—४१, १३—५१, १८—५५
उपासना—अनेक ठिकाणीं १५—४
उर्वशी १७—८१

ऋ

ऋषभ १७—५२, १७—७६ इ.

क

कंडु—मुनि १७—६५
कपिल-मातेला बोध ८-४१, १४-१, १७—३१
कबंध २०—१०४
करवीर १—४७
कर्दम—ऋषि १७—२९ इ.
कर्म १३-२२, १४-८३, १४-९१, १५-२, १५-४, १५-८, १५-१२ इ., १५-३०, १५-३८ इ., १७-८३, १८-३, १८-३०, १८-३५, १८-४४, १९-१८ इ., २१-६०, २२-१५, २२-२२, २२-२४, २२—४१, २२—१२२
सकाम...२-१७, ९-६२, ११-४०, १३-७, १४-७०, १५-३, १५-२३, १५-४३, १५-४५ इ., १६-६, १७-६७, १७-७१, १८-३७, २२-१३, २२-२१, २२—२२, २२-३५, २२-४८
निष्काम...११-६५, १३-७, १५-२, १५-९ इ., १५-४४ इ., १७-८, १७-१०, २१-७९, २२-४९
ब्रह्मसमुद्भव...११—४३
कवि-ऋषभपुत्र ४—४०, ९—७९
कश्यप १७-२९
कुंभकर्ण ७—७८, २०—१०७
कृष्ण १५—२१, १८—५५...कीटक १५—५२ इ.
कृष्णा १-३१, १-६०...तीरीं समर्थांची आज्ञा १—१४, २२—१८८
केतु ६—२३, ६—२५
कैकेयी ८—३७, २०-२३, २०-९८
कैलास ४-२४, ५-५० इ., १५-२३, २०-१०, २०—७८, २०-९६, २०—१३२, २१-९७, २२-५२
कौसल्या—आत्मदर्शन ८—११ इ०, १८—५३, २०—९७

ख

खट्वांग—राजा १७—७७
खर—राक्षस २०—१०२

ग

गजानन १—१, ६—६०, ८—२, ९—१६, गणपति १४—५२
गंगा-पाताळ...—नीळ...—ॐकार-रूपिणी इ० १२—३, निवृत्ति... १२—२१, ज्ञान... १३—४१, १५—३५, १६—५३ इ., अनेक ओघ १६—५४ गुप्त...१९—२४
गरुड १३—३०
गर्भगीता ४—४६
गायत्री ३—७ इ० अनेक ठिकाणीं.
गिरि ( धर ? ) १-१०१
गुण-सत्व रज, तम, १५-१२, १५-१५, १७-११, १९-२० इ. अनेक ठिकाणीं. त्यांवरून वर्णविभाग १७-८० इ०, १९—२०
गुरु गीता १-८४, १-८५, ४—४२, ४—४४, ६—४६ इ०, ९—७, २०-११८

गोकुळ १३—३८
गोदा २०—१२२, २२—१८८
गौतम ११—६८, १५—३९
गौतमी--गोदा १—३१, २०—३८
ग्रह ( मंडळ ) १६—४२

### च

चकोर १-२, १३-१२ इ०, १६-२
चंद्र ५—११ इ० अनेक ठिकाणीं, ६-२१ इ०, ७—२३, रावणाचा छत्रधर ७-७१,१३-१२,१३-३६, १३—४०, ...नाडी १४--३०, मेरूभोंवतीं भ्रमण १६-४१, २१-४०, २१-७१, २२—१४९
चंद्रगिरि १—४९
चातक १३—१२ इ० १६—२
चाफळ १—७५
चित्रकूट २०—१२, २०-२९, २०-३०, २०—४०, २०—१३५

### ज

जगदोद्धार १—४३, १-६९, २-१३, ७-५८, ७-५९, ८-७, १७--७२, १९—३५, १९-३६, १९-१८८, १९—१८९
जगदंबा-अंबा पहा
जटायु २०—१०१, २०—१०४
जनक--विदेही ९-२० इ०, ९—४९, ९—७७, १०-२९ इ०, मिथिलेश्वर १०—३९, १३-५१, १५-४२, १५—४३
जनस्थान १—५३, २०—१२, २०-३६, २०—१०२
जमदग्नि ११—६८
जैमिनि १५—४५, १५—४६
ज्ञान--अनेक ठिकाणीं, ...योगें निवृत्ति ९—४ इ०

### त

तारा--गुरुपत्नि १३—३६
ताटिका २०—९९
त्रिपुटी--ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान इ० ६—२९—३४ इ०, २२—६१, २२—६२, २२—७८
त्रिवेणी-भक्ति, ज्ञान, वैराग्य १—९५, ४--८
त्रिशंकु ३—२९, १५-२४
त्रिशिरा ७—७८

### द

दक्ष-प्रजापति १५-१, १५-१३ इ०, १७-२९ इ०, १७-३३, १७-७२
दत्तात्रय १—४७, १०—५४, १३-५२, १७—३३
दशरथ १८-५२, २०-२३, २०-९८
दासबोध १—८७, १—८८, २२—१८५, २२—१८६
दिक्पाळ १६—५०
दिग्गज १६—२३
दुर्योधन १८—५५
दुर्वास १७—३३, १८—५५
दूषण—राक्षस २०—१०२
देव-अमर १५-१८, १५-२४, १७-६७, ...भक्तांशीं ऐक्य २१—२१, २१-९२, २२—२७, २२—३१ इ०, २२—४० इ०, २२-४७, २२—५८
देवग्रह (?) १— ९८

देह–आठ किंवा दहा ४—४ इ०, ८–९४, ९—२०, स्थूलसूक्ष्मादि ९—३१, १४–८८, दहा १८—९ इ०, २०—२६, २०—६०, ... रूपक २१—९, २१—४७ इ०, २१—५५, २२—६६ इ०, २२—१५४
द्रोणाचल ७—८०
द्रौपदी १५—२१, १५—३०
द्वीपें—सात १६—५७
द्वैत ६–२० इ०, ८—५१, ९—१९, १२–२९, १३—५८, १८—७३, २०—२७, २२—१५३ इ०

**ध**

धर्मांगद—राजा १३—५३
धूर्जटी ६—५८, १३—२९
ध्रुव १२—४१, १६—४१, १६—४५ इ०, उत्तानपादपुत्र १७–४१

**न**

नंदन—संवत्सर १—१०२
नंदिग्राम २०—३४, २०—४०
नळ—वानर १३—५३
नहुष—राजा १५—२३
नाद–ॐकार १–११, अनाहत ध्वनि १४—१२
नारद ८–६६, ८—७८, १०—३३, १३—५१, १५—२३, १५—३३, १७—३५, १७—६४, १७—६८, १७—७२, १८—५६, २०—११, २०—७८ इ०, २०—१३३, २०—१७९
नारायण १७—३५, १९—१६ इ०, २०—१८, २०—९६, २१–४१
निर्गुण ९—६०, ९—९४, १६–१२ इ०, १७—८९ २०—४८, २१—११
निवृत्ति–सर्व समासांत अनेक ठिकाणीं; प्रवृत्तिमार्गें... ८—७१, ...एकदां झाली कीं नष्ट होत नाहीं ८–७५, ९—५२, २१–१७, २२–१३९ इ०, वृत्तीशिवाय ... नाहीं २२—१५६ इ०
नीळ--वानर १७–५३
नैमिषारण्य २०–११, २०–७८
न्यायशास्त्र ८–५०, ९–६१, १५–३९, २०–४८, २२–१०४, ... ह्मण १६–९ इ०

**प**

पंचवटी १–५३, २०–३६, २०–३८, २०–६६, २०–१०२, २०–१३५
पंचीकरण ५–१५, ९–१४, १०–४५, १९–१६९, २१–६ इ०, २१–३७, ४१, ५९, ७०, १०६
पंपा सरोवर २०–१०४
परळी–क्षेत्र १–३१, १–७६, १९–१
पराशर–व्यासपिता १०–१९
परीक्षित–श्रवणभक्ति १०--५९, १७-६३
पांचरात्र–भक्तिमार्ग ८–५०, ९–६२
पांचाळी—द्रौपदी १७–६५
पाताळें–सप्त १६–३७
पार्वती ५–५५, ६–५१ इ०, स्कंदाला बोध ६–५३, ५४, अंबा ६–५५ इ०, शैल्यबाळी ७–४७, गौरी ८–६५, ९—७, आदिशक्ति १५—१४, २०–१०, २०–३५, २०–७८, २०–८०, २०–११७, २०–१२६
पाषांड–नास्तिक, वेदबाह्य मत १३–२७

१५--२८, १८--२८, १८--२९, १८--४०, ...डी २०--१३६
पुरंजन—राजा १७--६४
पुरूरवा--राजा १७--८१
पुष्करणी—क्षेत्र ११—३ इ०
पुष्पक-विमान २०—१०९, रूपक २१—१५
पूर्वपक्ष ७—८३ इ०, ९—५९, १३-७, १६—६९, १६—७९, २२-१७, २२—११०, २२-११४, २२—१५२, २२-१५७
पूर्वमीमांसा ९—६२, १५—४५, १७—८२, १७-८४, २२—१५
पृथु—राजा ८—८८, १५—२७ इ० १५—३४
प्रकृति-अष्टधा ६—१०, २१—४, २१—५६, २२—१०६
प्रचेते—दहा १७—६५
प्रल्हाद—स्मरणभक्ति ८—८१, १२—४१, १३—५१
प्रवर्ष—पाराशर १—४८
प्रळय--विवेक... ६--३०, ७--३८, १६--८०, १८--६७, १९--११०, महा... ६—३०, ९--२८, १८-६७, ...मान १८—६८, १९—११०, १९—१३१, १९—१३७
प्राचीनबर्हि—राजा १७—६४
प्रियव्रत—मनुपुत्र-राजा १७-४१ इ०, १७—७५ इ०

ब

बदरिकाश्रम १२—३८
बलि—आत्मनिवेदनभक्ति ८—१०४, १३—५१, १५—३५, १५-४१, १६—३८
बाईयाबाई—वेणाबाईची शिष्या १—९८
बाहुक्षेत्र १—६० इ०
बिंदु-अर्धमात्रा, ॐकाराचें मूळ १-११
बिभीषण १२—४०, २०—१०८, रूपक २१—१३, २१—२४ इ०, २१—५९, लंकेश २१—७४, चिरंजीव २१—८३, २१—८७, २१—९६ इ०, २१—१०५
बृहदारण्य—श्रुति १९—६६
बोलणें—अबोलणें ४—७, ४—३४, १०-४९, २२-११९, १३६, १३७, १५५
बौद्ध १५-६२
ब्रह्म-जनकाला बोध ९-२२ इ०, १०-१३, ...गीता २२-२७
ब्रह्मदेव-विधि, कमलोद्भव इ० ५-५१ इ० ५-६८, ६-६४, चतुरानन ७-२८ इ०, ८—६६, ९—६४, १३—१९, १३—४३, विष्णुसुत १४-५२, १५-४१, १६—१७, १७-३६ इ०, २०-११, २०-१७, ७८, १३३, २१-४०, २२—२७, २२-१७९
ब्रह्मांड पुराण ८-७६, २०-१३४

भ

भक्ति १-३३, १-३७, १-९५ इ०, नवविधा...२-३, ८-९, ८-७० इ०, ८-१०५ इ०, ११-६३, १३-४८, निष्काम..., निष्काम भजन ६-३८ ९—९६, १५—६, १५—४३, १५-६२, १७-६९ इ०, १९-३८ इ०, १९-४६, ६१ इ०, २०-७०, २१—९२, २२—१४, १२१: ...योगें निवृत्ति ८—१ इ०,

भगवद्गीता १—२७, ४-४५, ६-११, ३१, ३२, ४९, ९—७३, ११—४२, १४—६६, १५-४६, ४९, १६-५८, १७--१०, २५, १८-५५
भरत—रामाचा बंधु १८—५२, २०—१२इ०, २०—२७,...रामभेट २०—३२, २०—४०, ८१, ९८, १०९, १२७, १३५, रूपक १—१६, २१—१५, ऋषभपुत्र १७-५१, जड...१७—५३ इ०
भरतखंड १-७८, १५-१८, १७-५१
भविष्योत्तर पुराण १—२६
भागवत—पुराण ४—४५, ६—१५, १०—३३, १०—५८, १४—६७, १४—७०, १५—४९, १७—३, १७—२५, ३०, ४०, ४१, ४२, ६४, ६८, १८-५५, ...भक्त १२-४० इ०, १५—२२, २२—५१, ...धर्म १५—३३, १७—४५, १०--६९, २१—७५, २२—५३
भारत १५—४६
भारद्वाज—ऋषि ११—६८
भार्गव २०—१००
भीमसेन १—२८
भीष्म १३—५१
भूतें—पांच ५—६५, १६—१८ इ०, २१, ३९, ४५, ४७ इ०, २२-८३
भृगु १५—६६

म

मनु १७-२९, १७-३५ इ०, चवदा... १७—३८, ३९ इ०
मय १६—३८
महंत १—८९, १९—८५ इ०, १९-१२३ इ०, १९-१२६, १३४ १७४, २२—१८६
महावाक्य १५-४८, १७-६०, २०-५९, ६१, ७०, ७१, २१—१०७, २२-११६
मायासुर १६—३८
माध्व—द्वैतमती, भक्तिमार्गीय १८-५
मार्ग—भक्ति..., ज्ञान..., विहंगम... इ० १८—७ इ०, गुरु... १९-५०, ११७, कर्म... २२—१५, भक्ति... २२—१२१
मिथिला ९-२१ इ०, १०-३४ —जनक पहा
मुक्ति—चतुर्विध ३-२९, ११—६३, १३—४८, १९—४७
मेनका १२-३७
मेरु १२—३१, १६—२२ इ०, सर्व देवांचें स्थान १६-३०, ...भोंवतीं सर्व लोक १६—४७ इ०
मैत्रेय ( मैत्रेयी ) ३—१७
मोहिनी १३—३६

य

यदु—अवधूताचा त्याला बोध १८-५६
ययाति-राजा १५-२४
याज्ञवल्क्य ९-२१, जनकाला ज्ञानोपदेश ९-३७ ९-४४ इ०, ९-४८
युग १—२७, १—२९, ८—४७ इ०, १३—२७, १५—६१, ...मान १८—६८ कृत...१-२८, ७-२१, १७—४५, वर्णविभाग नाहीं १७—८१ त्रेता... १-२८ द्वापार... १-२८ कलि.... १—

२८, १—३०, ३९, १३—२७, १५-६०
योग-भक्ति..., कर्म..., ज्ञान... इ० ८-४०, ९-१७, १०-६३, ११-४९, १९-१८९, पातंजल...८-५०, अभ्यास...१४-६ इ०, हठ...१३-२१, अष्टांग... १४-८ इ०, राज... १४—३७
योगी ११—२९, १४—१९ इ०, २२—१८६
योगवासिष्ठ ४—४७, १५—५२ २१—७३

र

रतिपति-मदन २०-२१ इ०
रमा ५—११ इ० अनेक ठिकाणीं, ८-८४
रंभा १७—६५ इ०
रहूगण राजा—जडभरताशीं संवाद १७-५७ ते ६०
राम-रघुनाथ, रघुपति, जानकीजीवन इ०, अनेक ठिकाणीं, तारक ब्रह्म १-३८; ५-५४ इ०, ५-७०, ७-७४, ९—६, १५—६३, २१—२६, कौसल्येला आत्मरूपदर्शन आणि बोध ८-११ इ०, ८-४२, ९-८३, १०—१०, १५—५२ इ० हनुमंताला उपदेश २०—१२, १३ इ०, २०—३७, लक्ष्मणाला उपदेश २०-४२ इ०, हनुमंताला उपदेश करावयास सीतेला आज्ञा २०—८८, ९०, ...कथेवर रूपक २१—८ इ०, २१—२१, २२, २२-१५८
रामगीता ४-४६, २०-१०, २०-९१, ११९, १२६, १२८, १३६, १३७
रामदासस्वामी-श्री १-२५, १-२८, ३२, ३९, ४०, ४४ इ०, हनुमानाशीं भेट १—५७ इ०, धर्मसंस्थापक १—४३, १—७१, समर्थ ४—३७, ८—८, १०—१५, १२—५, १४—६२, १७-६९, १७—९३, १८—७३, २२-१६२ इ०, २२-१७३ इ०, २२—१८७ इ०,
रामलिंग—क्षेत्र १—६० इ०
रामेश्वर—क्षेत्र २१—१
रामायण ७—६३, २०-८०, शतकोटि...२१-१२
रावण १-६२, वेदांचीं खंडें करणारा ७—७०, ७४, रामाशीं ऐक्य ७-८९, १२-४०, १५-३८, २०—८१, दशानन २०-१०७, रूपक २१—१०, दशकंठ ( कंठइंद्रिय ) २१-१०, २२-४२
राहो—राहु ६—२० इ०
रुक्मांगद १३—५३
रुद्र—तमोगुणी १२—१५, १३—३६, १४-५१, २१-३०, २१—४१

ल

लक्ष्मण—सौमित्रि इ० १-१६, ७-७९, २०-१२, १८, ३७, ३९ इ०, सहस्रफणी २०—४३ इ०, चक्षुःश्रवण २०—७३, २०—७६, २०-८१, ९८, १२७, १३५
लक्ष्मी ५—११, ५—४५ इ०, सिंधुबाळी ७-४७, रमा पहा.
लंका ७-७३, १६-२६, २०-१०३,

१०५, १०७, २१-३०, ७९, ८४
लिंगपुराण १२--१५
लोक-सात १६-४७
लोकसंग्रह ६-१५, ६-२४, ११-२९, १९-५, १९-६
लोकानुग्रह ७-९, २०-४३, ४४, ६६, ८७, २१-९३
लोकालोक-पर्वत १६-२४, ६३

व

वराहस्वामी ११-४ इ०
वरुण-रावणाचा सेवक ७-७१, २१-४३
वर्ण-...संकर ११-१२, ...विभाग १७-८०, ८१
वसिष्ठ ७-२१ इ०, ८-३५, १०-१९, ११-६८, १५-४१, १५-५२ इ०, १८-५४, २०-१३ इ०, २०-३८, ४०, ४४, ९८, १२८, २२-१७९
वसुदेव १८-५६
वामदेव १८-३८
वामन १५-३५, ३६
वायु-रावणाचा सेवक ७-७१, १४-१८ इ०, १४-३६ इ०, १४-५३ इ०, २१-४, ५, ...पंचक २१-४२
वारुणि १५-६६, भृगु पहा.
वाली १२-६८, २०-१०४
वाल्मीकि ४-४०, ९-७९, ११-६८, १३-५४, १८-३८, १९-१५२
विजय-संवत्सर २२-१८८
विदेह ४-४०, ९-३७, ९-४९ इ०, जनक पहा.
विधि-ब्रह्मदेव-शास्त्रोक्तमार्ग ७-५५, ५६, ७-७०, ११-५४, २१-८०, ब्रह्मदेव पहा.
विराध २०-१०१
विश्वामित्र ७-२१ इ०, कौशिक ११-६८, १३-३७, १८-५४, २०-९८
विषय-शुद्ध, सेव्य ११-५१, ५२, ५८ इ०, शबल ११-२९, ११-४४, ...पांच ११-३३, ११-५१ इ०
विष्णु-वैकुंठनाथ इ० ५-४२ इ०, ६-१३, गरुडवहन इ०, ७-४२ इ०, ८-३३, ८-८०, १३-३६, १४-५३, १५-१९, ३१, १६-१७, १७-९, १९-१०३, २१-४०, २२-१८०
वृंदा १३-३६
वेणी १-९५, निवृत्ति... १-९८ इ० अनेक ठिकाणीं, ...संप्रदाय १-९८, त्रिवेणी १-९५, ४-८ इ०
वेदांत ८-५०, ९-६१, इतर शास्त्रें, उपकरणें ९-६३, १६-१५, १७-८४, २०-४८, ४९, ६१, ६३, ११५, २२-१९, १००, १०४, १२८, १५१
वैकुंठ ४-२४, ५-५० इ०, ११-१, ११-७, २३, ६६, २०-९६, १३२, २१-९७, २२-५२
वैराग्य १-३८, १-९५, ९-१७, ...योगें निवृत्ति १०-४ इ०, १०-२०, १०-४० इ०, १९-३६ इ०
व्याकरण ३-८, ब्रह्माला दृष्टांत ९-६९ इ०, ९-७२
व्यास ४-४०, ८-६६, ९-७९,

८४ इ०, जनकावरील आक्षेप खंडन ९—८५, ९-९९, १०-२६ इ०, ११—६८, १२—३९, १३—५४, १५—४५ इ०, भागवत रचना १७-६८, २०-११

**श**

शक्ति—वसिष्ठपुत्र १०-७९
शंकर-हर, पार्वतीनाथ, कैलासनाथ इ० ५-४९ इ०, नंदिवहन इ० ७-४२ इ०, ८—६५, ९-१६, शूलपाणी १५-१९, १५-२३, १६-३७, २०-१०, २२, ७८, ८०, ११७, १२६
शंकरमूर्ति-शंकराचार्य १-५५
शंख २०-१८, २०-२३, २४
शतरूपा-मनुपत्नि १७-३६
शत्रुघ्न १—१६, २०—४०, ८१, ९८, १२७
शबल २-२२, ८-४०, विषय ११—३४, ११-४० इ०, पक्षी १३-१६ इ०, १४-६५, १५-२, ५१, १६-१०, १७-२५ इ०, १८-२३, १८-५८, १९—१३२, २०—११३, २२—२५
शबरी २०-१०४
शंबर २०-२१
शाक्त ८-५०, ९-६२
शांडिली २-१५
शिव-शिवाजी, ...गण १-४८, शंकर, ...गण २२-१८१, ...गीता ४-४६
शिवतर-गांव १—४८
शुक-व्यासपुत्र १-४१, ८-१०६, ९—९९, १०—१९, २४ इ०, १२-४५, १३-५१, १५-४२, ४३, १७-६३, पोपट, ...नलिका न्याय ७-६१, १८—७
शुक १५—३७
शुद्ध २-२२, ८-४०, ११-३९, १४-६५ १५-५१, १६-१०, १७-२५ इ०, १८-५८, १९-१३२, २०-११३, २२-२५
शूर्पणखा २०-१०२
शेष ९-६४, १६-२३, १६-३८, २०-१८, ...चा अवतार लक्ष्मण २०—४३, ७३, ९६, लक्ष्मण पहा.
शैव ८-५०, ९-६२
शौनक ४-४०, १३-५१
श्रीशैल्य १२-१, ५ इ०

**स**

सगुण-भक्ति, ध्यान इ० ९-५८, ७६, ९४, ९५ इ०, ११-३९, १५-४, १६-१३, ७६, १७-८९, २०-४८
संकर्षण १६-३८
संग १०-९, १०—३९ इ०
सत्संग-मुक्तांना हि पाहिजे १०-६१, ११-६१, १७-८५, ८६, १८-८, १९-५५ इ०, १७-७५, ८२ इ०, १४२ इ०, १७५ इ०, २०-६९, २२-८८, ९५
सद्गुरु—महिमा १-१४, २० इ०, कर्णधार १-२०, ३०, २-३७, ३-४०, ६-३९, ८-६८, ८-१०९ इ०, ९-६०, ९२, ११-२४, ६५, ६९, १२-२२, ४८, १३-६३, १४-६३, ७४, ९१, १५-५९, १६-८० इ०, १७-९४,

वा. ९३२४ श्री निवृत्तिराम



९५ इ०, १८-२० इ०, १९-८,४८
इ०, २०-११७ इ०, २१-२, ३
७, १७, २१, २२-८, १२४, १२५
१३५, १५५
सनक-ऋषि १३-५१, १५-२२, १७—
१२, २२-१८, ३४
सनत्कुमार १७-२२
समर्थ—रामदास पहा.
समाधि ९-९२, १४-१८ इ० अनेक
ठिकाणीं, सहज ... १४-८९
समुद्र-सात १६-६०, ६१
सांख्य ८-५०, ९-६१, १४-१, २०—
४९, ११५, २२-१००, १०४
सिद्धांत ७-८४, ९-५९, १६-६९
७९, १९-१५१ इ०, २२-८, १०
१७, २०, ९९, ११५, १५२, १५
सिद्धि-अणिमादि १-४४
सीता—जनकनंदिनी ८-३१, ...स्व
वरावर रूपक ९-५३, ५७, ७६ इ
२०-३७, योगमाया २०-७५, मा
तीला उपदेश २०-९२, १३०, २
१४, ८९
सुग्रीव १३-५३, २०-१०४
सुमित्रा ८-३७, २०-९८
सुमेधा--जनकपत्नि ९—८१
सुवेळा-पर्वत ७-६६ २०-१०६, रूप
२१-९
सूत ८-६६, २०—११, ७८, १३
सूर्य ६-२१ इ०, ७-२३, रावणाचे
उभा ७-७१, १४-१७, ...न
१४-३०,...मेरूभोंवतीं फिरतो
सेतुबंध २१-४३, २२—७, १०१
सोहं-हंस २१-१, रूपक २१-९
पहा.
स्कंध १-४१, ५-५६, ६-४४ इ०, कार्तिक, सेनानी ६—४९, षडानन
६-५३, क्रौंचदमन ६-५६, ७-१,
कपाटस्वामि ७-२, ९-१६

ह

हनुमंत १-१६, २८, ३२ इ०, समर्थांना
भेट १-५७ इ०, वज्रदेह १-७८,
७-७६, ८—९४, १८—५२,
२०—१२, ८१, रामाचा उपदेश
२०—८६, सीतेचा उपदेश २०—
९३, १२५, चिरंजीव २१-८३, ८५,
बिभीषणाशीं ऐक्य २१-८९, २१—
९३, २१—९६
हरि—ऋषभपुत्र ४-४०, ९—७९
हरिश्चंद्र १७—७७
हरिसंकल्प १—२७, ८—४, ८—७७,
१२—१६, १९, २६, ३१ इ०,
१३—४९, १६—७७, १९—४८,
१९—१३१, १४७ इ०, २०—५६
हरिहर—अनेक ठिकाणीं—दोघांचें ऐक्य
७-५२, १२-१९, १६-३१ इ०,
२१—१९
हरिहरविधि—ब्रह्मा विष्णु महेश, पुष्कळ
ठिकाणीं.
हंस—सनकादिकांस वोध ४—३९,
१३—४४, १७—९, सोहं—अजपा-
जप १४-३८, ४६, १७—८७
हिमालय १—५०, ५—५३